महाराष्ट्राचे शिल्पकार

# प्रा.र.धों.कर्वे

डॉ. अनंत देशमुख



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# महाराष्ट्राचे शिल्पकार

# प्रो. र. धों. कर्वे

डॉ. अनंत देशमुख

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

महाराष्ट्राचे शिल्पकार क्र. ३५

प्रथमावृत्ती : फेब्रुवारी, २०१३

**प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, २रा मजला,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

© प्रकाशकाधीन

**मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई ४०० ००४.

**किंमत :** रु. ६५/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

प्रो. र. धों. कर्वे यांनी जे सामाजिक कार्य महाराष्ट्रासाठी आपल्या विविध क्रांतिकारक उपक्रमांनी पार पाडले त्याला तुलना नाही. संततिनियमन हा एकेकाळी वादग्रस्त विषय बनलेला होता. आपल्या समाजातील अनेक रूढ गैरसमजुतींना छेद देणारे कार्य प्रो. र. धों. कर्वे यांनी निष्ठापूर्वक आणि पराकोटीची टीका सोसून निर्भयपणे पार पाडले. आज त्याची फळे आपला समाज चाखत आहे. प्रो. र. धों. कर्वे यांचे बृहद्‌चरित्र प्रा. अनंत देशमुख यांनी यापूर्वीच लिहिलेले आहे. परंतु 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या चरित्रमालेमध्ये कर्व्यांचे सर्व कार्य अधोरेखित करणारा आटोपशीर ग्रंथ लिहिण्याचे कार्यही त्यांनी मंडळाच्या विनंतीवरून पार पाडले आहे. या चरित्राचे महाराष्ट्रातील वाचक स्वागत करतील याची मला खात्री आहे.

**मधु मंगेश कर्णिक,**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

स्थळ : मुंबई,

दिनांक : ४ फेब्रुवारी २०१३.

# मनोगत

‘ रधों ’ हा प्रो. रघुनाथ धोंडो कर्वे यांच्यासंबंधीचा अष्टखंडात्म महत्त्वाकांक्षी प्रकल्प ऑक्टोबर २०१० मध्ये ‘ पद्मगंधा प्रकाशन, पुणे ’ यांच्यामार्फत प्रकाशित झाला आहे. त्यात ‘ समाजस्वास्थ्यकार ’ हे त्यांचे चरित्र मी लिहिले आहेच. ‘महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने’ त्यानंतर याच विषयावर पुन्हा चरित्रलेखन करण्याचे सुचविले तेव्हा मन साशंक झाले. पण पुढे रघुनाथरावांच्या जीवनकहाणीची मूळ चौकट न सोडता नव्या उपलब्ध माहितीने आणि संशोधनाच्या शिस्तीत बसू शकेल असे चरित्रात्मक लेखन करण्याचे आवाहन स्वीकारावे असे वाटले.

साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष आदरणीय मधु मंगेश कर्णिक व तत्कालीन सचिव श्री. सुरेश वांदिले यांनी ही जबाबदारी माझ्यावर टाकताना जो विश्वास दाखवला त्याबद्दल त्यांचा मी कृतज्ञ आहे.

रसिक याला उचितसा प्रतिसाद देतील याची खात्री वाटते.

—अनंत देशमुख

# अनुक्रमणिका


पृष्ठे

१. **विद्यार्थिदशा** १-१६

दीडशे वर्षांतील स्थित्यंतरे—रघुनाथरावांची विद्यार्थिदशा

२. **नोकऱ्यांमधील अस्थिरता** १७-३४

एल्फिन्स्टन मिडल्स्कूल, नॉर्थकोट हायस्कूल-कोल्हापूर, एल्फिन्स्टन कॉलेज-मुंबई, कर्नाटक कॉलेज-धारवाड, डेक्कन कॉलेज-पुणे, गुजराथ कॉलेज-अहमदाबाद, विल्सन कॉलेज-मुंबई, नैरोबी पर्व-बॉम्बे बेहरिन कंपनी.

३. **वैवाहिक जीवन** ३५-४२

प्रेमविवाह-सुखपूर्ण जीवन-आजारपण-स्वतंत्र व्यक्तित्व-मालतीबाईंचा मृत्यू.

४. **जीवितकार्य** ४३-७२

संततिनियमन केंद्र-मिसेस मार्गारेट सँगर आणि मिसेस हाउ मार्टिन-संपादने-भाषणे-लेखन-संस्थांचे पदाधिकारी.

५. **गैरसमज, वस्तुस्थिती आणि मनोभंग** ७३-८६

किर्लोस्कर मासिके-विल्सन कॉलेज-अप्पा पेंडसे-पी.इ.एन.-रीझन-दक्षिण महाराष्ट्र पुरस्कार समिती.

६. **आजारपण आणि उत्तरपर्व** ८७-१२४

आजारपण-मान्यतेला सुरुवात-सत्तरीच्या निमित्ताने सत्कार-'समाजस्वास्थ्य'ला पंचवीस वर्षे पूर्ण-नागरिकांकडून थैली-अखेर-वाचकांच्या दृष्टीतून रघुनाथराव-रघुनाथरावांच्या शब्दांत रघुनाथराव-रघुनाथरावांच्या व्यक्तित्वाचे आणखी काही विशेष-हेही रघुनाथराव लिहू जाणोत-प्रवर्तकत्वाचा निर्विवाद मान.

**टीप.—**

रघुनाथराव बी. ए. होतात तोपर्यंत चरित्रात रघुनाथ असा एकेरी उल्लेख केला आहे. मात्र आपल्या बालपणातील आठवणी त्यांनी पुढे सांगितल्या. त्यातील मजकूर उद्‌धृत करताना ' रघुनाथराव लिहितात ', ' रघुनाथरावांनी लिहिले आहे ' असे आदरार्थी उल्लेख केले आहेत.

# १.  विद्यार्थिदशा

## दीडशे वर्षांतील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व शैक्षणिक स्थित्यंतरे

रघुनाथ धोंडो कर्वे (१४ जानेवारी १८८२–१४ ऑक्टोबर १९५३) यांच्या जीवनचरित्राची ओळख करून घ्यायची म्हणजे गेल्या दीडशे वर्षांतील जीवनाच्या विविध क्षेत्रांमधील स्थित्यंतरांची प्रथम जाणीव करून घेणे होय. ही जाणीव झाली की मग रघुनाथरावांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीकडे, तत्कालीन त्यांना उपलब्ध झालेल्या परिस्थितीकडे, त्यांच्या विचारांकडे व कर्तृत्वाकडे वळावे लागेल. त्यांचा जन्म हिंदू संस्कृतीत झालेला असल्याने तिच्यातील चातुर्वर्ण्यप्रधान जातीव्यवस्थेत विखुरलेला, अध्यात्मप्रवण दृष्टिकोन या साऱ्यांचे परिणाम त्या काळात जन्मलेल्या व्यक्तींना भोगावे लागत. १८१८ साली पेशवाई बुडाली आणि अव्वल इंग्रजीचा काळ सुरू झाला. १८१८ ते १८५७ या काळात इथे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य होते. १८५७च्या बंडानंतर जो लोकक्षोभ झाला त्याचा परिणाम असा झाला की देशाचे प्रशासन ब्रिटनच्या राणीच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या ब्रिटिश सरकारकडे गेले. माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या काळात (१८१८-१८२७) शाळा सुरू झाल्या आणि १८४० साली ' बोर्ड ऑफ एज्युकेशन 'ची स्थापना झाली. १८५७ साली मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली आणि शिक्षणाचा पद्धतशीर प्रसार व्हायला सुरुवातच झाली. कोकण किनारपट्टीवर असलेली बंदरे विकसित होऊन जलवाहतुकीला प्राधान्य मिळाले. मुंबईत कार्यालये सुरू झाली. गिरण्या सुरू झाल्या, गोदींचा विकास झाला. परिणामी नोकऱ्यांच्या संधी वाढल्या. शिक्षणाला त्यामुळे अधिकाधिक महत्त्व आले. कोकणातील तरुण नोकरीसाठी, त्यातही बुद्धिमान तरुण शिक्षणासाठी आगबोटीने मुंबईस येऊ लागले. त्या काळात बालविवाहाची प्रथा होती आणि असे विवाह झालेले तरुण आपल्या बायकांना गावाकडे एकत्र कुटुबांत ठेवून मुंबईत येऊन शिक्षण घेत. नव्या राजवटीमुळे जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये वेगवेगळी स्थित्यंतरे झपाट्याने होत होती. या बदलत्या परिस्थितीचे भान काहींना वेळीच आले. (हिंदू धर्मातील ब्राह्मण वर्ग शिक्षणाशी संबंधित असायचा.)

·अध्यापनमध्ययनं यजनं आजनं तथा ।
दानं प्रतिग्रहश्चैव षट्कर्माण्यग्रजन्मनः ।।

म्हणजे दुसऱ्यास शिकवणे, आपण शिकणे, स्वतः यज्ञ करणे, दुसऱ्याच्या घरी यज्ञ करणे, दान करणे व दान घेणे ही ब्राह्मणाची षट्कर्मे मनूने लिहिल्याचे लोकहितवादींनी 'ऐतिहासिक गोष्टी'मध्ये लिहिले आहे. मात्र एकोणिसाव्या शतकात प्रारंभी चालत आलेल्या या गोष्टी पुढे बदलत गेल्या. 'सांप्रत मुंबई येथील हिंदू लोक इंग्रजी भाषा आणि विद्या यापासून संसारात उपयोग आहे म्हणून त्या शिकणे, हाच मोठा पुरुषार्थ मानून त्यात सर्व वेळ खर्च करीतात. आणि देशपरंपरागत जी स्वभाषा किंवा त्या भाषेचे मूळ आणि धर्मशास्त्रे, पुराणे यांच्या ज्ञानास साधन अशी संस्कृत भाषा तिचा अभ्यास करण्याकडेस काहीच लक्ष देत नाहीत. त्यामुळे येथील लोकांची भाषा व स्थिती ही विलक्षण होत चालली आहेत...' असे ८ मे १८४२ रोजी 'प्रभाकर'पत्रात भाऊ महाजन यांनी 'मुंबईतील हिंदू लोकांची स्थिती-रीती' शीर्षकाखाली लिहिले आहे. हे मुंबईत जसे घडत होते तसे ते पुण्यातही. 'याउप्पर खांद्यावर शालजोडी टाकून हिंडण्यात प्रतिष्ठा राहणार नाही. तू शहाणा असलास तर इंग्रजी शीक' असा सल्ला मोरशास्त्री साठे या शिक्षकांनी कृष्णशास्त्री चिपळूणकरांना दिला होता.

'त्यावेळचे माझ्या क्षितिजावरचे महत्त्वाकांक्षेने अत्युच्च शिखर म्हणजे सहाव्या इयत्तेची परीक्षा देऊन ट्रेनिंगात जाणे, तेथून पहिल्या प्रतीचे सर्टिफिकेट मिळवून मास्तर होऊन बाहेर पडणे, हे होते......... परीक्षेला कोठे जावे, हा एक प्रश्न येऊन पडला. मुंबईला जावयाचे म्हणजे गलबताच्या स्वाधीन, अर्थात अनिश्चित....... घरीच चवथी इयत्ता पुरी करून माझे सहाध्यायी मुंबईत रॉबर्ट मनी स्कुलात शिकत होते. त्यांजबरोबर मुंबईला जाऊन नवीन वर्ग सुरू होण्याबरोबर मी पाचव्या इयत्तेत जाऊन बसलो. मुरुडची पुष्कळ मंडळी मुंबईला असत. मुरुडच्याच विद्यार्थ्यांनी मिळून एक खोली घेतली होती. जेवावयाला मुरुडच्या नागोपंत दातारांनी नुकतीच खाणावळ घातली होती, तीत जात असे.' असे अण्णा कर्वे यांनी 'आत्मवृत्त'मध्ये म्हटले आहे.

अण्ण कर्वे यांचे हे विचार इथे मुद्दाम उद्धृत करण्याचे कारण असे की, शिक्षणाची आच असलेले कोकणातील बुद्धिमान विद्यार्थी मुंबईत कसे येत असत आणि त्या काळात तिथे त्यांची राहण्याची सोय कशी होत असे हे स्पष्ट व्हावे. दुसरे असे की, इंग्रजी राजवट आली असली आणि शिक्षणाच्या सोयी तेव्हा होत असल्या तरी त्या महत्त्वाच्या

गावांपुरत्या असत आणि माध्यमिक शिक्षणाकरिता तालुका, जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा मुंबईला त्यांना धाव घ्यावी लागत असे. हा प्रकार विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांपर्यंत तरी सर्रास सुरू होता आणि त्याचा फायदा अनेकांनी घेतला. म्हणून त्यांच्या जीवनाची दिशा बदलली हे लक्षात येते. त्याचा आणखी एक परिणाम असा झाला की, पूर्वीच्या एकत्र कुटुंब पद्धतीला धक्के बसले आणि शिक्षण प्राप्त करून मिळेल त्या गावी नोकरी करण्याचा नवशिक्षितांचा कल राहिल्यामुळे समाज विकीर्ण होत गेला. ' गावगाडा 'चे लेखक त्रिं. ना. आत्रे यांनी या काळातील स्थित्यंतराला ' वतनदारीकडून वेतनदारीकडे ' असे उचित म्हटले आहे. आंग्ल सत्तेमुळे महाराष्ट्रीय जीवनसरणीवर असे परिणाम होत राहिले.

## रघुनाथरावांची विद्यार्थिदशा :

रघुनाथराव कर्वे हे गेल्या शतकातील विधवांच्या पुनर्विवाहासंबंधी आणि स्त्रीशिक्षणाचे महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या धोंडो केशव कर्वे यांचे थोरले चिरंजीव होत. अण्णांचा जन्म १८५८ सालचा तर राधाबाईंचा १८६४ सालचा. दोघांमध्ये सहा वर्षांचे अंतर होते. राधाबाई अण्णांच्या जवळच्या नात्यातील होत्या. त्यांचा विवाह अण्णांच्या वयाच्या पंधराव्या वर्षी झाला होता. आणि नजीकच्या काळात तर अण्णा शिक्षणाकरिता मुंबईस तर राधाबाई मुरुड येथे राहत होत्या. त्यांचा विवाह १८७३ मध्ये झाला असला तरी त्यांना पुत्रप्राप्ती झाली ती १८८२ साली. म्हणजे विवाहानंतर ९ वर्षांनी. मुलाचे नाव रघुनाथ असे ठेवण्यात आले. रघुनाथचे बालपण अर्थातच पहिली अडीच वर्षे मुरुडमध्येच गेले.

१८८४-१८८५च्या दरम्यान अण्णांच्या मित्राने- नरहर बाळकृष्ण जोशी- यांनी आंग्रेवाडीसमोरच्या गोपिनाथ खत्री यांच्या चाळीत अगदी वरच्या मजल्यावर भाड्याने घर घेतले. तिथे त्यांनी ' एकत्र कुटुंबा 'चा प्रयोग केला. म्हणजे असे की नरहरपंत, त्यांच्या पत्नी, अण्णा, राधाबाई, रघुनाथ आणि दोघांचे इतर नातलग असे एकत्र राहत असत. या काळात प्रथम राधाबाईंनी रघुनाथला शिक्षणाचे धडे दिले. नंतर अण्णांनी दररोज शिकवायला येणाऱ्या शिक्षकाची किमान एक वर्षभर नेमणूक केली. त्यांचा हा प्रयोग १८९० पर्यंत चालू होता.

त्या काळात प्राथमिक शाळेतील प्रवेशासंबंधी सरकारी धोरणात शिथिलता असावी. त्यामुळेच की काय रीतसर शाळेत घालून रघुनाथला शिक्षण देण्यापेक्षा, मुरुडजवळ असलेल्या बुरोंडी गावी शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या बाळकृष्ण वामन आचवल या मित्राकडे त्यांनी शिकायला ठेवले. आचवल यांच्यांशी अण्णांचे संबंध सलोख्याचे असले तरी अध्यापनाच्या बाबतीत ' छडी लागे छम् छम्, विद्या येई घम घम ' या वृत्तीचे ते असल्याने त्यांच्याकडून रघुनाथला मार खावा लागे. मात्र आचवल आपल्या मुलालाही मारीत असत. त्यामुळे त्यांच्याविषयी तक्रार करायला जागा नसल्याचे रघुनाथरावांनी लिहिले आहे. दीड वर्षाने पाचवी परीक्षा पास झाल्यावर अण्णांनी त्याला पुन्हा मुंबईस आणले ' मराठा हायस्कूल 'मध्ये त्याचे नाव घातले.

अण्णांचे स्नेही नरहरपंत हे ' सॅडिस्ट ' स्वभावाचे होते. स्वाभाविक त्यांचा मार रघुनाथला खावा लागला. ' पण ही योजना (एकत्र कुटुंब) प्रत्यक्ष राबविण्याचे काम ज्याने हाती घेतले; तो नरराक्षस घरातील सर्वांना, विशेषतः मुलांना किती जाच करीत असे.... गुरासारखे मारणे, घाणेरडे खायला लावणे-एक ना दोन ' असे शकुंतलाबाई परांजपे यांनी लिहिले आहे. स्वतः रघुनाथरावांनी ह. वि. देसाई यांना मुलाखत देताना यासंबंधात ' तो त्यांचा (अण्णांचा) स्नेही आम्हां मुलांना राक्षसासारखा वाटत असे. भूक लागली तरी खायची आम्हाला चोरी. त्यामुळे भूक लागली म्हणजे चोरूनच आम्हाला खावे लागत असे. त्या गृहस्थांचा मला इतका दरारा वाटे की, मी माझ्या वडलांशीही बोलायला भीत असे ' असे सांगितले आहे. स्वाभाविकच आईवेगळा मुलगा म्हणून रघुनाथला बालपणात कटू अनुभवांना सामोरे जावे लागले. म्हणून ' रम्य ते बालपण ' असे म्हटले की ती केवळ कविकल्पना असल्याचे त्यांना वाटे. यासंबंधात, ' रम्य ते बालपण, देई देवा फिरूनि ' यात दोन थापा आहेत. एक देव आणि दुसरी बालपणाची रम्यता... मला जी लहानपणाची आठवण आहे, ती सुखाची मुळीच नाही. असे त्यांनी लिहिले आहे. असे असले तरी नरहरपंत आणि अण्णा यांच्यात घरातील सर्वांच्या उपस्थितीत वेगवेगळ्या विषयांवर चर्चा व्हायच्या. त्या लहान रघुनाथच्या कानांवरही पडत असत. नरहरपंताचे वाचन, त्यांचे बुद्धिचातुर्य हे सारे मुलांवर संस्कार करून गेले. ' (रघुनाथराव कर्वे व र. पु. परांजपे) हे दोघेही पुढे बुद्धिप्रामाण्यवादाचे कडकडीत

उपासक झाले. काही श्रेय अण्णांच्या सुधारकीवृत्तीला असले तरी बरेचसे श्रेय अण्णांचे मेहुणे- बायांचे बंधू- नरहरपंत जोशी- यांच्या प्रवृत्तीला आहे. ' असे श्री. शं. नवरे यांनी आपले निरीक्षण नोंदवले आहे. नरहरपंतांनी रघुनाथला त्रास दिला. त्यामुळे त्यांच्याविषयी अप्रीती निर्माण होणे स्वाभाविक वाटते. तरीही रघुनाथरावांनी या गृहस्थांच्या संदर्भात जे लेखन केले आहे ते सूक्ष्मतेने पाहायला हवे : ' आत्मवृत्तांत अण्णांनी एका गृहस्थांना तेजस्वी, ओजस्वी वगैरे विशेषणे लावून त्यांचा गौरव केला आहे. ती कदाचित अगदीच खोटी म्हणता येणार नाहीत ; पण या गृहस्थांच्या तेजाची ज्या अनेक लोकांना झळ लागलेली आहे, त्यांना हे वर्णन वाचून आश्चर्य वाटते.' असे ते लिहितात.

रघुनाथ लहान असताना आपल्या वडलांना-अण्णांनाही तो घाबरत असे. त्याची कारणमीमांसा पुढील परिच्छेदात करण्यात आली आहे : ' .......मी लहान असताना अण्णांचा स्वभाव बराच तापट असे आणि मीच त्यांचा वडील मुलगा असल्यामुळे या तापटपणाची आच मलाच जास्त लागली. जुन्या पद्धतीप्रमाणे बापाने मुलांशी वागण्याचा सर्वमान्य नियम म्हणजे—' लालयेत् पंचवर्षाली दशवर्षाली ताडयेत् । प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रामित्र वदाचयेत् ।। ' यांपैकी पहिल्या पाच वर्षांत त्यांनी माझे लाड केले की नाहीत याची मला आठवण नाही ; परंतु त्यानंतर मार बसल्याची मात्र आठवण आहे.... इतर भावांपेक्षा माझे जास्त नुकसान झाले, तरी ते अण्णांनी बुद्धिपुरस्सर केले नसल्यामुळे मनात तेढ उत्पन्न झाली नाही. ' यादरम्यान काशिनाथपंत काणे नावाचे अण्णांचे एक स्नेही माहीमला राहत होते, त्यांच्याकडे रघुनाथची मुंज अवघ्या पंधरा रुपयात करून उरलेले २०० रुपये त्यांनी राधाबाईंच्या आणि आईच्या संमतीने मुरुड फंडाला दिली. रघुनाथच्या मुंजीत राधाबाई मुंबईत होत्या आणि लवकरच त्या मुरुडला गेल्या. तिथे त्या आजारी पडल्या. दिवस पावसाळ्याचे होते आणि त्या काळात दळणवळणाची साधने फारशी नव्हती. पडाव, गलबत किंवा आगबोटी म्हणजे जलवाहतूक ही साधने होती. अण्णांना पत्रांमधून राधाबाईंच्या आजाराची माहिती मिळत होती. तेही पत्रे लिहून त्यांच्या उपचारासंबंधी सूचना करीत होते. पण आजारातून त्या काही उठल्या नाहीत व सन १८९१ मध्ये राधाबाईंचे तिथे निधन झाले आणि रघुनाथचे मातृछत्र हरवले. त्यांचे शेवटचे विधी करायला अण्णांना जाता आले नाही. मात्र त्यांनी राधाबाईंचे उर्वरित विधी रघुनाथच्या हातून करवून घेतले आणि त्यांचे नावे काही रक्कम मुरुड फंडाला दिली.

'अण्णांच्याबरोबर रघुनाथ आणि त्यांच्याकडे शिकायला आलेली नात्यागोत्यातील मुले पुण्यास आली. रघुनाथच्या मावशी विधवा होत्या आणि राधाबाई हयात असतानाच त्या मुंबईला अण्णांकडे येऊन राहिल्या होत्या. पुण्याचे घर त्या सांभाळू लागल्या.' असे य. दि. फडके यांनी लिहिले आहे. ते तपासून घ्यायला हवे ' आत्मवृत्त 'च्या ९२/ ९३व्या पानांवर अण्णांनी मुंबईस आणलेल्या मुलांचा उल्लेख केला असून र. पु. परांजपे, दादांचे जावई, राधाबाईंचे बंधू आणि एक विद्यार्थी असा चौघांचा उल्लेख आहे. ' एकाशिवाय करून बाकीची मुले मजबरोबर पुण्याला आली. वरील तीन मुलांशिवाय माझा मुलगा रघुनाथ व माझे बालमित्र श्रीयुत बा. वा. आचवल यांचा मुलगा असे दोघे आणखी होते ' अशी माहिती पुरवली आहे. अण्णा मुंबईला राहत असताना राधाबाईंच्या विधवा भगिनी त्यांच्याकडे आल्या असतील व विशेषतः रघुनाथच्या मुंजीच्या निमित्ताने खासच. पण त्या कारणपरत्वे ' राहायला ' आल्या असत्या तर तसा उल्लेख अण्णांनी तिथे केला असता. अर्थात ' राधाबाई आजारी पडण्याच्या अगोदरपासूनच तिची वडील विधवा बहीण आमच्या घरी येऊन राहिली होती, तिचा गृहकृत्यांच्या कामी फार उपयोग होत असे. राधाबाई आजारी पडली तेव्हापासून हा सर्व भार तिजवरच पडला व पुढे तीच आमच्याबरोबर पुण्याला आली. ' असे अण्णांनी लिहिले तेव्हा ' आमच्या घरी ' याचा अर्थ ' आमच्या मुरुडच्या घरी ' असाच घ्यायला हवा.

मुंबईच्या ' संयुक्त कुटुंबात नरहरपंतांनी आपल्या भावाला आणि विधवा बहिणीला आणले होते. तिचे नाव गोदू असे होते. कालांतराने पंडिता रमाबाईंनी ' शारदाश्रम ' सुरू केल्यावर तिची व्यवस्था तिथे केली होती. गोदू ही ' शारदाश्रमात ' प्रवेश घेणारी पहिली विधवा विद्यार्थिनी होती. पण त्याआधी ' संयुक्त कुटंबा 'चे घटक असलेल्या अण्णा, राधाबाई आणि रघुनाथ यांच्याशी गोदूचा परिचय झाला होताच.

गोपाळकृष्ण गोखले हे अण्णांचे मुंबईत महाविद्यालयीन जीवनात सहाध्यायी होते. ते पुण्यात फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणिताचे प्राध्यापक म्हणून काम करीत होते. तेथे वर्ग वाढल्यावर निर्माण झालेल्या जागेवर काम करण्याकरिता त्यांनी अण्णांना पाचारण केले आणि एक अनपेक्षित संधी त्यांना चालून आली. ११ नोव्हेंबर १८९१ या दिवशी त्यांनी ही नोकरी स्वीकारली. अण्णांना प्रथम मुंबई हीच आपली कर्मभूमी असेल असे वाटत

होते. त्याला या घटनेने छेद गेला. अण्णा रघुनाथसह पुण्याला आले आणि त्यांच्या ' संयुक्त कुटुंबा 'चा प्रयोग संपुष्टात आला. नरहरपंतांनाही दरम्यानच्या काळात सौराष्ट्र हायस्कूल, राजकोट इथे शिक्षकाची नोकरी मिळाल्याने तेही तिकडे गेले. तरी अण्णा आणि नरहरपंत हे या कुटुंबात एकत्र सात वर्ष राहिले. त्यात वाद झाले नाहीत याचे श्रेय अण्णांनी बायकांना दिले आहे.

अण्णांनी रघुनाथला ' न्यू इंग्लिश स्कूल 'मध्ये घातले. पुढे ' सेनापती बापट ' म्हणून प्रसिद्धीस आलेले पां. म. बापट हे त्याचे सहाध्यायी होते. 'न्यू इंग्लिश स्कूलमध्ये सातव्या इयत्तेत आम्ही एका डिव्हिजनमध्ये शिकत होतो. गणितात फार हुशार. त्याचा बाप संत कर्वे गणिती. तो गणिती ' असे बापटांनी तुरुंगातून आपल्या मुलीला- कमलला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. म्हणजे गणितात रघुनाथची प्रगती चांगली असल्याचे दिसून येते.

नरहरपंत जोशी जरी राजकोटला गेले होते तरी त्यांचे आई-वडील कामाच्या निमित्ताने पुण्यास येत असत. तेव्हा ते अण्णांकडे काही तास गप्पा मारण्याकरिता येत असत. एकदा अण्णांनी आपण पुनर्विवाह करण्यास तयार असल्याचे व तोही विधवेशी करणार असल्याचे त्यांनी बाबांना (नरहरपंताच्या वडलांना) सांगितले. त्यावर त्यांनी गोदूचा प्रस्ताव अण्णांपुढे ठेवला. अण्णांची व गोदूची ओळख होतीच. अण्णांनी बाबांना ' आपण गोदूला विचारावे ' असे म्हटले. गोदूची संमती येताच अण्णांचा पुनर्विवाह ठरला. तो पुण्यात ११ मार्च १८९३ या दिवशी भांडारकरांच्या बंगल्यात पार पडला. गोदूचे विवाहानंतर आनंदी असे नाव अण्णांनी ठेवले.

१८९४ साली बायाला मुलगा झाला. त्याचे नाव शंकर. त्याच्या जन्मानंतर साडे-तीन वर्षांनी अण्णांनी बायाला नागपूरच्या डफरिन इस्पितळात एका वर्षाच्या मिडवाईफ व नर्सिंगच्या अभ्यासक्रमासाठी पाठविले. सोबत अर्थातच शंकर. त्यादरम्यान अण्णा फर्ग्युसन कॉलेजच्या आवारात प्रि. आगरकरांच्या बंगल्यात राहत होते. ' त्यावेळी घरात मंडळी अगदी थोडी होती. मी, वडील मुलगा रघुनाथ व पार्वतीबाई आठवले यांचा मुलगा नाना. ' अशी आठवण अण्णांनी 'आत्मवृत्त 'मध्ये दिलेली आहे. अर्थातच ही घटना १८९७-१८९८ मधील असावी. १८९६ नंतर पुण्यात प्लेगने हाहाकार माजवला होता. तेव्हा उन्हाळ्याच्या सुट्टीत अण्णा, बाया, शंकर आणि रघुनाथ असे चौघेजण उमरावतीस जाऊन राहिले होते.

न्यू इंग्लिश स्कूलमधील रघुनाथच्या अभ्यासातील प्रगतीविषयी अण्णांनी पुढील माहिती पुरविली आहे : ' पुण्याला आल्यावर न्यू इंग्लिश स्कुलातून तो पहिल्यावर्षी परीक्षेला बसला, तेव्हा त्याची तयारी बरी होती, परंतु तो इतिहास-भूगोलात नापास झाला. अशा रीतीने मिळालेल्या अधिक वर्षाचा चांगला उपयोग करून घ्यावा, असे मी मनात आणले. इतिहास व भूगोल हे विषय मी स्वतः तयार करून त्याला शिकवू लागलो व गणित विषयाकडे अधिक लक्ष देऊन मागील दहा-पंधरा वर्षांचे गणिताचे पेपर त्याजकडून लिहवून तपासून दिले. सुदैवाने या श्रमाचा उपयोग झाला व मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेत त्याचा नंबर पहिला आला. ' अशा रीतीने १८९९ साली रघुनाथ मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाला.

त्या काळात मुंबई विद्यापीठात प्रीव्हियस, इंटर, ज्युनिअर आणि सिनिअर असे चार वर्ग पदवीकरिता असत. त्यातही प्रीव्हियसचे विषय साधारणपणे अनिवार्य असत. त्यात गणितासारखा विषय असे. इंटरपासून पुढे आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स हे विषय वा या शाखा स्वतंत्र होत. त्यामुळे गणितात नापास झाल्याने हरिभाऊ आपटे, राम गणेश गडकरी यांचे पुढचे शिक्षण थांबले. रघुनाथचे तसे नव्हते. ' प्रीव्हियसच्या परीक्षेच्या वेळीही त्याजकडून मागील दहा वर्षांचे गणिताचे पेपर लिहवून घेतले होते. त्या परीक्षेत तो पहिल्या वर्गात पास झाला. ' असे अण्णांनी लिहिले आहे. ते वर्ष अर्थातच १८९९ चे असणार. अणांचे व बायाचे लग्न झाले १८९३ साली आणि रघुनाथ मॅट्रीक परीक्षा पास झाला १८९९ साली. ही सहा वर्षे अण्णा, बाया, रघुनाथ, शंकर आणि इतर आप्त असे एकत्र राहत असत. या काळात बायाचे आणि रघुनाथचे पटले असेलच असे नव्हे. पण घरात शांतता असावी आणि रघुनाथला स्वतंत्रपणे अभ्यास करता यावा म्हणून अण्णांनी त्याची फर्ग्युसन कॉलेजच्या वसतिगृहात राहण्याची सोय केली. ' मला कॉलेजच्या रेसिडेन्सीत कधी राहावयाला मिळाले नव्हते. माझ्या मुलाला तो फायदा मिळावा म्हणून मी त्याला तेथे ठेविले.' असे अण्णांनी लिहिले आहे. 'मी मॅट्रिकच्या परीक्षेत पहिला आल्याबद्दल बक्षीस म्हणून कॉलेजच्या वसतिगृहात राहण्याची परवानगी अण्णांनी दिली होती आणि मी नंतरची पाच वर्षे तेथेच काढली' असे रघुनाथरावांनीही लिहिले आहे.

या काळातील रघुनाथ आणि अण्णा या पितापुत्राचे संबंध कसे होते हे स्वतः रघुनाथरावांनी एका ठिकाणी लिहून ठेवले आहे ते असे : '..... अण्णांनी मला बरेच

दिवस जेवताना सोवळे नेसायला लावले होते. मी तो त्रासच समजत होतो, पण इलाज नव्हता. असाच आणखी एक त्रास म्हणजे दर आठवड्याला हजामत करून घेण्याचा. मला त्यापासून अतिशय त्रास होई आणि मी शक्यतो हजामत लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न करीत असे. एकदा मी मोठा धीर करून केस वाढविण्याची परवानगी अण्णांच्याजवळ मागितली होती. पण ते म्हणाले, ' तू मोठा झाल्यावर पाहिजे ते कर, पण सध्या माझ्याजवळ आहेस तोपर्यंत नको.... ' दुसऱ्या एका लेखात रघुनाथरावांनी लिहिले, ' अण्णांच्या हेतूबद्दल कधीही शंका न आल्यामुळे व ते आपल्या बुद्धीप्रमाणे शक्य तितके लोककल्याणाकरिताच झटत असल्यामुळे मला त्यांच्याबद्दल आदरच वाटत आला आहे.... '.[१]

१८९९ ते १९०४ अशी एकूण पाच वर्षे रघुनाथराव फर्ग्युसन कॉलेजच्या वसतिगृहात राहिले. प्रीव्हियसला त्यांना पहिला वर्ग मिळाला होता, त्या वर्गात व इंटरमध्येही ते पहिले आले होते. १९०४ साली ते बी.ए. झाले. तोपर्यंत त्यांना कॉलेजची शिष्यवृत्ती मिळत होती. त्यानंतर त्यांनी एम.ए.च्या पहिल्या वर्षासाठी नाव नोंदवले होते. पण शिष्यवृत्ती न मिळाल्याने त्यांना शिक्षण सोडून यावे लागले. यासंदर्भात त्यांनी लिहिले की, ' बी.ए. झाल्यावर फेलोशिपवर माझा हक्क असताही अधिकाऱ्याच्या कृपेमुळे मला दोन वर्षांऐवजी एक वर्ष मिळाली आणि एम.ए.चा अभ्यास पुरा करण्याऐवजी नोकरी पाहवी लागली. कारण अण्णांकडून उत्तेजन किंवा मदत न मिळता ' एम.ए. होऊन काय करायचं आहे ? झालं एवढं शिक्षण पुरे. हरिभाऊ आपट्यांनी नाही का बी.ए.देखील झाल्याशिवाय कीर्ती मिळवली ! ' असा सल्ला मिळाला. रघुनाथरावांचे आणि बायाचे एरव्ही पटत नसे हे खरे असूनही यासंदर्भात बायांनी लिहिले की, ' त्यांच्याकडून (अण्णांकडून) मुलांनाही कधी वशिला मिळालेला नाही. वशिला खोटा नको, पण जेथे हक्क आहे तेथे मिळावा की नाही ? रघुनाथला फर्ग्युसन कॉलेजात फेलोशिप मिळणे रास्त होते. पण ती ह्यांच्या अबोलपणामुळे मिळाली नाही. आपल्याच माणसांचे नुकसान व्हायची पाळी आली, तरी खरे असेल ते हक्काने सांगायचे नाहीत. '

वसतिगृहात रघुनाथरावांबरोबर असणाऱ्या रामभाऊ कानिटकर या सहाध्यायाने सांगितलेली आठवण य. दि. फडके यांनी नमूद केली आहे ती अशी : ' माझे वडील लहान असतानाच वारले आणि १८९९ साली मी वसतिगृहात राहायला गेल्यानंतर काही दिवसांनीच माझी आईही गेली. त्यामुळे फर्ग्युसन कॉलेजचे वसतिगृह हेच माझे खरे घर

बनले. मी आणि माझे मित्र रघुनाथ कर्वे सुट्टीतदेखील वसतिगृहातच राहत असल्यामुळे इतर टवाळखोर मुले आम्ही टेबलखुर्च्यांप्रमाणे वसतिगृहाचे कायम भाग बनलेलो आहोत असे म्हणत. '

त्या काळात कॉलेजात येणारे विद्यार्थी कसे असत याविषयी रघुनाथरावांनी लिहिले आहे की, ' आमच्यावेळी कॉलेजातील बऱ्याच मुलांचे लग्न झालेले असे. त्याकाळी मुले स्वेच्छेने लग्न करीत नसत, त्यांची लग्ने होत असत. पण हे कबूल करायला ते बहुधा लाजत असत. आणि एखाद्या मुलाचे सुटीत लग्न झाले तर कोणाला त्याची दादही तो देत नसे. पण आमच्यात चाणाक्ष मंडळी काही कमी नव्हती. ' रघुनाथराव महाविद्यालयीन दिवसात ' पुस्तकातील किडा ' नव्हते, तर त्यांना टेनिस, फुटबॉल आणि बुद्धिबळ या खेळांमध्ये विशेष रुची होती. ' कॉलेजात असताना मी टेनिस आणि फुटबॉल खेळत असे. टेनिसमध्ये मी पहिला यायचो. एका वर्षी थोडक्यात चुकले, आणि फुटबॉलमध्ये माझा नंबर पहिल्या तीन-चारांत होता. टेनिसमध्ये जरी मी केव्हाही पहिला आलो नाही, तरी काही बक्षिसे मिळवलेली आहेत. एकदा मी बुद्धिबळातही बक्षीस मिळवलेले आहे. '

रघुनाथराव पुढील काळातही टेनिस खेळत असत. एल्फिन्स्टन कॉलेजात गणिताच्या प्राध्यापकांचे साहाय्यक असताना त्यांची आणि चिंतामणराव देशमुख यांची गाठ बहुधा टेनिस कोर्टवरच पडे असे चिंतामणरावांनी लिहिले आहे. तर ' विद्यार्थिदशा संपल्यानंतरचा आनंदाचा एखादा प्रसंग सांगाल का ?' असे ह. वि. देसाई यांनी मुलाखत घेताना त्यांना विचारले असता त्यांनी दिलेले उत्तर पुढीलप्रमाणे होते—' विलायतेहून मी येत असता बोटीवर बुद्धिबळाचा डाव युरोपियनांबरोबर खेळण्याची संधी मिळाली. त्यावेळी मीच जिंकलो. मलाच पहिलं बक्षीस मिळालं. पण तेथील युरोपियनांनी भेदभाव हा बाळगलाच मला त्यांनी आपल्या इच्छेविरुद्ध जरी पहिलं बक्षीस दिलं, तरी त्यांनी ते अगदी कमी किमतीचं दिलं. आणि ज्या युरोपियनाला बक्षीस मिळालं त्याला जास्त किंमतीचं दिलं. बक्षीस देताना बाळगलेल्या भेदभावामुळं जरी मला वाईट वाटलं तरी मी पहिला आलो—युरोपियनांना जिंकून पहिला आलो हे समाधान काही थोडंथोडकं नव्हतं.'

१९२५च्या सुमारास रघुनाथरावांचे धाकटे बंधू भास्करराव त्यांच्याकडे बी.टी. करण्यासाठी आले असता राहिले होते. तेव्हाच्या आठवणी सांगतानाही ' काम संपले की बुद्धिबळाचा पट काढून (तो) बसत असे. परदेशातल्या खेळाडूंशी तो पत्रव्यवहाराने डाव खेळे ' असे आवर्जून लिहिले आहे.

मुरुडला असताना अण्णांनी नाटकामध्ये भूमिका केल्याचे ' आत्मवृत्त 'मध्ये लिहिले आहे. रघुनाथरावानांही नाटक व संगीत या कलांमध्ये लहानपणापासून रुची होती. ' अविस्मरणीय व्यक्ती : आमचे काका ' या लेखात ते लिहितात : ' काकांचे आणि माझे विशेष जमत असे. कारण त्यांना व मला नाटकांचा व गाण्याचा सारखाच शौक होता. तेव्हा नाटकाला किंवा गाण्याला आम्ही नेहमी बरोबर जायचो. '

कॉलेजमधील दिवसांत त्यांची नाटके पाहण्याची आवड दिवसेंदिवस वाढत गेली असे दिसते. ' नाटके पाहण्याची माझी आवड मॅट्रिक पास होईपर्यंत अतृप्तच राहिली. कारण अण्णांची परवानगी नव्हती. शाळेच्या वार्षिक संमेलनात नाटक होई. तेवढेच पाहायला मिळत असे..... कॉलेजात राहायला गेल्यावर जरी थोडेबहुत स्वातंत्र्य मिळाले, तरी पहिले वर्षभर अण्णा दर महिन्याला हिशोब बारकाईने पाहत असत. त्यामुळे नाटकाला जाणे शक्य नव्हते. त्या वर्षी जेव्हा किर्लोस्कर मंडळाचा 'शापसंभ्रम' खेळ लागला, तेव्हा भाऊराव (भावड्या) कोल्हटकरांची इतकी ख्याती झाली होती, की त्या रात्री बाकीचे सर्व विद्यार्थी नाटकाला गेले आणि वसतिगृहात मी जवळजवळ एकटाच होतो. नंतर 'शारदा' नाटक लागले, तेव्हा पुन्हा तोच प्रसंग. सर्वजण वर्णन करीत, आणि मला ऐकावे लागे. शेवटी एका स्नेह्याला माझी दया येऊन त्याने पदरचे दहा आणे खर्च करून मला नाटक दाखवले. दुसऱ्या वर्षी अण्णा हिशोब बारकाईने पाहिनासे झाले, तेव्हा इतर काही बाबतीत काटकसर करून नाटके पाहण्याचे मी ठरवले. किर्लोस्कर मंडळी या हंगामात अमुक इतके खेळ करणार व सर्व खेळांचे तिकीट एकदम घेतल्यास, कमी दराने मिळेल, असे जाहीर झाले तेव्हा मी ते घेतले. यामुळे माझ्या नावाचा बभ्रा झाला, आणि दरवेळी जास्त पैसे खर्च करून नाटके पाहणारांचा झाला नाही. ही हकिकत अण्णांच्या कानांवर गेली आणि त्यांनी मला जाब विचारला. तेव्हा खरे बोलण्याशिवाय गत्यंतर नव्हते. ' रघुनाथरावांच्या वरील विवेचनातून कॉलेजच्या दिवसांत नाटके पाहण्याची अनिवार ऊर्मी प्रकट झाली आहे.

नाटकांबरोबर संगीताबद्दल रघुनाथरावांना आकर्षण आणि रुची होती. संगीतात त्यातही शास्त्रीय संगीतात त्यांना चांगली गती होती. त्यांच्या विवाहप्रसंगी, भोजनप्रसंगी



एन ४०८८—२अ

अब्दुल करीम खाँ साहेब उपस्थित होते आणि पंक्तीत त्यांनी श्लोक म्हटल्याची नोंद आहे. शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमांना ते आवर्जून हजर असत. पेटीवादनाला त्यांचा विरोध होता आणि त्यासंबंधात ते मातब्बर गायकांशी वादही घालीत असत. पुढे गणितात जाणकार असलेल्या माणसाला शास्त्रीय संगीतातही जाणकारी असते हे मॅकडूलचे मत मांडून आपला गणित हा विषय असल्याने यासंबंधात काही बोलत नाही, असेही त्यांनी म्हटले होते. सारांश, नाटक, रंगभूमी, संगीतादी कलांमध्ये त्यांना आस्था होती आणि ती त्यांच्या महाविद्यालयीन जीवनात प्रकर्षाने जाणवू लागली होती.

(तत्कालीन महाविद्यालयातील आणि त्याच्या वसतिगृहातील विद्यार्थी कसे असत यासंबंधीचा परिच्छेद आपण यापूर्वीच नोंदवला आहे. आता हा परिच्छेद पाहा :) ‘ प्रचार-कार्य सुरू करण्यापूर्वी त्याला जरूर असणारी भूमिका कशी तयार झाली, याची थोडी हकिकत येथे देणे वावगे होणार नाही. त्याची पूर्वतयारी म्हणजे कामशास्त्राची शक्यतो माहिती मिळविणे, व त्या दृष्टीने माझे प्रयत्न १९०१ सालापासून होते. कारण कॉलेजात असतानाच गुप्तरोग झालेले काही विद्यार्थी आणि दरवर्षी मूल होत असलेलेही मला माहीत होते आणि दोन्ही बाबतीत प्रतिबंधक उपायांची जरुरी होती ! ’[१] याचा अर्थ असा की महाविद्यालयीन व वसतिगृहातील त्याचे जीवन त्यांच्या आयुष्याची दिशा निश्चित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावताना दिसते.

रघुनाथरावांच्या सत्तरीच्या निमित्ताने ‘ नवयुग ’मध्ये आलेल्या लेखात वेगळीच माहिती देण्यात आली आहे. ‘ एका तरुणाच्या मृत्यूमुळे लैंगिक विषयावरील अज्ञानाशी सामना देण्याचा त्यांचा निर्धार झाला. तोही त्या विषयाच्या अज्ञानामुळे व समाजाच्या हेटाळणीमुळे एका तरुणाचा मृत्यू झाला म्हणून. त्यांच्या कॉलेजातील त्यांचा एक तरुण सहकारी खेळाडू गर्मीच्या विकारानं आजारी पडला. एकेकाळी सर्वांत लोकप्रिय असलेला हा खेळाडू तरुण या विकाराला बळी पडताच समाजाच्या व सहकाऱ्यांच्या हेटाळणीचा व कुचेष्टेचा विषय झाला. कॉलेजच्या वसतिगृहातील त्याच्या खोलीवर कुजक्या शब्दांत त्याच्या विकाराची जाहिरात होई. त्याच्या तरुण मनाने हाय खाल्ली व त्यात त्याचा मृत्यू झाला. या अन्यायाची चीड उत्पन्न होऊन मानवी आयुष्यातील या असाध्य विकाराचे समाजात सर्वांत कमी ज्ञान का, हे त्यांना कळेना. ’ याशिवाय आणखी माहिती प्रकाशात आली आहे. ती म. वा. धोंड यांनी १९७७ साली शंकरराव, दिनकरराव, भास्करराव आणि शकुंतला परांजपे यांच्या मुलाखती घेतल्या तेव्हा प्रकट झाली.

भास्कररावांनी ती स्पष्ट केली आहे. ' रघुनाथरावांना संततिनियमनाचा प्रचार करण्याची प्रेरणा कशी झाली ? तशी काही घटना त्यांच्या जीवनात घडली होती का ? ' या प्रश्नाचे उत्तर देताना भास्करराव म्हणाले होते, ' संततिनियमनाविषयी अण्णा नेहमीच मोकळेपणाने बोलत. शंकर, दिनकर आणि मी तीन बंधूंत जे सरासरी पाच वर्षांचे अंतर आहे ते योगायोगाने पडलेले नव्हे, अण्णांचे ते कुटुंबनियोजन होते. '

मुलांबरोबर संततिनियमन या विषयावर अण्णा बोलत तेव्हा मुलं चांगली सज्ञान असली पाहिजेत म्हणजे तो काळ रघुनाथराव कॉलेज शिक्षण घेत असल्याचा निश्चित असावा. म्हणजे अण्णांना विधवांच्या दुःखाची कल्पना आल्याने त्यांनी त्यांच्या पुनर्विवाहासंबंधी व स्त्रीशिक्षणाविषयी कार्य हे आपले जीविताचे ध्येय मानले. तसे स्त्रियांना विशेषत्वाने शारीरिकदृष्ट्या त्रासणारा प्रश्न म्हणजे वारंवार त्यांची होणारी बाळंतपणे हे त्यांनी हेरले असावे. त्यामुळेच ते मुलांमध्ये मोकळेपणाने बोलत असावेत. यासंबंधात अण्णा हेच रघुनाथरावांचे गुरू नि पथदर्शक असावेत. रघुनाथराव खरे तर बुद्धिप्रामाण्यवादी, ईश्वर न मानणारे. पण त्यांच्या लिहायाच्या टेबलावर अण्णांची रंगीत तस्वीर ठेवलेली आढळल्याचे ह. वि. देसाई यांनी लिहिले आहे.[२] त्यामागील रहस्याची इथे उकल होते. एके ठिकाणी त्यांनी म्हटले आहे, ' (लैंगिक प्रश्नाखेरीज) कितीतरी विषय माझ्या आवडीचे आहेत. सिनेमा, नाटक आणि संगीत हे विषय माझ्या अत्यंत आवडीचे आहेत. '

रघुनाथरावांनी आपल्या या आवडीच्या विषयांमध्ये रस घ्यायला सुरुवात केली ती त्यांच्या महाविद्यालयीन व विशेषतः वसतिगृहातील दिवसांमध्ये. म्हणून त्या दिवसांचे त्यांच्या आयुष्यातील मोल वाढते. १९०६ साली शिष्यवृत्ती न मिळाल्याने त्यांनी एम.ए.च्या दुसऱ्या वर्गात प्रवेश घेतला नाही. आता नोकरीकरिता अध्यापनातील पदविका घेण्याचे त्यांनी ठरविले. त्याचवर्षी मुंबई ट्रेनिंग कॉलेज सुरू झाले. तिथे एस.टी.सी.डी. हा एक वर्षाचा अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला. तेव्हा त्यांची भेट नेल्सन जे फ्रेजर या प्राध्यापकांशी झाली. फ्रेजर यांचे वरवरचे वागणे सुरुवातीला तरी त्यांना कोरडे वाटत असे. परंतु या गुरुवर्यांनी त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले. ' आपल्याला फ्रेंच भाषेचा अभ्यास करावयाचा आहे ' हे त्यांनी प्रथम त्यांना सांगितले आणि त्यांनी एल्फिन्स्टन कॉलेजात तेव्हा फ्रेंच शिकवणाऱ्या प्रो. पेल्तिए यांची गाठ घालून दिली.

एस.टी.सी.डी. ही अध्यापन शास्त्रातली पदविका होती, पण ती विद्यापीठाकडून दिली जाणारी पदवी नव्हती. रघुनाथराव मुळात भिडस्त आणि भित्र्या स्वभावाचे होते. अपरिचिताशी बोलताना त्यांची जीभ अडत असे. त्यामुळे फ्रेझर साहेबांशी परिचय नव्हता आणि त्या परस्परात स्नेहभाव निर्माण व्हायला वेळ लागला. पण एकदा तो निर्माण झाल्यावर फ्रेझर यांचा मनमोकळा स्वभाव, भारतीयांबद्दलचे ममत्व त्यांच्या लक्षात आले. एकदा मुंबई येथील 'टीचर्स असोसिएशन' ने मुंबईतील सर्व शिक्षकांकरिता एक बक्षीस जाहीर केले. ' त्याकरिता निवडलेल्या विषयावर तो कसा शिकवावा यासंबंधी एक निबंध लिहून, आपले म्हणणे सिद्ध करण्याकरिता एक धडा लिहून दाखवायचा होता. याकरिता प्रयत्न करण्यासारखी माझी मनःस्थिती नव्हती ; पण एका स्नेह्याच्या प्रयत्नावरून तो प्रयत्न मी केला व तीन बक्षिसांपैकी पहिले मला मिळाले ' असे रघुनाथरावांनी लिहिले आहे. या स्पर्धेसंबंधी व तिच्या निकालासंबंधी फ्रेझर रघुनाथरावांशी मोकळेपणाने बोलले आणि तिथून त्यांच्यात जवळीक निर्माण झाली.

रघुनाथरावांचा संस्कृत, मराठी व इंग्रजी भाषांचा अभ्यास चांगला होता अशावेळी फ्रेंच भाषेकडे ते कसे वळले असतील याचा शोध घ्यायला हवा. घरांतील अण्णांच्या संततिनियमनासंबंधीच्या चर्चा, वसतिगृहातील गुप्तरोग झालेले काही विद्यार्थी त्यांच्या पाहण्यात आल्याने या महत्त्वाच्या विषयावर आपल्याकडे काय उपलब्ध आहे याची त्यांनी माहिती करून घेतली असणार आणि इथले या विषयावरील तुटपुंजे ग्रंथ व त्यासंबंधी गुप्तता पाळण्याची वृत्ती, त्यातून सर्वसामान्यांमध्ये निर्माण झालेले अज्ञान व त्याचे अनिष्ट परिणाम हेही त्यांच्या ध्यानात आले असणार. त्यातून अण्णांनी जसे स्त्रियांच्या शिक्षणाच्या संदर्भात व पुनर्विवाहाच्या बाबतीत जसे स्वतःला वाहून घेतले तसे स्त्री-पुरुष संबंध, गुप्तरोग इत्यादी विषयावर जनजागृती करण्याकरिता आपण प्रयत्न करायला हवेत असा त्यांचा दृढनिश्चय झाला असणार आणि त्याचा पद्धतशीर अभ्यास युरोपात इंग्लंड व विशेषतः फ्रान्समध्ये झालेला असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले असणार. म्हणून इंग्रजी तर त्यांना येत होतीच, पण त्यातही फ्रेंच भाषा अवगत झाली तर आपले काम अधिक सोपे होईल असे वाटल्याने प्रिन्सिपॉल फ्रेझर यांच्याशी ते या विषयावर बोलले असणार व त्यामुळेच फ्रेझर यांनी त्यांची ओळख त्या भाषेचे प्रोफेसर पेल्तिए यांच्याशी करून दिली असणार. पेल्तिए हे कॉलेजात फ्रेंच शिकवीत असत आणि बाहेरही त्या भाषेचे खाजगी वर्ग घेत असत. ' फ्रेंचरूप ' ही त्यांनी काढलेला

होता. त्याच्यासंबंधाची नोंद रघुनाथरावांनी केली आहे : ‘ गणिताचा जास्त अभ्यास करण्याकरिता फ्रेंच शिकण्याची जरूर भासली आणि मी ताबडतोब त्यांच कॉलेजातील फ्रेंचचे प्रोफेसर पेल्तिए नावाचे गृहस्थ होते, त्यांच्या वर्गाला जाऊ लागलो. त्यांची फी महिना आठ रुपये होती. तेव्हा सहा महिन्यांनी मी त्यांना सांगितले की, ‘ मला आता गणिताची पुस्तकं वाचण्याइतकं फ्रेंच येतं, तेव्हा आता मी वर्गाला येणार नाही. ’ त्यांनी फी माफ करून वर्गाला येण्याचा आग्रह केला. पुढे फ्रेंच संभाषणाकरिता त्यांनी ‘ फ्रेंचरूप ’ नावाची एक संस्था काढली. तेव्हा त्यातही येण्याचा त्यांनी आग्रह केला, कारण थोडेबहुत बोलता येणारा त्यांना कोणीतरी पाहिजे होता... ’

रघुनाथरावांचे लेखन एरव्ही सत्य आणि विश्वासार्ह असते. परंतु इथे ‘ गणिताचा जास्त अभ्यास करण्याकरिता फ्रेंच शिकण्याची गरज भासली ’ या वाक्यामुळे जरा शंका उपस्थित होते. इंग्रजी भाषेत गणितविषयक जी पुस्तके त्या काळात उपलब्ध होती त्यापेक्षा अधिक व्यापक नि सूक्ष्म अभ्यास फ्रेंचमध्ये झाला आहे असे वाटत नाही. आणि क्षणभर ती वस्तुस्थिती आहे असे गृहीत धरले तर गणितात विशेष प्राविण्य मिळविण्यासाठी विलायतेला गेलेल्या आणि रँग्लर होऊन परत आलेल्या रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांना फ्रेंच भाषा शिकावी असे का बरे वाटले नाही, असा प्रश्न पडतो.

याच सुमारास रघुनाथरावांनी सरकारी शिष्यवृत्ती मिळवून परदेशात जाण्याचे प्रयत्न केल्याचे दिसते. प्रकाशक ह. वि. मोटे यांनी कर्वे कुटुंबीयांकडून रघुनाथरावांची पत्रे, पुस्तके असलेली पेटी मिळवलेली होती. तिच्यात त्यांच्या या प्रयत्नांना सबळ पुरावा म्हणून रघुनाथरावांनी मिळवलेली शिफारसपत्रे आढळली. या संदर्भात य. दि. फडके यांनी लिहिले आहे की, ‘ बी.ए. झाल्यानंतर विलायतेस जाण्याचा रघुनाथरावांनी प्रयत्न केला असावा असे त्यांच्या संग्रहात आढळलेल्या रँग्लर परांजप्यांच्या १५ फेब्रुवारी १९०५ च्या शिफारसपत्रावरून दिसते. रघुनाथराव कर्वे हे कोणत्यातरी तांत्रिक विषयाच्या खास अध्ययनासाठी इंग्लंडला पाठविण्यास पूर्णपणे पात्र असल्याचे परांजप्यांनी एका शिफारसपत्रात म्हटले आहे. १८ जानेवारी १९०७ च्या शिफारसपत्रातही रघुनाथरावांना इंग्लंडला जाण्याची संधी दिली जावी असे परांजप्यांनी म्हटले आहे. तर १३ फेब्रुवारी १९११ च्या एका शिफारसपत्रात राजकीय बाबतीत त्यांची मते मुळीच जहाल नाहीत आणि राजकीय स्वरूपाच्या उद्योगात ते कधीही सहभागी झालेले नाहीत असा परांजप्यांनी त्यांच्याबाबत निर्वाळा दिलेला आहे.... गोपाळकृष्ण गोखले हे रघुनाथरावांना (फर्ग्युसन

कॉलेजात) शिकवीत असत. गोखल्यांनीही असेच एक शिफारसपत्र त्यांना दिले होते. गोखले किंवा रँग्लर परांजपे यांची शिफारसपत्रे जोडूनही रघुनाथरावांना कोणतीच शिष्यवृत्ती मिळाली नाही......... '

य. दिं. नी हे लिहिले ते ती ती शिफारसपत्रे पाहूनच, परंतु रघुनाथरावांचे वा अण्णांचे उलपब्ध झालेले सर्व लेखन पाहिल्यावर त्यांच्या या प्रयत्नांविषयी कुणीही काही लिहिल्याचे आढळले नाही, याचा अचंबा वाटतो. काही असले तरी स्त्री-पुरुष संबंध, संततिनियमन, गुप्तरोग याविषयीचा शास्त्रीय अभ्यास युरोपमध्ये गेल्याशिवाय होणार नाही व त्याच दिशांनी त्यांचे हे प्रयत्न होते असे दिसते. पण ते उघड लिहिण्याची तेव्हा पद्धत नसल्याने ' गणिताचा जास्त अभ्यास ' करण्यासाठी परदेशगमन हे त्यांना वेळोवेळी स्पष्ट करावे लागले आहे.

१९०६ च्या अखेरीस रघुनाथरावांची आवश्यक ती विद्यार्थिदशा संपली आणि त्यांच्या जीविताची दिशाही तेव्हा त्यांना उमगली हे जाणवते.

●●●

---

**तळटिपा**

१. ' तीस वर्षांपूर्वी आमच्या वेळचे जे कॉलेजातील विद्यार्थी आमच्या ओळखीचे होते. त्यापैकी काही नग्न चित्रे बाळगीत होते, काहींची लग्ने झालेली होती, काही वेश्यांकडे जात होते, काही स्वसंभोग व काही अनैसर्गिक प्रकार करीत होते. हे पुरातन काळापासून चालू आहे. ' (समाजस्वास्थ्य, डिसेंबर १९३६, पृ. १८२-१८३).

२. अण्णांची रंगीत तस्वीर रघुनाथरावांच्या दिवाणखान्यात टेबलावर होती असे निरीक्षण त्यांच्या दोन मुलाखती घेणाऱ्या ह. वि. देसाई यांनी नोंदविले आहे. तर ' ...... आम्ही सुप्रसिद्ध नवमतवादी प्रो. र. धों. कर्वे यांच्या घरी गेलो. सुदैवाने प्रोफेसर साहेब घरीच होते. त्यांनी वही घेऊन एक महत्त्वाचा बुद्धिवादी संदेश दिला. त्यांच्या त्या खोलीत वैद्यकीय पुस्तकांबरोबरच गु. प्रो. अण्णासाहेब कर्वे यांचा एक अतिसुंदर भव्य रंगीत फोटो आम्ही पाहिला. ' असे ' साहित्यिकांच्या सह्यांसाठी ' या लेखात मनोहर पाटील यांनी लिहिले आहे. (मनोहर, फेब्रुवारी १९३८, पृ. २१) अण्णा आणि रघुनाथराव यांच्यातील आंतरिक नातेसंबंधावर त्यातून प्रकाश पडतो.

# २. नोकऱ्यांमधील अस्थिरता

## एल्फिन्स्टन मिडल स्कूल :

ट्रेनिंग कॉलेजमधून बाहेर पडल्या पडल्या रघुनाथरावांना 'एल्फिन्स्टन मिडल स्कूल' मध्ये शिक्षकाची नोकरी मिळाली. त्या शाळेत पहिल्या तीन इयत्तांचे वर्ग असत. रघुनाथरावांनी नोकरीस प्रारंभ केला तेव्हा तिथे एक वृद्ध पारशी हेडमास्तर होते. ते स्वभावाने चांगले होते. परंतु मुलांना छडीने मारण्यावर त्यांचा जोर असायचा. रघुनाथरावांची दृष्टी याविरुद्ध होती. पण त्यांनी एकदा रघुनाथरावांना बोलावून छडीचा वापर करण्याची सूचना केली आणि 'शाळेचा कारकून (तुमच्या खर्चाने) छडी आणून देईल' असे सांगितले. वास्तविक छडी मारणे कायद्याच्या विरुद्ध होते आणि इन्स्पेक्टरना ते कळू नये अशी तेव्हा दक्षता घेतली जाई. तरीही इन्स्पेक्टरना ते कळे, पण ते त्याकडे कानाडोळा करीत. या गृहस्थांच्या निवृत्तीनंतर त्यांच्या जागी 'एक दक्षिणी गृहस्थ' आले. 'दक्षिणी गृहस्थ' याचा य. दि. फडके यांनी लावलेला अर्थ 'महाराष्ट्रीय गृहस्थ' असा आहे. हे हेडमास्तर अन्य शिक्षकांकडून 'भेटी' ची अपेक्षा करीत आणि शिक्षकांना कधी प्रत्यक्ष, कधी अप्रत्यक्षपणे तसे सुचवीत. एखादा शिक्षक त्यांच्या अपेक्षा पूर्ण करू इच्छित नसला किंवा असमर्थ असला तर ते त्याला छळत असत. रघुनाथरावांनांही त्यांनी त्या पद्धतीने काही सुचवून पाहिले. या संदर्भात रघुनाथराव यांनी पुढीलप्रमाणे लिहिले आहे. एकदा त्यांनी शाळेतच मला बोलावून सांगितले, मला डॉक्टराने अंगाबरोबर लोकरीचा कपडा घालायला सांगितला आहे आणि त्यावर आणखी एक शर्ट घातला तर उकडते. तेव्हा शर्टचे जे कडक इस्तरीचे सुटे 'कफ' मिळतात, ते मला आणून द्या. तुम्ही विजारबूट घालणारे आहात. तेव्हा तुम्हाला त्यातली माहिती असेलच. मी उत्तरलो, 'मला माहीत नाही, पण मी चौकशी करून आणून देईन.' हे संभाषण अकरा वाजता झाले व त्याच दिवशी मधल्या सुटीनंतर त्यांनी विचारले, 'काय हो, कफ आणलेत का ? ' मी म्हटले, ; 'मी त्याबाजूला गेलो नाही, जाईन तेव्हा आणीन' तेव्हा 'एवढेसुद्धा काम तुमच्या हातून होत नाही ?' म्हणून ते चिडले आणि याला चांगला हात दाखवला पाहिजे असे त्यांनी मनाशी ठरवले.'

**नॉर्थकोट हायस्कूल, सोलापूर :**

रघुनाथरावांचे अक्षर वाईट असल्याबद्दल, त्यांना रजा नाकारताना, डायरेक्ट मेथडला विरोध करताना अशा अनेक कारणांनी त्यांना या हेडमास्तरांनी त्रास द्यायचा प्रयत्न केला. पण रघुनाथराव त्यांना पुरून उरले. तेव्हा माझी शिक्षणखात्यात ओळख आहे, तुम्ही बदलीसाठी अर्ज करा आणि 'त्यात लिहा की मला खालच्या इयत्तांवर शिकवायला आवडत नाही. माझी एखाद्या हायस्कुलात बदली करा'. त्यावर 'हवा मानवत नाही' हे कारण लिहून त्यांनी ता अर्ज हेडमास्तरांकडे दिला. त्याचा परिणाम म्हणून त्यांची बदली सोलापूरच्या नॉर्थकोट हायस्कूलमध्ये झाली. त्या हायस्कूलचे हेडमास्तर सुदैवाने रघुनाथरावांना समजावून घेणारे निघाले. त्यामुळे एल्फिन्स्टन कॉलेजात गणिताच्या प्राध्यापकांचे सहायक म्हणून जागा निर्माण झाल्यावर रघुनाथरावांनी अर्ज केला तेव्हा त्यावर त्यांनी उत्तम शेरा मारून पुढे पाठवला आणि ती जागा त्यांना मिळाली. 'मुंबईला सुमारे एक वर्ष आणि सोलापूरला मे महिन्याची सुट्टी करून सहा महिने शाळा खात्यात काढल्यावर माझी एल्फिन्स्टन कॉलेजात नेमणूक झाली' असे त्यांनी म्हटले आहे.

असे असले तरी मुंबईच्या व सोलापूरच्या शाळांतील हेडमास्तरांशी त्यांचे जे वर्तन राहिले त्यात सुसंगती आढळत नाही. मुंबईतल्या शाळेतील हेडमास्तरांना कोणत्याही बाबतीत 'भेटी' देण्याचे दाखवून आपण तत्त्वनिष्ठ आहोत असा बाणा त्यांनी सिद्ध केला; पण सोलापूरच्या हेडमास्तरांना त्यांचे गणिताचे जादा वर्ग घेण्याचे सौजन्य रघुनाथरावांनी दाखवले. बरं हे केल्यामुळे त्या हेडमास्तरांचा जो वेळ वाचत असे तेव्हा ते काय करीत असत ते पाहा : 'शाळा भरल्यावर एकदा इमारतीच्या भोवतालच्या पडवीतून हिंडून सर्व शिक्षक वर्गाबरोबर आहेत असे पाहून मग स्वस्थ झोप काढायची ' मग शिक्षक वर्गावरून गेले तरी हरकत नाही आणि काही शिक्षक जातही असत. मी गणिताचे काम घेतल्यावर त्यांची चांगलीच सोय झाली आणि ते माझ्यावर... खूश झाले ...'

काही असले तरी सरकारी शाळांमधून त्यांची सुटका झाली आणि ते मुंबईस परतले.

सोलापूरच्या वास्तव्यात बाहेरचे जेवण घेत राहिल्याने ते आजारी पडले. त्यातून बरे होताच तिथे पाटणकर नाटक मंडळींची नाटके व त्या मंडळींच्या मालकाबरोबर तमाशा पाहण्याचा अनुभवही लुटला.

## एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई :

'मुंबईला सुमारे एक वर्ष आणि सोलापूरला मे महिन्याची सुट्टी धरून सहा महिने शाळाखात्यात काढल्यावर माझी एल्फिन्स्टन कॉलेजात नेमणूक झाली ; आणखी सहा वर्षे सरकारी नोकरीत काढून नंतर मी राजीनामा दिला' असे त्यांनी लिहिले आहे. '१९१४ साली र. धों. कर्वे हे गणिताचे प्राध्यापक म्हणून आले' असे एल्फिन्स्टन कॉलेजचे तेव्हाचे विद्यार्थी चिंतामणराव देशमुख यांनी आत्मचरित्रात लिहिले आहे. ते आणि रघुनाथरावांनी २० मे १९२१ या दिवशी सरकारी कॉलेजातील प्राध्यापकांच्या जागेचा दिलेला राजीनामा लक्षात घेता हा कालावधी बरोबर वाटतो. पण सरकारी शाळांमधील त्यांची नोकरी अवघी दीड वर्षाची असताना आणि ती १९०६ साली ट्रेनिंग कॉलेज सुरू झाल्याबरोबर त्यात त्यांनी नाव नोंदवले असताना व विशेष म्हणजे एस.टी.सी.डी. ही पदविका घेऊन बाहेर पडल्यावर ताबोडतोब 'एल्फिन्स्टन मिडल स्कूल'मध्ये नोकरी मिळाल्याची माहिती लक्षात घेता कालगणनेच्या बाबतीत मेळ बसत नाही असे दिसून येते. कसे ते पहा : रघुनाथरावांवर १९३० ते १९४० या दशकात अश्लीलतेच्या आरोपाखाली तीन खटले झाले तेव्हा पहिल्या व दुसऱ्या खटल्याच्या वेळी माननीय न्यायालयाला स्वत:संबंधी जी निवेदने सादर केली आहेत त्यामध्ये त्यांनी लिहिले आहे–

'मी मुंबई युनिव्हर्सिटीचा एम. ए. असून सेक्रेटरी ट्रेनिंग कॉलेजचा डिप्लोमाही घेतला आहे व पॅरिस युनिव्हर्सिटीचाही गणिताचा डिप्लोमा घेतला आहे. १९०८ पासून १९२१ पर्यंत सरकारी कॉलेजात गणिताध्यापक होतो. ' (खटला पहिला).

'मी मुंबई युनिव्हर्सिटीचा गणिताचा एम.ए. आहे आणि त्याच विषयात पॅरिस युनिव्हर्सिटीचा उच्च अध्ययनाचा डिप्लोमा मिळवला आहे आणि येथील सेकंडरी ट्रेनिंग कॉलेजचा डिप्लोमाही मिळवला आहे. मी एल्फिन्स्टन कॉलेजात १९०८ पासून १९१७ पर्यंत गणिताचा दुय्यम प्रोफेसर होतो. गेल्या लढाईनंतर १९२० साली पॅरिस येते अध्ययन केले आणि १९२२ पासून १९२५ पर्यंत विल्सन कॉलेजात प्रोफेसर होतो' (खटला दुसरा).

या दोन्ही विधानामध्ये १९०८ साली ते एल्फिन्स्टन कॉलेजात गणिताच्या प्राध्यापकांचा सहायक म्हणून नोकरीस लागले या घटनेला दुजोरा मिळतो.

अण्णांनी 'आत्मवृत्त' मध्ये यासंबंधात पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे : 'माझा वडील-मुलगा रघुनाथ ह्याने दहा-अकरा वर्षे सरकारी विद्याखात्यात नोकरी केली. प्रथम काही वर्षे हायस्कुलांतून शिक्षकाचे व पुढे एम.ए. झाल्यानंतर कित्येक कॉलेजांतून गणिताच्या अध्यापकाचे काम त्याने केले. नऊ-दहा वर्षे नोकरी झाल्यावर एक वर्ष फर्लो रजा घेऊन व पुढे ती आणखी चार-पाच महिने वाढवून त्याने पॅरिस येथे फ्रेंच अकॅडमीमध्ये गणिताचा अभ्यास केला.'

१९०८ ते १९१७ हा रघुनाथरावांचा एल्फिन्स्टन कॉलेजमधील अध्यापनाचा काल, गणिताच्या प्राध्यापकांचे ते सहायक होते. या काळात त्यांनी 'गणिताच्या एका भागावर' पुस्तक लिहिले आणि ते 'सर्वत्र चालू झाले'. १९१४ साली चिंतामणराव देशमुख त्या कॉलेजात शिकत होते. रघुनाथरावांचे शिकवणे त्यांना चांगले वाटे पण त्यांना स्वत:ला ते समजत नसे ; म्हणून रघुनाथरावांच्या वर्गात ते बसत नसत. पण त्यांची भेट मात्र कॉलेजच्या टेनिस कोर्टवर हमखास पडत असे. कारण दोघानांही त्या खेळाची आवड होती. त्या काळात गिरगाव, मुंबई भागातून काशिनाथ रघुनाथ मित्र 'मासिक मनोरंजन ' प्रकाशित करीत असत. 'यत्र नार्यत्सु पूज्यंते रमंते तत्र देवता' हे त्या मासिकाचे ब्रीद होते. १९०९ साली त्या मासिकाने काढलेला 'दिवाळी अंक' मराठीतला पहिला दिवाळी अंक ठरला होता. बृहन्महाराष्ट्रातले मातब्बर लेखक, कवी, समाजसुधारक, विद्वान संशोधक, राजेरजवाडे त्यामधून लिहीत असत. मित्रांच्या सूचनेवरूनच अण्णांनी 'आत्मवृत्त'ची पहिली संहिता तयार केली आणि मित्रांनी ती पुस्तकरूपाने प्रसिद्धही केली. याच काळात प्रो. पेल्तिए यांच्याकडे रघुनाथरावांनी फ्रेंच भाषेचे धडे घेतले आणि त्यांना त्या भाषेतील साहित्य मराठी भाषेत अनुवादित करण्याइतकी तज्ज्ञता प्राप्त झाली होती. एका फ्रेंच प्रहसनाचा 'दोन बहिरे' शीर्षकाने अनुवाद करून 'मनोरंजन'कडे पाठविला. त्या मासिकाच्या ११ जुलै १९१४ च्या अंकात तो प्रसिद्ध झाला.

रघुनाथरावांचा पोशाख आणि त्यांचे व्यक्तित्व यासंबंधी लिहायला हवे. त्यांचे व्यक्तित्व फारसे प्रभावी नव्हते. वर्णानेही ते सावळे होते. आपण कुरूप आहोत असा न्यूनगंड त्यांच्यात होता. सोबत अबोल नि बुजरेपणाही होता. मात्र ते उत्तम प्रकारचे कपडे घालीत. 'त्यांची राहणी चैनीची बनली होती. धारवाडसारख्या गावी डिस्ट्रीक्ट जज्ज सेन (पुढे हायकोर्टाचे न्यायाधीश), प्रोफेसर जठार, औंधचे पदच्युत राजे नानासाहेब प्रतिनिधी वगैरे क्लबातील

मित्रमंडळींच्या सान्निध्यात काही वर्षे गेल्यामुळेही असेल, त्यांची राहणी स्वाभाविकच तशी झाली. पण हे ऐश्वर्य फार थोडे दिवस राहिले.' असे भास्कररावांनी कथन केले आहे. मात्र किमान तारुण्यात त्यांच्यात पोशाखाबद्दल छानछोकीपणा राहिला त्याला प्रिन्सिपॉल फ्रेझर यांची शिकवण कारणीभूत ठरली असावी. 'फ्रेझर केवळ अभ्यासाकडेच लक्ष देत असत असे नाही. त्यांचे इतर गोष्टींकडेही लक्ष असे. शिक्षकांनी आपला दर्जा सांभाळला पाहिजे आणि याकरिता त्यांनी पोशाखाकडे लक्ष दिले पाहिजे असे ते नेहमी सांगत असत. कपडे स्वस्त असले तरी चालतील, पण शिक्षकाने गबाळेपणा करता कामा नये असा त्यांचा कटाक्ष असे. असे फ्रेझर यांचे शिक्षकांच्या पोशाखासंबंधीचे विचार त्यांनी स्पष्ट केले आहेत.'

**कर्नाटक कॉलेज, धारवाड :**

रघुनाथराव पुढे 'कर्नाटक कॉलेज, धारवाड' इथे अध्यापन करू लागले तेव्हा श्री. के. क्षीरसागर त्यांचे विद्यार्थी होते. त्यावेळच्या रघुनाथरावांच्या वेषभूषेविषयी श्री. केक्षींनी पुढीलप्रमाणे गमतीशीर वर्णन केले आहे. 'मी नुकताच कॉलेजमध्ये प्रवेश केला, त्यावेळी कर्वे हे आम्हाला गणिताचे प्रोफेसर होते. गणिताची आवड नसलेल्या विद्यार्थ्याला आपल्या प्रोफेसरचे निरीक्षण करण्याला किती नामी संधी असते हे इतर लोकांना कळणार नाही ! प्रो. कर्वे हे त्यावेळी नकळत आपल्या विख्यात आतेबंधूचे, म्हणजे रँग्लर परांजपे यांचे, अनुकरण करीत असावे. लांब मिशांचे मुद्दाम पोमेड लावून वळवलेले आकडे, बिनचूक युरोपियन पद्धतीचा पोशाख, बहुतेक सबंध तासच्या तास वर्गाकडे पाठ करून घाईघाईने गणिताच्या 'स्टेप्स' मांडण्याची पद्धत वगैरेमुळे ते नवथर 'एफ.वाय.'च्या विद्यार्थ्यांच्या कौतुकाचा विषय होत. आमच्या कानडी वर्गबंधूंनी सर्वच प्रोफेसरांच्या आद्याक्षरांची काल्पनिक नावे तयार केली होती. त्यात कर्व्यांच्या वाट्याला आर. डी. या इंग्रजी अद्याक्षरांवरून रुद्राप्पा दुडबसाप्पा कर्वे हे नाव आले होते !'

य. दि. फडके यांनी आपल्या लहानपणी वरेरकर व कर्वे यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या तेव्हा त्यांना कर्वे कसे दिसले ते त्यांनी पुढील परिच्छेदात लिहिले आहे. '१९४१ साली साहित्य संमेलनासाठी सोलापूरला आलेल्या मामा वरेरकरांची सही घेण्यासाठी मी त्यांच्या हाती माझी स्वाक्षऱ्यांची वही दिली तेव्हा त्यांनी ती माझ्या हाती दिली आणि शेजारच्या सुटाबुटातल्या

एका गृहस्थाकडे बोट दाखवून म्हटले, 'अरे, माझ्याआधी यांची सही घे. हा फार मोठा माणूस आहे..... ' मुकाट्याने मी त्या गृहस्थांच्या हाती वही दिली. सहीवरून ते र. धों. कर्वे असल्याचे कळले.

साहित्यिक रवींद्र पिंगे यांना रघुनाथरावांचे पहाटे गिरगाव चौपाटीवर असे दर्शन होत असे : '(र. धों. कर्वे) रेक्लेमेशनवर एकटेच नरीमन बांधाच्या टोकापर्यंत तरातरा चालत जात. पँट, रंगीत शर्ट आणि डोईला चटेरीपटेरी किरिस्तावी कौंटी.'

पोशाखासंबंधी ह. वि. देसाई आणि रघुनाथराव यांच्यात जो संवाद आला तो पुढीलप्रमाणे :

"आपणांस कोणत्या तऱ्हेचा पोशाख आवडतो ? "

"एकाच तऱ्हेचा पोशाख करावा असं माझं मत नाही. नवीन तऱ्हेचे पोशाख करावे असं मला वाटत. पण तसं करतोच असं नाही, धोतर मात्र कधी आवडत नाही. सुरवार त्यावर लांब कोट आणि डोक्यावर फेझ टोपी घालणं मला जास्त आवडतं."

" आपण रुमाल कधी वापरता का ? "

"कधी कधी वापरतोही पण तो बांधणं थोडं त्रासाचं आहे म्हणून नेहमी वापरत नाही."

"युरोपियन पद्धतीचा पोशाख आपणास जास्त आवडत नाही का ?"

" फारसा आवडत नाही, पण तो पोशाख सोयीचा असतो म्हणूनच मी वापरतो."

१९०८ ते १९१७ पर्यंत एल्फिन्स्टन कॉलेजात 'गणिताच्या प्राध्यापकांचे सहायक' म्हणून नोकरी करूनही त्यांना तिथे पदोन्नतीची शक्यता नव्हती. त्यातच १९१७ साली धारवाडला 'कर्नाटक कॉलेज ' सुरू झाले. तिथे सुरुवातीला पहिले दोन वर्ग उघडले गेले आणि पुढे विद्यार्थ्यांची संख्या पाहून पुढील दोन वर्षांची शिफारस विद्यापीठाकडून नेमण्यात आलेल्या तज्ज्ञांच्या समितीने केली होती. त्यावेळी रघुनाथरावांना 'तुम्ही तिथे जात असाल तर पदोन्नती मिळेल ' असे सांगण्यात आले. अर्थात त्यांनी तो पर्याय स्वीकारला आणि 'असिस्टंट प्रोफेसर ऑफ मॅथेमॅटिक्स' म्हणून ते त्या कॉलेजात रुजू झालेदेखील. त्या काळात अ. बा. गजेंद्रगडकर, प्र. बा. गजेंद्रगडकर, अ. का. प्रियोळकर आणि श्री. के. क्षीरसागर हे त्यांचे विद्यार्थी होते. यांपैकी प्रत्येकजण पुढे आपापल्या क्षेत्रात ख्यातनाम झाला.

अ. का. प्रियोळकर यांनी रघुनाथरावांविषयी पुढील आठवण सांगितली आहे : 'प्रो. कर्वे यांना शिकवण्याची बिलकूल हातोटी नव्हती. मला तरी ते काय शिकवतात हे कळेना.

माझ्याप्रमाणे पुष्कळ विद्यार्थ्यांची अशी स्थिती झाली असावी. प्रिन्सिपॉलसाहेबांकडे त्यांच्या विरुद्ध तक्रारी गेल्या आणि त्याचा परिणाम असा झाला, की त्यांच्या जागी चार्ल्स सालढाणा नावाच्या गृहस्थांची नेमणूक करण्यात आली. ही नेमणूक पहिल्या टर्ममध्येच करण्यात आली की दुसऱ्या टर्मपासून, हे मला बरोबर आठवत नाही.'

इथे काही गोष्टी स्पष्ट होतात. आपल्या विस्मरणाची कबुली प्रियोळकरांनी शेवटी स्वत:च दिली आहे. दुसरी गोष्ट ही की, प्रियोळकर कला शाखेचे विद्यार्थी होते. त्यांना गणितात रुची असण्याची शक्यता कमीच. म्हणून रघुनाथराव जे शिकवीत ते समजण्यात प्रियोळकर स्वत: कमी पडले असणार. रघुनाथरावांच्या शिकवण्याविरुद्ध प्राचार्यांकडे तक्रारी गेल्या हे श्री. केक्षींनी लिहिलेले नाही. कारण तशी वस्तुस्थिती असण्याची शक्यता कमी आणि शेवटची म्हणजे तक्रारी गेल्याने 'त्यांच्या जागी चार्ल्स सालढाणा नावाच्या गृहस्थांची नेमणूक करण्यात आली' हे वस्तुस्थितीला धरून नाही. यासंबंधात स्वत: रघुनाथरावांनी लिहिले की, 'जेव्हा मी अधिक गणित शिकण्याकरता १९१९ साली रजा घेऊन पॅरिसला गेलो तेव्हा माझ्या जागेवर आलेले 'सालढाणा' नावाचे गृहस्थ नेमले गेले.' रघुनाथरावांना काढले म्हणून सालढाणा यांची नेमणूक झाली असे नसून रघुनाथराव रजेवर गेले तेव्हा त्यांचे वर्ग घ्यायला कुणाची तरी नेमणूक करणे गरजेचे होते. त्या परिस्थितीत सालढाणांची नेमणूक झाली होती. सालढाणा भौतिक शास्त्रात एम.ए. होते, शिवाय त्यांची नोकरीही रघुनाथरावांहून कमी कालावधीची होती. अल्पावधीत रघुनाथरावांना डावलून व्यवस्थापनाने सालढाणा यांना पदोन्नती दिली आणि त्यांचा पगारही रघुनाथरावांपेक्षा वाढवून दिला.

या घटना घडल्या तेव्हा ते पॅरिसमध्ये शिक्षण घेत होते. घरच्या लोकांनी ही वस्तुस्थिती त्यांना कळवल्यावर चिडून जाऊन त्यांनी डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन्सला खरमरीत पत्र लिहिले. वस्तुत: या साऱ्या प्रकारात त्यांचा तोल ढळला तो ढळलाच.

याचे एक कारण असे की, ते कॉलेज पहिल्या दोन वर्गांच्या मान्यतेनंतर १९१७ साली सुरू झाले होते. स्वाभाविकच १९१९ नंतर दुसऱ्या पुढच्या दोन वर्गांना मान्यता मिळण्याची शक्यता गृहीतच होती. दुसरे म्हणजे त्या कॉलेजात नोकरी मिळण्यासाठी संबंधितांनी वशिलेबाजीचा वापर केला होता. तिसरे म्हणजे रघुनाथरावांच्यासंबंधात आधीच विरोध होत होता व त्याची पुरेपूर जाणीव त्यांना होती. चौथे म्हणजे विद्यापीठाकडून तज्ज्ञांची जी

समिती पुढच्या वर्गांना मान्यता द्यायला आली होती—तिच्यात रँग्लर परांजपे एक सदस्य होते- तिने 'विद्यमान प्राध्यापक (र. धों. कर्वे) हे काम करण्यास तयार असतील तरच पुढील वर्षांना मान्यता देण्यात येत आहे' असा शेरा मारला होता, हे रघुनाथरावांना माहिती होते व शेवटचे म्हणजे त्यांनी फर्लो रजा मागितल्यावर त्यांच्या जागेवर घेण्यात आलेले सालढाणा हे गणिताचे नव्हे तर फिजिक्सचे एम.ए.पदवी प्राप्त केलेले होते. या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन आणि त्यातही गणिताच्या प्राध्यापकाला आवश्यक असलेली गुणवत्ता एम.ए (गणित) त्यांच्यापाशी होती. ती पुरेशी होती. व्यवस्थापनाने 'तुम्ही परदेशी जाऊन शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त करून या' असे काही सांगितलेले नव्हते. तेव्हा त्यांनी त्या कॉलेजात आपले पूर्ण बस्तान बसवून घ्यायला प्राधान्य दिले पाहिजे होते. पॅरिसला अशा मोक्याच्या वेळी जाण्याचा त्यांचा निर्णय पूर्ण विचारांती होता म्हणण्यापेक्षा उतावळेपणाचा द्योतक होता असे म्हणता येते.

या घटनेच्या संदर्भात शकुंतला परांजपे यांनी पुढील माहिती पुरविली आहे : 'ह्याच्या गैरहजेरीत त्याच्या खालच्या हुद्द्यावर असलेल्या प्रोफेसरला वरची जागा दिली, म्हणून हिंदुस्तानात परत आल्यावर आप्पाने नोकरीचा राजीनामा दिला. माझे आप्पा ह्यावेळी शिक्षणमंत्री होते. हा अन्याय ध्यानात येताच त्यांनी शिक्षणाधिकाऱ्यांना आप्पाचा राजीनामा न स्वीकारण्याबद्दल सांगितले व आप्पाला तो परत घे, म्हणून विनंती केली. दुसरी तशीच जागा खाली होताच ती तुला मिळेल व अन्याय दूर होईल, असे आश्वासन दिले. अण्णांनीही माझ्या आप्पांची वस्तुस्थिती समजून सांगितली व केलेली नेमणूक रद्द न करता आप्पाला लवकरच समान हुद्द्याची नोकरी मिळेल, अशी हमी दिली. परंतु पुढे एकदा गॅझेटमध्ये त्या दुसऱ्या प्रोफेसरचे नाव आपल्यापेक्षा वरिष्ठ जागी पाहिल्यावर आप्पाला संतापाची उसळी आली व आपला राजीनामा का स्वीकारला नाही, असे पत्र त्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांना लिहिले. तेव्हा राजीनामा स्वीकारण्याशिवाय गत्यंतर नव्हते.'

रघुनाथरावांचे जवळचे स्नेही भा. वि. वरेरकर यांनी आणखी तपशिलात लेखन केले आहे : 'या बाबतीत वरिष्ठांशी पत्रव्यवहार करताना वरिष्ठ-कनिष्ठ भेद लेखनात न दाखवल्यामुळे त्या वरिष्ठांचा त्यांच्यावर रुसवा झाला. या रुसव्याची पर्वा न करण्याइतका ढिलेपणा त्यांच्या ठायी नव्हता. डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनबरोबर झालेल्या या पत्रव्यवहारात आपल्या बाबतीत झालेल्या अन्यायाबद्दल त्यांनी जी सडेतोड विधाने केली, अत्यंत कठोर

भाषा वापरली, सरकारी नोकराला अवश्य असलेल्या पडू वृत्तीचा अवलंब केला नाही... अधिकारमदाने धुंद झालेले अधिकारी आपली विद्वत्ता विसरून व्यक्तींच्या हक्कांवर...गदा आणतात... त्या वेळच्या डायरेक्टरविषयी खोटी विधाने करून आपल्या हक्कांवर अतिक्रमण केल्याचा आरोप प्रो. कर्वे यांनी केला होता ; तो सर्वस्वी खरा असला, तरी अधिकाराच्या कैफाने धुंद झालेल्या अधिकाऱ्याला पचण्याजोगा नव्हता. त्या आरोपाबद्दल अपमान वाटणे साहजिक असले, तरी फिर्याद करण्याइतका कायदेशीर पुरावा त्या अधिकाऱ्याच्या हाती असणे शक्य नव्हते. अर्थात प्रो. कर्वे यांजवर फिर्याद होणेच ज्याअर्थी अशक्य होते, त्याअर्थी त्यांना वाचवण्याची आणि वाचवण्यासाठी राजीनामा घेण्याची जरुरी नव्हती... ' ती विधाने 'False' म्हणून म्हणायची नसतील, तर 'Untrue' म्हणावी' असा उल्लेख 'दिलगिरीपत्र' समजल्या गेलेल्या त्या पत्रात प्रो. कर्वे यांनी केला होता. त्यामुळे त्या अधिकाऱ्याचे समाधान झाले नसावे. त्यानंतर प्रो. कर्वे यांनी चार-पाच महिने वाट पाहिली आणि नंतरच न्याय मिळत नाही असे सिद्ध झाल्यावर राजीनामा दिला.'

१९२० च्या अखेरीस रघुनाथराव पॅरिसहून परतले आणि त्यांची बदली डेक्कन कॉलेज, पुणे येथे करण्यात आली. काही महिन्यांनी तिथून 'गुजरात कॉलेज' अहमदाबाद इथे पुन्हा बदली झाली. शेवटी मनाजोगते काही होत नाही असे म्हटल्यावर त्यांनी सरकारी कॉलेजातील प्राध्यापकपदाचा राजीनामा दिला.

**गणिताच्या उच्च शिक्षणासाठी पॅरिसला रवाना :**

'गणिताचा उच्च अभ्यास करण्यासाठी' ते १९१९ च्या प्रारंभी पॅरिसला गेले. वास्तविक पाहता केंब्रिज आणि ऑक्स्फर्ड ही ब्रिटनमधली विद्यापीठे त्या काळात विशेषत्वाने प्रसिद्ध होती. सर्वसामान्यपणे बुद्धिमान भारतीय तरुण ज्यांना गणितात गती असायची तिथे जाऊन 'रँग्लर' होऊन परत यायचे. स्वतः अण्णांचे आप्त रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे हे तसे १९०० साली ती पदवी प्राप्त करून भारतात परतले होते. अशावेळी पॅरिस विद्यापीठात जाणे रघुनाथरावांनी पसंत केले हे लोकविलक्षण म्हणायला हवे. परंतु त्याचे खरे कारण त्यांना केवळ गणिताचा उच्च अभ्यासच करायचा नव्हता, तर त्याबरोबरच गुप्तरोग, स्त्री-पुरुष संबंध इत्यादीसंबंधीही. कारण या विषयाच्या बाबतीत त्या देशात विशेषत्वाने मोकळीक होती आणि अशा प्रकारची माहिती त्यांना त्यांचे फ्रेंच भाषेचे प्राध्यापक पेल्तिए यांनी दिली असणार. त्याकरिता परीक्षांचे पेपर्स तपासून पै न् पै साठवून त्यांनी पैशांची व्यवस्था केली होती.

(१) पॅरिसला पोहोचल्यावर त्यांनी 'पॅरिस विद्यापीठात गणितात पीएच.डी. करण्याकरिता नाव घातले.' त्याकरिता ते अभ्यास करीत राहिले.[१] त्याचबरोबर त्यांच्या वर उल्लेखलेल्या विषयावरील नियतकालिकांचा, ग्रथांचा त्यांनी शोध घ्यायला सुरुवात केली. या विषयातील तज्ज्ञ म्हणून प्रोफेसर गुजरो यांचे नाव त्यांच्यासमोर आले. एक तर त्यांच्यासंबंधी प्रो. पेल्तिए यांनी काही माहिती त्यांना दिलेली असावी किंवा तिथे त्यांनी जी नियतकालिके वा ग्रंथ धुंडाळले त्यामध्ये प्रो. गुजरो यांचे नाव आणि लेखन पाहिले असणार. त्यामुळे स्वाभाविकच त्यांची भेट घ्यावी, त्यांच्याशी संवाद साधावा अशी ऊर्मी रघुनाथरावांना झालेली असणार. स्वतः रघुनाथरावांनी 'समाजस्वास्थ'च्या मे १९३७ च्या अंकात 'गुप्तरोग प्रतिबंध' शीर्षकाचा लेख प्रसिद्ध केला होता. तो. प्रो. गुजरो यांच्या लेखाचा अनुवाद होता. त्या लेखाच्या प्रारंभी कंसात त्यांनी पुढील माहिती पुरविली आहे.

'प्रोफेसर गुजरो हे पॅरिसमधील गुप्तरोगांच्या प्रमुख अनुभवी तज्ज्ञांपैकी आहेत व प्रतिबंधासंबंधी माहिती आम्हांस खुद्द त्यांचेच तोंडून पंधरा वर्षांपूर्वी मिळालेली आहे.'

याचा अर्थ असा की, प्रो. गुजरो या समानशील व्यक्तीशी पॅरिसमध्ये त्यांनी संपर्क स्थापला होता व या विषयासंबंधी अधिकाधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला होता.

(२) आता त्यांच्या पीएच.डी.संबंधी काही माहिती हाताशी लागते काय, ते पाहू.

'नऊ-दहा वर्षे नोकरी झाल्यावर एक वर्ष फर्लो रजा घेऊन व पुढे ती आणखी चार-पाच महिने वाढवून त्यानी पॅरिस येथे फ्रेंच अ‍ॅकॅडमीमध्ये गणिताचा अभ्यास केला. त्या अ‍ॅकॅडमीची (Diplome d'Etudes Superieures) ही पदवी त्यानी मिळवली आहे.'

या पदवीसंबंधी एका वाचकाने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी लिहिले, की 'ही पॅरिस युनिव्हर्सिटीची पदवी असून तिचा अर्थ उच्च अध्यापनाचा डिप्लोमा' असा आहे व तो आम्हांला गणित विषयात मिळालेला आहे. हा एम.ए. पेक्षा उच्च आणि डॉक्टर पदवीपेक्षा कमी समजतात आम्ही पीएच.डी. नाही. '

त्यांना पीएच.डी. पदवी न मिळताच 'डिप्लोमा'वर का समाधान मानावे लागले यासंबंधात दिनकरराव कर्वे यांनी, 'आप्पाला चांगल्या राहण्याची हौस होती. शिवाय तो पॅरिसला जाण्याकरिता पैसे साठवीत होता. त्याला पॅरिसला तीन वर्षे राहून पीएच.डी. व्हायचं होतं पण पैसे अपुरे पडले म्हणून सुपिरयर डिप्लोमा घेऊनच लवकर परतावं लागलं' असे म्हटले आहे. आता वस्तुस्थिती काय होती ते रघुनाथरावच स्वतः सांगू शकत होते आणि त्यांनी ती फक्त ह. वि. देसाई यांना दिलेल्या मुलाखतीमध्ये सांगितली आहे

आणि ती अशी आहे : 'त्यावेळी मी पॅरिसमध्ये गेलो होतो. मला एका वर्षानंतर डॉक्टरेटसाठी 'थिसिस' लिहायचा होता. पण मी ज्या प्रोफेसरच्या हाताखाली काम करीत होती, त्याला ते आवडलं नाही. कारण तो तीन वर्ष अभ्यास करून पास झाला होता. तेव्हा मला सवलत मिळावी, हे त्याला पसंत पडेना. इतर प्रोफेसरांनी संमती दिली, पण त्यांच्या मान्यतेचा काही उपयोग होण्यासारखा नव्हता. कारण ज्या प्रोफेसरांच्या हाताखाली काम करायचं असतं त्यांच्याच मान्यतेची जरुरी असते. तीन वर्षांऐवजी एका वर्षात मला परवानगी देण्याचं त्याला जिवावर आलं. पण मी एम.ए. होतो. हे तो बुद्धिपुरस्सर विसरला आणि माझी डॉक्टरेट मिळवण्याची लायकी असतानाही मी डॉक्टरेट न झाल्याबद्दल मला दुःख झालं.'

(३) रघुनाथरावांना पीएच.डी. का मिळाली नाही यामागची कारणमीमांसा अशी आहे !

रघुनाथराव पॅरिसला गेले त्या काळात भारतात टिळकयुगाचा अस्त आणि गांधीयुगाची पहाट होत होती. स्वातंत्र्यलढ्याला जोर येत होता. त्याबद्दल दूर परदेशात राहून एकाकी अवस्थेत इथल्या घटनांबद्दल तरुण विद्यार्थ्याला उत्सुकता निर्माण होणे स्वाभाविक वाटते. शिवाय त्या काळात रेडिओचा तितका प्रसार झाला नव्हता आणि तिकडे झाला असला तरी हिंदुस्थानविषयक बातम्या देण्यावर तिथल्या सरकारचा जोर नसणार. शिवाय पॅरिससारख्या ठिकाणी काही मूठभर हिंदुस्थानी माणसं असणार. परदेशात मग ती सहज एकमेकाच्या जवळ येतात गटागटाने राहतात. त्या काळात 'खिलापत डेप्युटेशन' फ्रान्समध्ये गेले होते. त्यांच्या सभा तिथे होत होत्या. ती मंडळी आपल्या चळवळींबद्दल तिथे शिक्षणाच्या, नोकरीच्या वा व्यवसायाच्या निमित्ताने राहिलेल्या भारतीयांना माहिती देत असत व चळवळीकरिता काही मदत मिळते का ते पाहत असत. अशा सभांना रघुनाथराव कुतूहल म्हणून जात. यासंबंधी त्यांनी लिहिले की, '......मी १९१९ साली फर्लो घेऊन पॅरिस येथे गणिताचा अभ्यास करीत असता तेथे 'खिलापत डेप्युटेशन' आले होते आणि मला हिंदुस्तानातील बातमी बरेच दिवस न मिळाल्यामुळे केवळ कुतूहलाने मी इतर हिंदी विद्यार्थ्यांबरोबर काही व्याख्यानांस गेलो आणि याची बातमी तेथील हिंदी लोकांवर नजर ठेवणाऱ्या हेरांकडून ब्रिटिश कौन्सिलकडे ... पोचली.'

**डेक्कन कॉलेज, पुणे आणि गुजरात कॉलेज, अहमदाबाद :**

१९२० सालच्या अखेरीला ते पॅरिसहून परतले. मग कर्नाटक कॉलेज, धारवाडहून पुण्याच्या डेक्कन कॉलेजात आणि काही महिन्यातच गुजरात कॉलेज, अहमदाबाद इथे त्यांच्या बदल्या झाल्या. प्रत्येक ठिकाणी मानहानी आणि आर्थिक नुकसान त्यांना सहन करावे लागले.



एन ४०८८—३अ

अहमदाबाद येथील प्रिन्सिपॉल रॉबर्टसन हे खवचटपणाबद्दल प्रसिद्ध होते. 'नोकरी सोडल्यावर किती जास्त मिळकत होईल अशी आपली कल्पना आहे ? 'नोकरी सोडताना त्यांचा पगार तीनशे नव्वद रुपये होता. ही रक्कम त्या काळात आणि स्वस्ताईच्या काळात तर खूपच होती. स्वाभाविक राजीनामा देऊन रघुनाथराव आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेत आहेत असे रॉबर्टसन यांना वाटले असणार.

दिनांक २० मे १९२१ या दिवशी रघुनाथरावांनी राजीनाम्याच्या पत्राची प्रत 'बॉम्बे क्रॉनिकल' च्या संपादकांना प्रसिद्धीकरिता पाठवली. तीत त्यांनी प्रारंभीच, " I am sending here with a copy of my resignation of the Professorship of Mathematics at the Gujarat College as recently accepted by Government. Hardly any comment is necessary except that the officer who was responsible for the injustice was the then D.P.I. the Hon. Mr. J. G. Covernton, now on leave." असे म्हटले आहे. याचा अर्थ २० मे १९२१ पूर्वीच त्यांचा राजीनामा सरकारने स्वीकारला होता आणि त्यांच्यावर अन्याय करणारे डायरेक्टर ऑफ इन्स्ट्रक्शन्स मि. जे. जी. कॉव्हर्नटन हे रजेवर गेले होते..

राजीनाम्याच्या शेवटच्या भागात रघुनाथरावांनी नियमानुसार ३ ऑगस्ट १९२१ पर्यंत काम करण्याची इच्छा प्रदर्शित केली होती व शक्यतो त्या दिवशी किंवा त्याच्या आधीही आपल्याला सेवेतून मुक्त करावे अशी विनंती केली होती. सरकारी कॉलेजमधून प्राध्यापकाच्या नोकरीतून तेव्हा ते मुक्त झाले.

**विल्सन कॉलेज :**

१९२२ सालच्या जून महिन्यात त्यांना विल्सन कॉलेजमध्ये गणिताच्या प्राध्यापकाची अर्धवेळ नोकरी मिळाली. त्या आधीच्या आठ-दहा महिन्यांच्या काळात दादरपासून कुलाब्यापर्यंत पायपीट करीत त्यांना शिकवण्या कराव्या लागल्या. उरलेल्या वेळात त्यांनी परळ भागात संततिनियमन केंद्र काढले आणि गरजूंना त्या विषयासंबंधी ते मार्गदर्शन करू लागले. 'राइट एजन्सी' स्थापून त्याला आवश्यक असलेली साधने ते विकू लागले. इंग्रजी-मराठीतून ग्रंथरचना करू लागले. वास्तविक पाहता एल्फिन्स्टन कॉलेजचे प्रिन्सिपॉल विल्किन्सन यांचे त्यांच्याविषयीचे चांगले मत होते. विल्सन कॉलेजचे प्रिन्सिपॉल मॅकेन्झी हे त्यांच्या परिचयाचे होते. विल्किन्सन यांनी रघुनाथरावांसाठी त्यांच्याकडे शब्द टाकला. सुदैवाने तिथे गणिताच्या पार्ट टाईम (अर्धवेळ) प्राध्यापकांनी जागा रिकामी होती. विल्सन कॉलेज हे मिशनरी लोकांचे कॉलेज. त्या धर्मात संततिनियमनादी विचारांना पूर्ण विरोध आणि रघुनाथरावांचे

जीवितध्येय ह्या क्षेत्रात काम करण्याचे होते. म्हणजे दोन परस्परविरोधी विचारांचे घटक इथे एकत्र आले होते. रघुनाथरावांनी आपल्या अंगीकृत कार्याची त्या कॉलेजच्या प्राचार्यांना स्पष्ट कल्पना दिली होती असे दिसते. या संदर्भात त्यांनी लिहिले आहे की, 'विल्सन कॉलेजातील प्रोफेसराची जागा घेतानाच मी स्पष्टपणे सांगितले होते की, 'मी फक्त कॉलेजातील कामापुरता बांधलेला राहील आणि इतर वेळात मी पाहिजे ते करीन ' कॉलेजच्या व्यवस्थापनाने सहानुभूतीपूर्ण दृष्टिकोन बाळगून त्यांच्या अन्य कामांकडे कानाडोळा केला ; इतकेच नव्हे तर पुढे १९२४ साली त्यांची पूर्ण वेळ प्राध्यापक म्हणून नेमणूकही करण्यात आली.

दरम्यान अगदी अनपेक्षितपणे एक विलक्षण घटना घडून आली. 'किर्लोस्कर खबर'च्या संपादकांनी रघुनाथरावांकडे लेख मागितला आणि त्यानुसार त्यांनी ' अमर्याद संतती ' या शीर्षकाचा छोटासा लेख लिहून पाठवला. त्या मासिकाच्या १९२५ सालच्या ऑगस्टच्या अंकात तो प्रसिद्ध झाला. ' किर्लोस्कर खबर ' हे किर्लोस्करवाडीहून प्रसिद्ध होत असे. शंकरराव किर्लोस्कर त्याचे संपादक होते. ते पुरोगामी विचारांचे होते. त्यामुळे नवविचारांच्या लेखकांकडून लेख मिळवून ते सुधारणा करू इच्छित होते. पण किर्लोस्करवाडी हे औंध संस्थानात होते. तिथे ' पुरुषार्थ ' नावाचे नियतकालिक पंडित सातवळेकर काढीत असत. सातवळेकर सनातनी वृत्तीचे होते आणि त्याचा प्रचार ते आपल्या नियतकालिकामधून करीत. शिवाय औंध संस्थानाधिपती भवानराव पंतप्रतिनिधी यांचा आश्रय त्यांना लाभला होता. स्वतः भवानराव हेही सनातनी विचारांचे होते. त्यामुळे ' किर्लोस्कर खबर 'मधील लेखाने वादळ निर्माण झाले. रघुनाथरावांच्या विरोधात रयतेच्या तक्रारी संस्थानाच्या पोलिटिकल एजंट म्हणून काम पाहणाऱ्या जेकब बापूजी यांच्याकडे गेल्या. सांगली-मिरजेकडे त्यामुळे लोकक्षोभ निर्माण झाला.

रघुनाथरावांनी लिहिले, ' .... तो (लेख) पाहून औंध संस्थानात प्रसिद्ध असलेले खानबहादूर जेकब बापूजी यांनी व इतर काही लोकांनी श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांस अर्ज केला की, आपल्या संस्थानातील मासिकात अशा विषयावर लेख येणे योग्य नाही. तरी बंदोबस्त करावा. श्री. बाळासाहेबांची व माझी ओळख नव्हती व नाही, परंतु वडलांची होती. तेव्हा तो लेख त्यांनीच लिहिला असेल असा समजुतीने त्यांनी त्यांचे नावे एक पत्र लिहिले, की आपल्या लेखाबद्दल आमचेकडे बऱ्याच तक्रारी आल्या आहेत, त्या येऊन पाहून जावे. हे पत्र मजकडे आले, तेव्हा तो लेख मी लिहिला असून पुण्याच्या प्रो. कर्व्यांचा यांत संबंध नाही, असा खुलासा करावा लागला. इकडे खान-

बहादुरांनी मासिकाचे संपादकाकडून मी कोण, कोठे असतो वगैरे माहिती मिळवली व माझी दोन्ही पुस्तके व्ही.पी. ने मागवून घेतली......... ' खानबहादुरांनी पुढे विल्सन कॉलेजच्या प्राचार्यांना पत्र लिहून ' असा माणूस आपल्याला कसा चालतो ? ' म्हणून विचारणा केली. तेव्हा त्यांनी रघुनाथरावांना बोलावून घेतले. त्या दोघांमध्ये झडलेले संवादही रघुनाथरावांनी दिले आहेत ते असे—

' संततिनियमन हे आमच्या धर्मतत्त्वाच्या विरुद्ध आहे. या कॉलेजातील प्रोफेसरांनी त्याची तरफदारी करता नये. तुम्ही काय लिहिले असेल ते असो, परंतु आता ते बंद करा, तुम्ही कॉलेजात राहावे अशी आमची इच्छा आहे. ' मी स्पष्ट सांगितले, ' तुम्हाला गणित शिकवायला पाहिजे तितकी माणसे मिळतील, पण प्रचारकार्य करायला कोणीच तयार नाही आणि मला ते महत्त्वाचे असल्यामुळे मी ते करणार. ' मी असे उत्तर देईन अशी त्यांना कल्पना नव्हती. ते म्हणाले, ' हे प्रकरण कॉलेजच्या ' सिनेट ' पुढे ठेवले पाहिजे. परंतु तुम्हांला राजीनामा द्यावा लागेल. ' यानंतरही त्या दोघांमध्ये प्रश्नोत्तरे झाली. पण त्यांचे समाधान झाले नाही. त्यांनी रघुनाथरावांना सहा महिन्यांचा पगार, प्रॉव्हिडंट फंड वगैरे सर्व दिले व मॅकेंझी साहेबांनी मला एक पत्र लिहिले की ' अंगीकृत कार्याबद्दल आपली चिकाटी पाहून आम्हांला आपल्याबद्दल आदर वाटतो. ' रघुनाथरावांना विल्सन कॉलेजातील प्राध्यापकीचा या परिस्थितीत राजीनामा द्यावा लागला आणि अध्यापन क्षेत्रातली ती त्यांची शेवटची नोकरी ठरली.

त्यानंतर पुन्हा नोकरीसाठी वणवण आणि ती मिळत नाही म्हटल्यावर रघुनाथरावांच्या डोक्यात एकदम विजेसारखी एक कल्पना चमकून गेली. तेव्हा मुंबईत टॅक्सीचा वापर सुरू झाला होता. आपणही मोटार चालवायला शिकावे आणि टॅक्सीचा व्यवसाय करावा असे त्यांच्या मनाने घेतले. आता हाच व्यवसाय त्यांना का सुचावा या बाबतीतले पूर्व संदर्भ लागत नाहीत. कर्वे ब्राह्मण कुटुंबात जन्मलेले. या वर्णातील माणसं शिक्षकीपेशा, कारकुनी यांसारख्या बुद्धीशी संबंधित व्यवसायात शिरायची, अंगमेहनतीची कामे एकतर या मंडळींना झेपायची नाहीत किंवा ती करण्यात त्यांना कमीपणा वाटायचा. एकवेळ टॅक्सी चालवणे सोपे असेल, पण चुकून ती रस्त्यावर नादुरुस्त झाली, बंद पडली तर संबंधिताला जे हाल काढावे लागतात किंवा जे कष्ट घ्यावे लागतात त्याची पूर्ण कल्पना त्यांना नसावी. खेरीज हा व्यवसाय निवडताना चार चाकी वाहन चालवण्याचे त्यांनी प्रशिक्षण घेतल्याचे कुठे वाचनात आले नाही. विल्सन कॉलेजातील नोकरीचा राजीनामा

दिल्यानंतरच्या दिवसांसंबंधी लिहिताना त्यांनी म्हटले आहे की, '...आता पोटाचा प्रश्न उत्पन्न झाला. संततिनियमनाची साधने किंवा पुस्तके विकून पोट भरणे अशक्य होते आणि शिकवण्याही पूर्वीप्रमाणे मिळेनात. सहा महिने संपत आले तरी नोकरी मिळण्याचे काहीच चिन्ह दिसेना, तेव्हा स्वतः मोटर हाकण्यास शिकून भाड्याच्या मोटारीचा धंदा करावा असा बेत केला, परंतु ते व्हायचे नव्हते.'

**नैरोबी पर्व :**

रघुनाथरावांचे एक बंधू शंकरराव हे आफ्रिकेत नैरोबी येथे डॉक्टर होते. अण्णांचा बायांशी विवाह झाल्यावर त्यांना शंकरराव (१८९४), दिनकरराव (१९००) आणि भास्करराव (१९०३) अशी तीन मुले झाली रघुनाथरावांची ही सावत्र भावंडे असली तरी त्यांच्यात विलक्षण भ्रातृभाव होता. एक नामांकित डॉक्टर म्हणून शंकररावांनी तिकडे जम बसवला होता. आपल्या थोरल्या बंधूंच्या आयुष्यातील स्थित्यंतरे त्यांना तिथे कळत होती. त्यांनी रघुनाथरावांना नैरोबीला येण्याचे पाचारण केले. रघुनाथराव १९०६ नंतर बराच काळ अध्यापनाच्या क्षेत्रात होते. त्याकरिता लागणारी शैक्षणिक पात्रता त्यांनी संपादन केलेली होती आणि अनुभवही उदंड होता. तिथे त्यांना नोकरी मिळायला काही प्रत्यवाय नव्हता. कारण त्यांचे एक स्नेही बॅरिस्टर फडके हे तेथील कायदे मंडळाचे सभासद होते व त्यांचे सरकारात वजन होते. शिवाय रघुनाथरावांची व त्यांची प्रत्यक्ष ओळखही होती. परंतु प्रयत्न करूनही तिथे त्यांना नोकरी मिळाली नाही. ' सध्या जागा नाही ' असे मोघम उत्तर शिक्षण खात्याकडून पाच महिने मिळत राहिले. शेवटी कंटाळून ते पुन्हा मुंबईस परतले. त्यांना तिथे नोकरी मिळाली नाही याचे खरे कारण दक्षिण आफ्रिकेत ब्रिटिश सरकार होते आणि भारतातही त्यांचेच सरकार होते. रघुनाथराव पॅरिसला होते तेव्हा ' खिलाफत डेप्युटेशन 'च्या सभांना जात हे ब्रिटिश गुप्तहेरखात्याने पाहिले होते व तसा गुप्त अहवाल सरकारकडे गेला होता. तो भारत सरकारकडे होताच. दक्षिण आफ्रिकेतल्या ब्रिटिश सरकारने तो भारत सरकारकडून मागवून घेतला. त्यांना ' राजकीय व्याख्यानांना जाणारा मनुष्य ' खपणार नव्हता.

सरकारी नोकरी मिळेपर्यंत तिथे आचार्य नावाच्या एका हिंदी गृहस्थाने चालवलेल्या 'द डेमॉक्रॅट' या वर्तमानपत्रात संपादकीय आणि अन्य मजकूर लिहिण्याची जबाबदारी रघुनाथरावांवर टाकली कारण त्याला दुसरीकडे काही कारणाने जावयाचे होते. रघुनाथरावांनी

तेथील भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लेखणी चालवली. ती इतकी जहाल होती की आचार्य परत येताच प्रेसला गेलेला रघुनाथरावांचा लेख परत मागवून तो रद्द केला. कारण 'द डेमॉक्रॅट' ला सरकारी जाहिराती मिळत असत. रघुनाथरावांच्या लेखामुळे सरकारी रोष ओढवून घेऊन जाहिरातींद्वारे येणारा पैशांचा ओघ आचार्य यांना थांबवणे इष्ट वाटले नाही. प्रा. म. वा. धोंड यांना पुढे शंकररावांनी दिलेल्या मुलाखतीत असे म्हटले की, 'तिथल्या 'द डेमॉक्रॅट'मध्ये त्याला पत्रकाराच्या व्यवसायात मी प्रवेश मिळवून दिला होता. त्याचे संपादक रजेवर असल्यामुळे आप्पाने दोनेक महिने त्याचं संपादकत्वही सांभाळलं होतं. ते पत्र विकत घेऊन त्याला द्यायचं असा माझा विचार होता, पण त्याला भारतातच राहून कार्य करायचं होतं म्हणून तो परतला.'

रघुनाथरावांनी संततिनियमनाचे केंद्र १९२१ साली परळ भागात काढले आणि प्रत्यक्ष कार्याला सुरुवात केली. त्या दिवसांत पुरुषांनी स्वतःवर शस्त्रक्रिया करवून घ्यावी असे त्यांचे विचार होते. कारण त्यांनी ती करवून घेणे कमी त्रासाचे आणि सोयीचे होते. (पुढे त्यांचे हे मत बदलले कारण मुलं शेवटी स्त्रियांनाच होतात आणि त्याचा त्यांच्या शरीरावर परिणाम होतो, म्हणून स्त्रियांनीच शस्त्रक्रिया करवून घ्यावी असा त्यांचा विचार दृढ झाला.) या दृष्टीने 'परोपदेशे पांडित्यम्' पेक्षा 'आधी केले मग सांगितले' या विचाराचे ते असल्याने मुंबईत स्वतःवर शस्त्रक्रिया करण्याची विनंती त्यांनी डॉक्टरांना केली होती, परंतु कोणीही डॉक्टर या गोष्टीला तयार झाला नाही. ते नैरोबीला गेले तेव्हा त्यांचे वय होते ४४. म्हणून त्यांनी शंकररावांनाच तशी विनंती केली. शंकररावांनी डॉ. सोराबजी या आणखी एका डॉक्टरच्या मदतीने ती केली.

**'बॉम्बे बेहरिन' कंपनीत :**

रघुनाथराव आफ्रिकेतून भारतात परत कोणत्या परिस्थितीत आले ते त्यांनी एका पत्रात लिहिले आहे : 'इकडे ते लेख' ('द डेमॉक्रॅट'मधले) हिंदुस्थानातही येऊन पोहचल्यामुळे माझे काही स्नेही व नात्याचे लोकही मला आफ्रिकेत तुरुंगात टाकतील म्हणून घाबरले आणि त्यांच्या सल्ल्याने माझ्या बायकोने मला तार करून बोलावले आाणि तारेत कारण लिहिलेले नसल्यामुळे इकडे नोकरी आहे असे समजून मी परत आलो.'

रघुनाथरावांनी सरकारी कॉलेजातील नोकरीचा राजीनामा दिला तेव्हा त्यांना शिकविण्या कराव्या लागल्या होत्या. त्यांचे फ्रेंच भाषेचे प्राध्यापक पेल्तिए यांनी आपल्या मुलाची शिकवणी त्यांना दिली होती. पेल्तिए यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. आफ्रिकेहून ते परतले आणि नोकरी मिळविण्यासाठी प्रयत्न करू लागले तेव्हा पेल्तिए यांचा मुलगा 'बॉम्बे बेहरिन' कंपनीत नोकरीला लागला होता. ही कंपनी इराणच्या आखातातून हिरे आणून त्यांचा व्यापार इथे करीत असे. मि. रोझेंथाल नावाचे गृहस्थ तिचे व्यवस्थापकीय संचालक होते. त्यांना फ्रेंच आणि इंग्रजी जाणणाऱ्या साहाय्यकाची गरज होती आणि रघुनाथरावांना या दोन्ही भाषा चांगल्या अवगत असल्याने पोल्तिए यांच्या मुलाने साहेबाकडे शब्द टाकताच त्यांना ही नोकरी मिळाली. यासंदर्भात अण्णांनी 'आत्मवृत्त'मध्ये लिहिले—

'रघुनाथ फ्रान्समध्ये गेला त्यापूर्वीच त्याला फ्रेंच भाषा चांगली येत होती. तेथे गेल्यावर सर्व व्यवहार त्याला फ्रेंच भाषेतच करावा लागत होता. ह्या गोष्टीचा त्याला नोकरी मिळविण्याचे कामी फार उपयोग झाला. 'बॉम्बे बेहरिन कंपनी' ह्या नावाची मोत्ये व हिरे यांचा व्यापार करणारी एक कंपनी आहे. तिचे ऑफिस टाइम्स ऑफ इंडियाच्या इमारतीत आहे. त्या कंपनीचे मॅनेजर मिस्टर रोझेंथाल हे फ्रेंच गृहस्थ आहेत. त्यांना इंग्रजी व फ्रेंच ह्या दोन्ही भाषा चांगला जाणणारा एक प्रायव्हेट सेक्रेटरी किंवा पर्सनल असिस्टंट पाहिजे होता. हे काम अलीकडे दीड वर्ष रघुनाथाला मिळाले आहे.'

'बॉम्बे बेहरिन कंपनी'तली नोकरी ही कारकुनाच्या वर्गातील म्हणजे आठवड्यातील नियमित दिवस किंबहुना त्याहूनही अधिक वेळ ऑफिसात काम करावे लागे. रघुनाथरावांना त्याची सवय नव्हती. १९०८ पासून १९२५ पर्यंत काही काळामधील दोन नोकऱ्या सोडल्यास भरपूर सुट्या आणि चार तासांहून कमी कॉलेजमधील नोकरी त्यांच्या अंगवळणी पडली होती. 'या ऑफिसातल्या कामाला काही हिशेबच नव्हता. साहेबाच्या मर्जीप्रमाणे सारे चालायचे. रविवारीदेखील सुट्टी नाही' अशा रीतीने त्यांचे दिवस जायचे.

---

**तळटिपा :**

१. १९१९ ते १९२० अखेर रघुनाथराव पॅरिसमध्ये होते तेव्हा तिथल्या राहण्याच्या सोयींविषयी त्यांनी अपवादानेच लिहिले आहे : 'पॅरिसमध्ये एका बाईच्या घरात आम्ही पेइंग गेस्ट म्हणून राहत असताना एकदा जेवताना त्या बाईशी धर्मविषयक सर्वसामान्य स्वरूपाची चर्चा करीत होतो. बाई धार्मिक वृत्तीच्या असल्यामुळे माझे नास्तिक विचार

अर्थातच त्यांना पटण्यासारखे नव्हते. पण आम्हास जेवण वाढीत असलेली घरातील हरकामी मोलकरीण मात्र म्हणाली ' " महाशय, तुमच्या विचारांशी मी पूर्णपणे सहमत आहे. " (मोलकरणीने असे मध्ये तोंड खुपसावे, हे इंग्लंडमधल्या लोकांना फारच धक्कादायक वाटले असते. फ्रान्समध्ये मात्र तसे नाही.) ती मोलकरीण नुकतीच खेड्यातून नोकरीसाठी पॅरिसला आलेली होती. फ्रान्समध्ये प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे असल्यामुळे तिला लिहिता वाचता येत होते. तरी ती माझ्याइतकीच नास्तिक होती. : बुद्धिप्रामाण्यवाद, ५-१९-२०

पॅरिसमधील अविवाहित विद्यार्थ्यांच्या सहजीवनाविषयी त्यांनी पुढील माहिती पुरवली आहे : ' विवाहाशिवाय विवाहित स्त्रियांप्रमाणे राहणाऱ्या स्त्रिया इतर देशातही सापडतात. उदाहरणार्थ पॅरिस युनिव्हर्सिटीतील अविवाहित विद्यार्थ्यांबरोबर बिऱ्हाड करून राहणाऱ्या तरुण स्त्रिया एकेकाळी प्रख्यात होत्या. त्या इतक्या काटकसरीने संसार करीत असत की, विद्यार्थ्यांना घरून येणाऱ्या पैशात त्या दोघांचाही निर्वाह करू शकत असत. हाही वर्ग आता जवळजवळ नाहीसाच झाला आहे. कोणी कसे वागावे हा वैयक्तिक प्रश्न आहे, परंतु या सर्वांना वेश्या म्हणणे योग्य होणार नाही इतकेच येथे सांगायचे आहे.' : वेश्याव्यवसाय, राइट एजन्सी, १ जून १९४०, पृ. १६५.

तेव्हाच्या पॅरिसमधला त्यांनी कथन केलेला एक किस्सा : ' १९१९ साली जेव्हा मी पॅरिसला होतो, तेव्हा तेथे सर्वांच्या तोंडी अनेक स्त्रियांना फूस लावून, त्यांना लुबाडून कित्येकांचा खूनही केल्याबद्दल लांध्रू नावाच्या एका माणसाला फ्रेंच पद्धतीने शिरच्छेद करण्याची शिक्षा नुकतीच झाली होती, त्यासंबंधाच्या गोष्टी ऐकू येत. पहिले महायुद्ध नुकतेच संपले होते, पण तेथपर्यंत एकंदर साडेचार वर्षे या माणसाने धुमाकूळ घातला होता पण तो पोलिसांच्या हाती लागत नव्हता, इतकेच नव्हे तर फ्रान्समधील कायद्याप्रमाणे त्याने वास्तविक सैन्यात जाऊन युद्धात सामील व्हायला पाहिजे होते. परंतु या कायद्याला त्याने बिलकूल जुमानले नाही आणि तरी त्याची कोणालाही दाद लागली नाही.' (समाजस्वास्थ्य, मे १९५३, पृ. २०९.)

●●●

# ३. वैवाहिक जीवन

रघुनाथरावांच्या विवाहाच्या संदर्भात अण्णांनी अशी माहिती दिली आहे की, रघुनाथ स्वावलंबी झाल्याबरोबर मी हा प्रश्न (विवाहाचा) त्याच्याजवळ काढला, परंतु आणखी काही वर्षे तशीच जाऊ देण्याचे त्याच्या मनात असल्यामुळे मी त्याला आग्रह केला नाही. पुढे एकोणतिसाव्या वर्षी त्याचे लग्न झाले व मी त्याला या कामी योग्य ती मदत केली. या परिच्छेदातील अण्णांनी मोठ्या चातुर्याने शेवटचे वाक्य लिहिले आहे. ' मदत केली ' याचा अर्थ लग्न ठरविण्यात वडील म्हणून त्यांनी पुढाकार घेतला नव्हता.

आणखी एका ठिकाणी त्यांनी लिहिले की, रत्नागिरी जिल्ह्यातील एका गृहस्थांनी पत्र पाठवून आपल्याला तीन मुली असून थोरली विधवा आहे. त्यांची सोय आश्रमात होईल का? त्या मुलींची माहिती देताना अण्णा तिसरीचा अभ्यास प्रीव्हियस परीक्षेपर्यंत होऊन तिचे लग्न तिच्या एकविसाव्या वर्षी माझा वडील मुलगा एल्फिन्स्टन कॉलेजातील गणिताच्या अध्यापकांच्या मदतनीस आहे, त्याच्याशी झाले. या माझ्या सूनबाई हल्ली आपला संसार सांभाळून चंदारामजी हायस्कूलला शिक्षिकेचे काम करीत आहे अशी माहिती पुरवितात.

ही तिसरी मुलगी म्हणजे कु. गंगू गोडे होय. तिच्या पहिल्या बहिणीचा पुनर्विवाह पुण्यातील शेतकरी कॉलेजातील प्रा. द. ल. सहस्रबुद्धे यांच्याशी, तर दुसरीचा विवाह संगमनेर येथील हेडमास्तर दे. भा. लेले यांच्याशी झाला होता. त्यांचे बंधू प. कृ. गोडे हे पुढे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्राच्यविद्यासंशोधक म्हणून नावाजले गेले.

रघुनाथरावांचा हा प्रेमविवाह होता. अर्थात त्या दोघांनी परस्परांना निवडले असल्याने अण्णांना रघुनाथरावांसाठी वधू शोधण्याचे काम करावे लागले नाही. रघुनाथरावांचे हे प्रेम कसे जुळले यासंबंधी शंकररावांनी म. वा. धोंड यांना सांगितलेली हकीकत अशी आहे. 'त्यांचा प्रेमविवाह होता आणि मी त्याला साक्षी होतो. १९०९ साली आम्ही सर्व कर्वे मंडळी आणि गंगू, मालती व रंगू या बहिणी मुरुडास गेलो होतो. या बहिणी आश्रमात राहत आणि त्यांचे गाव मुरुडाजवळ होते. जाताना आगबोटीने गेलो, पण येताना गाडीवाटे म्हणजे

दापोली, महाड, महाबळेश्वर असे बैलगाडीतून आलो. दिवसा गावात मुक्काम आणि रात्री प्रवास, असा हा कार्यक्रम सहा-सात दिवस चालला होता. पूर्वरात्री व पहाटे आम्ही म्हणजे अण्णा, आप्पा (रघुनाथ, मी, गंगू, रंगू चालत असू. या प्रवासात आप्पा व गंगू यांचं जमलं आणि त्यांनी अण्णांना सांगितलं. अण्णांनी गंगूच्या वडिलांना लिहून त्यांची संमती मिळविली आणि हे लग्न ठरलं.'

**सुखपूर्ण जीवन :**

रघुनाथराव मुंबईत होते त्या काळात मालतीबाई (गंगूचे लग्नानंतरचे नाव) त्यांच्याबरोबर नाटक, सिनेमा पाहायला जात. प्रो. पेल्तिए यांच्याकडे जात आणि विशेष म्हणजे पेल्तिए यांना ते आपल्या घरी बोलावत. भारतीय पक्वानांबद्दल पेल्तिए यांना रुची होती आणि त्याकरिता कर्वे दांपत्याने आपल्याला बोलवावे अशी त्यांची अपेक्षा होती. मालतीबाईंचे शिक्षण पदवी प्राप्त व्हायच्या आधीच संपले वा सुटले असले तरी त्या चंदारामजी हायस्कूलमध्ये, म्युनिसिपाल्टीच्या उर्दू शाळेत शिक्षिका होत्या. १९२८ साली त्या आजारी पडण्यापूर्वी त्यांनी श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या गिरगाव येथील कन्याशाळेत नोकरी केली होती. त्यांच्यासंबंधीची माहिती अलीकडील मुख्याध्यापिका व्ही. व्ही. करंदीकर यांनी पुढीलप्रमाणे दिली आहे. 'श्रीमती मालतीबाई रघुनाथ कर्वे (सहशिक्षिका) श्री. ना. दा. ठा. कन्या शाळा', मुंबई-४, येथे फेब्रुवारी १९२४ ते जून १९२६ पर्यंत कार्यरत होत्या. त्यांना रुपये ५५ वेतन देण्यात येत होते.' मालतीबाई या पद्धतीने नोकरी करीत राहिल्यामुळे रघुनाथरावांना स्वाभिमानाने जेव्हा जेव्हा आपल्या नोकरीचा राजीनामा द्यावासा वाटला तेव्हा ते देत गेले. याशिवाय त्या गृहकृत्यदक्ष होत्या. त्यांच्या आदरातिथ्याचा अनुभव आपण अनेकदा घेतला असल्याचे शकुंतला परांजपे यांनी लिहिले आहे. तर बी. टी. चा अभ्यास करण्याकरिता भास्करराव कर्वे मुंबईत आले ते पहिल्या वर्षी (कारण तेव्हा हा अभ्यासक्रम दोन वर्षांचा होता) रघुनाथरावांकडे राहिले होते, तेव्हा त्यांना रघुनाथराव-मालतीबाईंचा संसार जवळून पाहता आला होता. त्यासंबंधी त्यांनी हृद्य आठवणी एका लेखात सांगितल्या आहेत.

रघुनाथरावांनी परळ भागात संततिनियमन केंद्र काढल्यावर सामान्यपणे स्त्रिया मार्गदर्शन घेण्याकरिता धजत नसत आणि त्याचे कारण त्यांना त्यांच्या नाजूक अडचणी एका पुरुषासमोर- रघुनाथरावांशी व्यक्त करू शकत नसत हे त्यांच्या लक्षात आले त्यामुळे त्यांनी मालतीबाईंना तयार करून स्त्रियांना सल्ला देण्याचे काम सुरू केले. त्याबाबतीत मालतीबाईंनी त्यांना पूर्ण सहकार्य केले. 'समाजस्वास्थ्य'मध्ये : मुंबईत सोय–स्त्रियांस तपासून, योग्य आकाराची टोपी निवडून ती स्वत:ला बसवण्यात शिकवून संपूर्ण माहिती देण्याचे काम सौ. मालतीबाई कर्वे करतात, अशी चौकट नियमितपणे प्रसिद्ध होऊ लागली. 'आपल्याकडे डचकॅप स्त्रीकडून देवविण्याची व्यवस्था आहे असे कळते. ही व्यवस्था ठीक आहे, पण या बाई आपल्या कामात इतक्या निष्णांत आहेत, की आपणच हे काम स्वत: खात्रीलायक करू शकाल असे आपणास वाटते। ' असा एका वाचकाने प्रश्न विचारला असता या बाई हे काम आमचे देखरेखीखाली १० वर्षे करीत आहेत, त्यांस पुरेसा अनुभव आहे असे समजण्यास हरकत नाही.' असे त्यांनी उत्तर दिले होते.[१] १९२७ सालच्या १५ जुलैला 'समाजस्वास्थ्य' मासिक सुरू केल्यावर मालतीबाईंनी त्यात लहानमोठी कामे करून सहकार्य दिले होते.

**आजारपण :**

१९२८ साली मालतीबाईंना आजाराने गाठले. हा आजार महत्त्वाचा ठरला. त्यासंबंधी तेव्हा वैद्यकीयशास्त्रात फारसा शोध लागलेला नव्हता. या आजारासंबंधी आपल्याला मूल का झाले नाही याविषयी आणि त्यासाठी आपण पुनर्विवाह का केला नाही या बाबतीत स्वत: रघुनाथरावांनी जी माहिती दिली आहे ती त्यांच्याच शब्दांत देत आहे–

आपल्या पत्नीस झालेल्या रोगाला पर्नीशियस ॲनिमिया म्हणतात. हा झाला त्यावेळी विलायती पदवी असलेल्या येथील चार-पाच डॉक्टरांनी तो न ओळखल्यामुळे व तरीही काहींनी ते कबूल न करता भरमसाठ उपचार केल्यामुळे तो बरा होण्याऐवजी वाढतच गेला. त्यानंतर तिला पुणे येथे पाठवणे भाग पडले व तेथे एका वैद्याच्या उपचाराने ती मरणोन्मुख झाल्यावर पुन्हा एकदा विलायती पदवीधर डॉक्टरांचा सल्ला घेतला व त्याने रक्त तपासण्यास सांगितले व त्यावरून रोग ओळखला. त्यापूर्वी रक्त तपासावे असेदेखील कोणी सुचविले नव्हते. अर्थात रोग ओळखल्यावर उपचार हल्ली इतका ठरीव व हुकमी

झाला आहे की तो करू लागल्याबरोबर उतार पडू लागला. परंतु रोगाने इतक्या वेळात पृष्ठ मज्जारज्जूला कायमची इजा केली असावी असे दिसते कारण बाकी सर्व बाबतीत प्रकृती चांगली असूनही पायावरचा ताबा कमी झाला. म्हणजे पाय जड वाटून सहज उचलता येत नाहीत व काठीच्या साहाय्याने एक एक पाऊल चालावे लागते. हा सर्व परिणाम शरीरात जरूर तितके ' हायड्रोल्कोरिक ॲसिड ' उत्पन्न नसल्याचा आहे आणि त्यावर उपचार म्हणजे पित्ताशयाचा अर्क व जठराची पूड वगैरे नियमाने घ्यावी लागतात. ती बंद केली तर रोग पुन्हा उलटतो. आणखी एके ठिकाणी त्यांनी लिहिले की, आमचे पत्नीस रक्त क्षयाने (पर्नीशियस ॲनिमिया) पंगूपणा आला होता. आमचा कामशास्त्राचा अभ्यास विवाहापूर्वी निदान दहा वर्षांपासून चालू होता, आम्हा दोघांसही पुत्रप्राप्तीची आतुरता कधीच नव्हती. कित्येकांना धार्मिक कारणांकरिता पुत्र पाहिजे असतो, कित्येकांना वारस पाहिजे असतो. आम्हा दोघांपैकी कोणीच धार्मिक नव्हते व मिळकतच नसल्यामुळे वारसाला काय मिळणार? पुष्कळ स्त्रियांना निसर्गतः अपत्याची उत्कट इच्छा असते, पण त्यातही काही अपवाद असतात व पुरुषांना अपत्याची इच्छा असलीच तर ती आगंतुक कारणामुळेच असते. त्यातून आमची आर्थिक परिस्थितीही कधीच विशेष चांगली नव्हती, आणि ती नसेल तर मुले नसलेलीच बरी असे वाटणे साहजिक आहे. अर्थात संततिनियमनाची जी एक पद्धत आज विशेष यशस्वी समजतात, ती प्रथम आम्हास माहितीच नव्हती, आणि जे काही तुटपुंजे उपाय आम्ही वापरले ते फसून मूल होणे अशक्य नव्हते, पण ते झाले नाही. याचे कारण शोधण्याची जरुरी आम्हास वाटली नाही, पण डॉक्टरी चिकित्सेशिवाय स्वतःलाच समजेल असे काही कारण नव्हते, इतकेच मी सांगू शकतो. तसे चुकून मूल झाले असते तर मला सरकारी नोकरी सोडण्याची छाती झाली नसती, कारण एकदा कुटुंबाची जबाबदारी पत्करली म्हणजे जरूर तर अपमान सोसूनही शक्य तर कुटुंबावर दारिद्र्यात राहण्याचा प्रसंग येऊ देऊ नये असे माझे मत आहे. कित्येक लोक स्वार्थत्याग करण्याकरता कुटुंबावर तसा प्रसंग आणतात, पण ते मला पसंत नाही. एखादे वेळी, पतिपत्नी दोघेही स्वार्थत्याग करतात आणि मुले झाल्यास त्यांचे हाल होतात, तेही मला पसंत नाही. अर्थात सरकारी नोकरी सोडली नसती म्हणजे आज मी पाचसातशे रुपये पेन्शन खात बसलो असतो व

कोणतेही सामाजिक कार्य माझ्या हातून झाले नसते. मुले नसल्यामुळे मी स्वाभिमान राखण्याकरता एकदा सरकारी नोकरी व नंतर पुन्हा विल्सन कॉलेजातील नोकरी सोडली. कारण बायकोच्या अंगात स्वतःचे पोट भरण्याची ताकद होती व मला एकट्यालाच धोका होता. पण नंतर पत्नी आजारी पडल्यावर मला अपमान सहन करूनही नोकरी करीत राहावे लागले आणि तीही प्रोफेसरकी नव्हे तर कारकुनी! तीही शेवटी स्वाभिमानाकरताच सोडली, पण इतर मार्गांनी मी आपले पोट भरेन असे वाटल्यामुळे. तेथेपर्यंत अपमान सहन केला, कारण पत्नीच्या आजाराचा भयंकर खर्च डोक्यावर होता. दोनदा नोकरी सोडल्यावर पुन्हा नोकरी मिळण्याचा संभव फारच थोडा होता, म्हणून त्या अवधीत संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करून घेतली, कारण त्यानंतर मुले होण्यात मोठाच धोका होता. दुसरा विवाह करण्याचे बाबतीत प्रथम पत्नीची जरी संमती असली, तरी भांडणे होण्याचा संभव असतोच, आणि खर्चाचाही प्रश्न असतो. त्यात मला पाप वाटत नाही, पण दुसरी बायको करून तीही आजारी पडली तर? पण खरे म्हटले म्हणजे दुसऱ्या लग्नाचा विचारच माझ्या डोक्यात कधी आला नाही. पत्नीचे आजाराचे सुरुवातीला माझे वय ४७ असल्यामुळे कामपूर्तीचे बाबतीत मला विशेष जाणवण्यासारखी परिस्थिती नव्हती, परंतु इतरांनी धडा घेण्यासारखे मी काहीच केले नाही, म्हणजे माझा स्वभाव भित्रा असल्यामुळे इतर कोणतीही व्यवस्था केली नाही. तसा उपदेश अनेकांनी केला, पण स्वभावाला औषध काय?' रघुनाथरावांच्या या दोन प्रदीर्घ निवेदनातून त्यांच्या वैवाहिक जीवनावर खूप प्रकाश पडतो. कुबड्या लावूनही मालतीबाई अनेक प्रकारची कामे करीत असत आणि 'गृहकर्मे'सारख्या 'समाजस्वास्थ्य'मधल्या सदरासाठी अनेक पाककृतीसंबंधीही त्या लिहीत असत. शिवाय ' समाजस्वास्थ्य ' च्या सप्टेंबर १९४० च्या अंकात ' क्रमिक संस्कृत पाठावली ' या साहित्यभूषण त्रिंबक देवराव आरस यांच्या पुस्तकाचे एक छोटेखानी परीक्षण केले आहे, ते त्या भाषाविषयाच्या उत्तम जाणकार होत्या हे स्पष्ट करणारे आहे. मालतीबाईंकडे अण्णा, भास्करराव, इरावतीबाई आणि शकुंतला परांजपे यांचा राबता असायचा.[२] यापैकी पहिले तिघे महिला विद्यापीठातील कामाकरिता येत असत. शकुंतलाबाई आणि अन्य आप्त कौटुंबिक कामासाठी येत असत. त्यांचे आदरातिथ्य त्या प्रेमाने करीत असत. १९४० नंतर त्यांच्या आजाराने शरीरावर मात

केली. त्यांना अंथरुणात पडून राहावे लागले. तेव्हा रघुनाथरावांनी त्यांची मनापासून सेवा केली.[३] १९४४ च्या ऑक्टोबर महिन्यात तर त्यांना ' सिंघानिया हॉस्पिटलमध्ये ' ठेवण्यात आले होते आणि त्यावर्षीच्या दिवाळीच्या आदल्या रात्री पहाटे त्यांचे तिथेच निधन झाले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या शवाची रघुनाथरावांनी जी व्यवस्था केली त्याला पत्रकार अप्पा पेंडसे साक्षी होते. त्यांनी त्याचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे—

**मालतीबाईंचा मृत्यू :**

' त्यांची पत्नी वारली तेव्हाची गोष्ट. मी भाजी घेण्यासाठी सकाळी आठच्या सुमारास ग्रँटरोडकडे निघालो होतो. कोपऱ्यावर जातो तो आप्पा कर्वे. इतक्या सकाळी इकडे कुठे? इथे कोपऱ्यावरील सिंघानिया हॉस्पिटलमध्ये त्यांची पत्नी उपचारासाठी होती, मला माहीत होते. पुढे होऊन मी काही विचारणार तो १५-२० पावलांवर एका प्रेतवाहिनी हातगाडीवर कापडात गुंडाळलेले प्रेत दिसले. म्हणून आप्पांजवळ गेलो. त्यांनीच सांगायला सुरुवात केली, " रात्रीच वारली. सकाळी प्रार्थना समाजाची प्रेतवाहिनी आणली. त्यालाच म्हणालो, पाच रुपये देईन, घेऊन चल. करायची काय इतर माणसं ? त्रास कशाला सकाळीच? आणि लोक तरी काय करणार होते येऊन? जी गोष्ट चटकन आपल्याला करता येते ती करून टाकावी. बरे आहे. तो गाडीवाला पुढे गेला. मी जातो. बाकी कुठे जायचे ते त्याला सांगितलेच आहे.' १४ ऑक्टोबर १९४४ या दिवशी मालतीबाईंचे निधन झाले आणि रघुनाथरावांचा साथीदार त्यांना कायमचा सोडून गेला.

**स्वतंत्र व्यक्तित्वे :**

मालतीबाई आणि रघुनाथराव यांचं वैवाहिक जीवन जवळ-जवळ ३४ वर्षांचे. या दरम्यान नोकरीच्या वा नोकरीच्या शोधासाठी काही काळ रघुनाथराव घराबाहेर होते आणि मालतीबाई मुंबईत शिक्षिकेची नोकरी करून संसाराचा गाडा ओढत राहिल्या. हा क्रम रघुनाथराव जेव्हा जेव्हा स्वाभिमानाने नोकरीचा राजीनामा देत तेव्हा मालतीबाईंची नोकरी मदतीला येई. याखेरीज 'समाजस्वास्थ्य'च्या कामातही त्यांचे सहकार्य असे. तथापि, ती दोन स्वतंत्र व्यक्तित्वे होती हे लक्षात घ्यायला हवे. रघुनाथरावांना त्यांच्या कार्यात मदत करणाऱ्या पत्नीविषयी एका वाचकाने प्रश्न केला असता त्यांनी दिलेले उत्तर सूचक

आहे : 'संततिनियमनाच्या प्रचारात आम्हांस त्यांची बरीच मदत होते. आमची इतर मते त्यांस सर्वच पसंत असतील असे नाही. याचे कारण आनुवंशिक गुण आणि शिक्षण वगैरे परिस्थिती यावर प्रत्येकाची मते अवलंबतात आणि या सर्व गोष्टी कोणत्याही दोन माणसांच्या सारख्या नसतात.'

अण्णांविषयी मालतीबाईंनी लिहिलेल्या लेखातही आपल्या कमी शिक्षणाबद्दल लिहिले आहे: 'मला कोणतीही पदवी मिळाली नाही किंवा कोणत्याही कलेचे ज्ञान मिळाले नाही पण संस्थेच्या आरंभी संस्थेवर जे जे सुखदु:खाचे प्रसंग आले. त्यापासून व ती. गु. अण्णांच्या सहवासातून मिळालेल्या ज्ञानाची किंमत सर्व पदव्यांपेक्षा मी मोठी समजते.' 'समाजस्वास्थ्य'चा ऑगस्ट-सप्टेंबर-ऑक्टोबर १९४४ चा अंक जोडअंक म्हणून काढण्यात आला आहे. कागदाच्या टंचाईमुळे अंक अगदी दहा पृष्ठांचा काढावा लागत असे हे जरी खरे असले तरी 'समाजस्वास्थ्य'च्या एकूण काळात 'जोडअंक' म्हणावा असा हा एकमेव अंक आहे ; आणि त्याचे कारण त्यांनी जरी स्पष्ट केले नसले तरी 'वर्गणीदारांना सूचना' या शीर्षकाखाली पुढील निवेदन केले आहे : ' या अंकावर जरी ऑगस्ट-सप्टेंबर-ऑक्टोबर ' असे लिहिले आहे तरी हा एकच महिन्याचा अंक धरून प्रत्येक वर्गणीदाराची मुदत दोन महिन्यांनी वाढवली आहे, ' वस्तुत: या काळात मालतीबाईंचा आजार पराकोटीला गेला होता. त्यांना हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले होते व त्यांनी तेथेच शेवटचा श्वास घेतला. दिनांक १४ ऑक्टोबर १९४४ या दिवशी त्या मृत्यू पावल्या. तेव्हा त्यांच्या आजारपणामुळे रघुनाथरावांना अंक काढता आले नव्हते ही वस्तुस्थिती होती. ती त्यांनी वाचकांना विश्वासात घेऊन तर सांगितली नाहीच ; खेरीज त्यांनी पुढच्या अंकात मालतीबाईंच्या मृत्यूची वार्ताही देण्याचे कटाक्षाने टाळले. मे, १९४० च्या अंकात 'शोचनीय निधन : आमचे एक चाहते, वर्गणीदार श्री. चिं. देव हे पुणे मुक्कामी २२ एप्रिल रोजी हृदयाचे विकाराने वारले असे त्यांचे चिरंजीव कळवतात.' अशी बातमी कुणा वर्गणीदाराच्या मृत्यूसंबंधी ते देतात आणि आपल्या पत्नीच्या मृत्यूसंबंधी वार्तालेखन करताना त्यांची लेखणी अडते हे आकलनाच्या पलीकडले आहे.

●●●

## तळटिपा

१. 'संततिनियमनाची सोय : स्त्रियांना तपासून, योग्य आकाराची टोपी निवडून ती त्यांना स्वतःला बसवण्यास शिकवून इतर संपूर्ण माहिती देऊ. उपकरणाचे किमतीशिवाय ५ रुपये फी पडेल. भेटण्याची वेळ : सकाळी ९ ते १० व दुपारी ३ ते ४—मालतीबाई कर्वे, जाहिरात.

२. 'तीच (मालतीबाई) उलट माणसे जोडी. ह्या उदार स्वभावाचा फायदा फार लोकांनी घेतला. पाय गेले तरी कुबड्या घेऊन मालतीवहिनी घरातले सर्व काम करी. आप्पाला कामातही तिची मदत असेच. आल्या-गेल्याचे स्वागत करण्याचे काम तिचेच. पंगूपणामुळे तिला नोकरी तर केव्हाच सोडावी लागली होती. ह्या दांपत्याकडे पाहुणे किती येत, हे सांगणे कठीण आहे. अनेकांनी ह्यांच्या पाहुणचाराचा फायदा घेतला, मीही त्यातलीच. पण मालतीवहिनीला आजारीपणात घरी आणले असता लवकरच तिची उचलबांगडी करून तिला परत पाठवावे, अशीही मंडळी होती...' —शकुंतला परांजपे.

३. '१९४१ च्या अखेरीस मुंबईत भरलेल्या नाट्यसंमेलनाला मी त्यांना सार्वजनिक ठिकाणी असे प्रथमच पाहिले. त्यांच्या पत्नी त्यावेळी रुग्ण आणि प्रायः अपंग अशा झालेल्या असून, त्यांच्याबरोबर संमेलनाला आल्या होत्या. पत्नीच्या रुग्णस्थितीत कर्वे त्यांची प्रेमळ आणि कर्तव्यदक्ष पतीप्रमाणे सेवाशुश्रूषा करताना पाहून कर्व्यांच्या अंगी मानसिक रोगरहिततेपलीकडे काहीतरी आहे, याचा प्रत्यय प्रथमच आला.' —श्री. के. क्षीरसागर.

# ४. जीवितकार्य

## संततिनियमन केंद्र :

सरकारी नोकरीचा राजीनामा दिल्यानंतर ज्या विषयाचा त्यांनी जवळ-जवळ २० वर्षे अभ्यास केला होता, तो म्हणजे स्त्री-पुरुष-संबंध, गुप्तरोग व संततिनियमन– त्याच्या प्रत्यक्ष प्रचारकार्यात उतरण्याचे त्यांनी ठरवले. या विषयावर बोलायचे नाही असा जणू त्या काळात संकेतच होता. त्या काळात मनोरंजनाची साधने, पर्यटन विकास यांसारख्या गोष्टीचा परिचय सर्वसामान्यांना अज्ञातच होता. त्यांची शक्यतो विनामूल्य आणि घरातल्या घरातील- सुलभ गोष्ट म्हणजे पत्नीशी सुरतक्रीडा होय. पण तीही अंधारात आणि चोरटेपणानेच व्हायची. त्या काळातही विवाहबाह्य संबंध असायचेच. मुंबई-पुण्याकडे किंवा परदेशात शिक्षण घ्यायला गेलेले विद्यार्थी प्रायः विवाहित असत आणि त्यांना आपल्या शारीरिक भूकेची पूर्तता मिळेल त्या मार्गाने करण्याची इच्छा होई. त्यातून रोगाचा फैलाव होत असे आणि त्या विषयावरही उघड चर्चा करण्याची चोरी असे. त्या रोगांवर उपचार करू शकतील असे जाणकार डॉक्टर सहज उपलब्ध होतील अशी परिस्थिती नव्हती. घरात 'ईश्वराची इच्छा' म्हणून वर्षाला पाळणा हालत असे ; मग त्या कुटुंबप्रमुखाची जन्माला घातलेल्या तोंडाना अन्न द्यायची क्षमता असेच असे नव्हे. सुशिक्षित, मध्यमवर्गातील माणसेही डॉक्टरांकडे जाऊन या विषयावर मोकळेपणाने आपली अडचण सांगून उपचार करून घ्यायला कचरत असत. या समस्येवर उत्तर मिळावे म्हणून रघुनाथराव प्रथम परळ भागात राहत होते तिथे त्यांनी संततिनियमनाचे केंद्र काढले. त्यासाठी ज्या साधनांचीच, जेली, ट्यूब्जची आवश्यकता असे तिचा पुरवठा करणारी राईट एजन्सी नावाची त्यांनी संस्था सुरू केली.[१] स्त्रिया आपल्याकडे त्यांच्या अडचणी विचारायला बिचकतात म्हटल्यावर त्यांनी मुंबईत मालतीबाईंना शिक्षण देऊन तयार केले ; तर १९३३ साली शकुंतला परांजपे विलायतहून परतल्यावर तो रँग्लर परांजपे यांच्याबरोबर ऑस्ट्रेलियाला जाईपर्यंतच्या काळात पुण्यात त्यांची खास सोय केली. आपल्याकडे सल्ला घेण्यासाठी येणाऱ्या व्यक्तींकडून ते माफक फी घेत असत.



एन ४०८८—४अ

त्यांच्या साधेपणाचा गैरफायदा घेणारी माणसेही निघाली. डॉ. ए. पी. पिल्ले नावांचे एक डॉक्टर सोलापूर येथे क्लिनिक चालवीत होते, पण त्यांना या विषयाची जाणकारी नव्हती. त्यांनी आपली एक नर्स मुंबईस रघुनाथरावांकडे पाठवली आणि योग्य ते प्रशिक्षण घेऊन ही बाई परत सोलापूरला गेली. तिच्या मदतीने पिल्ले यांनी तिथे भरपूर कमाई केली. पुढे ते स्वतः मुंबईस आले आणि त्यांनी आपले क्लिनिक सुरू केले. 'मॅरेज हायजिन' नावाचे एक नियतकालिकही त्यांनी चालवले. त्यांची मुंबईत राजकारणी आणि प्रतिष्ठितांमध्ये त्यांची ऊठबस असे. मार्गारेट सँगर, मिसेस हाउ मार्टिन या संततिनियमनासंबंधी अमेरिका, युरोपमध्ये काम करणाऱ्या विदुषी जेव्हा मुंबईत येत तेव्हा त्या आवर्जून रघुनाथरावांकडे येत आणि त्यांच्या कार्याची पाहणी करीत ; प्रशंसा करीत. पिल्ले अशा वेळी त्यांच्याबरोबर रघुनाथरावांकडे येत असत. पुढे पुढे तर पिल्ले स्वतः पुढाकार घेऊन या स्त्रियांनी रघुनाथरावांना भेटण्याची इच्छा पिल्ले यांच्याकडे व्यक्त केली तरी ते शक्यतो त्याकडे दुर्लक्ष करीत. एकदा तर परळ भागात एक गुजराती गृहस्थांनी केंद्र सुरू केले तेव्हा त्यांच्या उद्घाटन प्रसंगी रघुनाथराव श्रोत्यांमध्ये उपस्थित असताना पिल्ले यांनी आपणच मुंबईत असे केंद्र प्रथम कसे सुरू केले हे सांगितले. अर्थात तेव्हा त्या गुजराती गृहस्थांनी ते रघुनाथरावांनी प्रथम सुरू केल्याची दुरुस्ती पिल्ले यांच्या उपस्थितीत केली.

रघुनाथरावांच्या या कार्यात अडथळे आणणारा एक वर्ग मोठ्या प्रमाणात होता आणि तो म्हणजे प्रत्यक्ष वैद्यकीय व्यवसाय कराणारांचा–डॉक्टरांचा होय. कारण त्यांना कुटुंबात दरवर्षी पाळणा हालणे सोयीचे किंबहुना फायद्याचे होते. लोकांनी संततिनियमनाची साधने वापरली तर स्त्रियांच्या गर्भारपणाचे प्रमाण कमी होईल आणि मग आपली सूतिकागृहे ओस पडतील ; परिणामतः आपले उत्पन्न घटेल या भीतीने ही मंडळी विरोध करीत असत.

यापैकी डॉ. मनोरमाबाई थत्ते या विलायतेला जाऊन वैद्यकीय शिक्षण–एल.सी.पी.एस. होऊन आलेल्या आणि सांगली येथे त्यांनी सूतिकागृह सुरू केलेले. आपल्या यजमानांच्या साहाय्याने त्या ते चालवीत असत. त्यांच्याकडून संततिप्रतिबंधक साधने बसवून घेतलेल्या परंतु ती योग्य तऱ्हेने न बसवली गेल्याने त्रास होणाऱ्या स्त्रिया शेवटी रघुनाथरावांकडे येत असत. या डॉक्टरीणबाई आपल्या पेशन्टसकडून अवाजवी पैसेही

घेत असत. अशा स्त्रियांना डॉक्टरबाईंच्या अज्ञानामुळे त्रास होत असे व त्या रघुनाथरावांकडे आल्यावर त्यासंबंधी मोकळेपणाने बोलत असत. त्यामुळे रघुनाथरावांना बाईंच्या कर्तृत्वाविषयी पूर्ण जाणीव होती. याखेरीज या बाई 'यशवंत', 'जीवन', 'स्त्री'सारख्या मासिकांमधून आरोग्यविषयक लेख लिहीत असत. त्यातही त्यांचे अज्ञान वा अर्धवट ज्ञान प्रकटत असे. त्यावर चिडून जाऊन रघुनाथरावांनी टीका केली. त्याचा परिणाम त्या दोघांमध्ये कडाक्याचा वाद झाला. 'समाजस्वास्थ्य' मासिकात 'एक कैफियत' शीर्षकाचे क्रमशः ७ लेख लिहून रघुनाथरावांनी त्या बाईंचा खरपूस समाचार घेतला. वस्तुतः मनोरमाबाई एक डॉक्टर होत्या आणि स्त्री होत्या. वर्षावर्षाला घरात हलणाऱ्या पाळण्यामुळे स्त्रियांवर शारीरिक दुर्बलता लादली जात असल्याचे आणि त्यांना पुरेसे पोषक अन्न मिळेल याची खात्री नसल्याने खरेतर संततिनियमनाचा त्यांनी हिरिरीने प्रचार करायला हवा होता.

**मिसेस मार्गारेट सँगर आणि मिसेस हाउ मार्टिन :**

१९३५ सालच्या डिसेंबर महिन्यात 'अखिल भारतीय महिला परिषदे'ने आयोजित केलेल्या अधिवेशनाला अमेरिकेतील संततिनियमनाच्या प्रचारक मिसेस मार्गारेट सँगर भारतात आल्या होत्या. याचदरम्यान लंडनमध्ये तसेच काम करणाऱ्या मिसेस हाउ मार्टिन याही आलेल्या होत्या. या दोन्ही स्त्रिया मुंबईला येत तेव्हा रघुनाथरांवाना भेटत असत आणि त्यांचा परस्परांशी स्नेह होता. रघुनाथरावांच्या विरोधात पी.ई.एन. संस्थेच्या मिसेस वाडिया आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कारवाईला प्रारंभ केला तेव्हा लंडनमधल्या पी.ई.एन. च्या मुख्यालयातील अधिकाऱ्यांच्या कानांवर खरा प्रकार जावा म्हणून त्यांनी हाउ मार्टिन यांना पत्राद्वारे कळविले होते व त्या बाईंनीही त्यांना योग्य तो प्रतिसाद दिला होता. मार्गारेट सँगर मुंबईत 'ताजमहाल हॉटेल' मध्ये उतरत तेव्हा त्यांनी कॅप्टन पिल्ये यांच्यामार्फत रघुनाथरावांना जेवणाचे आमंत्रण दिले होते. प्रा. ना. सी. फडके यांनी रघुनाथरावांच्या सत्तरीच्या निमित्ताने 'नवभारत' वृत्तपत्रात लेख लिहिला होता. त्यात त्यांचा गौरव केला होता व जाता जाता संततिनियमनाच्या प्रवर्तकत्वाचा मान रघुनाथरावांकडे जातो ते गैर असल्याचे सांगत आपण त्या विषयावर पुस्तक लिहिल्याने आपल्याकडे ते कसे येते हे सूचकतेने लिहिले, तेव्हा रघुनाथरावांनी ते खोडून काढताना मिसेस सँगर

यांनी फडक्यांच्या संततिनियमनावरील इंग्रजी पुस्तकाला ते पूर्ण न वाचताच प्रस्तावना लिहिली असे लिहिले आहे. पण तो भाग पुढचा झाला. मुळात मुद्दा असा की या विदुषींशी त्यांचे स्नेहपूर्ण संबंध होते.

'गेल्या मार्च (१९३४) मध्ये लंडनमधील प्रचारक मिसेस हाउ मार्टिन व नोव्हेंबरात मिसेस सँगर व त्यांचेबरोबर पुन्हा मिसेस हाउ मार्टिन या आमचे घरी येऊन संततिनियमनासंबंधी आम्ही काय सल्ला देतो यासंबंधी अर्धा तास बोलत बसल्या होत्या. दुसऱ्यावेळी त्यांनी मिसेस सँगरकडून भेटण्याविषयी निरोप आल्यामुळे आम्ही ताजमहाल हॉटेलमध्ये त्यांना भेटण्यास सपत्नीक गेला होतो. एकंदरीत इंग्लंड, अमेरिकेत जे मार्ग उत्तम समजतात तेच उपाय आम्ही सांगतो असे सिद्ध झाले.'

भारताच्या वाढत्या लोकसंख्येच्या प्रश्नावर महात्मा गांधी यांनी 'आत्मसंयमनाचा' उपाय सांगितला होता, तो रघुनाथरावांना अव्यवहार्य वाटत होता. मिसेस सँगर यांनी गांधीजींची भेट घेतली, तो त्यांच्या मौनव्रताचा दिवस होता. या प्रसंगाचे त्यांनी (रघुनाथरावांनी) पुढील शब्दांत वर्णन केले आहे : 'गांधीजींचे मन वळवणे शक्य नाही हे आम्ही त्यांना अगोदरच सांगितले होते.... या मुलाखतीची हकीकत मिसेस सँगर यांनी 'इलेस्ट्रेटेड विकली' मध्ये नुकतीच प्रसिद्ध केली. रघुनाथरावांच्या मते सँगर यांनी त्यांना विचारलेल्या प्रश्नांना 'खुळचट' उत्तरे दिली. १९३७ डिसेंबरपासून जून, १९३८ पर्यंत (एप्रिलचा अपवाद वगळून) सात लेखांकांमधून रघुनाथरावांनी सांगलीच्या डॉ. मनोरमा थत्ते यांच्याशी झालेल्या वादाचा परामर्श घेतला. हा वाद केवळ बौद्धिक पातळीवर राहिलेला नव्हता ; तर रघुनाथरावांपाशी कोणतीही वैद्यकीय पदवी नसताना ते संतति नियमनाचे केंद्र चालवतात व कायद्याच्या दृष्टीने तो गुन्हा आहे. म्हणून त्यांच्यावर बंदी आणण्यासाठी डॉ. थत्ते सरकारकडे प्रयत्नशील होत्या. डॉ. थत्ते यांनी हाउ मार्टिन यांची एक मुलाखत घेऊन ती 'साप्ताहिक धनुर्धारी' मध्ये प्रकाशित केली होती. त्या मुलाखतीतही हाउ मार्टिन यांना याविषयी प्रश्न विचारला होता. पण डॉ. थत्ते यांना साह्यकारी ठरू शकेल असे उत्तर हाउ मार्टिन यांच्याकडून न आल्याने तो विषय तिथेच संपला. रघुनाथरावांना हे कळल्यावर ते डॉ. थत्त्यांवर खवळले असल्यास नवल नाही.

यासंदर्भातील त्यांनी पुरविलेला तपशील पुढीलप्रमाणे आहे : येथील 'धनुर्धारी' साप्ताहिकाच्या ९ एप्रिलच्या अंकात संततिनियमनाच्या प्रसिद्ध प्रचारक मिसेस हाउ मार्टिन यांची एक मुलाखत छापली आहे. तीत वरील डॉक्टरीण बाईच्या लेखांची चर्चा आहे. तीतून पुढील उतारा घेतला आहे :—

— डॉ. थत्ते आणखी काही म्हणाल्या का ? त्यांजवर वर्तमानपत्रातून आलेली टीका त्यांना कितपत रुचली ? त्या काही मला तसे बोलल्या नाहीत, पण काही दिवसांपूर्वी मला मिस्टर थत्ते यांजकडून एक पत्र आले होते, त्यात त्यांनी माझे मत विचारले होते... कशा संबंधी ?

— काही खाजगी नव्हे ना ते पत्र ?

— तसे काही ते खाजगी नव्हे, पण मला मात्र त्या पत्राचा हेतू त्यावेळी कळला नाही. आता त्याचे कारण स्पष्ट कळले. मि. थत्ते यांची पृच्छा अशी होती की, डॉक्टरीचा गंधही नसलेल्यांनी संततिनियमनाची साधने पुरवावीत का ? त्यासंबंधी सल्ला द्यावा का ? अर्थातच मी नाही म्हणून म्हटले पण त्याबरोबर हेही लक्षात घेतले पाहिजे, की डॉक्टरांना जोपर्यंत त्या विषयाचे महत्त्व पटले नाही, तोपर्यंत डॉक्टर नसलेल्यांनी हे प्रचारकार्य अवश्य केले पाहिजे. डॉक्टरांचे लक्ष खेचण्याचे, त्यांना महत्त्व पटवून देण्याचे कार्य अशा डॉक्टर नसलेल्यांकडूनच व्हावयाचे आहे.

— असे विचारण्यात मि. थत्ते यांचा काय बरे हेतू असावा ?

— मलादेखील तो उशिरा कळला, डॉ. थत्ते यांच्या लेखाला प्रो. र. धों. कर्वे यांनी फारच झणझणीत उत्तरे दिलेली आहेत असे मला समजल्यावर मग मि. थत्ते यांनी विचारलेल्या प्रश्नांचे प्रयोजन माझ्या लक्षात आले.

यावर चिडून जाऊन रघुनाथरावांनी लिहिले की, डॉक्टरांशिवाय इतरांनी ही साधने विकता नये, असा कायदा होईपर्यंत मला भीती नाही. आणि जरी असाही कायदा झाला, तरी वेळ पडल्यास चहाचे दुकान काढूनदेखील पोट भरण्याची धमक माझ्या अंगात आहे आणि याविरुद्ध कायदा बहुदा होणार नाही. युक्तिवाद करता येत नाही म्हणून चिडून काय होणार? अशा रीतीने लोकांत हसे मात्र होण्याचा संभव आहे, हे डॉक्टरीणबाईंना कधी समजणार?

१९३० च्या दरम्यान रघुनाथरावांचा पत्ता बदलला. परळहून ते गिरगावला आले. १३, न्यू भटवाडी, गिरगाव, मुंबई-४ अर्थात त्यांच्या केंद्राचा पत्ता आता तोच राहिला.

**संपादने :**

### १. समाजस्वास्थ्य

दिनांक १५ जुलै १९२७ या दिवशी रघुनाथरावांनी 'समाजस्वास्थ्य' शीर्षकाचे मासिक सुरू केले. त्याचा आकार १२ × १७.५ सें.मी. असा होता. आपले लेखन इतर मासिके छापत नाहीत म्हणून स्वतःचे मासिक असावे हा विचार त्यांच्या मनात दृढ झाला. त्यातच त्यांच्या प्रिय विषयांवर म्हणजे स्त्री-पुरुष संबंध, गुप्तरोग, संततिनियमन या विषयांवर शास्त्रीयस्वरूपाची चर्चा करणारे ग्रंथ अगदी एका हाताच्या बोटावर मोजता येतील इतके प्रसिद्ध होते. शिवाय या विषयासंबंधी जनसामान्यांना ज्ञान देण्यासाठी वेगवेगळे उपविषय व त्यावरील अधिकारी व्यक्तीने लिहिलेले लेख देणारे स्वतंत्र मासिक निघण्याची गरज होती. हे आणि केवळ हेच विषय या मासिकात असावेत एवढी त्यांची सीमित दृष्टी नव्हती ; तर व्यक्तीच्या सर्वांगीण विकासास पोषक ठरेल असा विचार देणारे लेख त्यात यावेत ही दृष्टी होती. त्यात साहित्य म्हणजे कथा, नाटिका, कादंबरी जशी असायला हवी तशीच पाकशास्त्र, व्यायाम, पुस्तक परीक्षणे, नाटक, चित्रपट समीक्षा, आरोग्यविषयक लेखन इत्यादीवरील साहित्य यांचा अंतर्भाव असावा अशी त्यांची धारणा होती.[२] त्या काळात 'किर्लोस्कर' मासिक दरमहा एक तारखेला प्रसिद्ध होत असे. हा नियमित-पणा 'समाजस्वास्थ्य'ने ही जपला. दरमहाच्या १५ तारखेला 'समाजस्वास्थ्य'ने पानांची संख्या दुप्पट करून आणि त्यात अधिक चित्रे घालून प्रसिद्ध करण्याचा प्रयोग केला. रघुनाथराव मुळात हे मासिक तोट्यात चालवीत असत. त्यामुळे लेखकांना मानधन देणे त्यांना परवडणारे नसे. त्याचा परिणाम असा होई की, संपूर्ण अंक त्यांना स्वतंत्र लेखन करून वा इंग्रजी, फ्रेंच भाषांतील साहित्याचा अनुवाद करून काढावा लागे. याशिवाय प्रूफ तपासणे, अंकावर वर्गणीदारांच्या नावांच्या चिठ्ठ्या चिकटविणे, त्यावर तिकिटे लावून ती पोस्टात टाकणे ही सारी कामे ते स्वतः करीत. (त्यात मालतीबाईंचा सहभाग असेच. पण तो कोणी लक्षात घेतलेला नाही.) म्हणून 'समाजस्वास्थ्य' मासिक म्हणजे एकखांबी तंबू किंवा 'समाजस्वास्थ्य' म्हणजे सबकुछ रघुनाथराव असे लिहिले गेले आहे. वस्तुतः भास्करराव जाधव, माधवराव बागल, दुर्गा भागवत, मामा वरेरकर, शंकरराव किर्लोस्कर, दामोदर कोसंबी, कॅप्टन गो. गं. लिमये, गो. स. सरदेसाई यांनी लेखन केले आहे.

'सहृदय, महाड' या लेखकाने त्यात भरपूर कथालेखन केले आहे. ना. स. बापट, के. बा. गजेंद्रगडकर, वि. वि. लिमये, श्री. यादव, रा. ज. गोखले, कृ. बा. बाबर, मनोहर लिमये, ग. र. मुळे, श्री वर्दे, बा. वा. सावर्डेकर यांनीही लेखन केले आहे. याशिवाय इरावती कर्वे, शंकरराव, भास्करराव व दिनकरराव यांनीही प्रसंगोपात त्यात लेखन केले आहे. 'समाजसुधारणेच्या मार्गातील खाचखळगे' ही लेखमाला, एक नाटिका, कविता, लेख व ग्रंथपरीक्षणे असे विपुललेखन शकुंतला परांजपे यांनीही केले आहे. डॉ. के. भा. लेले या आप्तांनी रघुनाथरावांना अनुकूल आणि प्रतिकूलही लेखन केले आहे. लेखकांना मानधन देणे त्यांना पत्करत नव्हते हे खरे, पण त्यांना लेखनसाहाय्य करणारेही होते ही वस्तुस्थिती आहे. 'शारदेचे पत्र' हे सदर जुलै, १९३२ मध्ये रघुनाथरावांनी सुरू केले. त्यात तत्कालीन वृत्तपत्र-नियतकालिकांमधील लेखनाचा 'शारदा' या टोपणनावाने ते समाचार घेत असत. तर मोपाँसा या कथाकाराच्या ३१ कथांचा स्वैरानुवाद त्यांनी वेळोवेळी प्रसिद्ध केला. याशिवाय जवळजवळ ५५ विविध विषयांच्या लेखमाला (कधी स्वतंत्रपणे तर कधी फ्रेंच वा इंग्रजीतून अनुवादून) त्यांनी लिहिल्या. ग्रंथपरीक्षणे, पत्रकार संघ, साहित्य संघ व नाट्यपरिषदेच्या सभासंमेलनांमध्ये ते वेळोवेळी भाग घेत असत, त्याच्या आधारे ते विस्तृत वृतांतही देत असत. आर्थिक ओढग्रस्ततेविषयी वा डॉ. मनोरमा थत्ते, प्रभाकर पाध्ये व व्ही. शांताराम यांच्याशी ते 'संपादकीयात', वारंवार लिहीत असत. नाट्यपरीक्षणे, चित्रपटपरीक्षणे, 'समाजस्वास्थ्यांवरी खटल्यासंबंधी त्यांनी लेखन केले आहे. वाचकांच्या पत्रांना उत्तरे देण्यासाठी 'पत्रव्यवहार' हे सदर नियमित नसले तरी बऱ्याचदा आलेले आहे.

'समाजस्वास्थ्य'मध्ये रघुनाथरावांच्या हातच्या दोन कविता आढळल्या :

### १. सज्जनाचे बक्षीस

(चाल जो भेद विधीने)

जे स्वकर्म सोडुनि जनकार्या करिती। निंदाच त्यांप्रती बहुत मिळत जगती।
कुणि मूढ म्हणति हा सोडूनि स्वहिताला। सोबती पहा हो कृतघ्न जनतेला।।
की जनकार्य मिशे स्वहिताचि हा साधी। जरि नसे असे मग स्वकार्य का बाधा।

कुणी म्हणति मतलबी कीर्तिच मिळवितो। मतलबाविणे कधि कोण काम करितो।।
यश येता ही अपवाद असे येती। तदभावी जर ते अनिवारचि होती।।
जो अधिकाचि ग्रासा सूच्म मुखी घेई। त्यायोग्यचि म्हणति शासन ते होई।।
सज्जनी गुणाला दोषचि जे म्हणती। शोभते तयाला सहजा निंदा ती।
हे समजुनि जो जनकार्य शिरी घेई। अक्षम्य यशाने तोचि पात्र होई।।

## २. भय विसरा रे। चित्ती सद्भाव धरा रे।।

भय विसरा रे। चित्ती सद्भाव धरा रे।।
साधु दिसे तरि भोंदु पक्का।
भुलवुनि लोका घेई टक्का।।
प्रसंग येतां देई धक्का।
तो न बरा रे त्यापासुनि दुर सरा रे।।१।।
संतमहंतहि ते नावाचे।
पाहू जातां कुचकामाचे।।
वदति तैस करिति न साचे।
बहु नखरे। त्यांपासुनि दूर सरा रे ।।२।।
परि फकीरहि शोषिति रक्ता।
चिपाट बनविति अपुल्या भक्ता।
धर्माचा जणु त्यांचा मक्ता।
चोरचि सारे। त्यांच्यापासूनि दूर सरा रे ।।३।।
समान प्रेमा बांधुनि गांठी।
लोकहिताच्या कार्यासाठी।।
निंदास्तुतिवर लावुनि कांठी।
मी तुं हरा रे। सत्कार्या धार धरा रे ।।४।।

काठी टाकुनि द्या धर्माची।
डोळसां न ती उपयोगाची।।
दिशा आंखुनी सत्कार्याची।
भय विसरा रे। चित्ती सद्भाव धरा रे।।५।।

यातील पहिल्या कवितेत रघुनाथराव जणू स्वत:संबंधीचे लेखन करीत आहेत असे वाटते; तर दुसऱ्या कवितेत त्यांचा बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टिकोन व्यक्त झाला आहे.

**खटला : १**

१९३० ते १९४० या दशकात 'समाजस्वास्थ्य' मासिकावर अश्लीलतेसंबंधी तीन खटले झाले. पहिला खटला 'व्यभिचाराचा प्रश्न' या लेखावरून झाला. तो त्या मासिकाच्या सप्टेंबर, १९३१ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. पुण्याच्या यजुर्वेदीय माध्यं दिन सभेच्या वतीने अध्यक्ष सरदार जगन्नाथ महाराज पंडित यांच्या सहीने एक ठराव पास करून 'समाजस्वास्थ्य' हे अश्लील मासिक असून सरकारने त्यावर खटला भरावा असे म्हटले होते. या संस्थेचे चिटणीस विश्वनाथ बळवंत डावरे होते. तर संपूर्ण ठरावामागे अहिताग्नी शंकर रामचंद्र राजवाडे होते. २९ डिसेंबर १९३१ रोजी पोलीस इन्स्पेक्टर आचरेकर यांनी 'व्याभिचाराचा प्रश्न' ज्या अंकात प्रसिद्ध झाला त्या अंकाच्या सर्व प्रती जप्त करून रघुनाथरावांना कैद केली. ते २००० रुपयांच्या जामिनावर सुटले. इंद्रवहन मेहता या न्यायाधीशांसमोर तो खटला चालला. ४ एप्रिल १९३२ रोजी खटल्याचा निकाल लागून १०० रुपये दंड त्यांनी केला.

**खटला : २**

'समाजस्वास्थ्य'वर अश्लीलतेच्या आरोपावरून खटल्यांची मालिका सुरू झाली. मराठीतील एक पत्रकार का. न. निमकर हे त्यांच्या व्यवसायातील गुजराती मित्राच्या साहाय्याने गुजरातीत 'समाजस्वास्थ्य' काढीत असत. त्यात मराठी 'समाजस्वास्थ्य' मधला मजकूर प्राय: अनुवादून प्रसिद्ध करीत असत. तेव्हा 'समाजस्वास्थ'च्या डिसेंबर १९३३ च्या गुजराती आवृत्तीतील पत्र क्रमांक ३, ४, १२ ही अश्लील ठरवून त्यावर

खटला भरण्यात आला. ८ फेब्रुवारी १९३४ रोजी पोलीस इन्स्पेक्टर आचरेकर यांनी रघुनाथरावांना पुन्हा पकडून नेले. तेव्हा बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे सहकारी असईकर हे रघुनाथरावांचे वकील होते. २८ फेब्रुवारी रोजी तो पुन्हा इंद्रवदन मेहता यांच्या समोर तो चालवला गेला. त्यावेळी २४ एप्रिल १९३४ रोजी २०० रुपये दंडाची रघुनाथरावांना शिक्षा झाली.

**खटला : ३**

'समाजस्वास्थ्य'च्या सप्टेंबर, १९३८ च्या अंकातील 'कामकला' पुस्तकाच्या जाहिरातीवरून खटला झाला. वस्तुतः ती जाहिरात त्याआधीही प्रसिद्ध झाली होती, परंतु सप्टेंबरच्या अंकात जाहिरातीत 'अप्राकृतिक संभोग' हे शब्द घालण्यात आल्याने हा खटला झाला. ५ एप्रिल १९३९ रोजी रघुनाथरावांना पोलिसांनी पकडून नेले व त्यांची जामिनावर सुटका करण्यात आली. २४ जून १९४० रोजी न्यायाधीश बावरेकर यांनी निर्णय दिला. हा खटला रघुनाथरावांनी स्वतः चालवला. न्यायमूर्तींनी संशयाचा फायदा देऊन निर्णय दिला व रघुनाथरावांची त्यातून सुटका झाली.

या निर्णयापूर्वीच म्हणजे मे १९३९ पासून 'अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आक्षेप करणाऱ्या मनाचा गुण आहे'. ही चौकट 'समाजस्वास्थ्य'च्या प्रारंभीच्या पानावर प्रसिद्ध करायला रघुनाथरावांनी सुरुवात केली.

## २. 'समाजस्वास्थ्य' मासिकातील निवडक लेख :

'समाजस्वास्थ्य' मालिका सुरू होऊन ४ वर्षे पूर्ण होण्याच्या आधीच रघुनाथरावांनी 'समाजस्वास्थ्य' मासिकातील निवडक लेख १(भाग पहिला) प्रसिद्ध केले. असे निवडक लेखांचे संपादन करून ते स्वतंत्र पुस्तकरूपाने प्रकाशित करताना जुलै, १९२७ ते जून, १९३० मधील 'समाजस्वास्थ्य'मधील मजकूर त्यांच्यासमोर होता. त्यात 'लेख', 'पत्रव्यवहार' व 'सूचिपत्रक' असे तीन विभाग त्यांची केले आहेत. 'लेखा'मध्ये तोवर प्रसिद्ध झालेल्या लेखांमधून निवड करून ती दिली आहे. तर 'पत्रव्यवहार' सदरात या कालावधीत वाचकांना संपादकांनी अगदी मोकळेपणाने वैयक्तिक स्वरूपाच्या शंका विचारल्या होत्या व त्यांना संपादकांनी दिलेली उत्तरे असे स्वरूप आहे. (असे

म्हणतात की हा सारा मजकूर मुख्यतः रघुनाथरावांच्या हातचा असे.) तिसऱ्या भागात त्या कालावधीत ‘समाजस्वास्थ्य’मध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखांची सूची दिली आहे. २९ एप्रिल १९३१ या तारखेला रघुनाथरावांनी हे संपादन प्रकाशित केल्याचे दिसते.[३]

‘समाजस्वास्थ्य मासिकातील निवडक लेख’ (भाग-२) हे पुस्तकही त्यांनी स्वतःच संपादून ‘राइट एजन्सी, १३, नवी भटवाडी, गिरगाव, मुंबई-४’ इथून प्रकाशित केले आहे. तिथे (१) लेख (२) शारदेची पत्रे व (३) पत्रव्यवहार अशी विषयवार मांडणी करण्यात आली आहे. अ. ब. कोल्हटकर यांना रघुनाथराव मानीत. त्यांनी ‘संजीवनी’ मधून ‘वत्सलावहिनीची पत्रे’ हे सदर लोकप्रिय केले होते. त्यापासून प्रेरणा घेऊन जुलै, १९३२ च्या अंकापासून हे सदर सुरू करण्यात आले होते. रघुनाथरावांच्या विचारांवर व कार्यावर त्यांच्या समकालीन वृत्तपत्रांमधून वा नियतकालिकांमधून नेहमी टीका होत असे. त्याला या सदरातून ते उत्तरे देत असत. आपण सुरू केलेल्या या सदरातील निवडक मजकूर या दुसऱ्या भागामध्ये त्यांनी आवर्जून दिला आहे. हा भाग १८ ऑक्टोबर १९३३ रोजी प्रकाशित करण्यात आला आहे.

### ३. रीझन :

‘द रॅशनॅलिस्ट असोशिएशन ऑफ इंडिया’ या संस्थेतर्फे ‘रीझन’ नावाचे नियतकालिक जुलै, १९३१ पासून मुंबईत सुरू झाले. मुंबईतील बुद्धिवादी विचारांच्या माणसांचा एक गट या संस्थेत कार्यरत होता. या नियतकालिकाशी मार्च, १९३१ पासून रघुनाथरावांचा संबंध आला. त्यांनी जाहीर केलेल्या निबंध स्पर्धेत ‘सेंट्स ॲण्ड फकिर्स’ हा त्यांचा लेख पारितोषिक विजेता ठरून त्यांना पन्नास रुपयांचे बक्षीस मिळाले, त्यानंतर त्यांनी तिथे पत्रलेखन व लेख प्रसिद्ध केले. त्या नियतकालिकाचे ते फेब्रुवारी, १९३७ च्या अंकापासून संपादक झाले. यासंदर्भात त्यांनी लिहिले की, ‘येथील रॅशनॅलिस्ट असोशिएशन ऑफ इंडिया’ या संस्थेचे मुखपत्र ‘रीझन’ हे बऱ्याच दिवसांपासून बंद पडले होते. ते गेल्या फेब्रुवारीपासून पुन्हा सुरू करण्याचे ठरवून त्या संस्थेने त्याचे मुख्य संपादकत्व आमच्या गळ्यात घातले आहे. गळ्यात घातले आहे म्हणण्याचे कारण असे त्याचा कोणत्याही प्रकारचा मोबदला मिळणार नाही आणि काम मात्र पडते, शिवाय पुन्हा एकदा खटला वगैरे झाल्यास (पूर्वी एकदा झाला होता) तो संपादक म्हणून आमचेवर होणार. तथापि, वरील संस्थेने आम्हास संपादक नेमून मानच दिला आहे याची आम्हास पूर्ण जाणीव आहे.

रघुनाथरावांनी त्यात कधी स्वतंत्रपणे तर कधी मराठी 'समाजस्वास्थ्य'मधला काही मजकूर इंग्रजीत अनुवादून लेखन केले. त्याचबरोबर रँग्लर र. पु. परांजपे, डॉ. ग. य. चिटणीस या मराठी विद्वानांचे लेखन साहाय्य मिळविण्यास ते यशस्वी झाले. जानेवारी, १९४१ पासून अब्राहम सॉलोमन यांचे नाव संपादक म्हणून येऊ लागले, पण पुन्हा जून, १९४१ पासून तो त्या नियतकालिकाच्या अंतापर्यंत रघुनाथराव संपादक होते. काही मराठी पुस्तके, वाद यांच्यावर त्यांनी तिथे लेखन केले. उपासनी महाराज, मेहरबाबा, पी.ई.एन. संस्था इत्यादीबद्दलही त्यांनी तिथे लेखन केले. पण १९४२ मध्ये हे नियतकालिक बंद पडले. असे असले तरी आपली बुद्धिप्रामाण्यवादी विचारसरणी स्पष्टपणे इंग्रजी भाषेत ते किती सफाईदारपणे मांडू शकत होते ते 'रीझन' मध्ये आपण पाहू शकतो.

**भाषणे :**

रघुनाथराव काळेसावळेच होते. वक्तृत्वाची कला त्यांना वश नव्हती. परंतु संततिनियमनाचा प्रचार करायचा म्हटल्यावर केवळ लेखन करून भागणारे नव्हते. त्याकरिता सभासंमेलनांमधून भाषणे करणे आणि आपले विचार लोकांपर्यंत पोहोचवणे, श्रोत्यांच्या शंकांचे तिथल्या तिथे निराकरण करणे गरजेचे होते. यासाठी त्यांनी संधी मिळेल तिथे जाऊन भाषणे दिली या विषयावरील त्यांचे पहिले भाषण (१९२३ साली) पुण्याच्या 'वसंत व्याख्यानमालेत' झाले. त्यासंबंधीचा अनुभव त्यांनी पुढील परिच्छेदात मांडला आहे. 'या विषयावरील माझे पहिले व्याख्यान अनेक वर्षांपूर्वी पुण्यास वसंत व्याख्यानमालेत झाले, तेथे सर्व वयाचे व दर्जाचे पुरुष व स्त्रियाही होत्या. जवळजवळ सव्वा तासापर्यंत व्याख्यान लोकांनी स्तब्धपणे ऐकून घेतले नंतर काही विरुद्ध बोलणाऱ्या लोकांनाच बोलू दिले नाही. कै. दादासाहेब करंदीकर प्रथमपासून हजर होते व व्याख्यानात वापरलेल्या सभ्य भाषेबद्दल त्यांनी माझी प्रशंसा करून आभार मानले होते. अध्यक्ष ना. कामत होणार होते, परंतु त्यांना त्या दिवशी येता आले नाही म्हणून डॉ. फाटक अध्यक्ष झाले होते. त्यांनी मात्र घरी तयार करून आणलेले भाषण म्हटले आणि सांगितले की, संततिनियमन केल्यास हिंदुस्थानातील सध्याचे लोक मेले की देश खलास होईल 'नियमन' याचा अर्थच त्यांना कळला नाही. मालेच्या शेवटच्या दिवशी मात्र समारोप करताना सेक्रेटरी म्हणाले की, फक्त संततिनियमनावरील व्याख्यानाखेरीज सर्व व्याख्याने चांगली झाली. या दिवशी सुदैवाने दादासाहेब करंदीकरच अध्यक्ष होते, त्यांनी हे म्हणणे खोडून काढले.'

२९ ऑक्टोबर १९३३ रोजी दादरच्या धुरू हॉलमध्ये ' आजची विवाहसंस्था ' या विषयावर त्यांनी व्याख्यान दिले ते साररूपाने डिसेंबर, १९३३ च्या अंकात त्यांनी प्रसिद्ध केले. त्यात त्यांची लिहिले ' आजची विवाहसंस्था म्हणजे उंदरांचा सापळा आहे. आत शिरायला सोपा, पण बाहेर पडणे अशक्य. ' ' घटस्फोटाचा कायदा असा पाहिजे, की दोघांच्या संमतीने तर तो मिळालाच पाहिजे, पण एकाच्या अर्जावरूनही मिळाला पाहिजे. कारण कोणालाही एखाद्या व्यक्तीशी मर्जीविरुद्ध शारीरिक संबंध ठेवावयास लागावा, हा भयंकर जुलूम आहे आणि कोणावरही असा जुलूम करण्याचा हक्क समाजाला पोहचत नाही. '

' लिंगविषयक बाबतीत नीती म्हणजे माझ्या मते इतकीच, की कोणावरही जुलूम होता कामा नये व रोगांचा प्रसार होता नये व तसेच सामाजिक दृष्टीने पाहता अनिष्ट संतती होता नये.... पत्नी पतीची मालमत्ता समजली जावी ही गोष्ट लाजिरवाणी आहे..... '

' रॅशनॅलिस्ट असोसिएशनच्या ' वतीने दिनांक ६ डिसेंबर १९३१ रोजी ' स्टुडंन्टस ब्रदरहूड हॉल'मध्ये ' अश्लीलतेविरुद्धचे कायदे' या विषयावर त्यांचे भाषण आयोजित करण्यात आले होते. त्या भाषणात त्यांनी बीभत्सता, अभद्रता आणि अश्लीलता या बाबतीतले जगभरातील कायदे ' अन्यायकारक, अनैतिक आणि दुष्टपणाच्या कायद्यांचे मेरुमणी असल्याचे प्रतिपादन केले. कुठल्याही भाषेतील कायद्यात अश्लीलतेच्या सर्वसमावेश, परिपूर्ण व्याख्या नसल्याचे त्यांनी दाखवून दिले ; वेगवेगळ्या देशात नैतिकतेच्या कल्पनाही भिन्न आणि हास्यास्पद असतात हे सोदारहण विशद केले. '

अश्लीलतेविरुद्धचा कायदा प्रत्यक्षात ज्या पुस्तकावर तो आरोप केला जातो त्याची उलट विक्री अधिक होते असे आढळते. हे त्यांनी काही उदाहरणे देऊन स्पष्ट केले. व्याख्यानाच्या शेवटी त्यांनी वैयक्तिक अनुभव कथन केला आहे.

रघुनाथरावांचे संततिनियमन, गुप्तरोग आणि स्त्रीपुरुष संबंध हेच केवळ जिव्हाळ्याचे विषय होते असे नव्हे तर त्यांची एकूणच दृष्टी बुद्धिप्रामाण्यवादी होती. आपल्या बुद्धीला जे पटते, तर्काच्या कसोटीवर जे उतरते, विज्ञानाची जे कास धरते ते ते त्यांना आवश्यक वाटते. त्यांचा धर्मांधता, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, दंतकथा, दैवतकथा यांना प्रचंड विरोध होता. आपल्या एक चाहत्याने जेव्हा त्यांच्यापाशी संदेश व स्वाक्षरी मागितली तेव्हा त्यांनी

‘ ज्ञानाची पहिली पायरी म्हणजे अविश्वास होय ’ असा संदेश दिला होता. त्याचा अर्थ असा की, कोणत्याही बाबतीत ‘ बाबावाक्य प्रामाण्यम् ’ ही कृती न स्वीकारता त्या त्या विषयी शंका उपस्थित करा, प्रश्न विचारा, त्यातील तर्कधारा विज्ञानाधिष्ठित आहे ना याची खात्री करून घ्या. पूर्वज वा कुणीही काही सांगतील त्यावर आंधळेपणाने विश्वास ठेवू नका, विसंबून राहू नका असा होतो. त्यांच्या सर्व लेखनाचे, आचारविचारांचे मूलभूत तत्त्व बुद्धिप्रामाण्यावाद हेच होते. ते ईश्वर मानीत नसत कारण ईश्वर म्हणजे काय हे कोणी त्यांना दाखवू शकत नसत. पुराणकथा तर त्यांना भाकडकथा वाटत. स्वाभाविक त्यांच्या बुद्धीने तार्किकतेला, सत्यनिष्ठेला प्रमाण मानले व त्याचा समाजात प्रचार करण्यासाठी त्यांनी लेखणी झिजवली. आधीच आपला समाज स्थितिशील, अध्यात्मप्रवण आणि गतानुगतिक. म्हणून त्यांची जबाबदारी वाढलेली त्यातही त्यांच्या काळात सनातन्यांचा नेहमीच वरचष्मा राहिलेला म्हणून बुद्धिवादाच्या शस्त्राने त्यांना लढा पुकारावा लागला. यासाठी त्यांनी विपुल लेखन केले. वि. दा. ऋषी नावाचे त्यांच्या काळात मोहनिद्रा विषयावर लेखन करणारे, व्याख्याने देणारे व प्रत्यक्ष प्रयोग करणारे गृहस्थ फार प्रसिद्धीला आले होते. त्यांच्याशी त्यांना वैचारिक लढा करावा लागला. उपासनी महाराजांच्या विरुद्धही त्यांना लेखनातून आवाज उठवावा लागला. ते संधी मिळेल त्या ठिकाणी या विषयावर भाषणेही देत असत. दिनांक २६ जानेवारी १९४१ रोजी वांद्रे येथील ‘ कॉस्मो सर्कल ’पुढे ‘बुद्धिप्रामाण्य आणि आगामी युग’ या विषयावर त्यांनी भाषण दिले होते. त्यांचे हे व्याख्यान मुळात इंग्रजीत झाले. जगातील सामाजिक राजकीय व आर्थिक बाबतीत बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टीतून आमूलाग्र बदल घडवून आणण्याची गरज आहे, आणि त्याकरिता धार्मिकबाबींना फाटा दिला पाहिजे. मनुष्य हा बुद्धी आणि तर्क यांचा वापर करणारा असल्याने इतर प्राण्यांपेक्षा तो वेगळा आहे. तो बुद्धीला जे पटते त्यावरच विश्वास ठेवतो. काही लोक बुद्धीऐवजी अंतःस्फूर्तीला अधिक महत्त्व देतात. त्याच भावनेच्या पडद्यामुळे आपण फसतो हे लक्षात घेतले पाहिजे. तरीही अंतःस्फूर्तीला काही प्रमाणात स्थान आहेच. भावनांचा ज्ञान मिळविण्याच्या कामात अडसर होतो. बुद्धिप्रामाण्याने ईश्वर, स्वर्ग, नरक वगैरे फोलकल्पना सोडून ऐहिक सुखांचा विचार करणे भाग आहे. व ते सर्वांना न्याय्य रीतीने मिळेल हे पाहायला हवे, एच. जी. वेल्स यांनी ‘ राइट्स ऑफ मॅन ’ नावाचे सुंदर पुस्तक लिहिले आहे. मनुष्याच्या

मुख्य गरजा अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टी समाजातल्या व्यक्तीला फुकट मिळाल्या पाहिजेत असे त्यांनी प्रतिपादले आहे. परंतु त्यांनी कामतृप्तीचा विचार ग्रंथात केलेला नाही. मुलांच्या संगोपनाकरिताच विवाहसंस्थेचा उपयोग आहे, आणि विवाहित स्त्रीपुरुषांनी एकमेकांच्या शरीरावर हक्क गाजवण्याचे बिलकूल कारण नाही. शिवाय संततिनियमनाची गरज आहेच हे विचार त्यांनी मांडले. किर्लोस्कर, इचलकरंजीकर वादात किर्लोस्कर आणि केसरी या मासिक व वृत्तपत्रामधून १९३७ च्या प्रारंभी वाद झडला होता. ' स्त्री ' मासिकाच्या आधीच्या दिवाळी अंकावर ' ओढा ओलांडताना ' शीर्षकाचे रंगीतचित्र शिरूर यांनी काढलेले प्रसिद्ध झाले होते. त्याचबरोबर किर्लोस्करमध्ये भा. श्री. परांजपे यांची ' आभिसार ' ही कथा प्रसिद्ध झाली. ती अश्लील समजून इचलकरंजीच्या राणीसाहेब अनुबाई घोरपडे यांनी ' केसरी 'मध्ये पत्र लिहून निषेध नोंदवला व किर्लोस्करांच्या विरोधात सनातन्यांनी मोठा आवाज उठवला. त्यासंदर्भात मुंबईत एक सभा होऊन तिथल्या लेखकांनी किर्लोस्करांना पाठिंबा दर्शविला. त्या सभेला रघुनाथराव हजर होते व त्यांनी आपले पुढील विचार व्यक्त केले. " मासिकांवरील बायकांची चित्रे अश्लील आहेत, अशी सनातन्यांकडून टीका होते. मी त्यांना विचारतो की, रस्त्यातून बायका जात-येत असताना हे लोक काय डोळे मिटून घेतात? स्त्रियांची चित्रे जर कामोत्तेजक असतात तर प्रत्यक्ष स्त्रियांना तरी घाबरण्याचे काही कारण नाही. पुराणात अश्लीलता काय थोडी होती? कुंतीला विवाहापूर्वी पुत्र झाल्याची कथा आहे. तो मंत्रसाहाय्याने झाला असे म्हणतात. मला तरी ते सत्य दिसत नाही. कामुक वृत्तीचे लोक देशावर संकट आले तर काय करणार असे विचारले जाते. देशावर संकट येईल तेव्हाचा हा प्रश्न आहे. देशावर संकट येईल म्हणून आज कोणी जेवण घेण्याचे सोडत नाही. राज्यक्रांती मलाही पाहिजे असे माझे मत आहे."

वरील भाषणातून रघुनाथराव युक्तिवादात किती पक्के होते हे दिसून येते.

**लेखन :**

स्वतंत्र पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या लेखनाचे स्वरूप चार प्रकारचे आहे. त्यापैकी पहिला प्रकार म्हणजे संततिनियमन, गुप्तरोग, कामशास्त्र, आहारशास्त्र या विषयांवरील लेखन होय. अशा स्वरूपाची सात पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. त्यातही

सरकारी कॉलेजचा राजीनामा दिल्यावर त्यांनी प्रथम इंग्रजी व नंतर १९२३ साली 'संततिनियमन विचार व आचार' हे पुस्तक लिहिले. त्यांन वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न कुटुंबावर पडणारा आर्थिक बोजा, बाळंतपणांचा स्त्रीच्या शरीरावर होणारा परिणाम इत्यादीसंबंधी चित्रे, नकाशे व तक्ते यांच्या साहाय्याने गंभीरपणे चर्चा केलेली होती तरीही लेखन कंटाळवाणे वाटू नये म्हणून त्यात हलकासा विनोदही वापरण्यात आला होता. रघुनाथरावांचा श्री. कृ. कोल्हटकर यांच्याशी स्नेह होता. त्यांना त्या पुस्तकाची प्रत पाठवल्यावर जी प्रतिक्रिया पत्राद्वारे व्यक्त केली ती अशी होती: 'The copy of संततिनियमन that you have been kind enough to send to me is duly received. I thank you for the handsome present. I have read part of the book and have no doubt that it is a scientific book. I find a vein of humor running through it– a vain that was also present in the play that appeared some months back in the Manoranjan..'

काशिबाई हेर्लेकर या त्या काळातील एक लेखिका बडोद्यात राहत. अण्णांनी त्यांना 'संततिनियमन' ची प्रत पाठवल्यावर त्यांनी रघुनाथरावांना कळवले : 'आपल्या पुस्तकाची जाहिरात पाहिल्यापासून मला ते वाचण्याची उत्कंठा होती, ती नुकतीच पूर्ण झाली. सुमारे महिन्यापूर्वी 'संततिनियमन' हे पुस्तक आपल्या वडलांनी मला पाठविले.... पुस्तक पाठविल्याबद्दल मी आपली आभारी आहे.'

न. चिं. केळकर यांनी कळवले : 'आपले पुस्तक वाचले... तथापि ग्राम्य शरीरधर्मा प्रमाणे ग्राम्य विषयांची चर्चाही खाजगी किंबहुना गुप्त रीतीने ठेवणे योग्य होय... ह्याकरिता पुस्तकाची पोच देण्यापेक्षा मला अधिक काही करता येत नाही याबद्दल वाईट वाटते.'

'गुप्तरोगांपासून बचाव' हे त्यांचे दुसरे पुस्तक १९२७ साली प्रकाशित झाले. या पुस्तकात (१) नीती म्हणजे काय? (२) रोगांचे परिणाम, (३) आपले अदृश्यशत्रू, (४) आपले शरीर, (५) गुप्तरोगांचा संसर्ग, (६) गुप्तरोग कसे असतात? (७) त्यांवर उपचार, (८) प्रतिबंधावर आक्षेप अशी 'विचार' भागात ८ प्रकरणे तर 'आचार' भागात (१) प्रतिबंधाचे उपाय (२) स्त्री-पुरुषास उपदेश (३) गुप्तरोगांचे निर्मूलन अशी प्रकरणे असून 'पुरवणी-१' मध्ये भीती व सदाचार व 'पुरवणी-२' मध्ये काही आकडे

असा मजकूर दिलेला आहे. याच्या ' प्रस्तावनेत ' रघुनाथराव लिहितात — ' गतानुगतिको लोक: ' हे पंचतंत्रातील वाक्य हिंदुस्थानासच काय परंतु सर्व जगासच कमीजास्त प्रमाणात लागू पडते. याचे कारण असे की, बहुतेक लोकांच्या मनावर पारंपरिक पूर्वग्रहांचा इतका पगडा असतो की, त्यास ते क्षणभरसुद्धा बाजूला ठेवता येत नाहीत. हे ग्रह सर्व प्रकारच्या परिस्थितीवर अवलंबून असतात, व प्रत्येक व्यक्तीची परिस्थिती वेगळी असल्यामुळे हे ग्रह प्रत्येकाचे वेगळे असू शकतात. तेव्हा ते बाजूला ठेवल्याशिवाय शास्त्रीय पद्धतीने विचार करणे शक्य नसते, कारण शास्त्रीय पद्धत व शास्त्रीय सत्य सर्वांस सारखेच असते. गाय मारल्याने हिंदूस पाप व मुसलमानास पुण्य लाभते, हा हास्यास्पद प्रकार पूर्वग्रहांमुळे होतो. परंतु पूर्वग्रहांच्या शृंखला तोडून टाकण्याची ताकद फारच थोड्या लोकांत असते व त्यामुळे स्वतंत्र रीतीने विचार करण्याचे सामर्थ्य त्यांस येत नाही, म्हणूनच लोक गतानुगतिक असतात. '

१९३२ साली या पुस्तकाची दुसरी आवृत्ती निघाली तेव्हाही लोकांमध्ये काही बदल न झाल्याचे स्पष्ट करताना त्यांनी लिहिले— 'लैंगिक बाबतीत अजून सामान्य गोष्टीही लोकांस कळू लागल्या नाहीत, ' हे पुढील उदाहरणावरून दिसून येईल.

एकदा अहमदाबादचे एक गुजराती गृहस्थ आमचेकडे संततिनियमनाची माहिती विचारण्याकरता आले असता ते सहज बोलून गेले की, ' मी विधुर आहे आणि या वयात पुन्हा लग्न करण्याऐवजी एक विधवा स्वयंपाकाला ठेवली आहे. ती सर्व गरज भागवते. आणि तिच्याकरिताच ही माहिती पाहिजे आहे. ' अर्थात रोगासंबंधीही काळजी घेणे जरूर आहे असे आम्ही त्यांस सांगू लागलो, तेव्हा ते म्हणाले, त्याची काही काळजी नाही, कारण ती दुसऱ्या कोणाकडे जात नाही व मीही जात नाही. ' ती याच एका मनुष्यास चिकटून राहिली होती हे धरून चालले तरीदेखील ती पूर्वी कोणाजवळ राहिली नसेल किंवा तिला नवऱ्यापासून संसर्ग झाला नसेल कशावरून? हा विचार या सद्‌गृहस्थांचे मनात आला नाही....'

रघुनाथरावांनी ' संततिनियमन विचार व आचार ', ' गुप्तरोगापासून बचाव : विचार व आचार ' आणि ' त्वचेची निगा ' ही पुस्तके ' सामाजिक आरोग्यमाला ' या मालेअंतर्गत प्रकाशित केली होती.



एन ४०८८—५अ

‘ आधुनिक कामशास्त्र ’ हे पुस्तक त्यांनी १९३२ साली प्रकाशित केले. त्यात २२ प्रकरणे आहेत व ती प्रथम समाजस्वास्थ्य मासिकात प्रसिद्ध झाली होती. अर्थात त्यांचा पुस्तकात अंतर्भाव करताना त्यांनी पुन्हा लिहिली होती. या पुस्तकात ‘ पहिल्या आवृतीची प्रस्तावना ’ मध्ये पुस्तक लिहिण्यामागचा उद्देश पुढीलप्रमाणे व्यक्त केला आहे:–

‘ तर्कशुद्ध शास्त्रीय विचार करण्याची पद्धत एकंदरीत फारच थोड्या लोकांस साधते व त्यातही ती पद्धत कामवासनेस लावण्याची फारच थोड्यांची तयारी असते याचे कारण असे की, या बाबतीत स्वतःच्या अनुभवाचा, मनुष्याच्या मनावर इतका जबरदस्त पगडा असतो की त्यामुळे उत्पन्न झालेले पूर्वग्रह क्षणभरही बाजूला ठेवणे कठीण होते. यामुळेच पुस्तक आधुनिक म्हणविणारे लोक या बाबतीत आधुनिक नसतात व दृष्टिकोनच वाकडा झाल्यामुळे त्यांना या विषयात सरळ विचारच करता येत नाही. कोणीही हा विषयच घाणेरडा व अश्लील समजून त्यासंबंधी आपण विचारच करत नाही अशी स्वतःची समजूत करून घेतात व कोणी दुसऱ्या बाजूला घसरून त्यात धर्म व पावित्र्य घुसडतात, व प्रजोत्पादनाचा उद्देश असल्याशिवाय समागम करता कामा नये, वगैरे हास्यस्पद विधाने करून ब्रह्मचार्याचे गोडवे गातात. वास्तविक पाहता हे दोन्ही प्रकारचे लोक स्वतःची फसवणूकच करून घेतात व याबद्दल त्यास दोष देण्यापेक्षा त्यांचे परिस्थितीस दिला पाहिजे. अशा स्थितीत या विषयासंबंधी शास्त्रीय विचार लोकांपुढे मांडणे अत्यंत जरूर आहे व हा या पुस्तकाचा एक उद्देश आहे ’ याचा अर्थ ‘ शहाणे करून सोडावे सकळ जन ’ ही त्यांची हार्दिक इच्छा असून चिवट तर्काच्या धाग्याने विज्ञान स्पष्ट करणे व लोकांमध्ये त्याचा प्रचार करणे ही त्यांच्या लेखनामागील भूमिका होती, असे निःसंदिग्धपणे म्हणता येते.

त्वचेची निगा हे त्यांचे पुस्तक १९३५ साली प्रसिद्ध झाले असून त्यात (१) त्वचेचे कार्य (२) निरोगी त्वचेची काळजी (३) रूक्ष त्वचेची निगा (४) स्निग्ध त्वचेची निगा (५) वार्धक्यात त्वचेची निगा (६) केसांची निगा (७) त्वचेचे रोग (८) विविध माहिती. अशी प्रकरणे आहेत. ही बहुतेक सारी माहिती त्यांनी फ्रेंच आणि इंग्रजी पुस्तकांच्या आधाराने लिहिली असून आवश्यक तेथे चित्रे, कोष्टके वगैरे उपयुक्त माहिती देण्यावर त्यांनी भर दिला आहे.

१९३८ साली 'आधुनिक आहारशास्त्र' नावाचे पुस्तक स्वानुभवावर लिहिलेले आहे. बॉम्बे बेहिन कंपनीत ते नोकरीला असताना काही वेळा त्यांना इराणच्या आखातात साहेबाबरोबर जावे लागे. तिथली हवा त्यांना मानवत नसे. मालतीबाईंच्या आजारपणात तर क्वचित उपास घडत किंवा शिळ्या अन्नावर भूक भागवावी लागे. त्यातच उच्च रक्तदाबाचा विकार त्यांना जडला. त्यावेळी त्यावर औषधेही फारशी उपलब्ध नसत. मुंबईपासून दूर मोकळ्या ठिकाणी वारंवार जा, भरपूर चाला असा सल्ला तज्ज्ञ डॉक्टरांनी दिला होता. पण त्यांचा थकवा जात नव्हता. उन्हाचा त्रास होऊन एकदा त्यांना भोवळही आली. त्यामुळे कच्च्या आहाराचा प्रयोग त्यांनी स्वतःवर केला, यासंदर्भात असे सांगता येते की, एखाद्या विषयाचा त्यांनी ध्यास घेतला की, फ्रेंच व इंग्रजी भाषेत असलेले त्या विषयावरील ग्रंथाचा ते मनःपूर्वकतेने अभ्यास करीत व पुढे त्या विषयावर लेखन करीत असत. कच्चा आहार हा केवळ अभ्यासाचा विषय बनविला नाही तर त्याचा प्रत्यक्ष स्वतःवर ते प्रयोग करीत राहिले. त्याचा परिणाम म्हणून टेनिसचे सिंगलचे तीन सेट सहज खेळू लागले. 'आधुनिक आहारशास्त्र' या पुस्तकाच्या लेखनप्रेरणेविषयी त्यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली आहे. 'आहारशास्त्रावर पुस्तक लिहिण्याचा इरादा प्रस्तुत लेखकाचा पुष्कळ दिवसांपासून होता. परंतु वेळेच्या अभावी तो मनातच राहिला. इतक्यात या विषयावरील पुस्तकाला एका गृहस्थांनी बक्षीस ठेवल्याचे समजले, आणि त्याकरिता अमूक तारखेपर्यंत पुस्तके किंवा हस्तलिखिते पाठविणे जरूर होते. त्याप्रमाणे यंत्रलिखित तयार करून पाठवलेही. परंतु मध्यंतरी प्रकृती बरीच बिघडल्यामुळे ते लिखाण स्वतःलाचा समाधानकारक वाटले नाही. त्या बक्षिसाचा निकाल होण्यास आणखी काही महिने लागतील असा अंदाज आहे, तथापि, शक्य तितकी सुधारणा करून आणि बरीच भर घालून त्या निकालापूर्वीच ते प्रसिद्ध करण्याचे ठरविले आणि ते प्रस्तुत स्वरूपात प्रसिद्ध होत आहे.'

याचा अर्थ त्यांनी स्पर्धेसाठी पाठविलेल्या संहितेत आवश्यक ते बदल करून, शक्य तिथे पुस्ती, दुरुस्ती करून त्या स्पर्धेचा निकाल लागण्यापूर्वीच हे पुस्तक प्रसिद्ध केले. या पुस्तकात (१) आहारशास्त्राची आवश्यकता (२) मन्युष्याचा आहार (३) आपण जिवंत कसे राहतो ? (४) अन्नाचे महत्त्व (५) आहाराचे घटक-१ (६) आहाराचे घटक-२ (७) आहाराचे घटक-३ (८) आहाराचे घटक-४ (९) अन्नाचे

प्रमाण आणि निवड (१०) आहाराच्या पृथक्करणाची कोष्टके (११) पचनक्रिया (१२) काही विशिष्ट पदार्थांचा विचार (१३) प्रकृतीला काय मानवेल ? (१४) एकंदरीत काय ? (१५) पुरवणी-१ ; सारक औषधे घ्यावीत काय ? (१६) पुरवणी-२ : उपोषण (१७) पुरवणी-३ : मादक द्रव्ये (१२) सूचिपत्रे या प्रकरणांमध्ये मांडणी करून आहारशास्त्राची शास्त्रीय स्वरूपाची आणि परिपूर्ण माहिती वाचकांना देण्यावर त्यांचा भर राहिला आहे.

'वेश्याव्यवसाय' हे पुस्तक १९४० साली प्रकाशित झाले. त्यात (१) प्राचीन हिंदुस्थान (२) युरोप (३) नंतरची परिस्थिती (४) वेश्याबंदीची मोहीम (५) कायदेबंदी-संबंधीचा सविस्तर विचार (६) कायदेबंदीचा प्रत्यक्ष परिणाम (७) नियंत्रण कसे असावे? (८) वेश्यावृत्तीचा नैतिक विचार (९) संदर्भग्रंथाची यादी (१०) पुरवणी-खऱ्या आणि खोट्या वेश्या अशी प्रकरणे आहेत. 'प्रस्तुत लेखकावर वेश्यावृत्तीचा पुरस्कार करण्याचा आरोप अनेकांनी केला आहे आणि त्यांत थोडेबहुत तथ्यही आहे परंतु, तो पुरस्कार केवळ समाजसुखाच्या दृष्टीने आहे. वेश्या ही एक उत्तम संस्था आहे अशा विचाराने नव्हे.' अशी आपली या विषयाकडे बघण्याची भूमिका असल्याचे त्यांनी 'प्रस्तावने'त स्पष्ट केले आहे. या प्रस्तावनेचा शेवट करताना त्यांनी 'शेवटच्या प्रकरणात दिलेली माहिती मुख्यतः श्री. मामा वरेरकर यांजकडून मिळालेली आहे आणि तीबद्दल मी अत्यंत आभारी आहे' असे त्यांनी लिहिले. 'वेश्याव्यवसाय' या पुस्तकात या विषयाचा त्यांनी परिश्रमपूर्वक धांडोळा घेतलेला असून त्याबद्दल कुणाचे दुमत होण्याची शक्यता नव्हती. परंतु 'शिंदे' या शब्दाच्या व्युत्पत्तीसंबंधी त्यांनी केलेल्या विवेचनावरून त्यांना मानहानी पत्करावी लागली. तथापि, 'चुकीची दुरुस्ती' करताना झाल्या प्रकाराला मामा कारणीभूत आहेत असे नव्हे हे स्पष्ट करून त्यांनी मामांना दोषमुक्त केले. शिवाय भास्करराव जाधव, रियासतकार सरदेसाई यांची मते मागवून जनरल नानासाहेब शिंदे म्हणतात तसे आपण पूर्णतः चूक नाही हेही त्यांनी दाखवून दिले होते. या नको त्या वादामुळे हे पुस्तक अकारण गाजले. १९४९ साली त्यांनी लिहिलेले 'क्लैब्याची मीमांसा' हे पुस्तक प्रकाशित झाले असून त्यात वंध्यत्व विचार त्यांनी केला आहे.

ग. रा. भटकळ फाउंडेशनच्या संक्षिप्त मराठी वाङ्मयकोशमध्ये रघुनाथरावांच्या 'पॅरिसच्या परी' (१९४६) या पुस्तकाचे वर्णन 'कादंबरी' असे करण्यात आले आहे. वस्तुतः हे एका गायिकेचे चारित्र आहे. तिचे नाव निना द लांक्टो (१६२० ते १७०५) असे असून तिच्या स्वैरजीवनामुळे तिच्या मृत्यूनंतर लोक तिला विसरले. तिच्या मृत्यूनंतर ३० वर्षांनी 'ला बोमेल' याने तिचे चारित्र लिहिले. ते प्रायः तिच्यासंबंधी काही अस्सल माहिती न मिळाल्यामुळे सांगोवांगीवरून त्याला उपलब्ध झालेल्या गोष्टींच्या आधाराने लिहिले होते. 'चौदाव्या लुईचे शतक' हा संशोधनपर ग्रंथ 'व्हॉल्टेअर' या प्रसिद्ध लेखकाने लिहिला तेव्हा तिचे खरे चरित्र लोकांपुढे आले. कारण चौदाव्या लुईने तिच्याशी गुप्तपणे विवाह केला होता. पण तो उघड न झाल्याने तिची गणना लुईची रखेल म्हणून केली गेली. फ्रेंच भाषेत या बाईसंबंधी जे उपलब्ध होते त्याचा अनुवाद असल्याचे रघुनाथरावांनी 'प्रस्तावने'त म्हटले आहे. त्यांच्यासंबंधात त्यांनी लिहिले आहे की, विद्वतेने आणि कलाभिन्नतेमुळे विद्वानांच्या स्नेहाला आणि प्रेमाला पात्र झालेल्या पण त्यांचा दर्जा सामान्यतः वेश्यांपेक्षा पुष्कळ वरचा असतो अशा प्रकारच्या एका स्त्रीचे जीवनवृत्त या पुस्तकात सांगितले आहे. स्वभाविकच फ्रान्समधील रंगेल जीवनाच्या पार्श्वभूमीमुळे आणि त्यांच्या स्वैर वर्तनामुळे त्यांचे जीवन वैविध्यपूर्ण आणि नाट्यपूर्ण ठरते. Life is Stranger than fiction याचा अनुभव तेथे येतो. त्यामुळेच त्यांनी १२ प्रकरणांतून निना द लांक्टो सांगितलेली जीवनकहाणी कुणाला 'कादंबरी' वाटली तर गैर काही नाही. रघुनाथरावांनी या पुस्तकाखेरीज इतर सर्व पुस्तके 'राइट एजन्सी'मार्फत म्हणजे स्वतःच प्रसिद्ध केली. हे पुस्तक मात्र 'अभिनव प्रकाशन'च्या वा. वि. भटांनी 'धरित्री' प्रकाशनासाठी प्रकाशित केले असून रमाकांत वेलदे यांनी ते सुदर्शन मुद्रणालय, नाशिक' इथे मुद्रित केले आहे.

'समाजस्वास्थ्य' मासिकात वैचारिक लेखनाबरोबर कथा देण्यावर रघुनाथरावांचा कटाक्ष राहिला. त्याकरिता माधवराव बागल, सहृदय, महाड या लेखकांनी भरपूर कथालेखन केले. त्याचबरोबर रघुनाथरावांनी स्वतः मोपाँसा यांच्या कथांचा भावानुवाद करून अंकांची जागा भरली तर बऱ्याचवेळा त्यांनी कथालेखन केले. ते स्वतः आपल्या लेखनाला 'कथा' न म्हणता 'गोष्टी असे म्हणतात.' 'तेरा गोष्टी' या नावाचे 'नानासाहेब टक्के', 'पुनर्विचार', 'अग्निशलाकामंजुषा', 'सहकार्य', 'प्रेम', 'कठीण प्रसंग', 'विमलेचे शील', 'आपली

कुसुम', 'स्नेहाची कसोटी', 'झोपेचे औषध', 'विवाहाचे सुख', 'जगाचा अनुभव', व 'पेचप्रसंग' या गोष्टींचा हा संग्रह प्रसिद्ध केला आहे. त्या १९३४ ते १९४० या काळात लिहिल्या गेल्या असून या सर्वच गोष्टी 'समाजस्वास्थ्य' मासिकात प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्या ज्या अनुक्रमाने लिहिल्या व प्रसिद्ध केल्या त्याच अनुक्रमाने येथे दिल्या आहेत. या गोष्टींतील सर्व पात्रे काल्पनिक आहेत, असे त्यांनी प्रस्तावनेत म्हटले आहे.

या कथांच्या संबंधात प्रसिद्ध लेखिका अरुणा ढेरे यांनी लिहिले की,'असे वाटते की समाजात नानापरींची माणसे आणि नानापरींचे संबंध रघुनाथराव अनुभवत असणार. त्यातले काही नमुने त्यांनी या कथांच्या स्वरूपाने आपल्यासमोर ठेवले इतकेच. कदाचित लेखकाचा त्यांमागे काही हेतू असलाच तर तो इतकात असावा की स्त्री-पुरुष संबंधातल्या नैतिकतेचे आदर्श आज समाजात काहीही असते आणि त्यांमध्ये सोवळेपणा किंवा पावित्र्य कितीही काठोकाठ भरलेले असले तरी प्रत्यक्ष जीवनात माणसे पुष्कळच वेगळी वागतात. त्यांच्या जगण्यात अंत:प्रेरणा प्रभावी झाल्या की सामाजिक दाब झुगारून देण्याची किंवा तो टाळण्यासाठी पळवाट काढण्याचीच त्यांची वृत्ती असते.'

या कथांच्या स्वरूपाविषयी आणखी त्यांनी लिहिले आहे. 'या तेराही गोष्टींचे विषय प्रेम, लग्न, विवाहबाह्य संबंध असे ढोबळमानाने सांगता येतील पण त्यापेक्षाही अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे या विषयांची लेखकाने केलेली नैतिक हाताळणी. स्त्री-पुरुष संबंधाच्या विविध परी कोणताही भलाबुरा चष्मा न चढवता अगदी निखळ दृष्टीने रघुनाथरावांनी कथांमधून रंगवल्या आहेत'.[४]

**प्रहसने/नाटके :**

फेंच प्रहसनाच्या आधारे रघुनाथरावांनी 'दोन बहिरे' हे प्रहसन लिहिले ते १९१४ सालच्या 'मासिक मनोरंजन'च्या जुलैच्या अंकात प्रसिद्ध झाले. 'तरला' हे संगीत नाटक त्याच मासिकाच्या १९२३ च्या मे, जून अंकात दोन हप्त्यांमध्ये प्रसिद्ध झाले. १९३६ च्या जूनमध्ये त्यांचे 'गुरुबाजी' हे नाटक स्वतंत्र पुस्तकरूपाने प्रकाशित झाले. 'न्यायाचा शोध' हे नाटक १९४६ साली प्रसिद्ध झाले. म्हणजे त्यांची शेवटची दोन नाटकेच पुस्तकाच्या स्वरूपात उपलब्ध आहेत. त्यांचे नाटकांवर, नाटक पाहण्यावर विलक्षण प्रेम होते. 'साहित्य संघांत' नाटकांच्या तालमी होत तेव्हा ते हजर असत. मामा वरेरकरांबरोबरची एक आठवण रवींद्र पिंगे यांनी सांगितली आहे ती अशी :

'नाटक लिहायची उबळ झाली की मामा 'रधों'ना सोबत घेऊन थेट माथेरान गाठत.

माथेरानाला परिचयाच्या गुजराती पथिकाश्रमात त्रिकूट एकत्र जमे. त्रिकूट म्हणजे मामा, र.धों. कर्वे आणि त्यावेळच्या मुंबई नभोवाणीचे मामांचे विश्वासातले नाट्यकलाकार बाळ कुडतरकर. उतारवय झालेले कुडतरकर सांगतात, माथेरानला आमचा तीन दिवस मुक्काम असे. पहिल्या दिवशी नाटकाचा पहिला अंक, दुसऱ्या नि तिसऱ्या दिवशी दुसरा नि तिसरा अखेरचा अंक, मामा पूर्ण करीत. सर्व नाटक, संवादांसह मामांच्या डोक्यात स्पष्ट असे. नाटक त्यांना डोळ्यांसमोर दिसायचं. हातात कागदाचं चिटोरेही न धरता ते नाटकाचा एकेक अंक सलगपणे तोंडी सांगत. एकाही शब्दाची फिरवाफिरव नसे. शांतचित्ताने मामा तोंडी मजकूर न अडखळता संथ लयीत सांगत. अंक सांगून संपला की, समोर बसलेल्या र.धों.ना मामा विचारीत,

"काय हो, कसं चालतंय नाटक? चढतंय नं?"

रधों निर्भीडपणे सांगत,

"मामा, अरे, तुझी प्रतिज्ञा पूर्णपणे संपलेली आहे. नाटक बिलकूल जमलेच नाही. माझं ऐक, तू नाटक लिहिणं सोडून दे."

रघुनाथरावांचे परखड बोल ऐकून मामा चपापत, ओशाळे होत नि सांगत,

"रघुनाथराव, तुम्ही एक सुटा अंक ऐकलात म्हणून त्यातली गंमत तुमच्या लक्षात आली नाही. उद्या पुढचा अंक ऐकलात की तुमचं मत पालटेल."

रधों. आपल्या मताशी ठाम असत. म्हणत,

"नाही रे नाही, मामा, तू माझं ऐक. तुझी नाट्यप्रतिभा तुला सोडून गेलीय. तू नाटक लिहिणं सोडून दे."

सारांश, नाटक विषयाचा रघुनाथरावांचा अभ्यास तयारीचा होता. परंतु त्यांनी जी नाटके लिहिली ती रंगभूमीवर मात्र केव्हाच आली नाहीत.

'गुरुबाजी' हे नाटक त्यांनी मोलिएरच्या 'तार्युफ' नावाच्या नाटकावरून रूपांतरित केले. मात्र ते त्यांनी पुस्तकरूपाने प्रसिद्ध करायला बराच वेळ घेतला. या नाटकाच्या प्रस्तावनेत

त्यांनी लिहिले की, या नाटकाचे हस्तलिखित आज निदान १८ वर्षे मजजवळ पडून होते. परंतु ते प्रसिद्ध करण्याचा योग आला नाही. नुकतेच एका गृहस्थांनी 'क्लबात करता येईल असे एखादे नाटक तुम्हाला माहीत आहे काय? असे विचारल्यावरून त्याची आठवण आली व त्यांना हे हस्तलिखित दाखवले. मूळ नाटकाची प्रशंसा करण्याची गरजच नाही. रूपांतर कसे झाले आहे हे वाचकांनी ठरवायचे आहे'.

या नाटकात ५ अंक असून त्यात अनुक्रमे ६, ३, ७, ८ व ९ असे प्रवेश आहेत.

'न्यायाचा शोध' हे नाटक त्यांनी १९४६ साली प्रसिद्ध केले असून ते मालतीबाईंच्या आणि त्यांचा जीवनावर बेतलेले असल्याचे य. दि. फडके यांनी र. धों. कर्वे या चरित्रात (पृ. १३७-१३८) दाखवून दिले आहे.

१९३० ते १९४२ या काळात मुंबईत 'द रॅशनॅलिस्ट असोसिएशन ऑफ इंडिया' नावाची संस्था कार्यरत होती. त्या संस्थेत डॉ. जी. व्ही. देशमुख, ए. एस. तय्यबजी, सी. एस. डी. अव्हेन, ड़ी. आर. डी. वाडिया, ए. एस. परूळकर, एम. ए. सोमजी, पी. त्रिकमदास, एफ. आर. पी. मसानी, एम. ए. बेलवी, एम. एम. वकील, ए. मेघेरिअन, मिस्. पी. नरिमन आणि सी. जे. शहा इत्यादी मंडळींचा समावेश होता. यापैकी काही वकील, तर काही पत्रकार होते. ते बुद्धिप्रामाण्यवादी विचारांनी झपाटलेले होते व या विचाराचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी जुलै १९३१ पासून 'रीझन' नावाचे इंग्रजी नियतकालिक सुरू केले होते. ते डिसेंबर १९४२ पर्यंत चालू होते. अब्राहम सोलोमन हे त्याचे दीर्घकाळ संपादक होते. ७"x ९.२५" या आकारात ते प्रसिद्ध होई. त्यात 'सेंट्स अँड फकीर्स' नावाचा रघुनाथरावांचा लेख प्रसिद्ध झाला. फेब्रुवारी १९३७ पासून ते त्याचे संपादक झाले. (मध्यंतरी काही काळ मासिकावर सॉलोमन यांचे नाव येत होते.) रघुनाथरावांचा हा पहिला लेख पारितोषिकप्राप्त ठरला होता. त्यानंतर त्या मासिकात कधी पत्रलेखन, कधी टिपणलेखन, कधी ग्रंथसमीक्षापर कधी संपादकीय, कधी वि.दा. ऋषी यांच्या मोहनिद्रेवर, कधी उपासनी महाराजांवर, कधी धर्मावर, कधी बुद्धिप्रामाण्यावर असे विविध स्वरूपाचे लेखन त्यांनी केले. त्यांच्या लेखनाचे मराठीत जवळजवळ ३०० छापील पृष्ठे होतील इतका मजकूर 'बुद्धिप्रामाण्यवाद' या नावाने (प्रा. मधुकर तोडरमल यांनी अनुवाद) केलेला प्रसिद्ध आहे. म्हणजे त्यांचे हे लेखन संख्यात्म व गुणात्मदृष्ट्या मोलाचे

आहे. हे लेखन विविध विषयस्पर्शी आहे. त्यात धर्मपर, अंधश्रद्धेवर आघात करणारे, संततिनियमनासंबंधी माहिती देणारे, बुद्धिप्रामाण्याची चिकित्सा करणारे, लैंगिक शिक्षणासंबंधी अश्लीलता व कायदा या विषयांवरील, मानसशास्त्र, नीतिशास्त्र, तर्कशास्त्र, सत्य, ज्योतिष, योग, संस्कृती, व्यक्तिपरिचयपर, भाषण वा तंत्र, राष्ट्रीय एकात्मता काँग्रेस आणि शिक्षण, दारूबंदी यांबरोबर 'समाजस्वास्थ'वरील खटल्यासंबंधी माहिती देणारे असे अनेक लेख त्यांनी लिहिले आहेत. 'द रॅशनॅलिस्ट सोसायटी-ऑफ इंडिया' या संस्थेच्या एका वार्षिक अधिवेशनाला बॅ. एम. सी. छगला उपस्थित असल्याची नोंद 'रीझन'मध्ये आहे. तिथे त्यांची छगलांशी ओळख झाली असणार. त्याचा परिणाम म्हणजे पुढे रघुनाथरावांच्या सत्तरीच्या निमित्ताने, जो सत्कार करण्यात आला तेव्हा त्याचे अध्यक्षपद छगलांनी भूषविले असणार. रघुनाथरावांचा बोलबाला मराठीतर बुद्धिवादी तरुणांमध्ये कसा होता व त्यांच्यासमोर ते कोणकोणत्या विषयांवर आपली मते व्यक्त करीत होते हे पाहायचे झाले तर त्यांचे 'रीझन'मधील लेखन लक्षात घ्यावे लागते.

**मोपाँसा मराठीत :**

एक अनुवादक म्हणून रघुनाथरावांच्या कार्याची फारशी दखल कोणी घेतलेली नाही. परकीय भाषांमधील साहित्याच्या अनुवादाचे आज विशेषत्वाने लेखन होताना दिसते. मातब्बर प्रकाशक असे ग्रंथ अभिमानाने आणि आवर्जून प्रकाशित करतात. त्या विषयाला वाहिलेली नियतकालिके मराठीत प्रसिद्ध होत आहेत; त्या विषयासंबंधीची चर्चासत्रे आणि त्या विषयात आजवर झालेल्या कामगिरीचे आढावे घेणारे लेखन वेळोवेळी प्रकाशित होत आहे. मात्र, अनुवादक रघुनाथराव कर्वे या विषयाला आजवर कोणी हात घातलेला नाही; ना कुणी तशी नोंद केली. लेखकांना मानधन देणे परवडत नाही, आर्थिक ओढग्रस्ततेत 'समाजस्वास्थ्य'चे अंक काढीत त्यांचे जीवन जात होते. कारण त्यांनी एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे ते त्यांचे 'व्यसन' झाले होते. तेव्हा अंक भरून काढण्यासाठी त्यांनी इंग्रजी व विशेषतः फ्रेंच भाषेतून बऱ्याचदा लेखांचे अनुवाद, स्वैरानुवाद वा रूपांतरे केलेली आहेत. अशावेळी प्रसिद्ध लेखक मोपाँसा यांची एकेक कथा घेऊन तिचा भावानुवाद करण्यावर त्यांचा कटाक्ष राहिला आणि म्हणता म्हणता त्यांच्या ३१ कथांना त्यांनी मराठी पेहराव दिला. हे सारे त्यांनी १९३० ते १९४० च्या दशकात केले. अमेरिकेत संततिनियमन, स्त्री-पुरुष संबंध या विषयाचे तज्ज्ञ समजले गेलेले डॉ. रॉबिनसन,

डॉ. नॉर्मन हेअर, डॉ. हॅवलॉक एलिसा, सिगमंड फ्रॉईड, प्रो. गुजरो वगैरे अनेक तज्ज्ञांच्या आणि विद्वानांच्या लेखनापासून त्यांनी प्रेरणा घेतली असली तरी त्यांच्या व्यक्तित्वाविषयी, विचारांविषयी वा कार्याविषयी वाचकांना जशी पद्धतशीर ओळख करून दिली नाही तसेच त्या मोपाँसासंबंधी केले.

मात्र 'मोपाँसाच्या कथा' हे माझे 'रधों' प्रकल्पातील संपादन पाहिल्यावर ज्येष्ठ समीक्षक डॉ. विलास र. खोले यांनी लिहिले, सुप्रसिद्ध फ्रेंच कथाकार मोपाँसा (जन्म ५/८/१८५०, मृत्यू ६/७/१८९३) यांच्या एकतीस कथांचे, मूळ फ्रेंच भाषेवरून कर्वे यांनी रूपांतर आणि अनुवाद केले. जागतिक कथावाङ्मयात उच्चस्थानी असणाऱ्या, विविधांगी नाविन्यपूर्ण निर्मिती करणाऱ्या मोपासाँचे व्यक्तिमत्त्व गूढ होते. सर्व विवाहांचा शेवट घटस्फोटातच होतो असे त्याला वाटत असे. कामलोलुप स्त्रिया, कामोत्सुक पुरुष, त्यांचे विवाहबाह्य संबंध, नीतिमूल्यांविषयीची त्यांची बेफिकिरी, फ्रान्समधील मुक्त प्रेमजीवन आणि स्वार्थ-प्रेम-वंचना या भावनांचे चढउतार रंगवणाऱ्या या कथाकाराच्या कथातंत्रावर हुकमत असणाऱ्या कथा, नाट्यात्म मांडणी, घट्ट रचना, शैलीतील साधेपणा, नेमकेपणा व सूचकता यांसाठी प्रसिद्ध होत्या. रघुनाथरावांना फ्रेंच भाषा उत्तम अवगत असल्यामुळे त्यांनी केलेले अनुवाद व रूपांतरे वाचनीय झाली. त्यांनी एकंदर एकतीस कथा मराठीत आणल्या त्यांचा संग्रह म्हणजे 'मोपाँसाच्या कथा' या संग्रहातून मूळ लेखकाचे कथालेखन कौशल्य, अनुवादकाची रूपांतर प्रक्रियेची जाण आणि कथांमधील अनुभवविश्व यांचा प्रत्यय येतो. कथा या साहित्य प्रकाराची ज्या काळात चलती होती त्या काळात त्यांनी केलेले हे अनुवाद, त्यांच्या व त्यांच्या काळाच्या अभिरुचीचे द्योतक आहे. अलीकडे मोपाँसाच्या मृत्यूशताब्दीनिमित्त माधुरी पुरंदरे व कीर्ती सरदेसाई यांनी केलेल्या 'त्वान आणि इतर कथामधील कथानुवादांपेक्षा कर्वे यांचे कथानुवाद पूर्णपणे भिन्न आहेत.'

**संस्थांचे पदाधिकारी :**

रघुनाथरावांना विविध विषयांमध्ये रस आणि गती होती. वाचकांच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास त्यांना होता, त्यामुळे वि. स. खांडेकर यांनी ' पारिजात 'मधील ' वाङ्मयभक्ताची रोजनिशी ' सदरात प्रो. र. धों. कर्वे यांचे शारीरिक सौख्याच्या चर्चेस वाहिलेले ' समाजस्वास्थ्य ' असा उल्लेख केला तेव्हा त्यांना तो रुचला नाही. ' वाचकांना काय आवडते तेवढेच लिहिण्याचा

आमच्या मासिकचा उद्देश नाही, सद्भिरुची कशी असावी हेही दाखवण्याचा उद्देश आहे. ' (सप्टेंबर १९३३ : ७६) असे त्यांनी लिहिले आहे. त्यांना स्वतःला साहित्य, नाटक, रंगभूमी, चित्रपट, संगीत इत्यादी विषयांमध्ये रुची असल्याने आणि ते १९३० नंतर ' १३, नवी भटवाडी, गिरगाव ' इथे राहायला आल्यावर तर मुंबई मराठी साहित्य संघाशी ते जोडले गेले. पुढे तर ते साहित्यसंघाचे उपाध्यक्षही होते. साहित्यसंघाचे पदाधिकारी म्हणून त्यांनी विविध प्रकारची कामे केली. पहिले म्हणजे काही काळ संघ साहित्यकृतींना पारितोषिके देत असे. तेव्हा तज्ज्ञांची एक समिती नेमली जात असे. त्या समितीवरही त्यांनी काम केल्याचे दिसते. १९४५ साली प्रभाकर पाध्ये यांच्या ' कलेची क्षितिजे ' या पुस्तकाविषयी वाद झाला त्यासंबंधी लिहिताना त्यांनी तसा उल्लेख केला आहे. साहित्यसंघाच्या चर्चा मंडळात ' ललित ' आणि ' ललितेतर ' या शब्दांविषयी वाद झाला. ललितेतर वाङ्मयाकरता नेमलेल्या पाच परीक्षकांनी श्री. प्रभाकर पाध्ये यांचे ' कलेची क्षितिजे ' हे पुस्तक ललितेतर वाङ्मयात येते की नाही, अशी शंका प्रदर्शित केली (व इतर कारणांनी) ते बक्षिसाला नालायक ठरविले आणि त्यांनी निकालाबरोबर त्याची कारणे सादर केल्यामुळे श्री. पाध्ये यांनी त्याबद्दल अकांडतांडव केले. आम्ही त्या पाच परीक्षकांपैकी एक होतो ... (१ सप्टेंबर, १९४५).

साहित्यसंघाचे पदाधिकारी म्हणून नाशिक, रत्नागिरी, नगर, सोलापूर, मुंबई व उपनगर साहित्य संमेलनांना ते गेले होते. अशा रीतीने मुंबईबाहेर जाण्यामागे त्यांचे काही हेतू होते. पहिला म्हणजे त्याची त्यांना मनापासून आवड होती, दुसरा त्यांचा रक्तदाबाचा विकार बळावल्यामुळे डॉक्टरांनी त्यांना मुंबईबाहेर जाण्याचा सल्ला दिला होता, तिसरा म्हणजे १९४४ साली मालतीबाईंचा मृत्यू झाला त्यानंतर तर ते एकटेच उरले. याशिवाय त्यांचे जवळचे मित्र मामा वरेरकर हेही संमेलनाला जात त्यामुळे त्यांना ते सोयीचे वाटे. अशा रीतीने ते संमेलनाला गेले की संमेलनात काय घडले याचा वृत्तान्त ते 'समाजस्वास्थ्य'च्या वाचकांना आवर्जून देत. १९४० साली रत्नागिरी येथे झालेल्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष प्रा. ना. सी. फडके तर स्वागताध्यक्ष भा. वि. वरेरकर होते. फडक्यांचे अध्यक्षीय भाषण रघुनाथरावांना फारसे आवडले नसावे. मात्र ' मुक्तछंद 'वर झालेल्या चर्चेचे अध्यक्ष व रत्नागिरीचे डिस्ट्रिक्ट जज्ज पु. मं. लाड यांचे भाषण त्यांना भावले. ' तीन चर्चांपैकी मुक्तछंदावरील चर्चा विशेष

चांगली झाली व त्यातही चर्चेचे अध्यक्ष व रत्नागिरीचे डिस्ट्रिक्ट जज्ज पु. मं. लाड यांचे समारोपाचे भाषण उत्कृष्ट झाले' असे त्यांनी लिहिले आहे. संमेलनकाळातच त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना ठरावांना विरोध करता आला नाही. तरी ' मराठी भाषा शिक्षणक्रमात सक्तीची करावी ' या ठरावाच्या वेळी ' जेथे जेथे मराठी हा सक्तीचा विषय नसेल, तेथे तेथे तो सक्तीचा करावा ' असा डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे व प्रो. श्री. ना. बनहट्टी यांनी दुरुस्त केलेला ठराव स्वीकारल्यास युनिव्हर्सिटीच्या सर्व परीक्षांना मराठी सक्तीची होईल याकडे त्यांनी सर्वांचे लक्ष वेधले.

सोलापूर साहित्य संमेलनात नभोवाणी केंद्रासंबंधीच्या ठरावावरील चर्चेत त्यांनी भाग घेतला होता. त्यांनी मराठीला अधिक वेळ आणि गुणात्म कार्यक्रम द्यावेत म्हणून निर्मात्यांना सल्ला देण्याकरिता एक समिती स्थापन करावी व तिच्यात काही व्यक्तींची नावे निश्चित करावीत असा तो ठराव होता. मुळात जी नावे पुढे आली त्यात भा. वि. वरेरकर यांच्या नावाचा समावेश करावा अशी सूचना त्यांनी केली. ती आमंत्रक प्रभाकर पाध्ये यांनी नाकारली. आणखी एक ठराव फॅसिझमच्या विरोधात ह. रा. महाजनी यांनी मांडला होता. ' यासंबंधी बहुतेकांची मन:प्रवृती अशी होता की, या ठरावाने साम्राज्यवादी ब्रिटिश सरकारला नैतिक पाठिंबा मिळेल, तेव्हा हा मंजूर होऊ नये. फॅसिझम हा अत्याचारी ग्रंथ आहे, त्याला विरोध करणे हे सर्व स्वातंत्र्यप्रिय लोकांचे कर्तव्य आहे ; त्याने ब्रिटिश सरकारला मदत होते एवढ्या मुद्द्यावर अशा ठरावाला विरोध करणे योग्य होणार नाही ' असे त्यांनी सांगितले.

कल्याण येथे भरलेल्या साहित्य संमेलनात ' वृत्तपत्रीय व्यक्तीविषयक टीका जरी समाजधारणेच्या दृष्टीने आवश्यक असली, तरी अशी टीका अनिर्बंध व असत्य स्वरूपाची असता कामा नये ' हा ठराव मांडण्याचे काम रघुनाथरावांकडे होते व त्यावर बरीच चर्चा होऊन तो बहुमताने पास करण्यात आला (८ जानेवारी १९४१).

मराठी रंगभूमीच्या शताब्दीनिमित्ताने ' शंभरीचा महोत्सव ' साजरा झाला. त्याआधी हौशी नाट्यसंस्थांकरता चढाओढीचा कार्यक्रम ठेवला होता. त्यातील एक परीक्षक म्हणून त्यांनी तेरा नाटके पाहिली. त्या नाटकांतील उणिवा त्यांनी 'नटांची निवड', ' वेषभूषा ', ' नाटकाचा काल व त्याला अनुरूप सादरीकरण ' ' संहितेतील पात्राला न्याय देऊ शकेल असे नटाचे

व्यक्तित्व असावे वा नटाने तसे ' ' बेअरिंग ' ठेवावे, ' भाषण व अभिनय ', ' इतरांना न्याय देणे ' अशा काही मुद्द्यांच्या आधाराने त्यांनी विवेचन केले आहे. अशा रीतीने विविध संस्थांचे पदाधिकारी म्हणून त्यांनी आपली भूमिका पार पाडल्याचे दिसले.

---

## तळटिपा

१. आरोग्याची साधने : डच कॅप, जेली, रबरी स्पंज, भोवऱ्याची पिचकारी, सॅनिटरी टॉवेल, रबराच्या पिशव्या वगैरे आमचेकडे मिळतात. कॅटलॉग मागवा. कोणत्याही प्रकारची नग्नचित्रे किंवा गर्भपाताची साधने मिळत नाहीत. चौकशी करू नये.—राइट एजन्सीची जाहिरात.

२. ' समाजस्वास्थ्य ' हे रघुनाथरावांचे मासिक होते. त्याच्या स्वरूपाविषयी रँग्लर परांजपे यांनी काही सूचना आधी केल्या होत्या. त्या त्यांनी नाकारल्या. त्यात येणारी सदरे, विषय, पत्रव्यवहार आणि मांडणी ही खास रघुनाथरावांची होती. ' समाजाच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास ' ही त्यामागील प्रेरणा असल्याने त्यांना जे जे विषय महत्त्वाचे वाटले त्या त्या विषयांवर त्यात लेखन आले. तरीही आत्माराम दामोदर सोनार या जुने धुळे येथे राहणाऱ्या वाचकाची ही प्रतिक्रिया बोलकी आहे : ' आपल्या मासिकाविषयी दोन शब्द लिहावेसे वाटले. आपण आपले बहुतेक आयुष्य ज्या शास्त्राच्या अभ्यासात व व्यासंगात घालवले, त्याच शास्त्राचा शक्य तितका पुरस्कार करण्याच्या मुख्य हेतूने आपण आपले मासिक सुरू केले आहे. सदर मासिकाच्या गेल्या काही अंकांतून या शास्त्राशी संबंध नसलेल्या विषयांस स्थान दिले जात आहे, उदाहरणार्थ ईश्वरवाद व ग्रंथपरीक्षण, आपण ज्या विषयाचा परिश्रमपूर्वक अभ्यास केला आहे, त्यासंबंधी आपले स्वतःचे तसेच पाश्चात्त्य प्रसिद्ध तज्ज्ञांचे विचार समजण्याविषयी वाचकांची जिज्ञासा असते. समाजस्वास्थ्य हा विषय कितीही व्यापक आहे असे मानले, तरी त्यात ग्रंथपरीक्षणाचा अंतर्भाव होऊ शकेल असे वाटत नाही. ग्रंथपरीक्षण हे कार्य वाङ्मयविषयक, नियतकालिकाचे आहे. समाजस्वास्थ्यात त्यांचा अंतर्भाव होऊ शकेल असे म्हटल्यास आधुनिक कवींच्या कविता अगर इतर लेखकांचे विविध विषयांवर लेख, यासही स्थान द्यावे लागेल व मग आपल्या मासिकाचे वैशिष्ट्य नाहीसे होईल. ईश्वरवादासारख्या तत्त्वज्ञानविषयक, लेखमालिका आपण का सुरू कराव्यात? असल्या विषयांची ज्या वाचकांस जिज्ञासा असेल त्यांचेकरिता पंडित सातवळेकर प्रभृति साहित्यिक संपादन करीतच आहेत.

तीच गोष्ट ग्रंथ परीक्षणाची. हल्ली निर्माण होत असलेल्या अनेक लघुकथासंग्रहांवर अभिप्राय देण्याचे कार्य इतर वाङ्मयसेवक आपापल्या मासिकाद्वारे करीत आहेत. आपल्या मासिकाचे मूळ ध्येय सोडून या नवीन क्षेत्रात पाऊल टाकण्याची जरुरी नव्हती. गेल्या डिसेंबर १५ ला प्रसिद्ध झालेल्या अंकात आपण चार ग्रंथांचे परीक्षण केले आहे व या कामी आपल्या छोटेखानी मासिकाची बारा पृष्ठे खर्ची पडली आहेत. शिवाय ईश्वरवाद गूढविद्या यांनी १० पृष्ठे घेतली ती वेगळीच. आपल्या आवडत्या विषयास जेमतेम ७-८ पृष्ठे मिळाली आहेत. आपण अभ्यासलेल्या विषयासंबंधी नवीन ज्ञान मिळविण्याकरिता उत्सुक असलेल्या वाचकांची सदर अंक पाहून बहुतेक निराशाच होईल. माझ्या मते आपल्या कार्यक्षेत्रात वरील विषयांचा समावेश होत नाही. तरी याबद्दल आपले काय म्हणणे आहे ते मासिकाद्वारे प्रसिद्ध करावे जेणेकरून इतर वाचकांचे मत अजमावता येईल. याचबरोबर जी इतर पत्रे प्रसिद्ध केली आहेत. त्यात पुढील प्रश्न विचारला आहे. ‘ गृहकर्मे ’ हे सदर मासिकात घेण्याचे आपले धोरण काय आहे ? (फेब्रुवारी, १९३९).

३. नमुन्याच्या अंकास बरीच मागणी आल्यामुळे आता मागील अंक एकही शिल्लक नाही. सुरुवातीपासून डिसेंबर १९२८ पर्यंतचे सर्व १८ अंक कोणाकडे सुस्थितीत शिल्लक असल्यास आम्ही त्याची मूळ किंमत म्हणजे रुपये २ देऊन परत घेण्यास तयार आहोत. असे दोन संच पाहिजे आहेत.’ रघुनाथरावांचे वाचकांना आवाहन (फेब्रुवारी, १९२९ : १७४). ‘ समाजस्वास्थ्य मासिकातील निवडक लेख ’ काढण्यामागे हेही कारण असण्याची शक्यता आहे.

४. ‘ तेरा गोष्टींचे परीक्षण ’ तेव्हा ‘महाराष्ट्र नागपूर’ मध्ये आले होते. त्यातील पुढील ओळी रघुनाथरावांनी त्या पुस्तकाच्या जाहिरातीत वापरल्या होत्या ; ‘ रूढ वैवाहिक नीतीच्या कल्पनेला या गोष्टींनी धक्का बसण्यासारखा असला तरी त्या प्रश्नाची दुसरी बाजू त्यात पाहावयास मिळते, हा फायदा आहे. ’ (समाजस्वास्थ्य, सप्टेंबर १९४०)

●●●

# ५. गैरसमज, वस्तुस्थिती व मानहानीचे प्रसंग

रघुनाथरावांचे आयुष्य विलक्षण पद्धतीने गेले. ‘ वैचित्यपूर्ण जीवन ’ असे भा. वि. वरेरकर यांनी त्यांचे वर्णन केले आहे आणि त्यांनी आत्मचरित्र लिहावे अशा सूचनाही त्यांनी केली आहे. तथापि, ‘आत्मचरित्रात पुष्कळ वेळा खऱ्या गोष्टी लिहिता येत नाहीत. आणि शिवाय चरित्रापासून फायदा होतो असे आमचे मत नाही. करमणूक होणे शक्य आहे. सध्या तरी आत्मचरित्र लिहिण्याचा विचार नाही.’ असे त्यानी लिहिलेले आणखी एके ठिकाणी त्यांनी लिहिले आहे : ‘ आत्मचरित्राचे बाबतीत मात्र आमचे मत बदललेले नाही... खाजगी व्यक्तीबद्दल बोलण्याची सोय नाही, कारण आपल्या भावना दुखावल्याचे ढोंग करणारे त्यांचे वंशज फिर्याद करू शकतात. तथापि काही अनुभव लिहिण्याचा विचार अजूनही आहे. शिवाय संपूर्ण आत्मचरित्र लिहिण्याइतकी सामग्रीही आमचेपाशी नाही. रोजनिशी लिहिली नाही, एखादे वेळी लिहिण्याचा निश्चय केला तरी तो दोन-तीन महिने टिकत असे. तेव्हा स्मरणशक्तीवरच अवलंबून राहावे लागणार आणि ती असावी तितकी चांगली नाही. मधूनमधून अनुभव लिहिता येतील ते पुढेमागे लिहू.[१] असे असले तरी ‘समाजस्वास्थ्य’ मधून त्यांनी भरपूर आत्मचरित्रात्मक लेखन केल्याचे आढळते. त्याचबरोबर ज्यांच्याशी मतभेद झाले त्यांच्यासंबंधीही त्यांनी लिहिले आहे. त्यातही त्या त्या व्यक्तीशी त्यांचे जे नाते राहिले ते संमिश्र स्वरूपाचे होते असे आढळते . उदाहरणार्थ शंकरराव किर्लोस्कर यांनी ‘विनय म्हणजे काय ?’ हा लेख नाकारला म्हणून रघुनाथराव त्यांच्यावर चिडलेले दिसतात व तसे त्यांनी अनेकदा लेखन केले आहे. म्हणून त्या दोघांमध्ये अटकोविटकोचा वाद होता असा समज होऊ शकतो. तसे आपले मत होतेही ; परंतु ते सत्यनिष्ठ नसते याला सबळ पुरावा देऊ शकू अशी त्यांची अनेक विधाने ‘समाजस्वास्थ्य’ मध्येच आढळतात ; कसे ते पाहा—

**किर्लोस्कर मासिके :**

ज्या ‘ किर्लोस्कर ’ च्या सोवळेपणामुळे आम्हास स्वतंत्र मासिक काढणे भाग पडले, त्याच किर्लोस्करांतील लेखांच्या अश्लीलतेबद्दल अश्लीलता पंडित सातवळेकर ओरड

करीत आहेत. (' समाजस्वास्थ्य ' जून १९३४ : ३११) ' किर्लोस्कर बोलूनचालून व्यापारीच आहेत तेव्हा कोणत्याही रीतीने स्वतःची जाहिरात देणे हे व्यापारी धोरण त्यांना शोभाच देते ' (' समाजस्वास्थ्य ', आगस्ट १९३४ : ५९१)

' स्त्री मासिकाचा गेला अंक शंभरावा असल्यामुळे त्याची जाहिरात करण्याची संधी चालकांनी गमावली नाही हे ठीकच झाले ? (' समाजस्वास्थ्य ', डिसेंबर १९३८ : १८७) '

१९३९ साली अहमदनगर येथे साहित्य संमेलन झाले. तिथे शंकरराव किर्लोस्कर आले होते. त्याआधी मुंबईत ' पुरोगामी लेखक परिषद ' झाली होती. तेव्हा ते आले नव्हते. कुणीतरी त्याबद्दल, शंकररावांना प्रश्न केला. त्यावर ' मुंबईत खरोखरच कोणी पुरोगामी लेखक आहेत की काय, याची मला शंका असल्यामुळेच मी आलो नाही.', असे त्यांनी उत्तर दिले.[२] रघुनाथराव स्वतःला बुद्धिप्रामाण्यवादी, पुरोगामी समजत असल्याने शंकररावांच्या या विधानावर चिडून त्यांनी लिहिले ; ' आमच्या किर्लोस्करवाडीला वीज आहे. मुंबईला ती आहे की नाही कोणाला ठाऊक, असं तेथील एखाद्या मजुराने म्हणावं, तितकंच हास्यास्पद ' किर्लोस्कर 'च्या संपादकांचं म्हणणं होते. ते खेडवळपणाचे द्योतक आहे. ' अर्थात यावरून दोघांमध्ये विस्तव जात नव्हता असा निष्कर्ष काढू नये. कारण ' किर्लोस्कर—इचलकरंजीकर ' वादात रघुनाथरावांनी किर्लोस्करांची बाजू घेतल्याचे दिसते : ' किर्लोस्कर 'वर लोकांनी निष्कारण काहूर उठविले आहे. टोपणनावाचे गुपित त्यांनी फोडले ही अक्षम्य चूक आहे खरी. बाकी त्यांच्याविरुद्ध जे इतर मुद्दे लोकांनी काढले आहेत, त्यात काही अर्थ नाही. ' असे लिहिले आहे. इतकेच नव्हे तर ' किर्लोस्कर 'ला पंचवीस वर्षे पूर्ण झाली तेव्हा त्यांनी ' समाजस्वास्थ्य ' मध्ये पुढील मजकूर लिहिला : ' या मासिकाला सन १९४४ अखेर २५ वर्षे झाली. इतक्या अवधीत मासिकाने मनोरंजन करून त्याबरोबर जे विचारजागृतीचे महत्त्वाचे कार्य केले आहे, त्याबद्दल त्याचे अभिनंदन करणे जरूर आहे. प्रथम हे मासिक केवळ कारखान्याची माहिती देणारे जाहिरातवजा मासिक होते आणि त्याचे नाव ' किर्लोस्कर खबर ' असे होते. परंतु त्याचा व्याप हळूहळू वाढत जाऊन त्यात सर्वप्रकारचे लेख येऊ लागले आणि बुद्धिप्रामाण्याच्या दृष्टीने त्याची एकसारखी प्रगतीच होत गेली आहे. बुवाबाजीला चव्हाट्यावर आणण्याचे महत्त्वाचे काम मासिकाने केले आहे. आणखी एक सांगण्यासारखा विषय म्हणजे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेला मासिक वाचकांच्या हातात पडलंच पाहिजे अशी खबरदारी घेणारं हे पहिलंच मासिक ही शिस्त प्रथम 'किर्लोस्कर'ने अमलात आणली, हे खरं.'[३]

इतकेच नव्हे तर किर्लोस्कर मासिकामध्ये रघुनाथरावांनी किमान १३ लेख लिहिल्याचे आढळते आणि रघुनाथरावांनी 'समाजस्वास्थ्य' चा 'दोन बायका विशेषांक' काढण्याचे निश्चित केले तेव्हा शंकररावांनी दोन विवाह केले असल्याने, त्यांना लिहिण्याची विनंती केली व त्यांनी त्या विषयावर लिहिलेला लेख 'समाजस्वास्थ्य' मध्ये प्रसिद्धही झाला आहे.

' समाजस्वास्थ्य 'ला दहा वर्षे पूर्ण झाल्यावर रघुनाथरावांनी पाने वाढवली आणि भरपूर छायाचित्रे घातली. तेव्हा ' किर्लोस्कर 'मध्ये पुढील ' परामर्श ' लिहिला गेला ; ' समाजस्वास्थ्य ' (संपादक—र. धों. कर्वे, १३, नवी भटवाडी, मुंबई-४) वैद्यक व मानसशास्त्रदृष्ट्या स्त्री-पुरुषसंबंधाची विचिकित्सा करणाऱ्या या मासिकाच्या दहाव्या वर्षाचा शेवटचा अंक नुकताच प्रसिद्ध झालेला आहे. सोवळेपणाची आव आणणाऱ्यांच्या टीकेला व विरोधाला भीक न घालता धैर्याने आपली मते लोकांच्या पुढे मांडून 'समाजस्वास्थ्या'ला नावारूपाला आणल्याबद्दल आम्ही त्याच्या संपादकांचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो व त्यांच्या स्वीकृत कार्यात त्यांना अधिकाधिक यश चिंतितो. हा ताजा अंक नेहमीपेक्षा दुप्पट मोठा असून त्यात चित्रेही बरीच आहेत. 'आरोग्य म्हणजे काय?', 'ज्योतिषी प्रामाणिक असतात काय?' वगैरे लेख वाचनीय आहेत. चौकस वाचकांचे शंकासमाधान करणारा 'पत्रव्यवहार' आणि 'शारदेची पत्रे' ही समाजस्वास्थ्याची दोन्ही सदरे नेहमीच उद्‌बोधक व मार्गदर्शक असतात. ' (किर्लोस्कर, जुलै १९३७ : पृ. १०-१६)

तर त्या मासिकाच्या एप्रिल १९३७ च्या अंकात ' श्री. र. धों. कर्वे ' या शीर्षकाखाली खालील परिच्छेद आढळतो ;

" मासिकावरील बायकांची चित्रे अश्लील आहेत, अशी सनातन्यांकडून टीका होते. मी त्यांना विचारतो की, रस्त्यातून जातयेत असताना हे लोक काय डोळे झाकून घेतात ? स्त्रियांची चित्रे जर कामोत्तेजक असतात तर त्यात स्त्रियांना तरी घाबरण्याचे काही कारण नाही. पुराणात अश्लीलता काय थोडी होती ? कुंतीला विवाहापूर्वी पुत्र झाल्याची कथा आहे. तो मंत्रसाहाय्याने झाला असे म्हणतात. मला तरी ते शक्य दिसत नाही. कामुक वृत्तीचे लोक देशावर आले तर काय करणार असे विचारले जाते. देशावर संकट येईल तेव्हांचा प्रश्न आहे. देशावर संकट येईल म्हणून आज कोणी जेवण सोडले नाही, राज्यक्रांती मलाही पाहिजे, असे माझे मत आहे. सर्व क्रांत्या राज्यक्रांतीला पोषक असतात. " (पृष्ठ-७७३)



एन ४०८८—६अ

—आता रघुनाथरावांचे इतके जहाल विचार किर्लोस्करला उद्धृत करावेसे का वाटले असावे तर याचे उत्तर असे की, शंकररावांना रघुनाथरावांच्या विचारांमधील विज्ञाननिष्ठा आणि सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने निकोप व निर्धाराने स्पष्ट करण्याची वृत्ती मनातून भावलेली होती असे दिसते.

**विल्सन कॉलेज :**

गणिताचे अर्धवेळ प्राध्यापक म्हणून १९२२ साली रघुनाथराव एल्फिन्स्टन कॉलेजचे प्रिन्सिपॉल विल्किन्सन यांनी केलेल्या शिफारसीमुळे विल्सन कॉलेजात नोकरीला लागले. १९२४ साली त्यांना पूर्णवेळ प्राध्यापक म्हणून बढती मिळाली. त्याचबरोबर १९२१ सालापासून त्यांनी संततिनियमनाचे केंद्र काढले व त्यासंबंधी समाजात प्रचार व्हावा म्हणून इंग्रजी-मराठीत पुस्तके लिहिली ; काही नियतकालिकांतून लेखही लिहिले. इथे आधी काही गोष्टी स्पष्ट होतात. त्या लक्षात घ्यायला हव्यात. मुंबईत रघुनाथराव व मालतीबाई संसार करीत होते. मालतीबाईही शिक्षिकेची नोकरी करीत असत. रघुनाथरावांचे वागणे, वेष रुबाबदार असे खर्चाच्या बाबतीत ते तसे बेफिकीर असत. सरकारी नोकरीचा राजीनामा दिल्यावर शिकवण्यांसाठी त्यांना वणवण भटकावे लागे. प्राध्यापकांची नोकरी मिळाली तर थोडेफार आर्थिक स्थैर्य मिळेल अशी त्यांची अवस्था होती. संततिनियमनाचा प्रचार, केंद्र चालवणे हे खरे तर दुय्यम असायला हवे होते. पण त्यावरील त्यांच्या निष्ठा वादातीत म्हणून नोकरी की प्रचार असा प्रश्न उपस्थित झाल्यास व्यवहारी नसला तरी त्यांचा कल प्रचाराच्या बाजूने जाई. त्यातून ते स्वत:हून अडचणींना आमंत्रण देत. दुसरे असे की, त्यांना लाभलेली गणिताच्या प्राध्यापकाची नोकरी ही विल्सन कॉलेजातली होती. ते कॉलेज एका मिशनरी संस्थेने चालवलेले होते. अर्थातच जेथे मिशनऱ्यांच्या विचारप्रणालींचा व तत्त्वज्ञानाचा केव्हाही स्वाभाविक वरचष्मा राहणार. म्हणजे पुन्हा दोन परस्परविरुद्ध विचारप्रणाल्या असलेले घटक परस्परांशी सहकार्य करताना दिसतात. ते म्हणजे विल्सन कॉलेजची संस्था आणि रघुनाथराव. म्हणजे ज्या संस्थेत आपण नोकरी करीत आहोत तिच्या विरोधातच आपले समाजकार्य आहे आणि त्यातून एकतर आपल्याला संस्थेचे हित लक्षात घेऊन सामाजिक कार्याला आवर घालावा लागणार; नाहीतर संस्थेत काम करीत असताना केव्हाही आपल्या बाहेरील कार्यावर बोट ठेवल्यास खिशात सतत राजीनामापत्र बाळगण्याची व्यवस्था आपण करायला हवी हे बुद्धिमान रघुनाथरावांना कळत नव्हते असे

काही म्हणता येत नाही. फक्त उभयपक्षी संघर्ष शक्यतो उत्पन्न होऊ नये एवढी काळजी घेत होते. जेकब बापूंजीच्या दबावामुळे संस्थाचालकांनी त्यांच्यासमोर हे दोन पर्याय ठेवले. प्रचारकार्य थांबवून शिकवण्यावर लक्ष केंद्रित करणे किंवा स्वाभिमानपूर्वक राजीनामा देणे. रघुनाथरावांनी दुसरा पर्याय स्वीकारला म्हणून त्या संस्थेविषयी त्यांच्या मनात कटुता निर्माण झाली असा समज होऊ शकतो. परंतु वस्तुस्थिती वेगळी होती असे दिसते. विल्सन कॉलेज हे गिरगाव चौपाटीवर उभे आहे. त्या कॉलेजातून शिक्षण घेणारे बहुसंख्य विद्यार्थी मराठी असत. संस्थेच्या ध्येयधोरणानुसार बायबल या त्यांच्या धार्मिक ग्रंथाचे पाठ घेण्याचा एक तास सर्व विद्यार्थ्यांना अनिवार्य असे त्यामुळे तसा तो मराठी विद्यार्थ्यांनाही असे. त्याच्या विरोधात तत्कालीन वृत्तपत्रांमधून वा नियतकालिकांमधून भरभरून टीका होत होती. स्वाभाविकच ज्या संस्थेतील सुखासीन नोकरी संचालकांच्या कठोरपणामुळे रघुनाथरावांना सोडावी लागली ते त्या संस्थेवर तोंडसुख घेतील असे वाटत असतानाच ' समाजस्वास्थ्य ' मध्ये पुढीलप्रमाणे भूमिका त्यांनी घेतल्याचे दिसते. विल्सन कॉलेजबद्दल लोकांनी जी ओरड चालविली आहे, तीवरून कॉलेजच्या अधिकाऱ्यांची परिस्थिती त्यांच्या लक्षात आलेली नाही असे दिसते. बायबलचा वर्ग सर्वांना सक्तीचा करणार आणि हा हुकूम मुकाट्याने न ऐकल्यास आम्ही कॉलेज बंद करू अशी धमकी त्यांनी दिली आहे असे म्हणतात. ख्रिस्ती किंवा इतर कोणत्याही धर्माच्या सक्तीच्या प्रचाराविरुद्ध ओरड करणे गैर नाही हे मला कबूल आहे ; पण अशी धमकी त्यांनी का दिली ते पाहणे जरूर आहे. विल्सन कॉलेज मिशनऱ्यांनी चालविलेले आहे आणि ते चालविण्याकरिता स्कॉटलंडमधील धार्मिक लोकांकडे भीक मागावी लागते, हे विसरून चालणार नाही. धार्मिक लोक जे पैसे देतात. ते धर्मप्रसाराकरिता देतात, केवळ शिक्षण देण्याकरिता नव्हे. आणि विल्सन कॉलेजात बायबलच्या वर्गापलीकडे धर्मप्रसार होत नाही हे लक्षात घेतले तर त्यांना हा वर्ग तरी सक्तीचा करणे का भाग पडत असेल हे सहज समजेल'...[४] रघुनाथरावांनी विल्सन कॉलेजच्या संचालकांची भूमिका, भीती सहृदयतेने समजून घेतली आहे हे इथे कळते, त्यांचे अंतरंग किती पारदर्शी होते ते अशा प्रसंगी विशेषत्वाने जाणवते.

**अप्पा पेंडसे :**

'समाजस्वास्थ्य' मासिक आर्थिक अडचणीतून रघुनाथराव चालवत. शिवाय नाटके व चित्रपटविषयक परीक्षणे त्यात देत. ती देताना आपल्या मूल्यांशी वा निकषांशी ते केव्हाही तडजोड करीत नसत. लेखक वा दिग्दर्शक केवढा का मोठा असेना त्याच्या चुका दाखवयला ते कचरत नसत. त्यामुळे व्ही. शांताराम यांच्या चित्रपटांवरही ते तुटून पडत. मग त्यांच्या जाहिराती कशा मिळणार ? अशावेळी पत्रकार अप्पा पेंडसे त्यांना काही जाहिराती पुरवून आर्थिक मदत करीत. ते दोघेही गिरगावमध्ये राहत असल्याने परस्परांना ओळखत. अप्पा पेंडसे यांना रघुनाथरावांच्या निष्ठा, त्यांचा त्याग प्रिय असावा, म्हाणून ते आपल्यापरीने जाहिराती देऊन रघुनाथरावांचा बोजा हलका करीत. परंतु जाहिरातींचे पैसे वेळेवर देणे त्यांना शक्य होत नसे, आणि जाहिराती छापूनही पैसे मिळत नाहीत म्हणून रघुनाथराव चिडत. त्यामुळे 'समाजस्वास्थ्य'च्या अंकात पुढील चौकट प्रसिद्ध झाल्याचे आढळते : पैसे बुडवणारे जाहिरातीचे एजंट :—

1. Jack Day यांनी आमचे रुपये १२ बुडवले.
यांचे खरे नाव अप्पा पेंडसे आहे असे समजते.
राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, गिरगाव, मुंबई.

वरील चौकटीत जॅक डे या टोपणनावाने अप्पा पेंडसे जाहिरात व्यवसाय करतात व त्यांनी रघुनाथरावांचे बारा रुपये दिलेले नव्हते असे समजते, अप्पा पेंडसे यांनी काही कारणांनी जाहिरातींचा व्यवसाय स्वतःच्या नावाने न करता 'जॅक डे' हे नाव घेऊन केला होता. स्वाभाविकच ते नाव गुप्त राहावे अशी अप्पांची भूमिका असावी. रघुनाथरावांनी अप्पांनी त्यांचे पैसे वेळेवर न दिल्याने हा गौप्यस्फोट केला. वस्तुतः पुढे एक-दीड वर्षाने 'इचलकरंजीकर किर्लोस्कर वादा'त शंकरराव किर्लोस्करांनी इंचलकरंजीच्या राणीसाहेबा अनुबाईसाहेब घोरपडे यांनी 'स्त्री' मासिकात 'अच्यूतानुजा' या टोपणनावाने कथालेखन केले होते असा गौप्यस्फोट केल्याबद्दल रघुनाथरावांनी त्यांना दोषी धरले होते. तेच रघुनाथराव अप्पा पेंडसे यांच्या संदर्भात तोच गुन्हा करतात हे स्पष्ट होते.

'समाजस्वास्थ्य' मध्ये वरील चौकटीची जाहिरात प्रसिद्ध झाल्यावर ताबडतोब ज्या घटना घडल्या त्याची माहिती रघुनाथरावांनी ऑगस्ट, १९३५ च्या अंकात दिली ती अशी

चार महिने पत्र लिहूनही उत्तर न मिळाल्यामुळे 'या गृहस्थांनी आमचे पैसे बुडविले' असे मागील जाहिरातीत लिहिल्यामुळे आपली बदनामी झाली असे वाटून त्यांनी आम्हांस वकिलामार्फत नोटीस दिली की, वरील विधान खोटे आहे, आम्ही पैसे बुडवणार नव्हतो, आम्हासच जाहिरातवाल्यांकडून पैसे मिळण्यास उशीर झाला, आता पैसे आले आहेत व तुम्ही आमचे बदनामीबद्दल सफशेल माफी २४ तासांचे आत नवाकाळ, प्रभात व जन्मभूमी यातील पत्रात प्रसिद्ध करा, म्हणजे आम्ही ते पैसे देऊ, नपेक्षा कायदेशीर इलाज करू. आम्ही माफी मागण्याचे अर्थातच नाकारले व पैसे दिल्यावर ते मिळाले असे प्रसिद्ध करू असे वकिलामार्फत कळवले. अजूनही ते प्रामाणिक गृहस्थ पैसे दाबून बसले आहेत.

राइट एजन्सी,
नंबर १३, नवी भटवाडी, मुंबई नं. ४.

त्यानंतर सप्टेंबर १९३५ च्या अंकात पुढील मजकूर प्रसिद्ध झाला आहे.—

**अप्पा पेंडसे प्रकरण :**

श्री. अप्पा पेंडसे यांचेकडून जाहिरातीबद्दल जे पैसे येणे होते, ते त्यांनी गेला अंक प्रसिद्ध झाल्यानंतर, ता. ११ ऑगस्ट रोजी वकिलामार्फत आमचेकडे पाठवले. पाच-सहा महिने उशिराने का होईना, पण त्यांनी ते दिले ; तेव्हा त्यांचा उद्देश पैसे बुडवण्याचा होता असे समजण्याचे आता कारण राहिले नाही. त्यांनी इतक्या अवधीत कोणतीही सबब किंवा पत्राचे उत्तरही न दिल्यामुळे आमचा तसा समज झाला होता व आम्ही त्यास पैसे बुडवणारे एजन्ट' असे जुलैचे अंकात म्हटले होते, त्याबद्दल आम्ही आता दिलगिरी प्रदर्शित करतो.

राइट एजन्सी,
नंबर १३, नवी भटवाडी, मुंबई नं. ४.

खरेतर एकमेकात मैत्रभाव असलेले रघुनाथराव आणि अप्पा पेंडसे, दोघेही पत्रकार (अप्पा तर पत्रकार होतेच, पण रघुनाथरावही पत्रकार संघाचे सभासद होते.) शिवाय दोघेही गिरगावात राहत होते व गैरसमज निर्माण झाल्यावर पत्रोपत्री करतात. बारा रुपयांसाठी वकिलामार्फत नोटीस व तिला दुसऱ्या वकिलामार्फत उत्तर पाठवतात हे खरोखरीच गमतीशीर वाटते. त्यापुढेही या दोघांनी 'मैत्रभाव' आपापल्या पद्धतीने सांभाळला हे विशेष.

**पी.इ.एन. :**

पी.ई.एन. ही जागतिक लेखक संघटना. पोएट्स-एडिटर्स-नॉव्हेलिस्ट ’ या शब्दांच्या आद्याक्षरांनी त्या संस्थेचे नाव झालेले. या संघटनेची मुंबईत एक शाखा होती. सौ. सोफिया वाडिया या बाई तिच्या अध्यक्षा होत्या. प्रा. भागवत हे सेंट झेव्हिअर कॉलेजातील पाली भाषेचे प्राध्यापक तिचे चिटणीस होते. दिवाणबहादूर जव्हेरी, बॅरिस्टर फैझी असे काही उच्चभ्रू वर्गातील तिचे सभासद होते. रघुनाथ रूढार्थाने ‘ललित लेखक’ नव्हते. म्हणजे त्यांनी ‘गोष्टी’ लिहिल्या, ‘नाटके’ लिहिली वा एखाद-दुसरी ‘कविता’ लिहिली तरी ‘ख्यातनाम ललित लेखक’ म्हणून ते प्रसिद्ध नव्हते. त्यांचे लेखन प्राय: वैचारिक होते आणि ‘स्त्री-पुरुष संबंध’ ‘गुप्तरोग’ व ‘संततिनियमन’ या विषयांचे तज्ज्ञ म्हणून त्यांची ख्याती झाली होती. अशावेळी संततिनियमनकेंद्र, समाजस्वास्थ्यासाठी लेखन, राइट एजन्सीची कामे, घरात आजारी पत्नीची सेवा, एशियाटिक सोसायटीत जाऊन नियमित वाचन, साहित्यसंघ, पत्रकार परिषद व नाट्य परिषद यांना वेळ देणे यातून उरलाच वेळ तर नियमितपणे शहरातील व्याख्यानांना हजेरी लावणे, फुरसतीच्या वेळात ग्रंथवाचन करणे इतकी असंख्य कामे त्यांनी स्वत:ला लावून घेतली होती. शिवाय लोकसंग्रह वा लेखक संपर्क जवळजवळ नाहीच असा त्यांचा स्वभाव. हे सारे असूनही त्यांनी पीईएन संस्थेचे सभासदत्व १९३८ मध्ये मिळवले होते. तेव्हा मुंबईत लेखक-पत्रकार म्हणून जे नामवंत होते त्यांच्याशी रघुनाथरावांचा सतत वैचारिक मतभेद चाललेला असे आणि या मंडळींचे पी.ई.एन. सभासदांशी सख्यत्व फार होते. रघुनाथरावांचे तत्कालीन समाजाला न रुचणारे विचार आणि कार्य यातून त्यांनी (हित) शत्रूच निर्माण केले होते. परिणामत: या मंडळींनीच त्यांची पी. ई. एन. संघटनेतून हकालपट्टी कशी होईल याची व्यवस्था केलेली होती व त्याकरिता त्या संस्थेच्या वर उल्लेखलेल्या पदाधिकाऱ्यांना रघुनाथरावांच्या विरोधात सबळ ठरू शकेल अशी छापील-लिखित सामग्री म्हणजे ‘समाजस्वास्थ्य’ चे अंक, रघुनाथरावांची पुस्तके ‘बॉम्बे क्रॉनिकल्स’ या तत्कालीन इंग्रजी वृत्तपत्रात रघुनाथरावांवर शिवीगाळ करणारे प्रसिद्ध झालेले लेखन व त्याला त्यांनी दिलेले उत्तर त्यांनी पुरवले होते. या पदाधिकाऱ्यांनी रघुनाथरावांना एका बंद लखोट्यात पत्र पाठवून चौकशीकरिता बोलावले आणि एखादे कोर्ट जसे फिर्यादीचा वकील गुन्हेगाराची उलट तपासणी घेतो त्या पद्धतीने रघुनाथरावांची इन कॅमेरा चौकशी करण्यात आली. सदर प्रसंगी त्यांनी जरी जशासतशा पद्धतीने उत्तर दिली असली तरी तो मानहानीचा प्रसंग होता हे जाणवते.

आणि त्याचा घाव त्यांच्या मनावर अगदी खोलवर बसला होता. त्यांनी पुढच्याच म्हणजे मार्च १९३९ च्या अंकात संबंधितांची व संस्थेचे नाव न घेता 'आमचे टीकाकर' शीर्षकाने लिहिलेल्या लेखात वाचकांना ही माहिती दिली. एप्रिल १९३९ च्या 'रीझन' च्या अंकात 'कथनी आणि करणी' शीर्षकाने ते सारे आपल्या इंग्रजी वाचकांना त्यांनी सांगितले आणि पुढे नोव्हेंबर १९४५ साली त्यांनी 'पी. ई. एन. सभासदांची अरेरावी' शीर्षकाने 'समाजस्वास्थ्य' मध्ये लिहिले. शेवटच्या लेखाच्या शेवटी त्यांनी लिहिले: 'या संस्थेची मुख्य कचेरी पूर्वी पॅरिसला असे, ती नंतर लंडनला आली. सौ. वाडिया यांच्या तिकडे नेहमी खेपा होतच असत. या सर्व भांडणानंतर, त्या लंडनला आपल्याविरुद्ध कारवाई करणार हे आम्ही मांडलेच होते व त्याबाबत इंग्लंडला ताबडतोब काही पत्रे लिहिली होती. त्यापैकी एक संततिनियमनाच्या प्रचार करणाऱ्या मिसेस हाउ मार्टिन, या मुंबईत आमचेकडे दोन-तीन वेळा येऊन गेल्या होत्या त्यांना, आणि एक डॉ. नॉर्मन हेअर यांची पत्रद्वारा ओळख झाली असल्यामुळे त्यांना लिहिले होते. दोघांनीही आम्हाला धीर दिला होता, की राजीनामा देऊ नका. कोणालाही काढून टाकता येणार नाही, तुम्ही बिलकूल राजीनामा देऊ नका. सौ. वाडिया लंडनला जाऊन त्यांनी तेथे आपलेविरुद्ध प्रयत्न केल्याचे आम्हाला कळले, परंतु त्या परत आल्यानंतरही त्यांना आमचे काही करता आले नाही. पण अशा लोकांची संगती नसलेलीच बरे असे वाटून आम्ही आमचा मुद्दा सिद्धीस गेल्यावर एक वर्ष वाट पाहून नंतर सौ. वाडिया यांच्या पैशावर अवलंबून असलेल्या म्हणजे त्यांच्या खिशातच वास करणाऱ्या या संस्थेचा राजीनामा दिला. (पी. ई. एन.) ही जागतिक संस्था पुरोगामी आहे. परंतु स्थानिक शाखेची सूत्रे सौ. वाडिया आणि दिवाणबहादूर जव्हेरीसारख्या प्रतिगामी लोकांच्या हातात असल्यामुळे येथे तिचे स्वरूप पुरोगामी नाही' यासंदर्भात 'अभिरुची' मासिकात 'वादसंवाद' सदर चालवणाऱ्या 'निषाद' यांनी म्हणजे प्रा. मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांनी रघुनाथरावांची बाजू घेतल्याचे दिसते. त्यांनी लिहिले की, 'लेखकाला आपले विचार बोलून दाखवण्याचे पुरे स्वातंत्र्य असावे आणि त्या स्वातंत्र्याची जपणूक सर्वांनी एकदिलाने करावी हे तत्त्व तरी सुधारलेल्या जगाच्या पचनी पडेल असा भरवसा होता. पण हिंदी पी. ई. एन. ने म्हणे समाजस्वास्थ्याचे विचार व त्यातील नग्नचित्रे यांवर आक्षेप घेऊन कर्व्यांना संस्थेतून काढून टाकण्याची कारवाई केली. नटीच्या अर्धनग्न चित्रांनी

बरबटलेल्या नियतकालिकांचा हिंदी पी. ई. एन.च्या सासूबाई मादाम सोफिया वाडिया व त्यांच्या भोवतालचे निरुपद्रवी खुशामते यांच्या भावनावर काय परिणाम होतो, हे समजल्यास बरे. कर्व्यांनी या फुकट फौजदारांना ते ढोंगी असल्याचे तोंडावर सांगितलेच पण वाडियाबाईंच्या तोंडून (पी. ई. एन.) ' हा खाजगी क्लब आहे ' असे वदवले, याबद्दल त्यांची तारीफ करावी तेवढी थोडी...'[५]

**रीझन :**

'रॅशनॅलिस्ट सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेच्या 'रीझन' या नियतकालिकाची जबाबदारी त्यांनी स्वीकारली आणि काही तडजोडी स्वीकारून त्याचे संपादकत्वही मान्य केले. वस्तुतः रघुनाथरावांना आर्थिक चणचण नेहमी जाणवत असे. म्हणून असे वेळकाढू आणि विना-मोबदल्याचे काम त्यांनी का स्वीकारले ते कळत नाही. या संदर्भात त्यांनी लिहिले आहे, 'येथील 'रॅशनॅलिस्ट सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेचे मुखपत्र 'रीझन' हे बऱ्याच दिवसांपासून बंद पडले होते. ते गेल्या फेब्रुवारीपासून पुन्हा सुरू करण्याचे ठरवून त्या संस्थेने त्याचे मुख्य संपादकत्व आपल्या गळ्यात घातले आहे. गळ्यात घातले आहे म्हणण्याचे कारण असे की, त्याचा कोणत्याही प्रकारचा मोबदला मिळत नाही आणि काम मात्र पडते, आणि शिवाय पुन्हा एकदा खटला वगैरे झाल्यास (पूर्वी एकदा झाला होता) तो संपादक म्हणून आमचेवर होणार. तथापि वरील संस्थेने आम्हांस संपादक नेमून मानच दिला आहे याची आम्हास पूर्ण जाणीव आहे.' तथापि रघुनाथराव समजतात तसा 'मान' मिळतो म्हणून ह्या लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याचाच प्रकार होता असे म्हटले तर गैर होऊ नये.

जानेवारी १९४१ पासून रीझनवर संपादक म्हणून अब्राहम सॉलोमन यांचे नाव येऊ लागले तरी तिथे ते (रघुनाथराव) संबंध ठेवून होते असे दिसते. पाच महिन्यांनंतर म्हणजे जून १९४१ पासून तो अखेरच्या अंकापर्यंत मात्र तेच संपादक राहिले. असा बदल, म्हणजे प्रथम काही अंकांवर संपादक म्हणून रघुनाथरावांचे नाव, नंतर काही अंकावर सॉलोमन यांचे नाव व पुन्हा रघुनाथरावांचे नाव–का झाले हे त्यांनी स्वतःच सांगितले आहे आणि ते म्हणजे एका धनिकाची लहर व अडेलतट्टूपणा होय. त्यांनी लिहिले आहे की, 'इथली

आणखी एक संस्था' रॅशनॅलिस्ट सोसायटी ऑफ इंडिया' तिने-रीझन' नावाचे बुद्धिवादी इंग्रजी मासिक चालवले होते. त्याचे संपादक डॉ. डॅव्हॉइन यांचेवर ख्रिस्ती लोकांच्या भावना दुखावणारा लेख छापल्याबद्दल फिर्याद झाली होती. तीतून ते सहीसलामत सुटले तरीही त्यांनी ते काम सोडले व माझ्यावर पूर्वीच फिर्यादी झालेल्या असल्यामुळे ते पत्करण्याचा मला आग्रह झाला. मी ते पत्करले (अर्थात बिनपगारी). संस्थेजवळ पैसे नव्हते, ते पगार कुठून देणार? पुढे स्वतःला समाजवादी म्हणवणाऱ्या एका धनिकाने खर्च अंगावर घेतला. पण अशी अट घातली की संपादकाचे काम मीच करावे आणि मासिकात समाजवादाकरता काही पाने ठेवावी. अर्थात माझे काम वाढले; तेव्हा मी अशी अट घातली की, कोणताही लेख मला पसंत असेल तरच तो येऊ शकेल व धनिकाने मला थोडाबहुत पगार द्यावा. असे ठरून काही महिने लोटल्यावरही पगाराचे चिन्ह दिसेना, तेव्हा खरमरीत पत्र लिहिले. ते त्याला इतके झोंबले की, 'कर्वे यांना संपादकाच्या जागेवरून काढल्यासच मी खर्च चालवीन', असे त्याने संस्थेला कळवले. आम्ही दोघे व्यवस्थापक मंडळीत होतो. तेथे मी सांगितले की संस्थेचे नुकसान होऊ नये म्हणून मी राजीनामा देतो. दुसरा संपादक नेमला, पण त्याला लेख कसे लिहिता येणार? त्याने मलाच विनंती केली की मी पूर्वीप्रमाणेच लेख लिहावे (याला धनिकाची हरकत नव्हती) व छापखान्यातले कच्चे खर्डे तपासावे, नाव मात्र माझे नाही! तेही मी कबूल केले. पण संस्थेला शेवटी ही धनिकाची अरेरावी असह्य होऊन त्यांनी शेवटी ठरविले की, खाजगी वर्गणी भरून मासिक चालवावे व संपादक म्हणून माझे नाव घालावे. तथापि इतर काम पाहणारा कोणी न राहिल्यामुळे मासिक व संस्था बंद पडली.'

रघुनाथरावांनी इथे दिलेली स्पष्टीकरणे कितीही तर्कशास्त्रीय दृष्टीने बिनतोड असली तरी आणि त्यातही मालतीबाईंचे आजारपण हाताबाहेर गेलेले असतांना त्यांनी असे उद्योग करावेत हे आपल्या आकलनापलीकडचे आहे.

**दक्षिण महाराष्ट्र साहित्य पुरस्कार समिती :**

'दक्षिण महाराष्ट्र साहित्य पुरस्कार समिती' नावाची एक संस्था बहुधा फलटण येथून कार्यरत होती. तिला फलटण पुरस्कार समिती असेही संबोधण्यात येई. सन १९३७ नंतर ती विशेषतः क्रियाशील होती. तिचे वैशिष्ट्य असे होते की, प्रत्येक वेळी तिने नेमून दिलेल्या तज्ज्ञाच्या सूचनेवरून संयोजक एखादा विषय जाहीर करीत. लेखकांना त्या त्या विषयांवर ग्रंथलेखन करण्याकरिता ती प्रोत्साहन देत असे ; आणि पूर्वघोषित कालावधीत तिच्याकडे

येणाऱ्या हस्तालिखितांची गुणात्मदृष्ट्या छाननी होऊन मग पारितोषिके जाहीर केली जात. ती तेव्हाच्या वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध होत. साधारणपणे पाचशे रुपये इतके ते पारितोषिक असे, आणि तेव्हाचे पाचशे रुपये म्हणजे फार कमी किंमत नव्हती. शिवाय पारितोषिकप्राप्तीने लेखकांना सन्मान नि प्रसिद्धीही मिळत असे.

रघुनाथरावांना अशा स्पर्धामध्ये भाग घेण्याची व त्यात विजय मिळवण्याची ईर्षा अगदी त्यांच्या ट्रेनिंग कॉलेजमधील दिवसांपासून असल्याचे दिसते. याबरोबरच त्यांच्या बुद्धीला कोणत्याही विषयाचे वावडे नसे. त्यांच्या मनाने एखाद्या विषयाचा अभ्यास करायचा असा निश्चय केला की, त्याचा मनःपूर्वक अभ्यास ते करीत. साधे बुद्धिबळात त्यांना रस आहे म्हटले की, त्यांचे विदेशी खेळाडूंबरोबर पत्राद्वारे 'चाली' चालत असत. डॉ. मनोरमाबाई थत्ते यांनी कॅन्सरविषयी सवंग विधाने केली तेव्हा त्यांनी त्यासंबंधीच्या आपल्या शंका लंडनमधील डॉक्टरांना विचारून ती माहिती त्यांनी वाचकांना दिली होती. त्यांनी लिहिले, 'कॅन्सरसंबंधी डॉ. सौ. थत्ते यांची अविश्वसनीय विधाने वाचून आम्ही लंडन येथून या विषयावर माहिती मागवली, ती पुढे देत आहोत'. (समाजस्वास्थ्य, मार्च १९३८ : पृ. २९५) प्रा. वा. म. जोशी यांनी सौंदर्याविषयी काही विचार व्यक्त केले तर रघुनाथरावांनी त्या विषयावरील पुस्तकांचा अभ्यास करून 'समाजस्वास्थ्य'मध्ये लेखमाला लिहिली. सारांश, एखाद्या विषयाचा अभ्यास करायचा म्हटले की, ते त्याच्या मुळापासून विचार करीत. 'दक्षिण महाराष्ट्र साहित्य पुरस्कार समिती' वेळोवेळी जे विषय जाहीर करीत असे त्यांचा ते अभ्यास करीत आणि आपली 'यंत्रलिखित' प्रत ते त्या संस्थेला सादर करीत. तेव्हा संस्थेने 'कच्चा आहार,' 'वाङ्मयसमीक्षा', 'चरित्रवाङ्मय' व 'मानसशास्त्र' या विषयांवर तेव्हा वेळोवेळी स्पर्धा जाहीर केल्या होत्या. त्यासंबंधीचा त्यांचा अनुभव त्यांनी वाचकांना सांगितला आहे; 'काही वर्षांपूर्वी 'दक्षिण महाराष्ट्र साहित्य पुरस्कार समिती' नावाची संस्था स्थापन होऊन ती दरवर्षी एखाद्या विषयावर ग्रंथ किंवा हस्तलिखित मागवून त्यापैकी जे उत्तम ठरेल, त्याला रु. ५०० चे बक्षीस देत असत. हा उपक्रम स्तुत्य आहे परंतु समितीचा कारभार अत्यंत अव्यवस्थितपणे चालतो, असे म्हणणे भाग पडते. आम्ही स्वतः दोन वेळा निबंध पाठवूनही आम्हास बक्षीस मिळाले नाही म्हणून तक्रार करतो, असे कोणी म्हणू शकेल. परंतु परंपराबद्ध परीक्षकांनी आम्हाला बक्षीस दिले तर तो एक अपघातच समजावा लागेल, आणि अपघाताची कोणी अपेक्षा करीत नाही. वरील प्रकारचा आरोप येईल हे समजूनही इतरांना इशारा देण्याकरिता या संस्थेच्या कारभारावर टीका करणे आम्हास भाग पडत आहे.'

१९४३ साली या संस्थेने 'वाङ्मयसमीक्षा' हा विषय नेमला होता. अनेक निबंधांत आमचाही होता, तथापि आमची तक्रार इतकीच, की शेवटी बक्षीस दिले प्रो. रा. श्री. जोग यांच्या 'सौंदर्यशोध व आनंदबोध' या ग्रंथाला. हे पुस्तक भलत्याच विषयावर आहे. पुस्तक चांगले आहे हे आम्हासही मान्य आहे, पण ते जोगांनी लिहिलेले असले तरीदेखील त्याचा नेमलेल्या विषयाशी संबंध तरी बादरायण म्हणता येईल की काय, याची शंका आहे. हे बक्षीस केवळ प्रो. जोगांच्या व्यक्तिमाहात्म्याच्या जोरावर त्यांना दिले, याबद्दल आम्हांस तीळमात्र शंका नाही. आता हा दोष परीक्षकांचा, समितीचा नव्हे, असे कोणी म्हणेल: पण परीक्षक समितीने नेमलेले असतात, तेव्हा ती दोषापासून अलिप्त नाही.

१९४४ साली बक्षिसाकरिता चरित्रे मागवली होती, परंतु काही चरित्रे तरी वेळेवर आली असूनही, दिलेली मुदत संपून गेल्यावर आणखी दोन महिन्यांची मुदत वाढवली, असे समितीने जाहीर केले. यात वेळेवर पाठवणारांचे काही नुकसान होते, हे समितीच्या गावीही नाही. या वेळी आम्ही ग्रंथ पाठवला नव्हता.

१९४५ साली 'मानसशास्त्र' हा विषय नेमून त्याला पुरी एक वर्षाची मुदत आणि ग्रंथ निदान २५० पानांचा झाला पाहिजे अशी अट घालून ३१ डिसेंबर १९४५ पर्यंत ग्रंथ मागवले होते. त्या मुदतीत आम्ही निबंध पाठवला, दुसऱ्या कोणी पाठवला किंवा नाही हे माहीत नाही. ही मुदत संपून गेल्यावर आणखी सात महिने मुदत वाढवल्याचे समितीने जाहीर केले-तरीदेखील या सात महिन्यांच्या शेवटी आमचा धरून एकंदर तीनच निबंध आले असे ऐकतो. या निबंधावर परीक्षकांनी आठ महिने खर्च करून शेवटी असा निकाल दिला की, 'यातला एकही निबंध बक्षिसाला लायक नाही.'

रघुनाथरावांचे वरील निवेदन द. म. सा. पु. स. संबंधी तपशीलवार माहिती देणारे असले तरी त्यात त्यांचे काही विस्मरण होते आहे असे वाटते. 'आधुनिक आहारशास्त्र', 'वाङ्मयसमीक्षा' व 'मानसशास्त्र' या तीन विषयांवरील स्पर्धांमध्ये ते सहभागी झाले. ते 'दोन' म्हणतात ते वस्तुस्थितीला धरून नाही, 'आम्हांस बक्षीस मिळाले नाही' हे त्यांचे आणखी एक विधान सर्व अर्धसत्य आहे, त्यांच्या 'आधुनिक आहारशास्त्र'ला परितोषिक मिळाले होते व ते डॉ. म्हसकर व रा. चित्रे यांनी सादर केलेल्या ग्रंथाबरोबर समप्रमाणात वाटून मिळाले होते. इथेच आणखी एक गोष्ट नोंदवाविशी वाटते आणि ती म्हणजे रघुनाथरावांच्या मृत्यूनंतर त्यांची हस्तलिखिते व पत्रे ह. वि. मोटे यांनी य. दि. फडके यांना दिली. त्यांनी ती

'र. धों. कर्वे' या आपल्या चरित्रात वापरली व ती पत्रे व 'वाङ्मयसमीक्षा' हे हस्तलिखित हे पुढे गहाळ झाले. ही अनास्था दाखवली गेली हा अक्षम्य गुन्हा म्हणावा लागेल.

आणखी एक गोष्ट अशी की, 'वाङ्मयसमीक्षा' असा विषय जाहीर केला गेला तेव्हा त्या विषयाच्या व्याप्तीबद्दलचे समितीचे नियम काटेकोरपणे कोणते होते ते रघुनाथराव सांगत नाहीत. या विषयाच्या संदर्भात समीक्षेची व्याख्या, समीक्षेचे स्वरूप, समीक्षेचे घटक, समीक्षेचे प्रकार, समीक्षा आणि साहित्यनिर्मिती, समीक्षा आणि संशोधन, समीक्षा आणि वाङ्मयेइतिहास, भारतीय साहित्यशास्त्र, पाश्चात्त्य समीक्षा सिद्धांत : नेमके समितीला काय अपेक्षित होते? वाङ्मयीन वाद, सौंदर्यवाद की समीक्षेतील एखादा प्रश्न घेऊन त्यात मूलभूत अंगाने चिंतन अपेक्षित होते, काही कळत नाही. प्रा. रा. श्री. जोग यांच्या 'सौंदर्यशोध आणि आनंदबोध' या ग्रंथाला त्यात पारितोषिक मिळाले आणि रघुनाथरावांच्या निबंधाबरोबरच बा. सी. मर्ढेकर यांचे 'वाङ्मयीन महात्मता' हे पुस्तकही होते याचा निर्देश 'चित्रा'मध्ये अजितकुमार यांनी केला आहे[६] आणि खरे तर रघुनाथरावांचे 'वाङ्मय समीक्षा' हे हस्तलिखित उपलब्ध झाले असते तर त्याच्या गुणवत्तेसंबंधी काही लिहिता आले असते. 'दक्षिण महाराष्ट्र साहित्य पुरस्कार समिती'कडून आपल्यावर अन्याय होतो हे लक्षात आल्यावर तिच्या नादाला त्यांनी लागायचे नव्हते. आणि त्यात सहभाग घेतल्यावर जर आपल्या मनाविरुद्ध घडले असेल तर एक तर 'मान सांगावा जनात' या तत्त्वाने त्यांनी त्यावर लेखणी चालवायला नको होती.

●●●

---

१. आत्मचरित्र लेखनाचा संकल्प, समाजस्वास्थ्य, फेब्रुवारी १९४२ : पृ. १८४-१८५.

२. समाजस्वास्थ्य, मे १९४१.

३. समाजस्वास्थ्य, जानेवारी १९४५ : पृ. ६८.

४. समाजस्वास्थ्य, जानेवारी १९४४ : पृ. १६५.

५. वाद-सवांद: संपादक: ग. रा. कामत, मीना गोखले, मौज प्रकाशन, २००३.

६. अजितकुमार, चित्रा, दिवाळी, १९४३ : पृ. ५७ ते ६४.

# ६. आजारपण आणि उत्तरपर्व

## आजारपण :

१९२६ सालच्या नोव्हेंबरदरम्यान रघुनाथराव नैरोबीहून परतले व डिसेंबरअखेर त्यांना प्रो. पेल्तिए यांच्या मुलाच्या ओळखीने त्याच्याच ऑफिसमध्ये- म्हणजे 'बॉम्बे बेहरिन' कंपनीत नोकरी मिळाली, ती १ मे १९३३ या दिवशी त्यांनी सोडली. १९३० च्या सुमारास त्यांच्या प्रकृतीच्या तक्रारी सुरू झाल्या. यासंदर्भात त्यांनी लिहिले की '(बॉम्बे बेहरिन कंपनी)' चे काम फार दिवस निभणे शक्य नव्हते आणि त्याचा प्रकृतीवर परिणाम होऊन नंतर दोन तास काम केल्यानेही थकवा येऊ लागला. प्रकृतीत दृश्य फरक काहीच नव्हता, तेव्हा एका तज्ज्ञ समजलेल्या डॉक्टरांकडून तपासून घेतले, व त्यानी यंत्राने रक्तदाब पाहता तो बराच वाढला असल्याचे आढळले. हेच एकंदर थकव्याचे कारण ठरले आणि त्यानी काम कमी करण्याचा उपदेश केला आणि काही शक्तिवर्धक औषधांची यादी दिली. तेव्हा रात्री काम करणे बंद केले, आणि साडेनऊ वाजता निजू लागलो. त्यामुळे आणि औषधांमुळे रक्तदाब बराच उतरला. परंतु ही स्थिती फार दिवस टिकली नाही. काम करू नका, हवेच्या ठिकाणी जा, मुंबईतून शक्य तितक्या वेळा बाहेर जात जा, वगैरे गोष्टी डॉक्टरांना बोलायला सोप्या असतात...., प्रकृती अधिकाधिक बिघडत चालली... थोडे उन्हातून चालल्यानेही त्रास होऊ लागला आणि एके दिवशी रस्त्यात बेशुद्ध झालो. परंतु अगोदरच थोडेसे चमत्कारिक वाटल्यामुळे कांदेवाडीच्या कोपऱ्यावरील तांबे यांचे दुकानाचे फळीवर चढून बसण्याची बुद्धी झाली व दुकानातील लोकांच्या ते लक्षात असल्यामुळे त्यांनी कांदा आणून नाकाला लावला. शुद्धीवर आलो तो प्रेक्षकांचा थवा दुकानापुढे जमलेला दिसला.... स्वतःच्या प्रकृतीसंबंधी काय करावे, हा विचार डोक्यात होताच. डॉक्टरांना त्यात फारसे काही करता येत नाही हे उघड होते; तेव्हा आपणच काहीतरी मूलगामी उपाय शोधून काढला पाहिजे, एरवी आपण फार दिवस जगत नाही अशी खात्री झाली... आमच्या शेजारी आमच्यापेक्षाही जास्त रक्तदाब असलेले डॉक्टर राहतात आणि त्यांचे मत असे होते की, उपोषण करून वजन कमी करावे व त्याप्रमाणे त्यांनी केले होते. परंतु त्याचा फारसा उपयोग

झाला नव्हता, आणि उपोषणासंबंधी आमचा स्वत:चा अनुभव असा होता, की कधी चुकून उपोषण घडल्यास फार अशक्तता वाटे... (कच्चा) आहार घेऊ लागल्याला आता सात महिने होऊन गेले. इतक्या अवधीत प्रकृतीत जमीनअस्मानाचा फरक दिसू लागला. अशक्तता साफ नाहीशी झाली, इतकी की, आता टेनिसचे सिंगलचे तीन सेट खेळता येतात. पूर्वी चालणे शक्य तितके टाळण्याची प्रवृत्ती होती, तेथे आता थोडेबहुत कमीअधिक चालावे लागले तरी काही वाटत नाही. केवळ व्यायामाकरता चालण्याचा कंटाळा पूर्वी होतात तसाच अजूनही आहे, परंतु जरूर पडल्यास चालता येते. वजन आणि विशेषत: पोट फाजील वाढले होते, ते उपोषण केल्याशिवाय ताबडतोब कमी झाले... पूर्वी रक्तदाबामुळे झोप नीट येत नसे. आणि रात्रीतून दोन-तीन वेळा उठण्याची सवय होती, त्याऐवजी आता रात्री एखाद्याच वेळी उठावे लागते, व किंचित थकलो असलो तर मुळीच उठत नाही. काही दिवस अंगावर एक्झिमा होता. तोही आता नाहीसा झाला. आणखी एक आजाराचे चिन्ह म्हणजे दोन्ही बाजूच्या मूत्रवाहक नलिकांमध्ये मूतखडे असल्याचे एकदा 'क्ष' किरणांच्या साह्याने दिसले होते. त्याचे काय झाले हे माहीत नाही. ते खर्चाचे काम असल्यामुळे पुन्हा तपासले नाही... इतर अन्न पुरेसे न वाटल्यास बटाटे भाजून किंवा उकडूनही खाल्ले आहेत, कारण ते कच्चे खाणे बरे नव्हे, पूर्वी मधूनमधून मांसाहाराची सवय होती तीही सोडली नाही.. अंडी कच्चीच खात होतो... हा आमचा स्वत:चा अनुभव आहे', रघुनाथरावांनी आपल्या आजारपणाविषयी इतके विस्तृतपणे एप्रिल १९३९ च्या 'समाजस्वास्थ्य'मध्ये लिहिले आहे.

आजारपणापासून मुक्ती मिळावी म्हणून रघुनाथरावांनी कच्चा आहार घेण्याचा जसा प्रयोग केला तसाच चालण्याचा व्यायाम घेण्याचाही केला. वरील परिच्छेदात चालण्याविषयी त्यांना आवड नव्हती हे स्पष्ट होत असले तरी ते गिरगाव चौपाटीवर नियमित चालत असत.

शकुंतला परांजपे यांनी रघुनाथरावांसंबंधी लिहिलेल्या लेखाचा प्रारंभ 'एका मोठ्या आजारातून उठल्यानंतर हवापालट करण्यासाठी आप्पा कर्वे पुण्यास आमच्याकडे प्रिन्सिपॉलच्या बंगल्यात राहावयास आला होता..... त्यावेळी मी पाच-सात वर्षांची होते.' असे म्हटले

आहे. शकुंतलाबाईंचा जन्म १९०६ सालचा म्हणजे त्यांच्या स्मृती जर लेखन प्रसंगी शाबूद असतील तर हे वर्णन सन १९१२-१९१३ च्या सुमाराचे मानता येईल. तेव्हा रँग्लर परांजपे फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य होते व कॉलेजच्या आवारात असलेल्या प्राचार्यांच्या बंगल्यात ते राहत. त्यांनी १९२२ साली 'पुरुषोत्तमाश्रम' नावाचा बंगला बांधला ही गोष्ट वेगळी. म्हणजे शकुंतलाबाई रघुनाथरावांच्या 'मोठ्या आजारांचा' इथे निर्देश करतात तो त्यांच्या ऐन तारुण्यातला असावा. १९३५-१९३७ नंतरचा नसावा.

१९४४ सालानंतर 'समाजस्वास्थ्य' मासिकात मुंबई मराठी साहित्य संघातर्फे भरविण्यात येणाऱ्या नाट्यमहोत्सवांचे समालोचन रघुनाथराव 'यंदाचा नाट्यमहोत्सव' या शीर्षकाने करीत असत. १९५१ सालच्या या महोत्सवाविषयी लिहिताना 'मध्येच आजारी झाल्यामुळे सर्वच नाटके आम्ही पाहिलेली नाहीत' अशी नोंद त्यांनी केली आहे. (समाजस्वास्थ्य, मे १९५१, पृ. २४२) याचा अर्थ त्या काळात त्यांची प्रकृती ठीक नव्हती आणि एका जागेवर सतत तीन-चार तास बसून नाटके पाहण्याची ताकद त्यांच्यात नव्हती.

रघुनाथरावांवर 'अश्लील'तेच्या आरोपावरून खटले झाले त्यावेळची त्यांची मन:स्थिती कशी होती यावर प्रकाश टाकणारा परिच्छेद गंगाधर महांबरे यांनी लिहिला आहे. मामांना (वरेरकर) आपल्या घरी नेहमी यावासा वाटणारा त्यांचा खरा स्नेही म्हणजे र. धों. ऊर्फ आप्पा कर्वे हे होत. 'आताशा तो कुठंच जात नाही.' मामा नैराश्यपूर्ण म्हणत 'समाजस्वास्थ्यांच्या खटल्यात खचलाय तो.' ही नेहमीची त्या वाक्याला पुष्टी असे. एक दिवस मामा मला आप्पा कर्वेंच्या घरी घेऊन गेले. म्हणाले, 'आज त्याचा वाढदिवस आहे. आजच त्याच्या घरी जाण्यात औचित्य आहे......' आप्पा कर्व्यांच्या घरी गेलो तेव्हा आप्पा आरामखुर्चीत बसले होते. मामांनी माझी त्यांच्याशी ओळख करून दिली. मामा आप्पांना म्हणाले, "आप्पा, तू माझ्यापेक्षा लहान आणि मी तुझ्या अण्णांपेक्षा लहान. पण अण्णा करीत असलेलं कार्य आणि त्यांचं झालेलं वय पाहिलं की, वाटतं आता आपल्याला वयाची कुरकुर करायला काही जागा नाही. तुझ्याकडे आज आल्यावर मात्र सांगतो, जिना चढून येताना खूप धाप लागते मला" त्यावर आप्पा म्हणाले, "यापुढे माझ्या आयुष्यात तरी किती दिवस राहिलेत....." स्वातंत्र्योत्तर काळात तर त्यांची प्रकृती खूपच नाजूक बनली होती असे दिसते. 'गेल्या तीन-चार वर्षांत श्री. र. धों. कर्वे यांची प्रकृती नीटशी राहत नसून दोन वेळा ते मोठ्या दुखण्यातून वाचले' असे भास्करराव कर्वे यांनी लिहिले आहे. आणखी एका लेखात भास्कररावांनी

म्हटले की, ' मालतीबाईंच्या मृत्यूनंतर आप्पा एकाकी उरला. त्याचीही प्रकृती तितकी चांगली नसे. फ्रेंच भाषेतील होमिओपॅथिक पुस्तके वाचून तो स्वतः औषधे घेत असे...'

**मान्यतेला सुरुवात :**

१९५२ च्या प्रारंभी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संततिनियमनाच्या बाजूने काही विधाने केली ; त्यामुळे या विषयासंबंधी काँग्रेसचे म्हणजे तेव्हाच्या शासनाचे धोरण बदलू लागल्याची चिन्हे दिसू लागली. त्याआधी संततिनियमनाच्या संदर्भात महात्मा गांधी यांचे आत्मसंयमनाचे विचार प्रमाण मानले गेले होते व तीच काँग्रेसची भूमिका राहिली होती. नेहरू मंत्रिमंडळातील आरोग्यमंत्री राजकुमारी कौर या गांधीजींच्या विचारांचा ठिकठिकाणी पुनरुच्चार करायच्या. रघुनाथराव संततिनियमनासाठी डच कॅप, जेली कॅप, वेगवेगळ्या नळ्यांसाठी आवश्यक असलेला धातू परदेशांतून आयात करीत असत. त्या वस्तूंवर १९४२ सालच्या सुमारास सरकारी नियंत्रण बसविण्यात आले होते. सरकारचा परवाना असल्याखेरीज हा माल आणता येत नसे. रघुनाथरावांना त्याकरिता आरोग्य मंत्रालयाकडे अर्ज करून परवाना मागवावा लागत असे. तेव्हा अशा बाबींना म्हणजे संततिनियमनाला सरकारी धोरण अनुकूल नसल्याने त्यांचा अर्ज नामंजूर झाला होता. त्यावर 'समाजस्वास्थ्य'च्या फेब्रुवारी, १९४३ च्या अंकात 'सरकारी अधिकाऱ्यांचा आडमुठेपणा' नावाचा लेख लिहून त्यांनी आपली नाराजी व चीड व्यक्त केली होती. परंतु पंडित नेहरूंचा कल हळूहळू संततिनियमनाला अनुकूल दिसताच, त्यांच्या सहकाऱ्यांच्या विचारात आणि वर्तनातही बदल होऊ लागला. त्याचाच परिणाम म्हणून मुंबईत खार येथे 'पहिली अखिल भारतीय संततिनियमन परिषद' आयोजित करण्यात आली होती. 'कुटुंबनियोजन संस्थे'च्या अध्यक्षा लेडी रामराव आणि चिटणीस मिसेस वेंबू यांनी त्यात रस घेतला होता. या परिषदेचे अध्यक्ष म्हणून बडोदा विद्यापीठातील डॉ. चंद्रशेखर आणि अमेरिकन तज्ज्ञ डॉ. एब्राहम स्टोन यांना निमंत्रित केले होते. डॉ. स्टोन यांनी 'रिदम पद्धती'चा पुरस्कार केला. ही परिषद किमान दोन दिवस चालली असावी. तिच्यात आपले अनुभव कथन करण्यासाठी रघुनाथरावांना निमंत्रित केले गेले होते. त्यामुळे नाही म्हटले तरी हा, त्यांनी आजवर केलेल्या कार्याचा व लेखनाचा सन्मानच होता असे म्हटले पाहिजे. परंतु सर्व परिषदांमध्ये, सभा-संमेलनात नेहमी जे घडते ते म्हणजे वेळ न पुरणे हे तेथेही झाल्याने त्यांना आपले अनुभव सांगता आले नाहीत. यासंदर्भात त्यांनी लिहिले आहे की, 'या परिषदेत आम्हाला आमचे तीस वर्षांतील अनुभव

सांगण्याची विनंती केली होती, परंतु पुरेसा वेळ न मिळाल्यामुळे या पद्धतीविषयी बोलायचे राहिले. तेव्हा नंतर सँटाक्रूझ येथील डॉ. काशीबाई अवसरे यांनी विचारले की, यासंबंधी तुम्ही का बोलला नाही? वेळ मिळाला नाही असे सांगितल्यावर त्यांनी अध्यक्षांना विनंती केली, की त्यांनी मला या पद्धतीविषयी बोलायला सांगावे.'

राज्यकर्त्यांच्या बदलत्या भूमिकेची ही परिषद म्हणजे नांदी आहे असे रघुनाथरावांना वाटले आणि म्हणून क्वचित मतभेद नोंदवत पण प्राय: कौतुकाचा स्वर लावत त्यांनी हे वृत्तान्तनिवेदन केले आहे. त्याच्या शेवटच्या भागात त्यांनी लिहिले—

'आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या मुंबईच्या नगरसमितीने कित्येक वर्षेपर्यंत गांधीप्रणीत अडाणीपणामुळे आणि काँग्रेसच्या हुकमी बहुमतामुळे हा विषय फेटाळून लावला होता, त्याच नगरसमितीने काही वर्षांपूर्वी संततिनियमन केंद्रे सुरू केली आणि आता अशी सात केंद्रे मुंबईत चालू आहेत. त्याच नगरसमितीच्या दिवाणखान्यात प्रतिनिधींना मुंबईचे मेयरसाहेब श्री. स. का. पाटील यांनी चहा दिला आणि जो दिवाणखाना आम्ही कधी पाहिलाही नव्हता, तेथे प्रथमच जाण्याचा प्रसंग या वेळी आला आणि मेयरसाहेबांच्या टेबलापाशीच आम्हांला स्थान मिळाले होते.' (समाजस्वास्थ्य, जानेवारी, १९५२). रघुनाथरावांच्या मनाला सुखावणारा असा हा प्रसंग होता.

**सत्तरीच्या निमित्ताने सत्कार :**

दिनांक १४ जानेवारी १९५२ रोजी रघुनाथरावांनी आपल्या वयाची सत्तर वर्षे पूर्ण केली. ते स्वत: मितभाषी असले आणि त्यांनी मित्रांपेक्षा शत्रूच जास्त निर्माण केले असले तरी, अप्पा पेंडसे, समतानंद गद्रे, मामा वरेरकर यांच्यासारखे मोजके लोक त्यांच्या मित्रपरिवारात होते असे म्हणता येते. ते मुळात स्पष्टवक्ते होते. त्यामुळे सत्य बोलायला व त्यानुसार वागायला ते कमी करीत नसत. त्यांचा हा स्वभाव नेमकेपणाने ओळखणारेही त्या काळात होते. त्यांच्या विचारांशी न जुळणारे तरीही त्यांचा स्वार्थत्याग ओळखून त्यांचा मोठेपणा मानणारेही काही महाभाग होतेच. त्यांनी रघुनाथरावांच्या सत्तरीच्या निमित्ताने त्यांचा सत्कार करायचा घाट घातला. त्यासाठी एक समिती नेमण्यात आली आणि जनतेकडून पैसे गोळा करून रघुनाथरावांना एक थैली द्यायची असे निश्चित करण्यात आले. या सत्कारसमारंभाचे अध्यक्ष म्हणून भारताचे सरन्यायाधीश एम. सी. छागला यांना बोलावण्याचे ठरले.



एन ४०८८—७अ

यानिमित्ताने रघुनाथरावांच्या कार्याचा गौरव करणारे लेख वृत्तपत्रांतून व नियतकालिकांमधून आले. त्यापैकी श्री. के. क्षीरसागर, श्री. शं. नवरे यांनी अनुक्रमे 'लोकसत्ता' व 'मौज' मध्ये लिहिले होते. श्री. के. क्षीरसागर हे रघुनाथरावांचे, ते कर्नाटक कॉलेज, धारवाड येथे गणिताचे प्राध्यापक होते तेव्हा विद्यार्थी होते. पुढे दोघेही आपापल्या क्षेत्रात कर्तृत्वाने मोठे झाले तरी त्यांच्या परस्पर गाठीभेटी क्वचितच होत. दोघांमध्येही वैचारिक मतभेद पुष्कळ होते. 'हरिभाऊ आपटे हे मराठीतील पहिले आणि शेवटचे कांदबरीकार' असा विचार श्री. के. क्षीरसागर यांनी हरिभाऊंच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने दिलेल्या भाषणात मांडला. त्यावर जुलै, १९४७ च्या 'समाजस्वास्थ्य' मध्ये 'शारदेचे पत्र' मध्ये शारदा (म्हणजे र. धों. कर्वे) लिहिते, 'तुमच्या पुण्यात कोणी प्रो. क्षीरसागर आहेत ना! त्यांनी तर असा नियम केलेला दिसतो. क्षीरसागर आपल्याला काय समजतात? हे कोठल्या कॉलेजात आहेत मला माहीत नाही. पण त्या विद्यार्थ्यांची मला दया येते.' आता रघुनाथरावांच्या संदर्भात क्षीरसागर अन्यत्र काय लिहितात ते पाहा : 'पुरोगामी म्हणवणारे लोक शहाणे असोत की मूर्ख असोत, सरळ लढण्याचा प्रांजळपणा अन् धाडस त्यांच्याजवळ असेल अशी प्रथम माझी कल्पना होती. कारण कॉलेजमधील माझे (गणित विषयाचे) गुरू, र. धों. कर्वे यांची काही मते चुकीची असली, तरी Straight Fight ला ते कधी कचरत नसत.' 'वाङ्मयीन लेखसंग्रह' मध्ये श्रीकेक्षींनी रघुनाथरावांविषयी आणखीही लिहिले आहे. त्यांच्या सत्तरीच्या निमित्ताने क्षीरसागर लिहितात, 'मला प्रो. कर्वे यांच्याविषयी जो आदर वाटतो, तो त्यांच्या विचारसरणीमुळे नसून पुष्कळ अंशी आक्षेपार्ह अशा त्या विचारसरणीसंबंधी त्यांनी जी निष्ठा आणि कर्तव्यबुद्धी जन्मभर प्रत्यक्ष कृतीने दाखविली आहे, तिजमुळे वाटतो. म्हणजेच मला प्रो. कर्वे ही व्यक्ती आदरणीय वाटते ; पण त्या व्यक्तीचे तत्त्वज्ञान आक्षेपार्ह वाटते.... त्यांच्या मतांचा निष्कर्ष सांगावयाचा झाला तर ते संभोगस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आहेत.... दोन स्त्री-पुरुषांची एकमेकांच्या समागमाचे सुख घेण्याची इच्छा असल्यास, धर्म अगर लोकलज्जा यांची त्यांना आडकाठी असता कामा नये, असे त्यांचे मत आहे. लोकांची तर आडकाठी नसावीच ; पण पतीची अगर पत्नीचीही आपल्या सोबत्याला अशा स्वैर समागमाचेबाबत पूर्ण मुभा असावी, असेच त्यांचे तत्त्व आहे.'

क्षीरसागरांच्या आक्षेपांचा परामर्श रघुनाथरावांनी 'आमची सत्तरी' या लेखात घेतला असून त्यांची भूमिका पुढीलप्रमाणे आहे : 'क्षीरसागर म्हणतात की, हे मत कितीही मोठ्या लोकांनी मांडले असले, तरी ते ग्राह्य ठरत नाही, कारण विवाहित जोडप्यापैकी एकाने व्यभिचार केल्यास दुसऱ्याला मत्सर वाटणे साहजिक आहे.... क्षीरसागरांनी असा एक मुद्दा काढला आहे की पुरुष वेश्येकडे गेल्यास केवळ तिच्याशी होणाऱ्या शरीरसंबंधाविषयीच पत्नीची हरकत असते असे नसून, एका हीन वृत्तीच्या व्यक्तीशी निकट संबंध येतो याला तिची मुख्यत: हरकत असते. (उलट) वेश्यांना हीन मानणे हा अन्याय आहे. बाकीच्या समाजात जशा सर्व दर्जाच्या स्त्रिया असतात, तशाच वेश्यांतही असतात. काही अतिशय उच्च दर्जाच्या असतात, काही कमी दर्जाच्या असतात. त्यांना सरसकट हीन म्हणणे म्हणजे आपल्याला तारतम्य नाही, असे कबूल करण्यासारखे आहे.'

श्री. शं. नवरे यांनी लिहिले : 'न्यायालयाच्या शिक्षेपेक्षा अधिक जाचक अशी समाजाच्या अवहेलनेची शिक्षा वर्षानुवर्षे आप्पासाहेबांनी आनंदाने सोसली, त्यासाठी भोगावे लागणारे कष्ट सोसले, इतकेच नव्हे तर मोठ्या पगाराच्या सरकारी नोकरीवर पाणी सोडून निष्कांचनत्व पत्करले. आपल्या तत्त्वासाठी एवढा त्याग करणारी माणसे विरळा ! माणसाची किंमत त्याच्या विशिष्ट मतावर नसते. त्या मतासाठी तो जास्तीतजास्त त्याग करतो, मानसिक व शारीरिक कष्ट सोसतो, त्यावर त्याची खरी किंमत अवलंबून असते. आप्पासाहेबांनी ही किंमत सिद्ध करून दाखवली, म्हणूनच लोक ७०व्या वाढदिवशी त्यांचा गौरव करण्यास उद्युक्त झाले. आप्पासाहेबांच्या कार्याबद्दल जनतेकडून त्यांना मिळालेली ही पावतीच होय.' एवढे स्तुतिपर लेखन केल्यानंतर 'आप्पासाहेबांची मते लोकविलक्षण आणि परंपरागत कल्पनांना जबरदस्त धक्का देणारी आहेत. संभोगस्वातंत्र्याचा पुरस्कार कोणाला आवडेल? स्त्री-पुरुष समागमासाठी प्रेमाची गरज नाही किंवा एकपत्नीकत्व खूळ आहे, अशा प्रचाराने मनुष्य आणि जनावर यांत भेद काय उरला? वेश्याव्यवसायाचे नैतिकदृष्ट्या समर्थन केलेले कोणाला आवडेल? प्रत्येकाला मतस्वातंत्र्य असले पाहिजे, हे कबूल ; पण वागणुकीचे स्वातंत्र्य दिल्यास अनर्थ ओढवणार नाही काय ?' याचेही उत्तर रघुनाथरावांनी असे दिले आहे : 'श्री. नवऱ्यांनीही असे म्हटले आहे, की 'वेश्यावृत्तीचे समर्थन केलेले कोणाला आवडेल ?' ते कोणाला आवडो न आवडो, परंतु तिची समाजाला गरज आहे, हे

कोणाही समंजस माणसाला कबूल करावे लागेल. अर्थात वेश्यावृत्ती ही अत्यंत उच्च दर्जाची संस्था आहे व ती कधीही नाहीशी होता नये, असे आमचे म्हणणे नाही. तेव्हा वेश्यावृत्ती आदर्श समजत नाही, पण आम्ही त्यांना हीन मात्र मानीत नाही.'

श्री. के. क्षीरसागर आणि श्री. शं. नवरे यांच्या लेखनाचा त्यांनी उल्लेख केला असला आणि त्यातील आक्षेपांचा परामर्श घेतला असला तरी ह. रा. महाजनी यांनी 'लोकसत्ते'त तर अग्रलेख लिहिला होता. त्याचबरोबरच 'साप्ताहिक नवयुग'ने खास लेखही प्रसिद्ध केला होता या आणि इतर लेखांचा उल्लेख ते करीत नाहीत. ह. रा. महाजनी यांनी त्यांचे अभिनंदन करताना अग्रलेखात म्हटले होते की, 'श्री. र. धों. कर्वे यांनी आपले जीवित एका विशिष्ट कार्याला वाहून घेतल्याकारणाने महाराष्ट्रात अशा ध्येयपरायण व्यक्तींच्या वाट्याला जी हलाखीची स्थिती येते, तीच त्यांच्या वाट्याला आली यात नवल नाही.... कर्वे यांनी समाजस्वास्थ्यासारखे ध्येय स्वीकारले. यामध्ये त्यांची धडाडी दिसून येत असली तरी त्याबरोबरच समाजाची अप्रीतीही त्यांनी आपणावर ओढवून घेतली होती. अशा समाजरोषास पात्र झालेल्या कार्यात श्री. कर्वे यांनी अतिशय चिकाटीने काम केले.'

'स्त्री-पुरुषांच्या लैंगिक संबंधाबद्दल मानवी मनात असलेले विलक्षण कुतूहल व संततिनियमन या विषयासंबंधी बेधडकपणे असलेली आपली मते यातील संभावितपणा काहीसा विचित्र खरा. कर्वे रूढींनी घालून दिलेल्या नियमांचे आज्ञाधारकपणे पालन करीत नाहीत आणि असेल ती रूढी मोडलीच पाहिजे असे हट्टाने सांगणारे ते आततायी नाहीत. त्यांची मते स्वैराचाराचे समर्थन करणारी असतात..... तरीही स्वैराचारी मार्ग हे कर्वे तत्त्वज्ञान नव्हे किंवा लैंगिक संबंधापलीकडे इतर काहीही नाही असे मानणारे ते लिंगपिसाटही नव्हेत. ते अतिशय तर्ककठोर आहेत हेच त्यांच्या स्वभावातले नि तत्त्वज्ञानातले वैशिष्ट्य होय. ही कठोरता भावनातिरेकातून निर्माण झालेली नाही. अभ्यास आणि खोल विचार यांच्या बळकट मुळावर ती खंबीरपणे उभी आहे.' असे 'नवयुग' मध्ये रघुनाथरावांच्या एका जवळच्या व्यक्तीने लिहिलेले आहे. त्यांच्या सत्तरीच्या निमित्ताने जे लेख प्रसिद्ध झाले त्यापैकी काहींमधून रघुनाथरावांची स्वभाव व विचारवैशिष्ट्ये व्यक्त झालीत त्याची ही नोंद.

**'समाजस्वास्थ्य'ला पंचवीस वर्षे पूर्ण : नागरिकांकडून थैली :**

रघुनाथरावांच्या सत्तरीच्या निमित्ताने स्थापलेल्या समितीने त्यांना थैली देण्याची व त्याकरिता जनतेने उत्स्फूर्तपणे व सढळ हाताने देणगी देण्याचे आवाहन वृत्तपत्रांमधून जाहिराती देऊन केले होते. परंतु सत्काराच्या कार्यक्रमाच्या दिवसापर्यंत पुरेशी रक्कम गोळा न झाल्याने ती त्या समारंभात देण्याऐवजी पुढे देण्याचे ठरविले गेले. त्याप्रमाणे १५ जुलै १९६२ या दिवशी 'समाजस्वास्थ्य' मासिकाने पंचवीस वर्षे पूर्ण केली. त्यानिमित्ताने त्यांचा सत्कार त्याच लॅव्हॅटक्सी लॉजच्या हॉलमध्ये श्री. स. का. पाटील हे तेव्हा खासदार होते - त्यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. तेव्हा समितीने गोळा झालेले ५,६०० रुपये अध्यक्षांच्या हस्ते त्यांना सुपूर्द करण्यात आले. या संदर्भात त्यांनी लिहिले की, 'दोन्ही प्रसंगी कित्येक सन्मान्य वक्त्यांनी आमच्या तीस वर्षांच्या कामगिरीबद्दल स्तुतीपर भाषणे केली, त्याबद्दल आम्ही त्यांचे जाहीर आभार मानतो. समितीच्या सभासदांनी व विशेषतः कार्यवाह अनंतराव गद्रे व शि. न. कोल्हटकर यांनी या बाबतीत जे परिश्रम केले, त्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानणे जरूर आहे.'

'समाजस्वास्थ्य'च्या सत्ताविसाव्या वर्षात पदार्पण करताना त्यांनी तोपर्यंत केलेल्या कामाचा असा आढावा घेतला आहे–

"या पंचवीस वर्षांत आम्ही काय केले ? या मासिकाच्या नावावरून हे समजण्यासारखे आहे की, लैंगिक विषयांना वाहून घेण्याचा आमचा उद्देशच नव्हता. तरीदेखील पुष्कळ लोकांचा तसा गैरसमज आहे आणि आम्ही इतर विषयांवर का लिहितो अशी पृच्छा आम्हांस अनेकांनी केली आहे. आमचा उद्देश प्रथमपासूनच असा होता की, आगरकरांनी ज्या बुद्धिवादाचा पुरस्कार केला, त्या बुद्धिवादाचा प्रकाश शक्य तितक्या विषयांवर पाडून त्याचा प्रसार करावा अर्थात बुद्धिवाद आगरकरांनी आपल्या डोक्यांतून काढलेला नाही. त्याचा त्यांनी पुरस्कार केला इतकेच. परंतु कित्येक बुद्धिवादी म्हणवणारे लोक असे समजतात की, आगरकर म्हणजे बुद्धिवादाची कमाल मर्यादा झाली, त्यांच्यापुढे जाणे शक्य नाही. आमच्या मते ते शक्य आहे आणि आम्ही तसा प्रयत्न केला आहे."

वर उल्लेखलेला थैलीदानाचा कार्यक्रम जेव्हा झाला तेव्हा 'समाजस्वास्थ्य' मासिकाच्या सर्व अंकाचे छोटेसे प्रदर्शन मांडण्यात आले होते. त्याप्रसंगी डॉ. र. पु. परांजपे, र. धों. कर्वे यांचे वडील अण्णासाहेब कर्वे, समारंभाचे अध्यक्ष, महापौर स. का. पाटील यांची भाषणे

झाली. डॉ. र. पु. परांजपे आपल्या भाषणात म्हणाले, "देशाला भेडसावणाऱ्या अनेक प्रश्नांमध्ये लोकसंख्येचा प्रश्न फार मोठा आहे; परंतु आपले पुढारी या प्रश्नाकडे अद्याप तर बुजरेपणाने पाहतात. अन्नासाठी आपणांस सर्व राष्ट्रांकडे आज पाहावे लागते. लोकसंख्या अशीच सतत वाढत राहिली तर आपण स्वयंपूर्ण कधीच होऊ शकणार नाही व आमची प्रगतीही कधी होऊ शकणार नाही. प्रो. कर्वे यांनी ४० वर्षांपूर्वी दूरदृष्टीने ही गोष्ट ओळखून संततिनियमन व कुटुंबनियोजन यांचा जोरदार आणि निर्भीडपणे पुरस्कार केला. प्रो. कर्वे यांना आयुरारोग्य लाभो एवढीच मी प्रार्थना करतो."

या प्रसंगी अण्णा कर्वे म्हणाले, 'समाजाला अप्रिय वाटणारे प्रश्न मी हाताळले व ते सोडवण्याचा प्रयत्न केला. त्यात मला यशही लाभले. परंतु माझ्या चिरंजीवाने हाती घेतलेला प्रश्न अप्रिय तर होताच पण प्रक्षोभकही होता. समाजाचा रोष ओढवून घेण्याचे कार्य त्यांना करायचे होते. तेव्हा या बाबतीत त्यांनी आपल्या पित्याचाही पराभव केला आहे. मला ही घटना अभिमानास्पद वाटते.'

श्री. कर्वे यांनी उत्तरादाखल केलेल्या भाषणात सांगितले, 'जनतेला विचार करावयास लावणे हे माझे ध्येय होते. अलीकडे जनता थोडीफार विचार करू लागली आहे. समाजातही बरेच परिवर्तन झाले आहे. चर्चा करावयासही तयार नसलेल्या कॉर्पोरेशनने आज संततिनियमन केंद्रे उघडली पण त्यावर नावाचे बोर्डही लावले नाहीत.' त्यावेळी एका मराठी वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या प्रा. ना. सी. फडके यांच्या लेखाकडे त्यांनी श्रोत्यांचे लक्ष वेधले. या लेखात प्रा. फडके यांनी प्रा. कर्वे यांच्या संततिनियमनाबाबतच्या कार्याचा गौरव केला होता ; परंतु या चळवळीचे प्रवर्तक प्रा. कर्वे नाहीत असे सूचित केले होते. प्रा. कर्वे यांनी आपल्या भाषणात आपणच या चळवळीचे प्रवर्तक असल्याची माहिती दिली व प्रा. फडके यांचेजवळ या बाबतीत काही पुरावा असल्यास जाहीर करावा, असे आव्हान दिले.

या कार्यक्रमाला अध्यक्ष असलेल्या स. का. पाटील यांनी या प्रसंगी पुढील विचार व्यक्त केले : 'एके काळी कॉर्पोरेशनमध्ये या प्रश्नावर चर्चाही होऊ शकत नव्हती. जनतेला अज्ञानात ठेवण्याचा एक पद्धतशीर प्रयत्न त्या काळी होत होता. प्रा. कर्वे यांचे मत पटो वा न पटो या प्रश्नावर जनतेला अज्ञानात ठेवणे योग्य नव्हते. जनतेला ज्ञानाचा एक दरवाजा खुला करून दिल्याचे श्रेय प्रा. कर्वे यांना आहे. ४० वर्षे या प्रश्नासाठी झटत, आज ते ७० वर्षांचे असतानाही तरुणाच्या जोशाने कार्य करीत आहेत. अद्यापही समाजाला त्यांची जरुरी

आहे, आपण जर या विषयाचे ज्ञान तरुणांना दिले तरच ते मिळणारच. खरे पाहिले तर प्रत्येकाला या प्रश्नाची माहिती असणे जरूर आहे.'

याचा अर्थ असा की, १९५२ सालाच्या प्रारंभापासूनच रघुनाथरावांच्या कार्याची थोरवी आणि त्यांच्या कार्यावरील असीम निष्ठा मुंबईत लोकांना पटू लागली होती. एके काळी समाजातील लोक 'तो वेडा आहे' असे म्हणायचे तेच लोक आता त्यांच्या कार्याचे महत्त्व ओळखून त्यांचा मानसन्मान करू लागले होते. असे असले तरी त्यांची सारीच मते मान्य होत होती असे मात्र नाही. त्यांच्यावर सत्तरीच्या निमिताने जे लेख लिहून आले त्यामध्ये त्यांच्या निष्ठेला व कार्याला मुक्तकंठाने दाद देणारी मंडळी त्या समागमस्वातंत्र्याच्या संदर्भात आपला स्पष्ट विरोध नोंदवीत होती. ना. सी. फडके यांनी त्यांच्या कार्याची महती गायली परंतु संततिनियमानाच्या संदर्भात कर्व्यांच्या आधी आपण पुस्तक लिहिल्याने वास्तविक पाहता त्याच्या प्रवर्तकत्वाचा मान कर्व्यांकडे न जाता आपल्याकडे यायला हवा असे ' नवभारत 'मधल्या लेखात लिहिल्याने रघुनाथरावांचे पित्त खवळले आणि त्यांनी पुढील शब्दांमध्ये ते निस्संदिग्धपणे खोडून काढले.

या कार्यक्रमाला गालबोट म्हणून प्रा. ना. सी. फडके यांनी नवभारतमध्ये (१९ जुलैच्या अंकात) आम्हाला एकट्यालाच संततिनियमनाचे आद्य प्रवर्तक असल्याचे श्रेय देणे चुकीचे आहे असे लिहिले आहे त्याही लेखात आमची बरीच स्तुती आहे, तीबद्दल प्रा. फडक्यांचे आभार मानले पाहिजेत, परंतु त्यांनी केलेले विधान मात्र खरे नाही हे नमूद करणे जरूर आहे. त्याला त्यांनी कोणताच पुरावा दिलेला नाही. दुसरा कोणी आद्य प्रवर्तक त्यांच्या मताने असेल, तर तसे त्यांनी सांगायला व दाखवायला पाहिजे होते. त्यांचे स्वतःचे या विषयावरील पुस्तक १९२५ साली प्रसिद्ध झाले. त्या वेळी आमच्या मराठी पुस्तकाच्या दोन आवृत्त्या निघालेल्या होत्या व शिवाय आम्ही १९२१ सालीच एक इंग्रजी पुस्तक याच विषयावर प्रसिद्ध केले होते तसेच संततिनियमनाचे एक केंद्र स्थापन करून गरजूंना प्रत्यक्ष साधनांचा उपयोग कसा करावा, हे शिकवण्यास आरंभ केला होता. त्यापूर्वी यासंबधी कोणीही लिहिले नव्हते आणि ते जाहीरपणे प्रत्यक्ष कोणीही शिकवीत नव्हते. अशा स्थितीत आम्हाला आद्य प्रवर्तक म्हणणे चूक आहे असे ते कोणत्या आधारावर म्हणतात, असा जाहीर सवाल आम्हाला सभेत करावा लागला...'

**अखेर :**

१९७२ सालापासून रघुनाथरावांना सन्मानाचे दिवस आले. एका बाजूने रक्तदाबाच्या विकाराने त्यांची प्रकृती ढासळत गेली. शरीराला स्थूलता आली. तरी बाहेरील वातावरण उत्साहाचे राहिल्याने त्यांच्या मनाला उभारी येत असे. समाजमान्यता आणि राजमान्यता मिळू लागली होती. समाजाचा पूर्वीचा कुत्सितपणाचा सूर आता क्षीण होऊ लागला होता. मुंबई महानगरपालिकेनेही शहरात ७ ठिकाणी संततिनियमन केंद्रे काढली होती. पंडित नेहरू तर प्रारंभी प्रारंभी 'हिंदुस्थानची लोकसंख्या तशी काही फार नाही आणि ज्या ठिकाणी हल्ली वस्तीच नाही, त्यांचा विचार केल्यास ती कमीच म्हणावी लागेल' असे विधान करीत. जून १९४८ मध्ये उटकमंड येथे त्यांनी हे भाषण केले होते. (समाजस्वास्थ्य, जुलै १९४८) उलट 'पंडित नेहरूंनी आता बऱ्याच बाबतीत आपला सूर बदलेला दिसतो. लोकसंख्या फाजील वाढलेली आहे हेही आता त्यांना कळू लागले आहे, आणि आता ते शिरगणतीच्या आकड्यांतून सिद्धच झाले आहे. नगरसमित्यांनी संततिनियमन केंद्र स्थापन करणे जरूर आहे, असेही ते नुकतेच बोलून गेले. तेव्हा गांधी तंद्रीतून ते आता जागे झालेले दिसतात' असेही रघुनाथरावांनी लिहिले आहे. (समाजस्वास्थ्य, मे १९५१) 'पहिली संततिनियमन परिषद' मुंबईत भरली होती तेव्हा रघुनाथरावांना तिथे पाचारणही केले गेले होते. त्यांच्या सत्तरीच्या कार्यक्रमाला भारताचे सरन्यायाधीश एम. सी. छगला तर 'समाजस्वास्थ्य'ला २५ वर्षे पूर्ण झाली त्या कार्यक्रमाला स. का. पाटील उपस्थित राहिले होते. समाजातही त्यांच्या व्यक्तित्वाविषयी, आचार आणि विचारांविषयी लोकांमध्ये कुतूहल निर्माण झाले होते. काही संस्था त्यांना व्याख्यानांनाही निमंत्रित करीत होत्या. याचाच एक भाग म्हणजे गिरगावातील निकदवारी लेनमध्ये असलेल्या सारस्वत ब्राह्मण समाजाच्या इमारतीतील श्रीसरस्वती महोत्सवात शनिवार, दिनांक १० ऑक्टोबर १९५३ रोजी संध्याकाळी प्रश्नोत्तरांचा (ब्रेन्स ट्रस्ट) कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तेव्हा रघुनाथरावांना आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमप्रसंगी संयोजकांचे प्रतिनिधी व उपस्थित श्रोते (त्यांना विविध विषयांवर अर्थात ते रघुनाथरावांचे जीवन शिक्षण, संततिनियमन, गुप्तरोग, स्त्री-पुरुष संबंध यासंबंधीची त्यांची मते जाणून घेण्यासाठी) प्रश्न विचारीत होते व त्यांची उत्तरे ते देत होते.

असा तो कार्यक्रम होता. 'तेथे उत्तरे देतानाच त्यांचे पाय लटपटू लागल्यासारखे वाटले. शेवटची काही उत्तरे त्यांनी बसूनच दिली. कार्यक्रमानंतर चहा घेण्यापूर्वी त्यांना ओकारी आली. डॉक्टरांनी तपासल्यावर प्रकृती चिंताजनक असल्याचे आढळल्यावरून त्यांना ॲम्ब्युलन्समधून घरी पोहचवण्यात आले. रात्री डॉ. भालेराव यांनी तपासल्यावर रक्तदाब २६० पर्यंत गेल्याचे आढळून आल्यावरून त्यांनी ताबडतोब कर्वे यांना भाटिया जनरल हॉस्पिटलमध्ये पोहचविले. तेथे डॉ. गोखले, डॉ. पै, डॉ. साठे वगैरेंनी अतोनात परिश्रम घेऊन औषधोपचार केले ; परंतु तिथे जाण्यापूर्वी जी बेशुद्धावस्था आली ती कायमचीच ठरली व बुधवार, दिनांक १४ रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास श्री. कर्वे यांचे प्राणोत्क्रमण झाले. गेली अनेक वर्षे श्री. रघुनाथरावांना रक्तदाबाचा विकार होताच. मेंदूत रक्तस्राव होऊन अखेर त्यातच त्यांचा अंत झाला'. असे त्यांचे बंधू भास्करराव यांनी लिहिले आहे.

रघुनाथरावांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केल्यावर डॉ. भालेराव व दि. वि अमोणकर यांनी त्यांच्या नातेवाईकांना बोलावून घेतले. त्याप्रमाणे दिनकरराव (आणि इरावतीबाई) मुंबईत आले. त्यांच्या आजारासंबंधी माहिती पुण्याला कळविण्यात येत होती कारण तेव्हा त्यांचे वडील अण्णा स्वतः ९५/९६ वर्षांचे वृद्ध होते. रघुनाथरावांच्या मृत्यूनंतर दिनकररावांनी ही वार्ता फोनवरून भास्कररावांना सांगितली आणि भास्करावांनी ती अण्णांच्या कानावर घातली.

पुण्याच्या 'केसरी'ने ही बातमी पुढीलप्रमाणे दिली : 'मुंबईच्या 'समाजस्वास्थ्य'चे संपादक प्रा. रघुनाथ धोंडो कर्वे हे मंगळवार रोजी मुंबई येथे कालवश झाले. त्यांच्या निधनाने वृद्धापकाळात श्री. अण्णासाहेब कर्वे यांना मोठाच धक्का बसला आहे. श्री. रघुनाथरावांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.'.

'मुंबई मराठी साहित्यसंघा'चे रघुनाथराव कित्येक वर्षे पदाधिकारी होते. त्यामुळे त्यांच्या निधनानंतर ५ दिवसांनी म्हणजे १९ ऑक्टोबर रोजी संघाने शोकसभा घेतली. त्या संस्थेच्या अठराव्या वर्षाच्या अहवालात पुढील माहिती आढळते : 'कै. र. धों. कर्वे उपाध्यक्ष, आजीव सभासद व एक समाजसेवक, ' समाजस्वास्थ्य ' मासिकाचे संपादक प्रा. र. धों. कर्वे हे दिनांक १४ ऑक्टोबर १९५३ रोजी दिवंगत झाले, हे नमूद करण्यास संस्थेस अत्यंत दुःख होत आहे. त्यांच्या निधनानिमित्त संघ व मुंबई मराठी पत्रकारसंघ यांच्या विद्यमाने व

इतर साहित्यिक संस्थाच्या सहकार्याने एक शोकसभा दिनांक १९ ऑक्टोबर १९५३ रोजी संघ मंदिर, केळेवाडी येथे घेण्यात आली होती. अध्यक्षस्थानी संस्थेचे दुसरे एक उपाध्यक्ष प्रि. का. रा. गुंजीकर हे होते. सभेत अनेक वक्त्यांची कै. र. धों. कर्वे यांच्या गुणवर्णनपर भाषणे झाली व दुखवट्याचा ठराव सभेत करण्यात आला.'

## वाचकांच्या दृष्टीतून रघुनाथराव :

'समाजस्वास्थ्य' मासिकातील पानांमधून रघुनाथरावांसंबंधी अनुकूल, प्रतिकूल मते वाचायला मिळतात, त्याच्या व्यक्तित्वाचे आकलन करून घेण्यास ती साहाय्यकर ठरतात, प्रारंभी मडगाव, गोवा येथे प्रा. बा. वा. सावर्डेकर यांनी ८ एप्रिल १९३२ रोजी 'संततिनियमन' या विषयावर एक व्याख्यान दिले. सावर्डेकर पुरोगामी विचाराचे असल्याने या विषयावर व्याख्यान देताना तेव्हा त्यांनी म्हटले, 'आज उद्या तरी ही लाट आपल्या समाजावर आदळणारच आहे. कोण जाणे प्रो. र. धों. कर्वे यांच्या 'समाजस्वास्थ्य' या मासिकाद्वारे व राइट एजन्सीच्या विद्यमाने ती महाराष्ट्रात पसरल्यानंतर आजला येथेही पोचली असेल, अर्थात तिजकडे उदासीनतेने पाहाणे आपल्याला यापुढे शक्य नाही व इष्ट तर मुळीच नाही. 'सुस्वागतम्' म्हणून तिचे आगमन इच्छिणे....' (स. स्वा., फे. १९३३ २०७)

रघुनाथरावांच्या विचारांना केवळ सर्वसामान्यांकडून, सनातन्यांकडून विरोध होत असे, असे नव्हे, तर सरंजाम वतनदारांकडूनही तो होत असे. 'मालव साहित्य' च्या द. ग. काळे यांनी सन १९३३ च्या सुमारास 'इंदूर विशेषांक' काढला होता. त्यासाठी त्यांनी रघुनाथरावांना पत्र पाठवून लेख व पुस्तके पाठवण्याची विनंती केली होती. त्यानंतरचे काळे यांचे हे पत्र बोलके आहे : 'दोन वर्षांपूर्वी मी इंदूर विशेषांक काढला. त्या अंकासाठी लेख पाठवण्यासाठी मी आपणास कळकळीने लिहिले व माझ्या विनंतीस मान देऊन आपण 'संततिनियमन' या विषयावर लेखही पाठवला. तसेच आपली सर्व पुस्तकेही त्यावेळी आपण (विनंतीप्रमाणे) पाठविली. अत्यंत खेदाची गोष्ट ही की, आपला लेख व आपल्या पुस्तकांवरील माझी परीक्षणे 'मालव साहित्या'त प्रसिद्ध करण्याबद्दल मला सरदार माधवराव किबे व सौ. कमलाबाई किबे यांच्याकडून त्या वेळी बंदी करण्यात आली होती. (स. स्वा., नोव्हेंबर १९३५ : पृ. १५२) डॉ. के. भा. लेले हे रघुनाथरावांचे दूरचे आप्त. त्यांनी 'समाजस्वास्थ्या'मध्ये भरपूर लेखन केले. त्यांनी रघुनाथरांवाच्या विरोधातही लिहिले आहे : 'समाजस्वास्थ्य'चा

पहिल्या वर्षाचा पहिला अंक हाती पडताच मी आपली मुद्दाम भेट घेऊन आपले अभिनंदन केले व तेव्हापासून प्रत्येक अंक बारकाईने पाहत आहे—त्यातच भर म्हणजे गेल्या ३५ वर्षांपासून आपल्या कुटुंबातील माणसांचा व माझा परिचय आहे आणि गेल्या १० वर्षांत तुमच्या व माझ्या ज्या अनेक भेटी झाल्या त्यावरून तुमची तत्त्वनिष्ठा, प्रेमळवृत्ती व शुद्ध अंत:करण पाहून मला तुमच्याबद्दल अत्यंत अभिमान वाटतो याशिवाय स्वास्थ्यात छापल्या जाणाऱ्या पत्रांना जी तुमची बिनचूक (?) व हजरजबाबी उत्तरे येतात, त्यावरून तुमची असामान्य बुद्धिमत्ताही व्यक्त होते. अशा मनुष्याचे मेंदूमधून कामविषयक मराठी मासिक चालवावे व या विषयाचे महत्त्व व माहिती लोकांना पटवून देऊन फाजील संततीला प्रतिबंधक उपायही सुचवावेत, इतकेच नव्हेतर बाहेरख्याली (गुप्तरोग)पासून बचावही कसा करून घ्यावा इत्यादी माहितीलाच वाहिलेले आपले मासिक असले तरी, त्याची अत्यंत जरुरी आहे असे मलाही वाटते. मुले चोरून तुमचे मासिक वाचतात व त्यामधील सत्यकथांच्या ज्ञानाने ती खरोखरच कुमार्गाला लागतात हे तुम्हाला पटू नये याचे आश्चर्य वाटते... ‘ स्वास्थ्याची आवश्यकता आहे, परंतु प्रस्तुतच्या पद्धतीची नाही हे माझे स्वत:चे व अनेक सभांतून व्यक्त होत असलेले लोकमत मी आपणाला कळविले आहे...? (जानेवारी, १९३७ : पृ. २००-२०१)

याच डॉ. लेल्यांनी ‘ समाजस्वास्थ्य ’मध्ये ‘ मुलांचे मानसिक दोष ’ नावाचा लेख लिहिला. त्यात त्यांनी बालपणात मुलांवर होणारे संस्कार वा आघात याचा त्यांच्या पुढील आयुष्यावर परिणाम होत असतो, असे सूत्र घेतले आहे. त्यातील सातव्या परिच्छेदात तर त्यांनी रघुनाथरावांचे उदाहरण घेतले आहे—

‘ परिस्थितीशी समरसतेचा अभाव ’ नाव लांबलचक झाले. तथापि त्याचा अर्थ स्पष्ट आहे. ही मुले बुद्धिमान असून व त्यांची स्मृतीसुद्धा चांगली असते. तथापि त्यांच्यातील मोठा दुर्गुण म्हणजे परिस्थिती ओळखून त्यांना आपली सोय करून घेता येत नाही. त्यामुळे त्यांचे चरित्र त्यांना स्वत:ला व समाजाला अपयशी ठरते. उदाहरणार्थ, माझ्या पाहण्यात एका गणिताच्या प्रोफेसराने सर्वस्वावर पाणी सोडून आपल्या स्वत:ला कामशास्त्राला वाहून घेतलेले आहे. एवढ्यानेच न थांबता फ्रान्समध्ये जसा व्यभिचार (इकडील लोकांच्या बुद्धीने) चालतो तसा हिंदुस्थानातही आजच्या परिस्थितीस लागू आहे असा त्याचा आग्रह आहे.... ’

डॉ. लेले आणि रघुनाथराव या दोहोंमधला वैचारिक वाद पुढील पत्रांमधूनही होत राहिला होता. ज. र. आजगावकर हे त्या काळातील एक लेखक. त्यांनी ‘ प्रतोद ’च्या दिवाळी अंकात एक लेख लिहिला होता त्यात ‘ नागड्या, उघड्या नवमतवादाचा पुरस्कार हा किर्लोस्कर आणि कर्वे यांचा बोलूनचालून पोटापाण्याचा प्रश्न असल्यामुळे त्यांच्यासंबंधात मी येथे काही लिहू इच्छित नाही.’ असे विधान केले होते. (पुढे रघुनाथरावांनी त्याचा (डिसेंबर, १९३६ : १८४) समाचार घेतला होता. पण तेव्हा लोक काय समजत, बोलत ते इथे व्यक्त झाले आहे. त्या काळात भारतीय राजकारणावर महात्मा गांधींचा विलक्षण प्रभाव होता आणि ‘ संततिनियमन ’, ‘ स्त्री-पुरुष संबंध ’ या बाबतीत त्यांचे विचार कुणालाही विक्षिप्त वाटावेत असे होते. लोकांनी आत्मसंयमन करावे असे ते सांगत. त्या शिकवणुकीचा सामान्यांवर परिणाम होणे शक्य नव्हते. कारण भारतात गरिबांची संख्या खूप आणि परस्परांच्या जवळ येण्यापेक्षा सहजसोपा दुसरा रंजनाचा मार्ग दिसत नव्हता. तेव्हा समागमातून सुख तर मिळावे पण त्यातून पुढे गर्भधारणा होऊ नये यासाठी शोध घ्यायला हवा असे रघुनाथरावांना वाटे. तेव्हा त्यांनी महात्माजींशी सुरुवातीलाच पत्रव्यवहार केला होता. पण गांधीजी आपल्या भूमिकेवर ठाम होते. त्यामुळे रघुनाथराव वेळोवेळी त्यांच्यावर टीका करीत. यासंदर्भात ‘ तुम्हास लोकांचे दोष लवकर दिसतात, तो गुण आहे का? ’ असा प्रश्नसुद्धा रानडे यांनी विचारला. त्याला त्यांनी असे उत्तर दिले की, ‘ मला दुसऱ्याचे दोष लवकर दिसतात ही गोष्ट खरी आहे, पण त्याला मी तरी काय करू ? तो माझा दोष असेल, पण तो स्वभाव आहे, तो मर्जीप्रमाणे बदलता येत नाही. ’ (जानेवारी, १९५० : पृ. १६३) असे त्यांनी उत्तर दिले होते.

रघुनाथरावांनी गांधीजींवर अशी वेळोवेळी टीका केलेली गांधीजींच्या अनुयायांना रुचत नसे. एकाने त्यांना लिहिले, गांधींच्या नावाने तुम्ही जन्मोजन्मी जरी शंख करीत राहिलात, तरी त्यांचे थोरपण यत्किंचितही कमी होत नाही. ‘ गांधींनी हिंदुस्थानचे नुकसान केले आहे ’ यासारखे बेअकलीपणाचे विधान करताना तुम्हांला लाज कशी वाटली नाही ? त्यावर त्यांनी लिहिले, ‘ मी गांधींसंबंधी एकवचन वापरलेले नाही. ’

## रघुनाथरावांच्या शब्दांत रघुनाथराव :

आता रघुनाथराव स्वतःबद्दल नि आपल्या मासिकाबद्दल काय म्हणतात ते पाहा : ‘ मी स्वतःला जबाबदार लेखक समजतो आणि बदफैलीपणाला प्रोत्साहन देणे महाअशक्य आहे. या ज्ञानाचा प्रसार करून अज्ञ देशबांधवांची सेवा करणे इतकाच माझा ही मासिके काढण्याचा उद्देश आहे.... माझ्या लेखांची एकंदर तऱ्हा अत्यंत भावनारहित, शास्त्रीय आणि जितक्यास तितकी असून त्यात विषयलोलुपतेला मुळीच जागा नसते.’ (मे १९३४ : पृ. २८३)

रघुनाथरावांना समजून घेणारे नाही म्हटले तरी काही लोक समाजात होतेच. मोठ्या पगाराच्या प्राध्यापकाच्या नोकऱ्या सोडून केवळ आपल्या कामावरील निष्ठेने त्यांनी आर्थिक ओढाताण स्वीकारली हे त्यांना दिसत होते ; त्यांचा स्वार्थत्याग अशा व्यक्तींना जाणवत असे. मात्र यासंबंधात त्यांचे विचार वेगळे होते. ‘ कोणत्याही स्वार्थत्यागाच्या मुळाशी हेच कारण असते. समाजस्वास्थाच्या संपादकाने स्वार्थत्याग केला असे काही लोक म्हणतात. वास्तविक यात कसला स्वार्थत्याग आला आहे ? त्यांच्या मनाला ज्यात अधिक समाधान वाटले ते त्यांनी केले त्यात विशेष काय केले ? ’ (शारदा, जुलै १९३३ : ३२७) समाजस्वास्थ्यातील लेख एकहाती असतात ; तेव्हा लेखकांकडून लेख मागवून ते तुम्ही का प्रसिद्ध करीत नाहीत असा प्रश्न वाचकाने विचारला असता त्यांनी लिहिले ; लेखकांना मोबदला मिळावा असे आमचे मत आहे व तो देण्याची ऐपत नसल्यामुळे आम्ही कोणाजवळही लेख मागत नाही. जे काही इतरांचे लेख येतात, ते त्यांनी पैशाची अपेक्षा न ठेवता पाठवलेले असतात. अर्थात ते बरे वाटल्यास आम्ही छापतो. लेखांकरता लाचारी पत्करण्याची आमची तयारी नाही. ’ (डिसेंबर, १९४२) स्वतःच्या लेखनाबद्दल आणि लेखनातील लढवय्या वृत्तीबद्दल त्यांना विलक्षण अभिमान होता. ‘ आम्हाला बुरख्याआड लपण्याचे काहीच कारण नाही. आम्हास जे लिहिणे असेल ते आम्ही स्पष्ट लिहितोच कोणाशीही दोन हात करण्याची आमची केव्हाही तयारी आहे.’ असे त्यांनी लिहिले आहे. त्यांच्या या स्वभावामुळेच त्यांनी डॉ. के. भा. लेले, प्रभाकर पाध्ये, ना. सी. फडके, श्री. के. क्षीरसागर, कॅप्टन पिल्ले, मालतीबाई तेंडुलकर, मनोरमाबाई खोबडे, डॉ. मनोरमाबाई थत्ते यांच्याशी ‘ दोन हात करायला ’ त्यांनी कमी केले नाही.

याशिवाय ते ज्या कुणावर टीका करीत तो किंवा ती व्यक्ती पदवीधर असो किंवा नसो ते कुणाचाही मुलाहिजा ठेवीत नसत. ‘ कोणाला पदव्या असोत किंवा नसोत, आम्हांला त्याची बिलकूल पर्वा नाही. कोणी आमचे मताचे गैरवाजवी लिहिले की, त्याच्या विरुद्ध आम्ही लिहिणार आणि त्याप्रमाणे बिनपदकांच्या स्त्री-पुरुषांच्या लिखाणावर आम्ही अनेक वेळा टीकाही केली आहे. ’ आणखी एके ठिकाणी ‘ जेथे आमची चूक असेल तेथे ती कबूल करण्यास आमची बिलकूल हरकत नसते. ’

आपल्या मासिकाचा उद्देश आणि आपल्या लेखनात टीकाविषय कोण होतात हे सांगताना त्यांनी लिहिले, ‘ नवमतप्रचार हा ज्या मासिकाचा एक उद्देश आहे त्यात पारंपरिक मतांवर प्रगती जुनाट बुरसटलेली असो किंवा स्वतःला नवमतवादी समजणाऱ्या प्रच्छन्न पारंपरिकांची असो, टीका येणे अपरिहार्य आहे.’

आपण अत्यंत सत्यनिष्ठ आहोत आणि सत्य सांगण्याकरिता आवश्यक असलेले धैर्य आपणांपाशी आहे याची त्यांना जाणीव होती. ‘ सत्य सांगण्यास धैर्य लागते, ते फार थोड्यांच्या अंगी असते आणि म्हणूनच स्वतः स्वैर वागणारे अनेक लोक लैंगिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्यास भितात ’ हेही त्यांनी नमूद केले आहे.

रघुनाथराव आयुष्यभर बुद्धिप्रामाण्यासाठी लेखन करीत राहिले. मात्र काही जण त्यांच्यावर टीका करीत. यासंदर्भात त्यांनी लिहिले. ‘ जी माझी मते आहेत ती मी लिहितो. मला बुद्धिमान म्हणा असा माझा आग्रह नाही. ते म्हटले किंवा न म्हटले तरी माझ्या बुद्धीत काही कमी-जास्त होत नाही. ती आहे तितकीच राहते तेव्हा मला त्याची पर्वा नाही, व्यवहारी होणे कोणाच्या हातचे नाही. कोणी व्यवहारी असतो, कोणी नसतो. हा स्वभावाचा दोष आहे, त्याला इलाज नाही.’

असे असले तरीही आपण बुद्धिप्रामाण्यवादी असण्याचा त्यांना अहंकार होता. या संदर्भात त्यांनी लिहिले, ‘ येथे घमेंडखोरपणाचा आरोप येण्याचा संभव स्पष्ट दिसूनदेखील हे स्पष्ट सांगणे जरूर आहे की आगरकरांच्या मागे मराठीत जर कोणी बुद्धिवादाचा पुरस्कार हिरिरीने केला असेल तर तो आम्हीच केला आहे दुसऱ्या कोणत्याही लेखकाने केलेला आमच्या आढळात नाही ’.[१]

हे विधान करीत असताना त्यांच्या मनातला आगकरकरांबद्दलचा आदरभाव व्यक्त झाला आहे असे दिसते ; तर 'समाजस्वास्थ्य' मासिकाला २५ वर्ष पूर्ण झाली तेव्हा त्यांनी लिहिले : 'आमचा उद्देश प्रथमपासूनच असा होता की, आगरकरांनी ज्या बुद्धिवादाचा पुरस्कार केला, त्या बुद्धिवादाचा प्रकाश शक्य तितक्या विषयांवर पाडून त्याचा प्रसार करावा अर्थात बुद्धिवाद आगरकरांनी आपल्या डोक्यांतून काढलेला नाही, त्याचा त्यांनी पुरस्कार केला इतकेच. परंतु कित्येक बुद्धिवादी म्हणवणारे लोक असे समजतात की आगरकर म्हणजे बुद्धिवादाची कमाल मर्यादा झाली, त्यांच्यापुढे जाणे शक्य नाही. आमचे मत ते शक्य आहे आणि आम्ही तसा प्रयत्न केला आहे.'

बुद्धिवादाचे बाबतीत आगरकरांचे शिष्यत्व त्यांनी पत्करले नव्हते आणि विविध विषयांना बुद्धिवादाच्या कसोट्यांवर घासून त्यांनी चिकित्सा केली व आपण आगरकरांच्या पुढचा टप्पा पार केला आहे असा सूक्ष्म आणि खरे तर स्पष्ट नि रास्त अभिमान त्यांनी व्यक्त केला आहे.

**रघुनाथरावांच्या स्वभावाचे आणखी काही विशेष :**

रघुनाथरावांच्या व्यक्तित्वाला अनेक पैलू होते. संततिनियमन, स्त्री-पुरुष संबंध व गुप्तरोग या विषयांचे तज्ज्ञ म्हणून त्यांच्याकडे पाहिले गेले आणि त्या क्षेत्रांमधील त्यांचे कार्य असाधारण असल्याने ते योग्यच होते. पण केवळ त्या दृष्टीने त्यांच्या समग्र व्यक्तित्वाचे वर्णन करणे हे अन्यायकारकच म्हणायला हवे. संगीतात व विशेषतः शास्त्रीय संगीतात त्यांची जाणकारी लक्षणीय होती. अब्दुल करीम खाँसाहेब त्यांच्या लग्नाला उपस्थित होते व भोजनप्रसंगी त्यांनी एक श्लोक म्हटल्याची (व त्यामुळे अण्णा कर्वे यांना ब्राह्मणवर्गाने दंड केल्याची) नोंद आहे. खाँसाहेब आपल्या मित्राच्या लग्नाला आले होते. म्हणजे त्या दोघांमधला समान दुवा संगीत होता. रघुनाथरावांना नाटक पाहण्याचा शौक होता व कॉलेजच्या वसतिगृहात असताना त्याचा आनंद त्यांनी लुटला. पण शास्त्रीय संगीतात त्यांनी इतकी गती केव्हा व कशी प्राप्त करून घेतली याविषयी काही लिहिल्याचे आढळले नाही. एक मात्र खरे की, त्या बाबतीत त्यांच्या जानकारीचे भान बुजुर्ग गायकांना असे आणि पेटीची साथ त्यांना (रघुनाथरावांना पेटी हे शुद्ध वाद्य नसल्याने) योग्य वाटत नसे व गायकांना ते तसे सांगतही व तेही त्यांचे ऐकत असत.



एन ४०८८—८

तो नाटक आणि रंगभूमीचा व विशेषतः संगीत रंगभूमीचा ऐन वैभवाचा काळ होता. ‘अरुण’ मध्ये ‘नाट्यकलेची चेष्टा’ नावाचा लेख त्यांनी लिहिला तेव्हा नाटकात स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनी कराव्यात’ हा विचार त्यांनी आग्रहाने मांडला होता. बालगंधर्वांवर म्हणूनच ते टीका करीत. व्ही. शांताराम यांच्या चित्रपटांवर त्यांनी लिहिलेली परीक्षणे वाचली तर चित्रपट माध्यमाची त्यांना किती सूक्ष्म समज होती ते कळते. ‘समाजस्वास्थ्य’ मासिकात पुस्तकांची परीक्षणे कशासाठी दिली जातात असा प्रश्न एका वाचकाने त्यांना विचारला होता. पण ते शेवटपर्यंत ती देत राहिले याचे कारण त्यांना स्वतःला या विषयातही रस असायचा. त्यांनी केलेली परीक्षणे अर्थपूर्ण व अल्पाक्षरी असायची. ‘स्मृतिचित्रे’ (लक्ष्मीबाई टिळक) चे त्यांनी केलेले परीक्षण पाहा—

‘लहानापासून थोरापर्यंत सर्वांना अत्यंत वाचनीय असे मराठीतील एक उत्कृष्ट पुस्तक, याचा तिसरा भाग प्रसिद्ध झाल्यानंतर थोड्याच दिवसात लेखिकेची जीवनयात्रा संपेल हे कोणाच्या स्वप्नातही नसेल. सुप्रसिद्ध ख्रिस्ती, मराठी लेखक कवी मरहूम नारायण वामन टिळक यांचे हे अत्यंत मनोरंजक चरित्र त्यांच्या पत्नीने लिहिले. चरित्रे बहुधा कंटाळवाणी असतात, परंतु हे तसे नाही. आणि मराठीत अशा प्रकारचे चरित्र दुसरे सापडणार नाही.’

रघुनाथरावांना खेळांमध्ये रस होता. बुद्धिबळात ते तरबेज होते आणि त्यांचे खेळ परदेशातील खेळाडूंशी पत्राद्वारे चालत, असे भास्करराव कर्वे यांनी लिहिले आहे. विलायतेहून परतत असताना आगबोटीत त्यांनी एका गोऱ्या माणसाला बुद्धिबळात पराभूत केले हा त्यांच्या दृष्टीने विलक्षण आनंदाचा क्षण होता असे त्यांनी मुलाखतकार ह. वि. देसाई यांना सांगितले. टेनिसही त्यांना प्रिय असे. एल्फिन्स्टन कॉलेजात गणिताच्या प्राध्यापकांचे साहाय्यक म्हणून त्यांची नेमणूक झाल्यावर ते कॉलेजच्या कोर्टवर टेनिस खेळत. तिथे त्यांची गाठ चिंतामणराव देशमुख यांच्याशी पडत असे. सन १९३० नंतर रक्तदाबाचा विकार बळावल्यावर त्यांनी स्वतःवर कच्चा आहार घेण्याचा प्रयोग केला व त्याचे परिणाम विशद करताना ते सलग तीन सिंगल्सचे सेट खेळू शकत, असे लिहिले आहे. नाटक, चित्रपट पाहणे, उपनगरीय साहित्य संमेलनास सपत्नीक जाणे, प्रो. पेल्तिए यांनी बोलावल्यावर त्यांच्या घरी जेवणासाठी जाणे अशा गोष्टींमध्ये ते आनंद घेत.

रक्तदाबाचा विकार वाढल्यावर त्यांना डॉक्टरांनी वारंवार मुंबईबाहेर जायचा सल्ला दिला होता. त्यासाठी ते मिळेल ती संधी घेत असत. साहित्यसंघाचे पदाधिकारी म्हणून ते सोलापूर, कोल्हापूर, नगर, नाशिक, रत्नागिरी या ठिकाणी गेले होते. त्या त्या वेळच्या कार्यक्रमांचे वृत्तान्तलेखन करणे हे तर काम त्यांनी केलेच पण त्याबरोबर प्रवासातील अनुभवांच्या नोंदी, त्या त्या ठिकाणी त्यांना भेटलेल्या परिचितांसंबंधीच्या आठवणी त्यांनी कसलेल्या ललित लेखकाच्या शैलीत लिहिल्या आहेत ; कशा ते पाहा : 'पहिली आखिल भारतीय संततिनियमन परिषद' मुंबई येथे झाली. त्यानिमित्ताने तेव्हाचे मुंबई नगरसमितीचे मेयर स. का. पाटील यांनी त्यांच्या सभागृहात निमंत्रितांना चहासाठी बोलावले. त्यासंबंधी लिहिताना 'नगरसमितीच्या दिवाणखान्यात प्रतिनिधींना मुंबईचे मेयर साहेब श्री. स. का. पाटील यांनी चहा दिला आणि जो दिवाणखाना आम्ही कधी पाहिलाही नव्हता, तेथे प्रथमच जाण्याचा प्रसंग यावेळी आला आणि मेयर साहेबांच्या टेबलापाशीच आम्हांला स्थान मिळाले होते.'

कोल्हापूरच्या मराठी पत्रकार परिषदेच्या वेळचा प्रसंग : 'परिषदेचा उद्घाटन समारंभ श्री. विजयमाला राणीसाहेब यांच्या हस्ते झाला. परंतु हा औपचारिक कार्यक्रम करून त्यांचे समाधान झाले नाही. शनिवारी रात्री पाहुण्यांची पंगत बसली असता त्या स्वयंस्फूर्तीने तेथे उपस्थित झाल्या होत्या व रविवारी सकाळी आपल्या राजवाड्यात सर्व प्रतिनिधींना चहाला बोलावून त्या वेळी त्यांनी जे अगत्य दाखवले त्याबद्दल त्यांनाही धन्यवाद देणे जरूर आहे......'

श्री. माधवराव बागल आमच्या वाचकांच्या परिचयाचेच आहेत. त्यांची व आमची प्रत्यक्ष ओळख याच प्रसंगी झाली, कारण ते या समारंभात उत्साहाने सामील होते...

मास्टर विनायक यांनी सर्वांना आपल्या चित्रमंदिरात बोलावून चित्र घेण्याच्या कृतीचा मासला दाखवला आणि जी होतकरू माणसे त्यांच्याबरोबर काम करून तयार होत आहेत, त्यांची ओळख करून दिली. पटतारका मीनाक्षी यांनी एक पद्य म्हणून दाखवले व दोन लहान मुलांनी नाच केला. श्री. भालजी पेंढारकर यांनीही काही निवडक मंडळीना बोलावून कर्णाच्या कथानकावरील आपल्या नवीन बोलपटातील काही भाग वाचून दाखवला...

रघुनाथरावांनी फ्रान्स, इराण असे परदेश प्रवास केले, मात्र प्रवासातल्या आठवणी काही शब्दबद्ध केल्या नाहीत. १९४० साली प्रा. ना. सी. फडके यांच्या अध्यक्षतेखाली रत्नागिरीला मराठी साहित्य संमेलन झाले. मामा वरेरकर त्याचे स्वागताध्यक्ष होते. मामांबरोबर रघुनाथरावही रत्नागिरीला गेले. तिथे त्यांची प्रकृती बिघडली. पण जलवाहतुकीतून त्यांनी केलेल्या प्रवासाचे त्यांनी केलेले हे चित्रदर्शी वर्णन : ‘ एल मदिना ’ ही बोट जरी मोठी आहे, तरी विशेष सोयींची नाही. या बोटीवर एकंदर चार वर्ग आहेत. पहिल्या व दुसऱ्या वर्गाच्या लोकांकरता विलायतच्या बोटीप्रमाणे निजण्याची खोली वगैरे सर्व सोयी चांगल्या असतात. याशिवाय वरचा आणि खालचा असे दोन वर्ग असतात, आणि यांपैकी वरच्या वर्गापुरतीच भाड्यात सवलत दिलेली होती व आमचेकरिता बोटीचा काही भाग राखूनही ठेवलेला होता, हा वरच्या मजल्यावर होता. आणि तेथून शौचकुपात जाणे असल्यास वाटेत पसरलेल्या शेपन्नास लोकांना न तुडवण्याचा प्रयत्न करीत बराच लांबचा प्रवास करत खालच्या मजल्यावर जावे लागत असे .... ’

नगरच्या साहित्यसंमेलनाच्या वेळी आगगाडीतील अनुभव त्यांनी कथन केले आहेत. ते वाचले म्हणजे याही प्रकारांमध्ये ते उत्तम लेखन करू शकले असते अशी खात्री पटते. रघुनाथराव प्रसंगी तुटक लिहीत, ते कुणाचा मुलाहिजा ठेवीत नसत. आपल्या वैयक्तिक भावना ते क्वचितच दाखवत पण एका गुणाचा निर्देश केल्याशिवाय त्यांच्या व्यक्तित्वाचे आकलन अपुरे ठरावे आणि तो म्हणजे वाचकांशी असलेली त्यांची Commitment. एखाद्या विषयासंबंधी, व्यक्ती वा स्वत:विषयी ते वाचकांना पारदर्शक पद्धतीने निवेदन करीत असत. किंबहुना त्यांच्याशी संवाद साधल्याखेरीज त्यांना राहवत नसे. रघुनाथरावांच्या व्यक्तित्वाचे समग्र आकलन व्हायला या गोष्टी निश्चित साह्यभूत ठरणाऱ्या आहेत.

**हेही रघुनाथराव लिहू जाणोत :**

रघुनाथराव स्त्री-पुरुष समानतेवर व स्वातंत्र्यावर विश्वास ठेवणारे होते. दोन स्त्री-पुरुषांची परस्परांना अनुकूलता असल्यास त्यांच्या संबंधाला मान्यता द्यायला हरकत नसावी अशा विचाराचे ते होते. मुले फक्त स्त्रियांनाच होतात आणि त्यांच्या शरीरावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो त्यामुळे आपल्याला किती मुले व्हावीत याचा निर्णय स्त्रियांनीच घ्यायला हवा आणि लग्नबंधन म्हणजे स्त्रियांच्या शरीराचा मालकी हक्क

तिच्या नवऱ्याकडे जातो हा विचार त्यांना बुरसटलेला वाटे. पुरुषांनी स्वतःवर संततिनियमनाची शस्त्रक्रिया करवून घ्यावी कारण ती कमी त्रासाची व कमी खर्चाची असते असे त्यांचे सुरुवातीला मत होते, पण अनुभवाने त्याचे परिणाम स्त्रियांवर होत असल्याने स्त्रियांनीच शस्त्रक्रिया करवून घ्यावी हे त्यांचे मत बनले. स्त्री-पुरुष हे समाजाचे स्वाभाविक समान घटक असल्याने केवळ स्त्रियांकरिता स्वतंत्र शाळा, कॉलेज, विद्यापीठे वा मासिके असावीत याला त्यांचा विरोध असायचा. सेंट झेव्हिअर्स कॉलेजमध्ये 'स्त्रियांची स्वतंत्र कॉलेज असावीत का?' या विषयावर चर्चा होऊन ती तशी नसावीत असा निर्णय झाल्याचा वृत्तान्त त्यांनी 'समाजस्वास्थ्य'च्या ऑक्टोबर, १९२८ च्या अंकात दिला आहे. स्त्रियांनी संपादित केलेली व केवळ स्त्रियांचे लेखन असलेली मासिके त्यांना अपुरी व एकांगी वाटत. 'युरोपात मुलींकरिता वेगळ्या खोल्याही नसतात आणि वर्गात बाकेही राखून ठेवलेली नसतात.' असे त्यांनी 'समाजस्वास्थ'च्या ऑगस्ट १९३२ : पृ. ५६ अंकात लिहिले आहे. 'सरस्वती' या मासिकाच्या नावे अंकावर प्रतिक्रिया देताना त्यांनी 'संपादिका सहशिक्षणाच्या विरुद्ध लिहीत असतात यावरून त्यांस सहशिक्षणाचा अनुभव नाही हे स्पष्ट दिसते'. वैयक्तिक स्वातंत्र्यावर प्रत्येक व्यक्तीचा अधिकार असतो आणि त्याचा संकोच दुसरी व्यक्ती करू शकत नाही. 'वैयक्तिक सुखावर मनुष्याचा निसर्गाविरुद्ध हक्क आहे, आणि जोपर्यंत ते समाजहिताच्या किंवा दुसऱ्याच्या आड येत नाही तोपर्यंत ते मिळविण्याचा प्रत्येकास हक्क आहे.' (नोव्हेंबर, १९३२) या विचाराचे ते होते. 'बायकांना जर पुरुषांची बरोबरी करायची असेल, तर त्याला एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे बायकांनी स्वतःच्या पायावर उभे राहायला शिकले पाहिजे. या मार्गात पुरुषांनी अडचणी उत्पन्न केल्या तर त्या हर प्रयत्नांनी हाणून पाडल्या पाहिजेत' असे (मार्च १९४३ : पृ. २२३) त्यांनी म्हटले आहे.

मुले केव्हा व्हावीत यासंबंधीची विचारणा एका वाचकाने केल्यावर उत्तरादाखल त्यांनी लिहिले : 'मुले लवकरच होऊन त्यांचे शिक्षण वगैरे आपल्यादेखत व्हावे हे इष्टच आहे, परंतु उशिरा झाली म्हणजे बापाची पैशाच्या दृष्टीने हलाखीची स्थिती असते असे कसे म्हणता येईल ? पगारदार लोकांना ४०-४५ वयात जास्तच पैसे मिळत असतात, आणि तेथपर्यंत मुले झाली नसल्यास हलाखीची परिस्थिती असल्याचे बिलकूल कारण नाही... तरीदेखील मुले लवकर व्हावी हेच बरे.



(शा.म.मु.) एन ४०८८—९ (११६५—२-२०१३)

महात्मा गांधी यांच्या 'आत्मसंयमना'च्या विचारांवर रघुनाथरावांनी सतत टीका केली. पंडित नेहरूवरही त्यांनी तशीच टीका केली आहे. त्यांनी रेशमी वस्त्रे सोडून खादी घालणे पसंत केले. त्यावर रेशमी कपडे जर सगळ्यांनी टाकून दिले तर या धंद्याचे काय होईल? आणि रेशमी कपडा काही मिरवण्याकरता असतो असे नाही. हलका असूनही कापसापेक्षा उबदार असा कपडा पाहिजे असेल तेथे त्याचा उपयोग आहे' असे त्यांनी लिहिले आहे. (डिसेंबर १९३७ : पृ. १८६) , भारतात अनेक प्रदेश असे आहेत की, जिथे लोकसंख्या पार विरळ आहे तेव्हा लोकसंख्येचा प्रश्न इथे नाही असा विचार त्यांनी उटकमंड येथील सभेत बोलून दाखविला त्यावरही रघुनाथराव तुटून पडले होते. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकसंख्येसंबंधी व विशेषतः संततिनियमनासंबंधी त्यांनी अनुकूल मत व्यक्त करताच त्यांचे सहकारी कसे बदलले हेदेखील त्यांनी लिहिले आहे. रघुनाथरावांवर अश्लीलतेचा दुसरा खटला झाला तेव्हा त्यांचे वकीलपत्र डॉ. आंबेडकर यांनी घेतले होते. पण फेब्रुवारी, १९५१ च्या अंकात त्यांनी त्यांच्याविषयी लिहिले : डॉ. आंबेडकरांनी सरकारवर टीका केल्याबद्दल त्यांच्यावर जो गहजब झाला आहे त्यात मला तर काही अर्थ दिसत नाही. तरीपण पूर्वीच्या सरकारच्या धोरणांची त्यांनी जी प्रशंसा केली आहे, तीतही तथ्य नाही. पूर्वीच्या सरकारचे धोरण समाजात शक्य तितकी फूट पाडण्याचे असल्यामुळे अस्पृश्यांना शक्य तितक्या सवलती देऊन त्यांना चढवून ठेवणे हे त्यांच्या धोरणाला पोषकच होते. जातिभेद मोडावा आणि मागासलेल्या जातींना शिक्षणाच्या बाबतीत सवलती देऊन बाकीच्या सर्व बाबतीत जादा हक्क द्यावे असेच आज कोणीही समंजस मनुष्य म्हणेल, पण आंबेडकरांना हे पसंत नाही. अस्पृश्यांना वेगळे काढण्याचेच त्यांचे धोरण दिसते. एरव्ही दिल्लीतील आंबेडकर भवनाच्या कोनशिलासमारंभाचे वेळी 'या भवनाच्या पूर्तीसाठी तुम्ही सवर्णांकडे भीक मागण्यासाठी जाऊ नका असे त्यांनी का सांगितले ?'

हिंदू-मुसलमानांच्या धर्मांधतेविषयी लिहिताना 'हिंदूंचे देव झोपाळू असतात, त्यांना घंटा वाजवून जागे केले तरच ते जागे होऊन आपली गाऱ्हाणे ऐकतील असा मुळी श्लोकच आहे..... हिंदू-मुसलमानांच्या दंग्यांच्या मुळाशी धर्मवेड आहे आणि ते थांबण्यास धर्म सोडून देणे हा एक उत्तम मार्ग आहे, हे लोकांना कधी कळेल ते कळो.' (जून १९३७ : पृ. ४११-४१२).

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाचे राष्ट्रगीत कोणते असावे याविषयी वातावरणात चर्चा असताना रवींद्रनाथ टागोर यांचे ' जन गण मन ' हे आणि बंकिमचंद्र यांचे ' वंदे मातरम् ' ही गीते चर्चेत होती. तेव्हा त्याविषयी प्रतिक्रिया व्यक्त करताना त्यांनी लिहिले, ' त्यातला ' भारतभाग्य विधाता ' हा शब्द एका व्हॉइसरॉयला उद्देशून लिहिला होता असे म्हणतात..... ते टागोरांनी लिहिले असले तरी ते राष्ट्रगीत होण्याच्या योग्यतेचे नाही.... धनुर्धारीच्या १७ जुलैच्या अंकात ' भारती ' नावाच्या कवीचे मूळ तमिळ भाषेचे लिहिलेले गीत हिंदी आणि इंग्रजी भाषांतरासह छापले आहे, ते सर्व दृष्टीनी या दोन्ही गीतांपेक्षा अधिक योग्य आहे. ' रघुनाथरावांचे हे मत अर्थातच बाद झाले.

१९२६ साली रघुनाथराव नैरोबीला डॉ. शंकरराव यांच्याकडे गेलेले असताना शंकरराव व सोराबजी यांनी मिळून त्यांच्यावर संततिनियमनाची शस्त्रक्रिया केली. यासंबंधी त्यांनी ' समाजस्वास्थ्य 'बाहेर लिहिलेल्या लेखात नोंद आढळते. अपवादाने ऑगस्ट १९३५, च्या अंकात ' या शस्त्रक्रियासंबंधी त्रोटक माहिती आम्ही आमच्या ' संततिनियमन ' पुस्तकाच्या प्रथमावृत्तीत १९२३ सालीच दिलेली होती आणि स्वतः करून घेतल्याबद्दलही मासिकात एकदा प्रसिद्ध केले होते ' असे सांगितले आहे. त्यांनी हे एकदाच सांगितले ते मार्च, १९३१ साली ' आम्ही स्वतः ही शस्त्रक्रिया अजमासे पाच वर्षांपूर्वी करवून घेतली व आमचेवर कोणताही अनिष्ट परिणाम झालेला नाही ' असे त्यांनी सांगितले आहे.

रघुनाथरावांचे व्यक्तित्व पारदर्शक होते. त्यामुळेच त्यांनी आपल्या पोटात मेद वाढला होता, दोन्ही मूत्रवाहक नलिकांमध्ये मूतखडे झाले होते, अंगावर काही दिवस एक्झिमा होता (एप्रिल, १९३९) आपण पोर्ट वाईन वा बीअर घेत होतो हे सारे त्यांनी मनमोकळेपणाने वाचकांना सांगितले आहे. कुणा एका वाचकाचा चुकून एक रुपया जादा आला आहे तो त्याने खात्री पटवून घेऊन जावा आणि सांगलीच्या एस. ए. कुळकर्णी यांनी पाकिटातून आपण पाच रुपये पाठविले हे कळवल्यावर त्यांनी कुलकर्णी यांना लिहिले की, आम्ही वारंवार पाकिटातून पैसे पाठवू नका असे सांगूनही तुम्ही तसे वागलात. पैसे कुणाच्याही हाती लागू शकतात असे कळविले तर कुलकर्णी यांनी रघुनाथराव खोटे बोलत असतील अशी शंका व्यक्त केली. त्यावर चिडून त्यांनी लिहिले : ' स्वातंत्र्य आणि स्वाभिमान राखण्याकरिता आजपर्यंत तीन वेळा नोकरी सोडल्यानंतर आमचेबद्दल अशा प्रकारचा संशय घेणारे हे गृहस्थ निघाले... '



एन ४७८८—९अ

१९४४ साली कागदाची टंचाई तीव्रतेने जाणवू लागल्यावर त्यांना कमी पानांचे अंक काढावे लागले तर जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९४४ हा जोडअंक त्यांनी प्रसिद्ध केला तेव्हा प्रत्येक वर्गणीदाराच्या वर्गणीत आणखी दोन अंक पाठवण्यात येतील अशी सूचनाही त्यांनी केली.

मुंबईच्या गोदीतील आगबोटीत झालेल्या बॉम्बस्फोटामुळे घाबरून जाऊन कामगार पळाल्याने नाट्यमहोत्सवाचा मंच पूर्ण तयार न झाल्याने मर्यादित नाटके करावी लागली ही नोंद ते करतात. लोकलगाड्यांना असलेला तिसरा वर्ग सरकारने रद्द करून पहिला व दुसरा वर्ग ठेवला हा लोकांकडून पैसा उकळण्याचा एक मार्ग आहे असे त्यांनी म्हटले आहे. नभोवाणीवरील वशिलेबाजीचा उल्लेख करीत आता सर्वत्र ती बोकाळली असल्याचे त्यांनी म्हटले आहे. (ऑक्टोबर, १९५३) तर पुणे विद्यापीठात पदवीदान समारंभात संस्कृत भाषेचा वापर करण्यात आला. संस्कृत ही मृत भाषा असून तिचा गौरव विद्यापीठाने केला म्हणून त्यांनी निषेध व्यक्त केला आहे.

मुंबईत झालेल्या दंग्यासंबंधी ' ....आता ही गुंडगिरी नको म्हणून थांबणार कशी ? आग लावणे सोपे असते, ती विझवणे कठीण असते. काँग्रेसच्या गुरूची विद्या त्यांनाच भोवली नाही म्हणजे पुरे. मुंबईत ज्या बेअकली लोकांनी दंगा केला, त्यांनी कोणाचे नुकसान केले? अर्थात ज्यांनी सोन्या चांदीची, दारूची, धान्याची दुकाने लुटली, ते चोर, लुटारू आणि दरोडेखोरच समजले पाहिजेत. पण ज्यांनी ट्राम, बस आणि खाजगी गाड्या जाळल्या ते काही नुसते मवाली नव्हते ते काँग्रेसवाले किंवा त्यांचेच शिष्य होते.' (एप्रिल, १९४६, पृ. २२६).

रघुनाथराव अभ्यासिकेत बसून लेखन करणारे लेखक नव्हते तर समकालीन दाहक वास्तवाला अंगावर घेण्याची चिवट जिद्द असलेले ते प्रचारक आणि कार्यकर्ते होते.

**प्रवर्तकत्वाचा निर्विवाद मान :**

१९२१ साली मुंबईत परळ भागात रघुनाथरावांनी 'संततिनियमन' केंद्र काढून त्या आणि त्याच्याशी संबंधित विषयाचे ज्ञान देण्याचे कार्य सुरू केले. गोपाळ गणेश आगरकरांनी त्यापूर्वी या विषयावर लेखन केले होते. हे विषयच असे होते की, यासंबंधी

बोलायचे नाही असा जणू संकेतच होता 'काळोखातील व्यवहार' या दृष्टीने तेव्हा त्याकडे पाहिले जात होते. संस्कृतमध्ये वात्सायनाने 'कामसूत्र' लिहिले होते. शिवलीलामृत-सारख्या ग्रंथात 'स्त्रीशी समागम करताना ती रोगट नसावी' असे लिहिल्याचे दिसते. रघुनाथपंडिताच्या 'नल-दमयंती स्वयंवरात' आपण 'पुरुषायित करू' असे दमयंती नळाला सुचविते. सामराज, नागेश व विठ्ठल कवींनी लिहिलेल्या स्वयंवरकाव्यात स्त्रियांचे हस्तिनी, पद्मिनी वगैरे प्रकार पाडून वर्णने करण्यात आली आहेत. 'बटकीच्या पोरी दोन वय सोळाच्या सुरतकर्मात पारंगत' अशा पाठवून द्याव्यात असे राघोबादादाने आपल्या सरदाराला लिहिलेले पत्र आढळते. नाना फडणवीस यांनी 'आत्मचरित्रात' आपल्या मातुल घराण्याकडून आपल्यात अतिरिक्त कामवासना मिळाली असे लिहिले असले तरी एकूणच यासंबंधी फारसे बोलायचे नाही, लिहायचे नाही अशी आपल्या संस्कृतीची धारणा होती. उलट 'धमार्थकाममोक्ष' हे आमच्या पूर्वजांनी चार महत्त्वाचे खांब सांगितले होते. वयात आल्यावर ज्या विषयासंबंधी जिज्ञासा उत्पन्न होते आणि शरीर तो अनुभव घ्यायला आतुरलेले असते आणि हे अगदी साठीनंतरही काहींच्या बाबतीत टिकून राहते त्याविषयीच्या बऱ्यावाईट बाजूंबद्दल या समाजात कोणतीही शास्त्रीय माहिती देण्या-घेण्याची सोयच नव्हती. आपल्या समाजातील हा मोठा दोष रघुनाथरावांना प्रकर्षाने जाणवला. कोणत्याही क्षेत्रात पद्धतशीर प्रचार आणि प्रसार करायचा असल्यास प्रत्यक्ष कार्यात उडी घ्यावी लागते. तळ्याच्या काठावर बसून पोहता येत नाही, त्याकरता पाण्यात उतरावेच लागते. मग त्यातील खाचाखोचा, अडीअडचणी व त्यावर करायची मात हे सारे कळते व सुचते. संततिनियमनावर ना. सी. फडके यांनी मराठीत व इंग्रजीत पुस्तके लिहिली.[२] पण मूलतः ते व्यवसायाने प्राध्यापक होते. या समाजाने प्राध्यापकाची जी एक प्रतिमा निर्माण केली आहे. तिच्या चौकटीत राहूनच त्यांना वागावे लागले ; आणि आपल्या विद्यार्थिनीवर प्रेम करून दुसऱ्या लग्नाचा घाट त्यांनी घातला व त्यात ते यशस्वी झाले तरी समाजात त्यांचा बदलौकिकच झाला. कथा, कादंबरी म्हणजे 'लेखन' हाही त्यांनी धर्म मानला. संततिनियमनासाठी त्यांची ऊर्जा विलक्षण क्षीण ठरली.

रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांनी १९०७ सालच्या ऑक्टोबर व नोव्हेंबर च्या 'मासिक मनोरंजन' च्या अंकात 'स्त्री-पुरुष समागम' शीर्षकाचे दोन लेख प्रसिद्ध

केले. या विषयासंबंधी त्यांची आस्था महत्त्वाची होती आणि दृष्टी पुरोगामी होती. पण मुळात ते बडोद्याला गायकवाडांकडे १८८९ ते १९२५ पर्यंत म्हणजे ३७वर्षे ' रीडर ' होते व युवराजांचे ' ट्यूटर ' म्हणून ते सेवेत होते. त्यांनी प्रायः लिहिल्या त्या रियासती : मग त्या ' मुसलमानी रियासत ', ' मराठी रियासत ' व ' ब्रिटिश रियासत ' अशा १३ खंडात त्यांनी लेखन केले, काही वेळा बडोदा नरेशांबरोबर त्यांना भारतभर, इंग्लंड वा युरोपमध्ये प्रवास करावा लागला. १९२५ नंतर ते कामशेत येथे इतिहाससंशोधनात गढले. म्हणजे रियासतकारांना संततिनियमनाच्या विषयांची जाण होती; परंतु त्यांचे लेखनक्षेत्र प्रायः इतिहास हे राहिले.

कॅप्टन ए. पी. पिल्ले हे प्रथम सोलापूरला वैद्यकीय व्यवसाय करीत होते. त्यांनी आपली एक नर्स मुंबईस पाठवून तिला रघुनाथरावांकडून संततिनियमनाचे शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले व ती परत आल्यावर प्रथम सोलापूरला केंद्र सुरू केले. १९३६ साली त्यांनी परळ भागात केंद्र सुरू केले व आपणच असे केंद्र प्रथम सुरू केल्याची फुशारकी रघुनाथराव हजर असतानाही केली. तिथे उपस्थित असलेल्या गुजराती स्त्रियांनी ही चूक त्यांच्या नजरेस आणून दिली. त्यांनी ' मॅरेज हायजिन ' नावाचे नियतकालिक चालवले होते व त्यांचा मिसेस हाउ मार्टिन, मार्गारेट सँगर यांच्याशी परिचय होता. पण ही गोष्ट फार पुढची झाली, कारण रघुनाथरावांनी १९२१ सालीच केंद्र सुरू केले होते.

स्वतः रघुनाथराव तर प्राध्यापकी वा लेखन सोडून त्यांच्याकडे आलेल्यांचे शंकानिरसन करीत; पण त्याबरोबरच त्यांनी त्यांच्या पत्नी मालतीबाई यांनाही तयार केले होते. त्यांच्या संदर्भात एका वाचकाने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी लिहिले, ' या बाई हे काम आमचे देखरेखीखाली १० वर्षे करीत आहेत, त्यांस पुरेसा अनुभव आहे असे समजण्यास हरकत नाही. ' असेच केंद्र पुण्यात रघुनाथरावांच्या प्रेरणेने शकुंतलाबाई परांजपे चालवत. ' शकू संततिनियमनाच्या आचारविचाराच्या प्रचाराचे काम आज कैक वर्षे मोठ्या हिरिरीने करीत आहे. या कामाचे तिचे स्फूर्तिस्थान म्हणजे कै. श्री. र. धों. कर्वे (ती. आण्णांचे थोरले चिरंजीव) हे होत. शहरातून काम पण खेड्यापाड्यांतूनदेखील या तिच्या प्रचारकार्याचा चांगला परिणाम दिसायला लागला

आहे. ' असे रँग्लर परांजपे यांनी लिहिले आहे. हे सारे लक्षात घेतले तर संततिनियमनाचे प्रत्यक्ष कार्य व लोकांमध्ये त्याचा प्रसार व्हावा म्हणून मासिक चालवणे, ग्रंथलेखन करणे हे पाहिले की, त्याच्या प्रवर्तकत्वाचा मान निस्संशयपणे रघुनाथरावांकडे जातो.

---

## तळटिपा

१. आगरकरांच्या मागे बुद्धिवादाचा हिरिरीने प्रचार मी एकट्यानेच केला असे मी नुकतेच लिहिले, तेव्हा ती कित्येकांना दर्पोक्ती वाटली, परंतु दुसरा कोणी मला तर दिसत नाही. (एप्रिल १९४८) असे त्यांनी लिहिले म्हणजे त्यांच्या विधानाला तेव्हा मान्यता न मिळता उलट ती अनेकांना दर्पोक्ती वाटली, हे मराठी माणसाच्या क्षुद्रवृत्तीचे द्योतक म्हटले पाहिजे. आज मात्र रघुनाथरावांचे हे विधान सर्वमान्य झाल्याचे दिसते.

२. ना. सी. फडके यांनी लिहिलेल्या ' संततिनियमन ' या पुस्तकावर रघुनाथरावांनी ' समाजस्वाथ्या 'मध्ये काय अभिप्राय दिला आहे तो पाहा :

' प्रो. (ना. सी.) फडके यांनी ' संततिनियमन ' पुस्तकाचे नाव चोरून त्याच नावाचे एक पुस्तक प्रसिद्ध केल्याला आज काही वर्षे झाली. व्यासंगाशिवाय धंदेवाला लेखकही भलत्याच विषयावर पुस्तक लिहू गेल्यास त्याने त्यात अत्यंत हास्यास्पद चुका केल्यास नवल नाही. परंतु इतकी वर्षे मध्ये गेल्यावर नवीन इंग्रजी ग्रंथातही त्याच हास्यास्पद चुकांची पुनरुक्ती करावी हे लांछनास्पद आहे. आमच्याशिवाय सर्वांनी या ग्रंथाचे परीक्षण करताना त्याची स्तुतीच केली आहे. यावरून या विषयाबद्दल सर्वत्र अज्ञान पसरले आहे इतकेच सिद्ध होते. अमेरिकन बर्थ कंट्रोल लीगच्या अध्यक्ष मिसेस मार्गारेट सँगर यांनी (संबंध पुस्तक न वाचता) त्याला प्रस्तावना लिहिली व फडक्यांसारख्या 'कसलेल्या' लेखकाने ग्रंथ लिहिला तेव्हा तो उत्तम कसा नसेल ? एवढ्यावरच बहुतेकांनी मते ठोकून दिलेली आहेत.. दुनिया झुकती है ' (समाजस्वास्थ्य, सप्टेंबर १९२८, पृ. ७१-७२).

## र. धों. कर्वे यांची ग्रंथसंपदा :

(१) संततिनियमन-विचार व आचार, राइट एजन्सी, मुंबई-४, १९२३.

(२) गुप्तरोगांपासून बचाव-विचार व आचार, राइट एजन्सी, मुंबई-४, १५ सप्टेंबर १९२७.

(३) समाजस्वास्थ्य मासिकातील निवडक लेख, भाग : १, राइट एजन्सी, मुंबई-४, २९ एप्रिल १९३१.

(४) आधुनिक कामशास्त्र, राइट एजन्सी, मुंबई-४, मे १९३२

(५) समाजस्वास्थ्य मासिकातील निवडक लेख, भाग-२, राइट एजन्सी, मुंबई-४, १८ ऑक्टोबर १९३३.

(६) त्वचेची निगा, राइट एजन्सी, मुंबई-४, १९३५

(७) आधुनिक आहार शास्त्र, राइट एजन्सी, मुंबई-४, १८ सप्टेंबर १९३८

(८) वेश्याव्यवसाय, राइट एजन्सी, मुंबई-४, १ जून १९४७

(९) क्लैब्याची मीमांसा, राइट एजन्सी, मुंबई-४, सन १९४९

(१०) गुरुबाजी, राईट एजन्सी, मुंबई-४, ५ जानेवारी १९३७

(११) न्यायाचा शोध, राइट एजन्सी, मुंबई-४, १९४६

(१२) पॅरिसच्या परी, धरित्री प्रकाशन, १९४६

(१३) तेरा गोष्टी, राइट एजन्सी, मुंबई-४, जून १९४०

## जीवनपट :

| | |
|---|---|
| १४ जानेवारी १८८२ | मुरुड, जि. रत्नागिरी येथे जन्म |
| १८८४-१८८५ | आई राधाबाईबरोबर मुंबईला आंग्र्यांच्या वाडीसमोर गोपिनाथ खत्र्याच्या चाळीत वरच्या मजल्यावर नरहरपंत जोशी यांनी भाड्याने घेतलेल्या खोलीत संयुक्त कुटुंबात. राधाबाई रघुनाथला शिकवीत. पुढे नियमित मास्तर घरी शिकवी. |
| १८९० | मुरूडजवळ बुरोंडी येथे बाळकृष्ण वामन आचवल यांच्याकडे आचवल छडीने मारीत. |
| १८९१-१८९२ | पाचवी पास झाल्यावर एकदीड वर्षाने मुंबईस मराठा हायस्कूलमध्ये शिक्षण. मुंज काशिनाथपंत काणे, माहीम, मुंबई यांच्याकडे अण्णांनी आई आणि पत्नी राधाबाई यांचे मन वळवून. |
| १८९१ | राधाबाईंचा मुरुड येथे मृत्यू. मुंबईला अण्णांनी रघुकरवी विधी केले.<br>न्यू इंग्लिश स्कूल : इतिहास, भूगोलात नापास. अण्णांनी घरी ते विषय स्वतः शिकवले. |
| १८९७ | पुण्यात प्लेग, अण्णा, बाया, रघू व शंकर उन्हाळयाच्या सुट्टीत अमरावतीला |
| १८९९ | मॅट्रीक. पहिला नंबर |
| १८९९-१९०४ | फर्ग्युसन कॉलेज वसतिगृहात, प्रिव्हियस, इन्टरला पहिला वर्ग : फर्ग्युसन कॉलेज शिष्यवृत्ती. |
| १९०४ | बी.ए. |
| १९०५ | एम.ए. पहिले वर्ष : शिष्यवृत्ती नाकारली गेली. |

| | |
|---|---|
| १९०६ | ट्रेनिंग कॉलेज, मुंबई, एस.टी.सी.डी. नेल्सन जे. फ्रेझर यांच्याशी परिचय. |
| | एल्फिन्स्टन मिडल स्कूल, मुंबई शिक्षकाची नोकरी, एक वर्ष. |
| | नॉर्थकोट हायस्कूल, सोलापूर, शिक्षक (सहा महिने) |
| १९०८ | एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई, गणिताच्या प्राध्यापकांचे साहाय्यक (१९१७ पर्यंत). |
| १९०८-१९०९ | एम.ए. (गणित) |
| १९१० | गंगू गोडेशी लग्न (शंकररावांनी धोंडांना सांगितलेली माहिती) १९११ : य. दि. फडके. |
| १९१४ जुलै | ‘ दोन बहिरे ’ प्रहसन ‘ मासिक मनोरंजन ’ मध्ये प्रसिद्ध. |
| १९१७ | कर्नाटक कॉलेज, धारवाड : असिस्टंट प्रोफेसर पदोन्नती मिळाली. |
| १९१९ | फर्लो रजा घेऊन दीड वर्ष पॅरिसला. |
| १९२० | अखेर ‘ द दिप्लोअ एत्युस्पेरिअल ’ : पदविका. |
| | अखेरीस : भारतात परत. डेक्कन कॉलेज, पुणे येथे बदली. |
| १९२० | गुजरात कॉलेज, अहमदाबाद बदली |
| १९२१, २० मे च्या आधी | सरकारी नोकरीचा राजीनामा. परळ भागात संततिनियमन केंद्र काढले, राईट एजन्सीची सुरुवात, संततिनियमनावर इंग्रजी व मराठीतून पुस्तिका. |
| १९२२ | विल्सन कॉलेज, मुंबई गणिताचे अर्धवेळ प्राध्यापक म्हणून नेमणूक. |
| १९२३ मे, जून | ‘ मासिक मनोरंजन ’मध्ये ‘ तरला ’ नाटक प्रसिद्ध. |
| | संततिनियमन विचार व आचार : प्रसिद्ध. |

| | | |
|---|---|---|
| १९२४ | जून | विल्सन कॉलेज, मुंबई, पूर्णवेळ प्राध्यापक |
| १९२५ | | ' किर्लोस्कर खबर ' मध्ये ' अमर्याद संतती ' लेख प्रसिद्ध |
| | ऑक्टोबर | राजीनामा. |
| | | शिकवण्या. |
| १९२५-१९२६ | | बी. टी. होण्याकरिता भास्करराव कर्वे एक वर्ष रघुनाथरावांकडे. |
| १९२६ | | स्वतः मोटर शिकून भाड्याने चालविण्याचा विचार. |
| | एप्रिल | नैरोबीस शंकररावांकडे (५/५।। महिने) |
| | | शिक्षणखात्यात अर्ज आणि नकार |
| | | 'द डेमॉक्रॅट'चे संपादन |
| | | स्वतःवर शस्त्रक्रिया (वय ४४) |
| | ऑक्टोबर/नोव्हेंबर | मुंबईत परत. |
| | डिसेंबर | 'बॉम्बे बेहरिन कंपनीत ' व्यवस्थापकांचे साहाय्यक म्हणून नोकरी. |
| १९२७, १५ जुलै | | 'समाजस्वास्थ्य 'ची सुरुवात. |
| | | ' विनय म्हणजे काय? ' किर्लोस्करने नाकारलेला लेख प्रसिद्ध. |
| | | 'गुप्तरोगापासून बचाव : विचार व आचार' प्रसिद्ध. |
| १९२८ | | मालतीबाई पर्निशियस ॲनिमियाने आजारी. |
| १९३१ | एप्रिल | 'समाजस्वास्थ्या'तील निवडक लेख, भाग-१ प्रसिद्ध. |
| | सप्टेंबर | ' व्यभिचाराचा प्रश्न ' प्रसिद्ध. |
| | डिसेंबर | अश्लीलतेचा पहिला खटला. |
| १९३२ | मार्च | 'सेंट्स अँड फकीर्स' ' रीझन 'मध्ये प्रसिद्ध. |
| | जुलै | 'शारदेची पत्रे' सदर सुरू. |
| | ऑक्टोबर | 'आधुनिक कामशास्त्र' प्रकाशित निवडक लेख, |
| | | ' आमची विवाह संस्था ' धुरू हॉल दादर येथे व्याख्यान. |
| १९३३ | ऑक्टोबर | ' समाजस्वास्थ्या 'तील निवडक लेख भाग-२ प्रकाशित. |

| | |
|---|---|
| १ मे | 'बॉम्बे बेहरिन कंपनी' च्या नोकरीचा राजीनामा |
| १९३४ फेब्रुवारी | 'समाजस्वास्थ्य' (गुजराती) मधील पत्रांवर खटला. |
| मे | श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांची पुण्यात भेट |
| | अकोला येथे दोन भाषणे. |
| १९३५, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर | 'मिसेस हाउ मार्टिन/मार्गारेट सँगर यांच्या भेटी. |
| | अप्पा पेंडसे यांच्याशी वाद. |
| १९३६ जून | कॅप्टन पिल्ले यांचा कटू अनुभव |
| १९३७ जानेवारी | 'गुरुबाजी' नाटक प्रसिद्ध |
| जुलै | 'समाजस्वास्थ्य' ला १० वर्षे पूर्ण दुप्पट पाने देऊन अंक |
| | 'रीझन' चे संपादन. |
| मार्च | ठाणे येथे व्याख्याने |
| डिसेंबर | थत्ते वादाला सुरुवात |
| | किर्लोस्कर-इचलकरंजीकर वादावरील मुंबईत झालेल्या चर्चेत सहभाग. |
| १९३८ एप्रिल-सप्टेंबर | 'कामकला' पुस्तकाच्या 'समाजस्वास्थ्य'मधील जाहिरातीमधून थत्त्यांना इशारा. |
| सप्टेंबर | प्रकृती रक्तदाबाने बिघडली. कच्चा आहार सुरू केला. |
| | 'आधुनिक आहारशास्त्र' प्रकाशित. |
| १९३९ एप्रिल | नगर येथील साहित्य संमेलनाला उपस्थित |
| | तिसरा खटला. 'कामकला' जाहिरातीतील 'अप्राकृतिक संभोग' शब्दावरून. |
| मे | अश्लीलतेसंबंधीची चौकट 'समाजस्वास्थ्यच्या' प्रारंभी द्यायला सुरुवात. |
| सप्टेंबर | 'आधुनिक आहारशास्त्र' ला पारितोषिक (विभागून) |
| १९४० जून | : 'तेरा गोष्टी' प्रसिद्ध |
| जून | 'वेश्याव्यवसाय' प्रसिद्ध |
| | ह. वि. देसाई यांना दोन मुलाखती दिल्या. |

| | |
|---|---|
| नोव्हेंबर | रत्नागिरी साहित्य संमेलनात उपस्थिती |
| | कल्याण साहित्य संमेलनात उपस्थिती |
| १९४१ | सोलापूर येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनास हजर |
| १९४१-१९४२ | 'कामविषयक स्वातंत्र्याचा पाया' ही 'जीवन' मासिकात लेखमाला. |
| ऑक्टोबर | मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात 'पुरोगामी साहित्याचा निकष' या विषयावरील चर्चेत सहभाग. |
| १९४३ | कोल्हापूर येथे झालेल्या 'मराठी पत्रकार परिषदे'स उपस्थित. |
| मार्च | 'दोन बायका विशेषांक' |
| | वाङ्मय समीक्षा हे लेखन दक्षिण महाराष्ट्र साहित्य पुरस्कार समिती, फलटणला सादर. |
| | डच कॅपच्या आयातीसाठी सरकारकडे मागितलेला परवाना नामंजूर. |
| १९४४ एप्रिल | मराठी रंगभूमीच्या शंभरीच्या महोत्सवाला उपस्थित. |
| | 'समाजस्वास्थ्य' चा ऑगस्ट-सप्टेंबर-ऑक्टोबर जोडअंक. |
| १४ ऑक्टोबर | मालतीबाईंचा मृत्यू. |
| १९४५ | दक्षिण महाराष्ट्र साहित्य पुरस्कार समितीला 'मानसशास्त्र' विषयावर निबंध सादर. |
| ऑक्टोबर | पी. ई. एन. संस्थेचा राजीनामा. |
| | मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलनाला हजर. |
| १९४६ | 'न्यायाचा शोध' : नाटक प्रसिद्ध. |
| | 'पॅरिसच्या परी' प्रसिद्ध. |
| | नाट्यमहोत्सवाला उपस्थित. |
| १९४७ फेब्रुवारी | नाट्यमहोत्सवाला उपस्थित. |

| | | |
|---|---|---|
| १९४९ | | ‘ क्लैब्याची मीमांसा’ प्रकाशित |
| १९५० | | नाट्यमहोत्सवाला उपस्थित. |
| १९५१ | | पहिली ‘अखिल भारतीय संततिनियमन परिषदे’ला उपस्थित. तिथे स्वानुभव कथन करावे ही त्यांना सूचना करण्यात आली. वेळेअभावी त्यांचे भाषण झाले नाही. |
| १९५२ | १४ जानेवारी | सत्तरीच्या निमित्ताने सत्कार : अध्यक्ष न्यायमूर्ती एम.सी. छगला. त्यानिमित्ताने श्री. के. क्षीरसागर व श्री. शं. नवरे यांचे रघुनाथरावांवर लेख प्रसिद्ध. |
| | २० जुलै | ‘ समाजस्वास्थ्य ’ला २५ वर्षे पूर्ण. ब्लॅन्हॅटक्सी लॉज येथे स. का. पाटील यांच्या हस्ते सत्कार. ५६०० रुपयांची देणगी. अ. ह. लिमये व शि. न. कोल्हटकर यांचे विशेष परिश्रम. ना. सी. फडके यांचा ‘ नवभारत ’मध्ये गौरवपर लेख. |
| १९५३ | १० ऑक्टोबर | गिरगावच्या ‘ सारस्वत ब्राह्मण समाजां ’ त प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमात सहभाग. अस्वस्थ वाटल्याने इस्पितळात रवाना. शुद्ध हरपली. |
| | १४ ऑक्टोबर | मृत्यू. त्याच दिवशी ‘ समाजस्वास्थ्य ’ चा ऑक्टोबरचा अंक वाचकाना मिळाला. |
| १९५३ | नोव्हेंबर | रघुनाथरावांनी आधीच तयार करून ठेवलेल्या अंकाला ‘ समाजस्वास्थ्य ’च्या अवतारसमाप्तीची घोषणा करणारे संपादकीय भास्कररावांनी लिहिले. |

**‘ समाजस्वास्थ्य ’विषयी :**

| | |
|---|---|
| ‘ पत्रव्यवहार ’ सदराला सुरुवात | डिसेंबर, १९२७ |
| ‘शारदा’ सदराला प्रारंभ | जुलै, १९३३ |
| गृहकर्मे | एप्रिल, १९३८ |
| ग्रंथ परीक्षणे | नोव्हेंबर, १९२७ |
| कथा | जुलै, १९३३ |
| अंक दुप्पट + छायाचित्रे | जुलै, १९३७ |
| शकुंतला परांजपे यांचे लेखन साहाय्य | ऑक्टोबर, १९३८ |
| कविता | मार्च, १९३८ |
| कथास्पर्धा जाहिरात/बक्षीस : सनातनीमत, अनंत कृष्ण बापट बल्लारपूर | सप्टेंबर १९३९/जाने. ४० |
| व्हिकतर मार्गरीन यांची संततिनियमनावरील कादंबरी | १९२९ |
| अप्पा पेंडसे वाद | जुलै, १९३५ |
| कुमारिकेचे मूल नाटिका (श.प.) | जानेवारी, १९३९ |
| ‘ अश्लीलते ’विषयीची चौकट ‘ समाजस्वास्थ्य ’च्या पहिल्या पानावर सुधारणेच्या मार्गातील खाचखळगे (लेखमाला) | मे, १९३९<br>जून, १९४१ |
| दोन बायका विशेषांक | मार्च, १९४३ |
| मालतीबाई कर्वे यांनी केलेले परीक्षण | सप्टेंबर, १९४० |
| सं. पांघरलेली कातडी (श.प.) | डिसेंबर, १९४२ |
| जोडअंक | ऑग.-सप्टें.-ऑक्टो. १९४४ |

## संदर्भ ग्रंथ :

(१) ‘ र. धों. ’ : ८ पुस्तकांचा संच : लेखक, संपादक, संशोधक : डॉ. अनंत देशमुख, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१०.

(२) र. धों. कर्वे : व्यक्तित्व आणि कर्तृत्व : डॉ. अनंत देशमुख, मैत्रेय प्रकाशन, मुंबई, २०१०.

(३) र. धों. कर्वे : यशवंत दिनकर फडके, ह. वि. मोटे प्रकाशन, पुणे-४, १९८१.

(४) आत्मवृत्त व चरित्र : धोंडो केशव कर्वे, ना. म. पटवर्धन, हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था, पुणे-४, १९५८.

## नियतकालिके :

‘समाजस्वास्थ्य’चे अंक

मनोहर, फेब्रुवारी १९३८,

ललित, जून २०११.

●●●